मा.
मराठी ग्रंथ संग्रहालय,
( जिल्हा वाचनालय )
…काचे नांव — काव्यरत्नावली
संपादक —
…क क्रमांक — सन १९०५ सन — १९०५
अंक —
( महिने ) १ ते १२
८०
२०६
२e
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. जुनी मासिके ( संदर्भ )

# अनुक्रमणिका.

कवि, विषय व पद्यसंख्या


१ विनायक कवि. ( कविता ५३२ )

| | | |
|---|---|---|
| ९४ | कृष्णाकुमारी | ६८ |
| ८ | नदी आणि कवि | ९१ |
| १०२ | ध्यास तो भास | ९७ |
| १०२ | गणिकोद्धार | ११६ |
| ८ | नागपंचमी | १२५ |
| १०२ | वीरमती | १२९ |
| १०५ | मोहानंतर | १४५ |
| ११ | शिवसंदेश | १८७ |

२ माधवानुज ( कविता १५३ )

| | | |
|---|---|---|
| ५३ | मेघनादवधकाव्य ( सर्ग ३ रा ) | १५४ |
| ९६ | मेघनादवधकाव्य ( सर्ग ४ था ) | १७९ |
| ४ | अन्योक्तिमाला | १९२ |

३ श्रीपाद नारायण मुजूमदार बी. ए. ( १३० )

| | | |
|---|---|---|
| १३० | वसंतचंद्रिका | १६१ |

४ विहंगम ( कविता १३१ )

| | | |
|---|---|---|
| ३० | आगपेटीस | २७ |
| १२ | मानवीदौर्बल्य | ६१ |
| १८ | गायीचा अकबर बादशहास अर्ज | १०६ |
| ३४ | सिद्धांतत्रयोदशी | १४२ |

१६० (partial)
१७६ (partial)
...खर ( कवितेचा निरोप ) १७७

...लक्ष्मण अंतरकर ( कविता ११६ )
...६३ मेघदूतच्छाया पूर्वमेघ १
९३ मेघदूतच्छाया उत्तरमेघ १७

६ भृंग ( कविता ९१ )
१० सज्जनाची थोरवी ४३
६९ मोहपाश ६९
९ पद्यरचनेचा ओनामा ९४
२ सुभाषित १२८
५ सुभाषित १७६

७ विष्णु गणेश नेने ( कविता ७० )
२३ ईशदर्शन गुच्छ १ ला ३३
१७ " " गुच्छ २ रा ४९
१९ " " गुच्छ ३ रा ६९
१९ " " गुच्छ ४ था ८१

८ केशवसुत ( कविता ५३ )
३ चिरवियुक्ताचा उद्गार ३२
४ नवा शिपाई ४०
१२ मयूरासन आणि ताजमहाल ६३
१३ प्रीति ७९
३१ हरपलें श्रेय ८८

९ बा. सी. जोशी ( कविता ४२ )
३७ शरल्लीला ५२
९ सुभाषित ६४

१० मल्हार खंडेराव चिटणीस बी. ए. एल्. एल्. बी. ३७
१६ कर्तव्य–पंचदशी २९
२१ वेदाध्ययनानंतर शिष्यास गुरु उपदेश करिताल १७२

११ चंद्रशेखर ( कविता ३४ )
३४ तारातरंग १३८

१२ बाळकृष्ण अनंत भिडे बी. ए. ( कविता ३० )
९ गर्व व काळ ४९
२९ शांतीचा बोध ७५

१३ चक्रवाकू ( कविता २७ )
११ मेघास उद्देशून ४६
१६ जलप्रवाहास उद्देशून ११०

१४ कै बळवंत जनार्दन करंदीकर ( कविता २३ )
२ होळी ६२
२१ ही कोण माझी दशा ? ८४

१५ मोरो गणेश लोंढे ( कविता २२ )
१७ कविमित्रास पत्र १२२
९ मनोवृत्ति १८९

१६ य. त्र्यं धर्माधिकारी ( कविता २० )
२० वेश्या ७२

१७ पांडुरंग बाळकृष्ण दडकर ( कविता २० )
१२ कवीचें ऐश्वर्य ९१

८ सतारीस १२७

१८ गोविंद पांडरंग देवधर बी. ए. ( कविता १४ )
१४ मृग आणि वेणू १५९

१९ रंगनाथ एच. अधिकारी ( कविता १२ )
१० गायत्रीवंदन ४५
२ सुभाषित ९६

२० विष्णु बाबाजीराव कुळकर्णी ( कविता १२ )
१२ पतंगास ७८

२१ राजहंस ( कविता १२ )
१२ वरानें वधूला घातलेले दहा घास १०८

२२ वनवासी ( कविता ११ )
७ तारका ७४
४ निदान ९६

२३ नारायण ( कविता १० )
१० दुरितेच्छानिरसन ७६

२४ दातार ( कविता ८ )
८ बागेंतील फुलपाखरास १७४

२५ वा. वा गद्रे ( कविता ६ )
६ राष्टसंगीतलक्षण ११२

२६ शंकर कृष्ण ( कविता ६ )
६ निद्रा १९०

२७ चिंतामण माधव पिंपळसकर ( कविता ४ )
२ सुभाषित ३२
२ सुभाषित ४८

सं-भा-२५११८

# काव्यरत्नावलि.

... ग्रंथ संग्रहालय ... नं. ... ता. ... ठाणे.

## सालअखेर.

श्लोक.

माळी मूढ, नितांत शुष्क अवनी, तापे रवी अंबरीं,
मोठ्या वावटळीमुळें परुषता दाही दिशांभीतरीं.
ऐसें संकट चंपकावरि मरुप्रांतांत येतां, घना !
दैवें धाडियलें कसें तरि तुला द्याया तरी जीवना.

लक्ष्मण गणेश शास्त्री लेले.

स्थळप्रत ... ठाणे.

ईश्वराच्या कृपेनें काव्यरत्नावलीस आज १७ वर्षें पुरीं झालीं. सालअखेर संबंधानें अधिक जरी नाहीं तरी थोडासा हिशेब दाखविणें अगत्याचें आहे.

गेल्या दोन वर्षांत नियमितपणानें रत्नावली बाहेर पडली. हें आलिकडील प्रसिद्ध होत असलेल्या अंकांवरून वाचकांस दिसून आलेंच आहे. रत्नावली अगदीं नेमक्या तारखेस पोष्ट व्हावी अशी व्यवस्थाही लौकरच होईल अशी आह्मास उमेद आहे.

वर्गणीदारांच्या संबंधानें ह्या वर्षी मागील वर्षापेक्षां थोडे जास्त वर्गणीदार मिळाले आहेत. उत्तरोत्तर असाच आश्रय मिळत गेल्यास रत्नावलीचें दैन्य बरेंच दूर होईल. चालू वर्षांत आह्मास बरीच तूट आली आहे. ती आली नसती तर आह्मास बरीच मदत होती. परंतु कित्येक बुडव्या वर्गणीदारांनीं आह्मास बऱ्याच खर्चांत घातलें ! ह्या बुडव्या वर्गणीदारांची यादी आह्मी प्रसंगोपात लौकरच प्रसिद्ध करणार आहों. ह्या

बुडव्या वर्गणीदारांच्या पायीं पांचशें रुपयांचा चट्टा बसला ! बिचाऱ्या रत्नावलीस कोणत्याच प्रकारचें साह्य नाहीं. त्यांतून वरील प्रकारचें नुकसानानें तिची काय स्थिति असेल, याची कल्पनाच केली पाहिजे. हल्लीं थोडा बहूत जो आश्रय आहे, त्यावरच तिचें कसें बसें संगोपन चाललें आहे. तरी सततोद्योगानें रत्नावलीस बरीच चांगली स्थिति प्राप्त होईल अशी आशा आहे.

रत्नावलीचीं पृष्ठें वाढवून त्यांत कविते संबंधाचा गद्यात्मक भाग देण्याची आह्मी संमति दिली होती, परंतु त्याप्रमाणें आमच्या लेखकवर्गाकडून तयारी झाली नाहीं. आणि कदाचित् आमच्या लेखकबंधूंनीं आमच्या विनंतीस मानही दिला असता, परंतु थोड्या पृष्ठांत इतर लेखांचा समावेश झाला नसता; ह्मणून आह्मी त्या गोष्टीकडे कानाडोळा केला. रत्नावलीचीं पृष्ठें वाढवून तीं पृष्ठें कवितेकडे तरी लावणें फार अगत्याचें आहे. असें आह्मास वाटतें. त्या योगानें दर वर्षी कवितेचा संग्रह बराच होईल. रत्नावलीची सांपत्तिक स्थिति सुधारल्याखेरीज व तिला मोठें रूप मिळाल्याखेरीज गद्यात्मक विषयाचा समावेश करणें सर्वथैव इष्ट नाहीं. येत्या वर्षापासून रत्नावलीचीं पृष्ठें जास्त करण्याचा विचार आहे.

कवितेच्या संबंधानें विचार करितां बारा अंकांतील कविता २७ कवींकडून गुंफल्या गेल्या आहेत. एकंदर कवितेची संख्या १६१८ आहे. यांत विनायक कवीचीं चार आख्यानें, माधवानुजकृत मेघनादवधकाव्याचे दोन सर्ग, रा. रा. मुजूमदार यांची वसंतचंद्रिका, रा. रा. अंतरकर यांची मेघदूतच्छाया, भृंग कवीचा मोहपाश, रा. रा. नेने यांचें ईशदर्शनकाव्याचे ४ गुच्छ, चंद्रशेखर कवीचा तारातरंग हीं मोठीं प्रकरणें आपआपल्या गुणांची साक्ष देत आहे. या वर्षी मोठीं प्रकरणें बरींच गुंफलीं गेलीं आहेत. या प्रकरणांची संख्या १०७२ आहे. ही संख्या मूळ

कवितेंतून वजा केली तर ९४६ कविता किरकोळ प्रकरणांनीं लिहिली गेली आहे. यांत ३९७ कविता निवळ भाषांतरात्मक आहे यांत ही कविता मूळसंख्येंतून वजा केली तर १२६१ कविता केवळ स्वतंत्र कल्पनेची आहे. यावरून स्वतंत्र कवितेचें पाऊल बरेंच पुढें आहे असें दिसून येईल. कवितेच्या चांगुलपणाविषयीं वेळोवेळीं प्रसिद्ध झालेले अभिप्राय आह्मी प्रसिद्ध केले आहेत. तेव्हां आतां निराळें लिहिण्याचें कारण नाहीं.

या वर्षी रा. रा. मुजूमदार, रा. रा. चिटणीस, रा. रा. देवधर, रा. रा. अधिकारी, रा. रा. दातार, रा. रा. शंकर कृष्ण वगैरे नवीन कवींचा आह्मास लाभ झाला आहे. ते रत्नावलीवर पूर्ण लोभ ठेवतील अशी आशा आहे.

ह्या अंकांत दोन कवींची मृत्युवार्ता कळविण्याचा दुःखद प्रसंग आह्मास आला आहे, तो हा कीं केशवसुत आणि परशुराम नारायण बेहरे हे दोन कवि ह्या वर्षांत परलोकवासी झाले. बेहरे हे ता० २१ मार्च रोजीं पांचवड येथें प्लेगचे आजारानें मरण पावले. लहानशा खेड्यांत जरी ह्यांचें वास्तव्य होतें तरी त्यांनीं वेदाध्ययन उत्तम प्रकारें केलें होतें. यांची कविताशक्ति बरीच होती आणि ते पुढें चांगले कवि झाले असते. मरणसमयीं यांचें वय अवघें २२ वर्षांचें होतें. रत्नावलींत यांचीं एक दोनच प्रकरणें प्रसिद्ध झालीं आहेत.

केशवसुत यांच्या मरणानें रत्नावलीची जी हानि झाली आ[illegible]ताचे कधींही भरून येणार नाहीं. रत्नावलीच्या कविपंचरत्नापैकीं हें [illegible]त्र येथें मौलिक रत्न हरविलें. हरपलें श्रेय यांची कविता रत्नावलीं[illegible] पेनशनाला होय. यांनीं कविता अशी फारच थोडी लिहिली आहे[illegible]नंतर फैजपूर विचाराचा मराठी कवि यास ह्मटलें असतां अतिशयो[illegible] होते. पण तेथें नाहीं. यांच्या कवितेंतील थोर विचार पाहून मन [illegible]रून त्यास धारवाड

बुडव्या वर्गणीदारांच्या पायीं पांचशें रुपयांचा चट्टा बसला ! बिचाऱ्या रत्नावलीस कोणत्याच प्रकारचें साह्य नाहीं. त्यांतून वरील प्रकारचें नुकसानानें तिची काय स्थिति असेल, याची कल्पनाच केली पाहिजे. हल्लीं थोडा बहूत जो आश्रय आहे, त्यावरच तिचें कसें बसें संगोपन चाललें आहे. तरी सततोद्योगानें रत्नावलीस बरीच चांगली स्थिति प्राप्त होईल अशी आशा आहे.

रत्नावलीचीं पृष्टें वाढवून त्यांत कविते संबंधाचा गद्यात्मक भाग देण्याची आह्मी संमति दिली होती, परंतु त्याप्रमाणें आमच्या लेखकवर्गाकडून तयारी झाली नाहीं. आणि कदाचित् आमच्या लेखकबंधूंनीं आमच्या विनंतीस मानही दिला असता, परंतु थोड्या पृष्टांत इतर लेखांचा समावेश झाला नसता; ह्मणून आह्मी त्या गोष्टीकडे कानाडोळा केला. रत्नावलीचीं पृष्टें वाढवून तीं पृष्टें कवितेकडे तरी लावणें फार अगत्याचें आहे. असें आह्मास वाटतें. त्या योगानें दर वर्षी कवितेचा संग्रह बराच होईल. रत्नावलीची सांपत्तिक स्थिति सुधारल्याखेरीज व तिला मोठें रूप मिळाल्याखेरीज गद्यात्मक विषयाचा समावेश करणें सर्वथैव इष्ट नाहीं. येत्या वर्षापासून रत्नावलीचीं पृष्टें जास्त करण्याचा विचार आहे.

कवितेच्या संबंधानें विचार करितां बारा अंकांतील कविता २७ कवींकडून गुंफल्या गेल्या आहेत. एकंदर कवितेची संख्या १६१८ आहे. यांत विनायक कवीचीं चार आख्यानें, माधवानुजकृत मेघनादवधकाव्याचे दोन सर्ग, रा. रा. मुजूमदार यांची वसंतचंद्रिका, रा. रा. अंतरकर यांची मेघदूतच्छाया, भृंग कवीचा मोहपाश, रा. रा. नेने यांचें ईशदर्शनकाव्याचे ४ गुच्छ, चंद्रशेखर कवीचा तारातरंग हीं मोठीं प्रकरणें आपआपल्या गुणांची साक्ष देत आहे. या वर्षी मोठीं प्रकरणें बरींच गुंफलीं गेलीं आहेत. या प्रकरणांची संख्या १०७२ आहे. ही संख्या मूळ

कवितेंतून वजा केली तर ९४६ कविता किरकोळ प्रकरणांनीं लिहिली गेली आहे. यांत ३९७ कविता निवळ भाषांतरात्मक आहे यांत ही कविता मूळसंख्येंतून वजा केली तर १२६१ कविता केवळ स्वतंत्र कल्पनेची आहे. यावरून स्वतंत्र कवितेचें पाऊल बरेंच पुढें आहे असें दिसून येईल. कवितेच्या चांगुलपणाविषयीं वेळोवेळीं प्रसिद्ध झालेले अभिप्राय आह्मी प्रसिद्ध केले आहेत. तेव्हां आतां निराळें लिहिण्याचें कारण नाहीं.

या वर्षी रा. रा. मुजूमदार, रा. रा. चिटणीस, रा. रा. देवधर, रा. रा. अधिकारी, रा. रा. दातार, रा. रा. शंकर कृष्ण वगैरे नवीन कवींचा आह्मास लाभ झाला आहे. ते रत्नावलीवर पूर्ण लोभ ठेवतील अशी आशा आहे.

ह्या अंकांत दोन कवींची मृत्युवार्ता कळविण्याचा दुःखद प्रसंग आह्मास आला आहे, तो हा कीं केशवसुत आणि परशुराम नारायण बेहरे हे दोन कवि ह्या वर्षांत परलोकवासी झाले. बेहरे हे ता० २१ मार्च रोजीं पांचवड येथें प्लेगचे आजारानें मरण पावले. लहानशा खेड्यांत जरी ह्यांचें वास्तव्य होतें तरी त्यांनीं वेदाध्ययन उत्तम प्रकारें केलें होतें. यांची कविताशक्ति बरीच होती आणि ते पुढें चांगले कवि झाले असते. मरणसमयीं यांचें वय अवघें २२ वर्षांचें होतें. रत्नावलींत यांचीं एक दोनच प्रकरणें प्रसिद्ध झालीं आहेत.

केशवसुत यांच्या मरणानें रत्नावलीची जी हानि झाली आहे ती कधींही भरून येणार नाहीं. रत्नावलीच्या कविपंचरत्नापैकीं हें एक अमोलिक रत्न हरविलें. हरपलें श्रेय यांची कविता रत्नावलींत शेवटचीच होय. यांनीं कविता अशी फारच थोडी लिहिली आहे, परंतु स्वतंत्र विचाराचा मराठी कवि यास ह्मटलें असतां अतिशयोक्ति अगदीं होणार नाहीं. यांच्या कवितेंतील थोर विचार पाहून मन अगदीं आश्चर्यचकित

होऊन जातें. यांच्याविषयीं आह्मास बरेंच लिहावयाचें होतें, पण स्थलसंकोचामुळें आज तसें करितां येत नाहीं. त्यांचें चरित्र मिळण्याची मोठी पंचाईत पडली होती; परंतु आमच्या विनंतीस मान देऊन त्यांचे बंधु प्रो० मोरो केशव दामले एम्. ए. यांनीं आह्मास थोडीं टिपणें देऊन, आमची मनीषा पूर्ण केली याबद्दल त्यांचे आह्मी आभार मानून केशवसुत यांचें चरित्र थोडक्यांत येथें देतों.

केशवसुत यांचें सबंध व खरें नांव कृष्णाजी केशव दामले हें होय. यास आप्पा असेंही ह्मणत. यांचा जन्म सन १८६६ मार्च महिन्यांत झाला. यांच्या वडिलास केसोपंत दामले ह्मणत. रत्नागिरी जिल्ह्यांत हे सरकारी मराठी शाळेवर हेडमास्तर होते. यांची बहुतेक नौकरी रत्नागिरी जिल्ह्यांतच झाली. उत्तम रीतीनें नौकरी करून यांणीं तेरा वर्षे पेनशन भोगून १८९३ सालीं यांचा काळ झाला. केसोपंतास एकंदर बारा अपत्यें झालीं. त्यांत ७ मुलगे व ५ मुली. सर्वांत वडील चिरंजीव ११ वर्षांचे बुडून वारले. एक चिरंजीव अल्पवयांतच वारले. तिसरे चिरंजीव श्रीधरपंत हे जगन्नाथ शंकर शेट स्कालर होते. एलफिन्स्टन कॉलेजांतून बी. ए. होऊन लगेच बडोद्यास प्रथमच नवीन कॉलेज झालें; त्यांत संस्कृतचे प्रोफेसर नेमले गेले. परंतु दुर्दैवानें एकच वर्ष नौकरी करून सन १८८३ च्या जानेवारींत वारले ! चौथे चिंतोपंत हे मराठी सहावी इयत्ता पास होऊन गरीबीमुळें संसारांत पडले. ते हल्लीं परलोकवासी विश्वनाथ नारायण मंडलिक यांचे खोतीगांवावर आज वीस बावीस वर्षे नौकर आहेत. पांचवे आमचे चरित्रनायक कृष्णाजीपंत– ह्मणजे केशवसुत. सहावे प्रो० मोरो केशव दामले, हे उज्जन कॉलेजांत आहेत. सातवे रा. रा. सितारामपंत बी. ए. एल्. एल्. बी. हे कांहीं दिवस सयाजीविजय, इंदुप्रकाश, मराठा ह्या पत्रांत लिहित होते. हल्लीं ज्ञानप्रकाशांत लिहित असतात. हे फर्ग्युसन कॉलेजांत प्रो० झाले असून

संभाग्र २/१०

त्यांचा डे. ए. सोसायटीचा लाईफ मेंबर होण्याचा पुढें मागें विचार आहे. केशवसुत ह्यांच्या चार बहिणी हयात आहेत. यांच्या वडिलास ह्मणजे केसोपंत दामले यांस ३० रुपये पगार होता. कुटुंबांतील पसारा मोठा. तरी मोठ्या दक्षतेनें केसोपंत यांणीं आपला प्रपंच चालविला. जरी गरीबी होती, तरी केसोपंताची संसारस्थिति मोठी वर्णनीय व व्यवस्थेशीर रीतीची असे. येवढा प्रपंचाचा गाडा हांकूनही शेवटीं कर्ज ह्मणून तें कसें मुळींच नाहीं ! केसोपंताचा दरारा व शिक्षा मोठी कडक असे. एकंदर केसोपंताची राहणी संभावितपणाची व नेकाची असे. यांचें कुटुंब १९०२ सालीं वारलें. केशवसुत यांच्या घरासंबंधाची अशी थोडक्यांत हकीकत आहे.

कृष्णाजीपंताचा जन्म रत्नागिरी जिल्ह्यांत मालगुंड गांवीं झाला. सर्व मराठी विद्याभ्यास सन १८८२ पर्यंत खेड येथें झाला. पुढें बडोद्यास श्रीधरपंतापाशीं एक वर्षभर पर्यंत इंग्रजीचा अभ्यास झाला. नंतर श्रीधरपंताच्या मरणामुळें हे पुण्यास न्यूस्कूलमध्यें सन १८८४ ते १८८९ पर्यंत अभ्यासास राहिले. सन १८८९ मध्यें यांची मॅट्रिकची परीक्षा पास झाली. नंतर सन १८९० ते १८९६ पर्यंत मुंबईंत कॉमिसारिअट, दादर इंग्लिशस्कूल, ज्ञानोदयपत्र, गव्हर्मेंटटेलिग्राफकडे नौकरींत काळ गेला. सन १८९७ मध्यें त्यांणीं प्लेगमुळें नौकरी सोडली. यांचें लग्न सन १८८६ मध्यें झालें. चाळीसगांव येथील मराठी शाळेवर रा. रा. चितळे हे हेडमास्तर होते. हल्लीं चिपळूणास हे पेनशनर आहेत. हे कृष्णाजीपंताचे सासरे. ह्यांच्या संबंधानें कृष्णाजीपंत खानदेशांत आले. भडगांव येथें म्युन्सिपल इंग्लीशस्कूलमध्यें हे २० रुपयावर टीचर राहिले. पुढें पेनशनाला हक्क पोंचावा ह्मणून सेंकडरीटीचर्सएक्झामिनेशन दिली. नंतर फैजपूर येथें म्युन्सिपल इंग्लीशस्कूलवर ३० रुपयावर हेडमास्तर होते. पण तेथें यांचें न जमल्यामुळें यांणीं हैस्कूलांत बदली मागितल्यावरून त्यास धारवाड

हैस्कूलांत १९०३ मध्यें जागा मिळाली. तेथें ते शेवटपर्यंत होते. कृष्णाजीपंत हे हुबळीस त्यांचे चुलत चुलते रा. रा. हरी सदाशिव दामले यांजकडे गेले होते. तेथेंच दुर्दैवानें प्लेगचा हल्ला त्यांजवर पडून ता० ७ नोवेंबर १९०६ रोजीं दुपारीं वारले. त्यांतल्या त्यांत आश्चर्याची गोष्ट ही कीं त्यांचे कुटुंब बरोबर त्यांचे दहावे दिवशीं वारलें ! ह्यास तीन मुली ११, ८, ४ वर्षांच्या आहेत.

ह्यांनां कवितेची गोडी अगदीं लहानपणांत होती. पोथ्या वगैरे वाचण्याचा नाद यांनां फार असे. श्रीधरपंताचा सहवास बडोद्यास एक वर्षभर होता. श्रीधरपंत हे कांहीं कविता वगैरे करित त्या वाचण्याचा नाद व कवितेविषयीं उत्सुकता तेव्हां बरीच दिसून येत असे. सन १८९३ सालीं हे आपल्या मामाकडे नागपुरास तीन चार महिने होते. तेथें हल्लीं ख्रिस्ति झालेले प्रसिद्ध कवि नारायण वामन टिळक यांचा सहवास घडला. त्यावेळीं यांच्यांत कवितेचा उद्गम व स्फूर्ति दिसूं लागली. पुढें हे पुण्यांत न्यूस्कूलमध्यें अभ्यासास राहिले. तेथें इंग्रजी कवींचीं काव्यें यांनीं पुष्कळ वाचलीं व तेव्हांपासून हे कविता लिहिण्यास लागले. यांची कल्पनाशक्ति फार भव्य होती. हे त्यांच्या कवितेवरून चांगलें दिसतें. “ रांगोळी घालतांना पाहून ” ही एक त्यांची कविता रत्नावलींत प्रसिद्ध झाली आहे. ही कविता ते शाळेत जात असतां एका गृहस्थाची मुलगी दारापुढें रांगोळी काढित असतांनां त्यांणीं पाहिली. त्यावरून कल्पना करून त्याणीं ती कविता त्यावेळेस लिहिली. यावरून चांगला कवि साधारण गोष्ट सुद्धां किती बहारीनें वठवितो, हें एक सदर कविता उदाहरण आहे. न्यूस्कूलांत असतांनां ह्यांनां चित्रें काढण्याचाही फार नाद होता. वाटेल त्याचा Likeness ते अर्ध्या तासाचे आंत साधारण ओळख पटेल असा काढित. अभ्यासाकडे दुर्लक्ष करूनही ते टिळक, आगरकर, वगैरे शिक्षकांचे

[stamp]

Likenesses आपले नोटबुकांत काढीत. हें त्यांच्या अनेक साहाध्यायांनीं पाहिलेलें आहे. याप्रमाणें काव्यकला व चित्रकला यांमधील निकट संबंध व साधर्म्य त्यांचें ठायीं दिसत होतें. व हीच गोष्ट त्यांचे बंधु रा. रा. सितारामपंत यांचेमध्येंही दिसत आहे. रा. रा. सितारामपंताची एक कविता रत्नावलींत प्रसिद्ध झाली आहे. याशिवाय रा. रा. सितारामपंताच्या कविता मनोरंजन व विविधज्ञानविस्तार यांत आलेल्या आहेत, यावरून यांच्या घराण्यांत कवितेचा ओघ बराच दिसत आहे. कुटुंबाच्या गरिबीमुळें कृष्णाजी पंतास कॉलेजचा मार्ग स्वीकारतां आला नाहीं, ही मोठी दुःखाची गोष्ट होय. यांच्यांत स्वातंत्र्य, स्वावलंबन, निस्प्रहता, प्रेमळपणा व कुशाग्रबुद्धित्व हे गुण स्पष्ट दिसत होते. स्वावलंबनाविषयीं यांची एक अशी गोष्ट ऐकण्यांत आली आहे कीं, त्यांचे बंधु प्रो० मोरो केशव दामले याणीं एक वेळीं ह्यास प्रपंचास मदत व्हावी ह्मणून मनिआर्डरीनें कांहीं रकम पाठविली, परंतु ती त्याणीं न घेतां रा. रा. मोरोपंत यांजकडे परत केली ! यावरून यांचें स्वावलंबनत्व चांगलें दिसून येतें. त्यांची वृत्ति व्यवहारी दृष्टीनें विचित्र व विक्षिप्त असे. आणि याच योगानें कित्येक त्यांनां वेडसर समजत. परंतु मूळची त्यांची वृत्ति तशी नव्हती, हें आह्मी स्वानुभवानें सांगतों. दोन तीन वेळ त्यांचा आमचा भेटीचा प्रसंग आला पण त्यांच्यांत संकोचवृत्ति शिवाय आह्मांस दुसरें कांहीं आढळून आलें नाहीं. धारवाडास जातांना तुह्मी आमचेकडे मंडळीसुद्धां एक दिवस उतरावें ह्मणून आह्मी त्यास विनंति केली, पण केवळ संकोचवृत्तीनें त्याणीं ती अमान्य केली. आणि आमच्या कित्येक कविवर्गाच्या मागें व्यवहारी दृष्टीनें विचित्रपणा व विक्षिप्तपणा हा लागलेला आहे. पण तो सूक्ष्म दृष्टीनें क्षम्य आहे. असो. यांचें सर्व चरित्र त्यांचे बंधु लौकरच लिहिणार आहे. स्थलाभावामुळें आह्मास जास्त लिहितां येत नाहीं. कृष्णाजीपंताच्या कांहीं कविता संग्रहीं असलेल्या मिळाल्या आहेत असें ऐकतों. तरी त्या रत्नावलीकरितां त्यांचे

बंधु पाठवितील तर आह्मावर व काव्यरत्नावलीच्या वाचकांवर त्यांचे फार उपकार होतील येवढें सांगून हा दुःखकारक लेख आह्मी संपवितों.

रत्नावलीचीं पृष्टें वाढविण्यासंबंधानें वर उल्लेख केला आहे. त्याप्रमाणें तूर्त २४ पृष्टें येत्या जानेवारीपासून छापण्यांत येतील. वर्गणीच्या मानानें रत्नावलीचीं पृष्टें फार कमी आहेत, असी जी कित्येकांची तक्रार आहे, ती वरील लिहिलेल्या व्यवस्थेवरून दूर होईल. जानेवारीच्या अंकापासून रा. रा. श्रीपाद नारायण मुजूमदार बी. ए. यांचें "श्री छत्रपति शिवाजी महाराजकाव्य" सूरू होईल. या काव्याचे १२ सर्ग असून प्रत्येक अंकांत एक एक सर्ग प्रसिद्ध होईल. मेघनादवधकाव्याचे आजपर्यंत चार सर्ग प्रसिद्ध झाले आहेत. पुढचे ५ सर्ग माधवानुज हे पुढच्या वर्षांत पुरे करून वाचकांच्या ऋणांतून मोकळे होतील, अशी आह्मास आशा आहे. विनायक कवींचीं चार आख्यानें या वर्षांत आलेलीं आहेत. व यापुढेंही प्रत्येक अंकांत एक एक आख्यान देण्याचें त्याणीं आह्मास अभिवचन दिलें आहे, त्याप्रमाणें ते आपला हेतू तडीस नेतील तर वाचकवर्गावर त्यांचे फार उपकार होतील. इतर कवींच्या कविता आमचेकडे बऱ्याच आहेत, त्या योग्य प्रसंगीं प्रसिद्ध होतील. रा. रा. चंद्रशेखर, विहंगम, गणेशसुतगुणे, रा. रा. भीडे, भृंग, ना. वा. टिळक, रा. रा. मुजूमदार, रा. रा. विनायक कवि वगैरे मंडळी यापुढें मनोभावानें रत्नावलीची सेवा करतील अशी आह्मास आशा आहे.

रत्नावलीचे हितचिंतक मित्र रा. रा. काशिनाथ बाबाजी पंडित हेडमास्तर रामपूर यानीं ह्या वर्षी प्रुफें तपासण्याची व इतर गोष्टींची आह्मास बरीच मदत केली, याबद्दल त्यांचे आह्मी आभार मानतों. व यापुढेंही ते रत्नावलीवर असाच कृपालोभ ठेऊन वेळोवेळीं आह्मास सहाय करतील, अशी आशा बाळगून हा लेख संपवितों.

---

सं. भा. २०११

# मेघदूतच्छाया.

( अथवा महाकवि श्रीकालिदासकृत ‘ मेघदूत ’ काव्याचें समश्लोकी भाषांतर )

## प्रस्तावना.

*कान् पृच्छामः सुराः स्वर्गे निवसामो वयं भुवि ।
किंवा काव्यरसः स्वादुः किंवा स्वादीयसी सुधा ॥

( १ प्रस्तुत ग्रंथाचें नांव. २ संस्कृत आणि मराठी. ३ मेघदूत व त्याचा कर्ता. ४ श्रृंगारवर्णन व त्याजवर येणारा दोष. ५ प्रकृत भाषांतराचा उद्देश व आवश्यकता. ६ ह्या ग्रंथाची रचना व रसिकप्रार्थना. )

१ आमच्या कविकुलमुकुटमणीच्या छोट्याच, परंतु सकल–काव्य गुणसंपन्न, पंडितमान्य, व लोकप्रिय अशा मेघदूत नामक काव्याचें हें समश्लोकी भाषांतर महाराष्ट्र वाचकांस सादर करित आहें. ह्या भाषांतराचें नांव मीं ‘ मेघदूतच्छाया ’ असें ठेविलें आहे. ‘ छाया ’ शब्दाचा मूळचा अर्थ ‘ सांवली ’ असा आहे; परंतु पुढें त्याजवर ‘ कांति ’ ‘ छटा, झांक, किंवा लकेर ’ ‘ प्रतिरूप किंवा प्रतिबिंब ’ व ‘ भाषांतर ’ असे लाक्षणिक अर्थ बसले असावे. संस्कृत नाटकांत हलक्या पात्रांच्या व सामान्य स्त्रियांच्या तोंडीं जी ‘ बालभाषा ’ घातलेली असते, तिचें संस्कृत प्रतिरूप जें त्या ग्रंथांत दिलेलें असतें, त्याला ‘ छाया ’ ह्मणण्याचा परिपाठ आहे. प्रस्तुत भाषांतरही एका श्लोकास त्याच वृत्तांतील एक श्लोक असें असल्यामुळें वरील प्रचारास अनुसरून त्यास छाया ह्मणण्यास हरकत नाहीं, असें वाटल्यावरून त्यास वरील अल्पाक्षरी नांव दिलें आहे.

दुसरें असें कीं, संस्कृत भाषेंतील शब्दप्राचुर्य, वर्णसौष्ठव, पदलालित्य,

* काव्यरस अधिक गोड कीं अमृतरस अधिक गोड हें कोणाला विचारूं ? कारण, काव्यरस पिणारे आह्मी रहातों पृथ्वीवर, आणि अमृतरस पिणारे देव आहेत स्वर्गांत !

श्रवणरमणीयता, संधिसमासादिकांनीं आलेली अल्पाक्षर बव्हर्थता, व परिपक्वता, इत्यादिक गुणांशीं मराठीच्या गुणांची तुलना केली असतां, व तिच्या उत्पत्तीचाही विचार केला असतां, मराठी भाषाही केवळ संस्कृताची छाया ह्मणजे सांवली व तीही अस्पष्टच आहे, असें ह्मणावें लागतें. सांवली ज्याप्रमाणें मूळ पदार्थाचा कांहींसा आकार मात्र दाखवून त्याच्या स्वरूपाची कल्पना करण्यास थोडें बहुत साहाय्य करिते, त्याचप्रमाणें कोणत्याही संस्कृत काव्याचा तर्जुमा मूळाचा दिग्दर्शक मात्र व्हावयाचा. तशांत हें मेघाचें प्रतिबिंब मराठींत उठविणारा कुशल व कसलेला नसल्यामुळें तें केवळ छायारूपानें उठणार हें उघड आहे. तेव्हां अशाही दृष्टीनें प्रस्तुत भाषांतरास ' मेघदूतच्छाया ' हेंच नांव शोभेल असें वाटतें.

२ आतां संस्कृत ग्रंथाचें आणि त्यांतही " मेघदूता " सारख्या प्रौढ व गंभीरार्थक काव्याचें मराठींत भाषांतर—व तेंही समश्लोकी—करितांना ज्या अडचणी येतात, त्यांचें येथें थोडेंसें दिग्दर्शन केलें असतां अप्रासंगिक होणार नाहीं.

पहिली अडचण ही आहे कीं मराठींत शब्दप्राचुर्य नाहीं. ह्मणजे मराठींत निरनिराळ्या सूक्ष्म कल्पनांना निरनिराळे शब्द व एकेका कल्पनेला अनेक शब्द नाहींत. अलीकडे मराठी भाषेच्या द्वारें होत असलेल्या विद्याप्रसारामुळें ही उणीव संस्कृत शब्दांनीं भरून काढण्याचा प्रघात पडला आहे. पण हे संस्कृत शब्द मराठीचा मराठीपणा व अर्थाची सुबोधता कायम राखून घ्यावयाचे असल्यामुळें पाहिजेत तितके विपुलपणें घेतां येत नाहींत. ह्यामुळें एकंदरींत संस्कृतांतील खुबीदार कल्पना मराठींत आणितांना समर्पक शब्दांची उणीव भासल्यावांचून रहात नाहीं.

दुसरी अडचण मराठींत संधिसमासांचा अभाव ही होय. शुद्ध संस्कृत शब्दांचे मात्र संधिसमास करण्याविषयीं व्याकरणकारांचें अनुमोदन आहे. इतर जे संधिसमास पूर्वींच प्रचारांत आले आहेत तेवढे मात्र निरुपायास्तव व्याक-

रण–कारांनीं मान्य केले आहेत. नवीन करण्याची मोकळीक त्यांनीं ठेविलेली नाहीं. व तसा प्रचारही अद्यापि पडलेला नाहीं. तथापि थोड्या अक्षरांनीं पुष्कळ अर्थ व्यक्त करण्यास ज्या अर्थी त्यांचा फार उपयोग आहे, ह्मणजे ज्या अर्थी त्यांनीं भाषेचा संक्षेप होतो, त्या अर्थी ते अधिकाधिक प्रचारांत आणण्याचा बहु–जनसमाजाचा कल सहजच असणार आहे; व ज्या अर्थी ‘ प्रयोगशरणा वैय्याकरणाः ’ ह्मणजे ‘ व्याकरणकार हे भाषेच्या प्रचाराच्या अधीन आहेत. ’ ही व्याकरणकारांच्या अधिकाराची मर्यादा ठरलेली आहे, त्या अर्थी अशा रीतीनें प्रचारांत आलेले संधिसमासही त्यांस शुद्ध मानावे लागतील. बाकी अशा रीतीनें कांहीं नियमित संधिसमास शुद्ध मानिले गेले, तरी संस्कृताप्रमाणें मराठींत त्यांचा सररहा नियम होणार आहे, असें मुळींच नाहीं. तेव्हां ही एक संस्कृतांत असलेली सोय मराठींत नाहीं असेंच ह्मटलें पाहिजे. तसेंच संस्कृताप्रमाणें विशेषणें, कृदंतें वगैरे प्रकारांच्या योगानें वाक्य आटपसर व नोंकदार करण्याची सोयही मराठींत नाहीं. ह्यामुळें संस्कृताचें भाषांतर मराठींत नेहमी एका शद्बाबद्दल अनेक शद्ब व एका वाक्याबद्दल अनेक वाक्यें घालून करावें लागतें.

तिसरी आणि सर्वांत मोठी अडचण ह्मटली ह्मणजे यमकांची होय. कांहीं नियमित चरणांच्या शेवटच्या निदान दोन दोन वर्णांची अनवृत्ति झालीच पाहिजे असा साधारणपणें मराठी कवितेंत एक सामान्य नियमच होऊन राहिला आहे. निदान वहिवाट तरी तशी आहे. यमकानें कवितेस श्रुति-मनोहरत्व येतें, व ह्मणूनच त्याची अलंकारांत गणना आहे. पण चरणांतीं यमक साधलेंच पाहिजे ही अट कवितेच्या यथेच्छ ओघास किती प्रतिबंधक आहे हें तज्ञांस सांगितलें पाहिजे असें नाहीं. कित्येक रसिकंमन्य तर यमक हेंच मराठी कवितेचें सर्वस्व समजतात ! व जीमध्यें यमक नाहीं ती कविता अतिशय खराब किंबहुना कविताच नव्हे असेंही ते समजतात ! अशा लोकांची काव्यपरीक्षा यमकांच्या रेलचेलीवर अवलंबून असावयाची हें सांगा-

मयास नकोच. ! ह्या लोकांस वाग्देवीच्या दरवाजावरचे द्वारपाळ ह्मटलें असतां चांगलें शोभेल ! ह्यांना तिच्या अत्यंत गूढ रहस्यांची ओळख कोठून असणार ? असो; ही समजूत मराठी कवितेसंबंधानें कां झाली ह्याचाही थोडा विचार केला पाहिजे. यमकाचा तोडा कवितेच्या चरणांत जन्मत: नसून तो पुढें बहुत वर्षांनीं पडत असतो असें निदान संस्कृत भाषेंतील कवितेच्या इतीहासावरून व आद्य काव्यांवरून दिसून येतें.[1] त्यानें तिच्या सौंदर्याचें पोषण व वर्धन होतें खरें; परंतु त्यावरून ' किमिवहि मधुराणां मंडनं नाकृतीनाम्[2] ' ही कालिदासोक्ति कांहीं असत्य होत नाहीं. मराठी कवितेंत आद्यकवि मुकुंदराज ह्यापासून तों मयूरपंत, रामजोशी वगैरे पेशवाई अखेरच्या कवींपर्यंत व विद्यमान लहान मोठ्या कवींपर्यंत सर्वांनीं यमकाचा शिंदेशाई तोडा आपल्या प्रिय कन्येच्या चरणांत अडकवून दिला आहे. ह्मणजे मराठी कवितेच्या जन्मापासूनच हें भूषण तिच्या चरणांत आहे, असें ह्मणण्यास प्रत्यवाय नाहीं. ह्याचें कारण ह्या सर्वांचे कवितेचे विषय व अर्थ प्राय: जुने आहेत हें असावें. जेव्हां कवितेचा विषय नवीन व चमत्कृति-जनक नसतो, तेव्हां कवींना आपलें काव्य सजविण्याकरितां यमकादिक शब्दालंकारांचें साह्य घ्यावें लागतें. ' तएवपदविन्यासास्तएवार्थ–विभूतय: । तथापि नव्यं भवति काव्यं ग्रथन--कौशलात्[3] ॥ ' ही उक्ति जरी खरी आहे, तरी हें ' ग्रथनकौशल ' कालिदास, भवभूति, जयदेव ह्यांच्यासारख्या वाग्देवीच्या कांहीं थोड्याच लालांस साध्य असतें. बाकीच्यांस बहुधा आपली बरीच भिस्त शब्दालंकारांवरच ठेवावी लागते. संस्कृत कवितेंत पुढील कित्येक

---

१ आद्यकवि जो वाल्मीकि त्याचा अगदीं पहिला व सहज मुखांतून निघालेला श्लोक–मानिषादप्रतिष्ठांत्वमगम:शाश्वतीसम: । यत्क्रौंचमिथुनादेकमवधी:काममोहितम् ॥ हा किती साधा व करुणरसपरिप्लुत आहे ! २ ' जातीच्या सुंदरांना कांहींहि शोभतें ।'– किर्लोस्कर–शाकुंतल १ अंक ३ तेच शब्द आणि तेच अर्थ; तथापि रचनाकौशल्यानें काव्यास नवत्व येतें.

कर्त्यांचा जसा शद्बालंकारावर भर दिसतो, तसा व्यास, वाल्मीकि, आदिकरून आद्य कवींचा दिसत नाहीं. ह्यावरून वरील गोष्ट उघड होते. मराठी कविता तर प्राय: भाषांतररूप असल्यामुळें तिला मोहकत्व आणण्याकरितां आपल्या मराठी कवींना शद्बालंकारांची व विशेषत: चरणांतीं यमक ठेवण्याची फार जरूर वाटली असावी. ज्याला महाकवि ह्मणतां येईल असा कवि मराठींत अद्यापपर्यंत जन्मला नाहीं असें ह्मटलें तरी चालेल. व पुढेंही कधीं उपजेल ह्याचें आज अनुमान करितां येत नाहीं. ह्याचें कारण राष्ट्राच्या स्थितींत आहे. कवि ह्मणजे आनंदाची, निश्चितपणाची व स्वातंत्र्याची केवळ मूर्ति आहे. ह्या गुणांचा आणि कवीच्या जीविताचा इतका निकट संबंध आहे कीं, वरील गुण हेंच त्याचें जीवित असें ह्मटलें तरी चालेल. तो आनंदांत उपजतो, आनंदांत रहातो, आनंद देतो घेतो, आणि आनंदांतच देहावसान पावतो. आतां महाराष्ट्रांत गेल्या आठ नउशें वर्षांत महाकवि कां निर्माण झाला नाहीं, ह्याचा उलगडा सहज होईल. वरील काळाच्या सुमारास आमचा भाग्यसूर्य अस्तोन्मुख झाला होता. व तो जो एकदा अस्तास गेला तो अद्यापि उदयास आलाच नाहीं असें ह्मणावें लागतें. ह्या तमोमय घोर निशाकालांत मध्यंतरीं मराठे व पेशवे हे तेजोमय तारे उदयास येऊन शें दोनशें वर्षे महाराष्ट्रास प्रकाशित करून गेले; व तितक्यांत रामदास, तुकाराम, रघुनाथ पंडित, रामजोशी इत्यादिक कवि, व ज्यांना केवळ महाकविच जरी ह्मणतां येणार नाहीं तरी उपमहाकवि ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं असे मुक्तेश्वर, वामन, मोरोपंत, ह्यांनीं महाराष्ट्र--कवितोद्यान यथाशक्ति सजविलें; पण राष्ट्रोत्कर्षसागरास पूर्ण भरती येण्याला व राष्ट्राचे सर्व व्यवहार यथास्थितपणें चालू होण्याला, त्या वेळच्या परिस्थितीच्या मानानें एवढा काळ पुरेसा झाला नाहीं. आतां तर कधींच न निखळण्यासारखे दिसणारे पारतंत्र्य--पाश महाराष्ट्राच्या गळ्यांत पडले आहेत; आणि त्यामुळें जिकडे तिकडे ‘ चिंतेचा पिकला मळा ’ हेंच प्रत्ययास येत आहे. झोंपडीवाल्या वनवासी शेतकऱ्या-

चरित्रें वेळच्या वेळीं लिहिण्याची वहिवाट नव्हती, व आज बहुत वर्षे परकीयांच्या स्वाऱ्यांनीं व जुलुमानें आपली विद्या व ग्रंथसंपत्ति ह्यांचा लोप होत गेला, हीं तर कारणें आहेतच; परंतु त्यांतच आणखी त्या कवीची अत्यंत प्रसिद्धिही कारण झाली असावी असें वाटतें. त्याच्या अप्रतिम कवित्वाबद्दल त्याच्या हयातींतच इतकी ख्याती झाली होती कीं, त्याला आपल्या ग्रंथांवर आपलें नांव सुद्धां घालावें लागलें नाहीं; मग आपलें चरित्र आपण लिहून 'निजगुणकथापातक' करण्याची त्याला काय गरज होती ? ह्याचा परिणाम असा झाला कीं, त्याचें वास्तव्य, कुलवृत्त, चरित्र व काल, ह्यासंबंधानें परस्पर-विरोधी अशा नाना प्रकारच्या दंतकथा प्रचारांत आल्या. ह्यामुळें सत्यशोधनास पंचाईत पडते. त्याच्या कुलवृत्ताबद्दल व चरित्राबद्दल अनुमान करितां येण्यासारखी विश्वसनीय माहिती कांहींच मिळत नाहीं. काळाच्या संबंधानें अलीकडे असा निर्णय झाला आहे कीं, इसवी सनाच्या सातव्या शतकांत तो विद्यमान होता. रघूनें हूणांस* जिंकिलें असें कालिदासानें आपल्या रघुवंशनामक काव्यांत वर्णन केलें आहे; व सातव्या शतकांत हिंदुस्थानांत आलेल्या एका बौद्ध यात्रेकऱ्यानें हूण लोकांचा उल्लेख आपल्या ग्रंथांत केला आहे; ह्यांवरून कालिदास त्याच वेळीं विद्यमान असला पाहिजे असें अनुमान काढितात. पण ज्यानें हूण लोकांचा उल्लेख केला, त्याच हुएन्त्संग नांवाच्या शोधक व चौकस प्रवाशानें कालिदासासारख्या सर्वमान्य, अद्वितीय, व दिगंत कीर्ति गेलेल्या कवीचा उल्लेख आपल्या ग्रंथांत करूं नये हें अश्रद्धेय दिसतें. तो प्रवासी हिंदुस्थानांत येऊन गेल्यानंतर कालिदास प्रसिद्धीस आला असें मानिल्यास वरील आक्षेपाचें निरसन होण्यासारखें आहे खरें; परंतु आधीं हूण ह्या नांवानें प्रसिद्ध असणारे राजे किंवा लोक प्राचीनकाळीं भरत-वर्षांत किंवा त्याच्या आसपासही नव्हते असें कां गृहीत धरावयाचें तें समजत

---

* तत्रहूणावरोधानांभर्तृषुव्यक्तविक्रमम् । कपोलपाटलादेशिबभूवरघुचेष्टितम्. ॥

—रघुवंश-सर्ग ४ श्लोक.

नाहीं. बरें प्राचीनकाळीं नव्हते असें गृहीत धरिलें तरी, सातव्या शतकापूर्वी किंबहुना इसवीसनापूर्वीच्या शतकांत ते नव्हतेच, व कालिदास इसवीसनापूर्वीच्या शतकांत झाला असल्यास त्यास त्यांचें नांवही माहीत असण्याचा संभव नाहीं, असें,--त्या काळचा सर्व जगाचा संगतवार इतिहास उपलब्ध नसल्यामुळें, केवळ विद्यमान इतिहासग्रंथांत उपरिनिर्दिष्टकाळीं ते असल्याबद्दलचा उल्लेख आढळत नाहीं एवढ्यावरूनच,--ह्मणतां येणार नाहीं. पण पुरातन युगींच्या रघूनें अर्वाचीन काळच्या हूण लोकांस जिंकिलें असें असंबद्ध विधान करून, कालिदासासारख्या विशालज्ञानी व कुशाग्र बुद्धीचा कवि, आपल्या काव्यनायकाच्या प्राचीनत्वास व तत्संबंधीं गौरवास बाध आणील हें संभवत नाहीं. मल्लीनाथानेंही उक्त श्लोकाच्या टीकेंत ‘ हूण ’ शद्बावर ‘ हूणा जनपदाख्याःक्षत्रियाः ’ असेंच व्याख्यान केलें आहे. ह्यावरून ‘ हूण ’ ह्मणून कोणी क्षत्रिय राजे हूण नांवाच्याच देशांत प्राचीनकाळीं होते असें ह्मणावें लागतें; व त्यामुळें वरील अनुमानाचा पायाच ढांसळतो.

आणखी असें आहे कीं, सदरहू काळ ह्मणजे इसवीसनाचें सातवें शतक हा, त्याच प्रवाशाच्या ग्रंथावरून हर्षराजाचा, बाणविरचित ‘ हर्षचरित ’ ग्रंथाचा, व अर्थात् बाणाचाही काळ असावा असें ठरतें. व कालिदास आणि बाण ह्यांच्या निरनिराळ्या भाषापद्धतींवरून ते समकालीन असावे असें वाटत नाहीं. समासांत पदें चार पांच ह्मणजे पराकाष्ठा अशी कालिदासाची साधी, सरळ, व प्रासादिक रचना कोणीकडे, आणि बाणाची दोन दोन ओळींचें एकच सामासिकपद करून टाकण्याची कृत्रिम तऱ्हा कोणीकडे ? कृत्रिम रचनेची पद्धत मागाहून पडलेली असावयाची; ह्यावरून दुसऱ्याच्या पूर्वी बरींच वर्षे पहिला झाला असावा असें अनुमान होतें.

आतां तो भर्तुहरीशीं समकालीन असावा असें अनुमान करण्यास एक पुरावा आहे. भाषासरणी तर दोघांची सारखीच साधी, सरळ, व प्रासादिक

आहे, व ह्यावरूनही ते बहुतेक समकालीन असण्याचा संभव दिसतो; परंतु ह्याहूनही बळवत्तर असें एक प्रमाण सांपडलें आहे. तें असें कीं शाकुंतल नाटकाच्या पांचव्या अंकांतील एक श्लोक नीतिशतकांत आढळतो. तो हाः--

भवंतिनम्रास्तरवःफलागमै--र्नवांबुभिर्भूरिविलंबिनो घनः ।

अनुद्धतः सत्पुरुषाः समृद्धिभिः स्वभाव एवैष परोपकारिणाम्. ॥

हा श्लोक शाकुंतलाच्या व नीतिशतकाच्या बहुतेक नव्या जुन्या प्रसिद्ध प्रतींत आढळतो; व त्याचें भाषांतरही वामन पंडितांनीं नीतिशतकांत इतर श्लोकां बरोबर केलें आहे. तें असेंः--

वृक्ष फार लवती फळभारें । लोंबती जलद घेउनि नीरें. ।
थोर गर्व न धरी विभवाचा । हा स्वभाव उपकारपराचा. ॥

ह्यावरून तो नीतिशतकांत कोणी तरी घुसडलेला असण्याचा संभव दिसत नाहीं. आतां हा श्लोक कोणाचा कोणी घेतला एवढाच काय तो प्रश्न राहिला. कालिदासासारख्या अद्वितीय कवीनें आपल्या सर्वोत्कृष्ट व जगांत निरुपम ठरलेल्या ग्रंथांत दुसऱ्याचा सगळाच्या सगळा श्लोक जसाचा तसा घेणें हा परतें त्याच्या कीर्तीस हानिकारक असें कांहींच नाहीं. अमुक ग्रंथांत अमुक श्लोक कालिदासानें दुसऱ्याचा घेतला आहे, असें जर आज कोणी सप्रमाण ठरविलें तर त्या ग्रंथाचें व खुद्द कालिदासाचेंही महत्व किती कमी होईल बरें ? पण अशी शंका घेणें ह्मणजे सुद्धां, कुबेरानें एखाद्या राजाच्या जामदारखान्यांतील हिरा घेऊन आपल्या मुकुटाला लाविला आहे, किंवा सूर्य दिव्यापासून प्रकाश घेऊन तो आपला ह्मणून लोकांना भासवितो आहे, असें ह्मणण्यासारखें आहे. ह्यास्तव कालिदासानें सदरील श्लोक भर्तृहरीच्या ग्रंथांतून घेतला असेल काय अशी शंका सुद्धां असंभवनीय आहे. आतां दुसऱ्या पक्षींही तीच अडचण आहे खरी, पण भर्तृहरीचा ग्रंथ स्फुट सुभाषितरूप असल्यामुळें व वरील श्लोक त्यांत साजण्यासारखा आणि विख्यात कवीचा

 सं. भा. २०/१९७०

असल्यामुळें त्यानें घेतला असेल हें अगदींच संभवत नाहींसें नाहीं. तशांत तो राजा असून कवि झालेला, व तोही कालिदासाहून कमी प्रतीचा, हें कोणासही कबूल करावें लागेल. व तोही विद्वान्, विनयशाली, व विरक्त पुरुष हें जाणत नसेल असें नाहीं. यास्तव कालिदासावर त्याची भक्ति असल्यामुळें सहरहू श्लोक त्यानें आपल्या ग्रंथांत शोभण्यासारखा ह्मणून प्रेमपूर्वक घेतला असावा असें दिसतें. श्रृंगारशतकांतही कित्येक श्लोक कालिदासकृत 'ऋतुसंहार' काव्यांतून घेतलेले आहेत. ह्यावरून वरील अनुमानास बळकटी येते. तेव्हां कालिदास भर्तृहरीशीं समकालीन किंवा त्याच्या अगोदर झाला असावा असें ठरतें. परंतु खालील विवेचनावरून तो विक्रमाच्या पदरीं असावा असें अनुमान निघतें, व विक्रम हा भर्तृहरीचा कनिष्ठ बंधु असून तो भर्तृहरि हयात असतांच राज्याधिरूढ झालेला होता, ह्यास्तव कालिदास भर्तृहरीच्या पूर्वी झालेला नसून तो त्याशीं समकालीन होता असेंच ह्मणावें लागतें.

कालिदास विक्रमाच्या नवरत्नांपैकीं एक होता अशी प्रसिद्धि साधारणपणें आहेच; शिवाय एका श्लोकाचाही आधार आहे--तो हा.:—

धन्वंतरिक्षपणकामरसिंहशंकु--वेतालभट्टघटखर्परकालिदासाः ।
ख्यातोवराहमिहिरोनृपतेःसभायां रत्नानिवैवररुचिर्नवविक्रमस्य[1]. ॥

---

१ हा श्लोक कालिदासकृत 'ज्योतिर्विदाभरण' नामक ज्योतिषग्रंथांतील होय. ह्या ग्रंथाचा उपक्रम गतकलि ३०६८ ह्या वर्षी केल्याविषयींचा, व ह्या पूर्वीच रघुवंशादिक तीन काव्यें व 'स्मृतिचंद्रिका' म्हणून एक कर्मकांडावरचा ग्रंथ रचल्याविषयींचा, तसेंच विक्रमाच्या पदरीं आपण असल्याविषयींचा, उल्लेख ह्या ग्रंथाच्या शेषाध्यायामध्यें कालिदासानें स्वतःच अगदीं स्पष्टपणें केला आहे. पण 'मंदःकवियशःप्रार्थी' अशा रीतीनें रघुवंशांत शालीनता प्रकट करणारा कालिदास ह्या ग्रंथांत आपणच आपणाला 'रत्न' ह्मणून घेत आहे, हा विचार मनांत आला म्हणजे हा उल्लेख त्यानेंच स्वतः केला असेल किंवा काय ह्याबद्दल जरा संशय वाटतो. तथापि कालिदास इ. स. पू. पहिल्या शतकांत विक्रमाच्या पदरीं होता, एवढें त्यावरून सिद्ध होण्यास कांहीं हरकत येईलसें वाटत नाहीं.

ह्या श्लोकांत विक्रमाच्या नऊ रत्नांची जी यादी दिली आहे तींत कालिदासाचें नांव अगदीं स्पष्टपणें दाखल केलें आहे. परंतु तो भोजराजाच्या पदरीं होता अशा विषयींच्या दंतकथा इतक्या पुष्कळ, इतक्या मनोरम, आणि इतक्या लोकप्रिय आहेत कीं, तो त्याच्या पदरीं नव्हता असें सिद्ध करूं जाणें ह्मणजे विनाकारण लोकांचा रोष संपादन करणें, त्यांजकडून एक प्रकारच्या अरसिकतेचा आरोप करून घेणें, व खुद्द आपल्या देखील मनाच्या विरुद्ध जाणें होय. पण ह्या दंतकथांखेरीज तो भोजराजाच्या पदरीं होता अशाविषयीं प्रत्यक्ष किंवा परोक्ष आधार कालिदासाच्या ग्रंथांत किंवा बाहेर कांहीं मिळत *नाहीं आमचा मराठी महाकवि जो मोरोपंत त्यानें आपल्या आश्रयदात्या बाबूजी नाईक बारामतीकरावर स्वतंत्र कविता कराव्या, आणि ह्या संस्कृतांतील महा कवीनें भोजासारख्या विद्वज्जनैकपक्षपाती, दानशूर, गुणनिधि, व लक्ष्मी आणि सरस्वती ह्या दोघींच्याही कृपेंतल्या अद्वितीय राजाचा--प्रत्यक्ष राहोच पण पर्यायानें सुद्धां--संबंध कोठेंही आपल्या कवितेंत आणूं नये, इतकेंच नाहीं, तर ज्या त्याच्या धारा नामक नगरींत त्यानें स्वतः वास केला तिचेंही थोडें बहुत वर्णन कोठेंच देऊं नये हें जरा चमत्कारिक नव्हे काय ? बरें हें धारा नगरीचें वर्णन देण्याचा प्रसंगच त्याच्या काव्यांत कोठेंही आला नाहीं असें ह्मणावें तर तसेंही नाहीं. कारण मेघदूतांत तें देतां आलें असतें. तेव्हां भोजकालिदासांच्या गोष्टी भ्रमात्मक असाव्या असें ह्मणावें लागतें.

विक्रम आणि कालिदास ह्यांच्या गोष्टी कोठें फारशा प्रसिद्ध नाहींत. तथापि कालिदास विक्रमाच्या पदरीं असल्याबद्दल कांहीं प्रत्यक्ष व कांहीं परोक्ष लेखी आधार मिळतात. त्यापैकीं एक श्लोक तर वर दिलाच आहे. दुसरा

---

* रघूच्या ५ । ६ । ७ । ह्या सर्गांत भोज ह्या नावांच्या राजाचें वर्णन आहे; पण धारा नगरीचा उल्लेख नसल्यामुळें व कविप्रिय भोज धारा नगरीचाच निर्विवाद असल्यामुळें, हें कालिदासानें आपल्या आश्रयदात्या भोजाचें पर्यायानें वर्णन दिलें असावें असें मानण्यास जागा नाहीं.

प्रत्यक्ष आधार खुद त्याच्या ग्रंथांतीलच आहे. तो असा कीं, कलकत्ता येथें १७८९ मध्यें छापिलेल्या शाकुंतल नाटकाच्या आवृत्तींत सूत्रधाराच्या तोंडीं पुढील वाक्य आहे.

'आर्ये ! इयंहिरसभावविशेषदीक्षागुरोविक्रमादित्यस्याभिरूपभूयिष्टापरिषत्.' ह्या विक्रमाच्या नांवाचा उल्लेख जर शाकुंतलाच्या सर्व प्रतींत मिळता तर कालिदास विक्रमाच्या पदरीं होता याबद्दल शंका राहिली नसती. पण तो निर्णयसागर छापखान्यांत छापलेल्या दक्षिणेकडील प्रतींत नाहीं. तथापि तो बंगाल्याकडच्या अर्थात् उत्तरहिंदुस्थानांतील प्रतींत आढळतो, व--कालिदास भोजाच्या पदरीं असो किंवा विक्रमाच्या पदरीं असो, पण त्याचें वास्तव्य उत्तर हिंदुस्थानांत होतें हें निर्विवाद असल्यामुळें--तो पाठीमागून कोणी तरी घुसडलेला नसून मुळचाच असावा, व इकडील प्रतींतून तो इतर कित्येक उत्तम श्लोकांप्रमाणें गळाला असावा, असें अनुमान करण्यास जोर मिळतो; व त्यामुळें कालिदास विक्रमाच्या पदरीं होता ह्या मतास विशेष बळकटी येते. हें प्रत्यक्ष लेखी आधारांविषयीं झालें. आतां अप्रत्यक्ष आधार जे खुद त्याच्याच ग्रंथांत मिळतात त्यांचा विचार करूं एक तर मागें ( २ ) ह्या मुद्यांत दर्शविलेल्या सामान्य सिद्धांताप्रमाणें विक्रमाचा उत्कर्षाचा काळ कालिदासासारख्या महाकवीच्या उत्पत्तीस जितका अनुकूल होता तितका दुसरा क्वचितच असेल. दुसरें, विक्रमानें जो दिग्विजय केला व ज्यावरून त्याला विक्रमादित्य* ( ह्म० पराक्रमाचा सूर्य ) हें नांव मिळालें त्याचें वर्णन कालिदासानें आ-

---

* विक्रमादित्य हा उज्जनीचा राजा होता. उज्जनीला पूर्वीं 'उज्जयिनी,' 'विशाला' किंवा 'अवंति' असेंही म्हणत असत; व ती अवंति देशाची राजधानी होती. अवंति नाथाला रघूच्या सहाव्या सर्गांत सूर्याचीच उपमा दिलेली आहे. तसेंच त्याच्या अजिंक्य प्रतापाचें वर्णन करून, त्याला इंदुमतीनें कां वरिलें नाहीं हें, त्याला न्यूनता न येईल अशा रीतीनें मोठ्या खुबीनें दाखविलें आहे. ह्याही गोष्टी विचार करण्यासारख्या आहेत. ( रघु० सर्ग ६ श्लोक ३२ व ३६ )

पल्या रघुवंशाच्या चौथ्या सर्गांत रघुदिग्विजयाच्या रूपानें दिलें आहे, अशी कल्पना करण्यास जागा आहे. पण ह्याहून मोठी गोष्ट ही आहे कीं; विक्रमाची राजधानी जी उज्जनी तिचें वर्णन मेघदूतांत जितकें दिलें आहे तितकें अलकेशिवाय दुसऱ्या कोणत्याही स्थलाचें नाहीं. तसेंच उज्जनीचें जें वर्णन मेघांत दिलें आहे तें सहज ओघानें दिलें नसून मेघास मुद्दाम वांकडा मार्ग करून तिकडून जावयास यक्ष सांगत आहे. यक्ष ह्मणतो:—

वक्रःपंथायदपिभवतःप्रस्थितस्योत्तराशां

सौधोत्संग-प्रणयविमुखोमास्मभूरुज्जयिन्याः ।

--ह्यावरून कालिदासाचा उज्जनीशीं प्रसक्त परिचय असावा असें वाटल्यावांचून राहत नाहीं.

आतां कालिदास जर विक्रमाच्या वेळीं होता, आणि भोज विक्रमानंतर कित्येक शतकांनीं झालेला आहे, तर तो भोजाच्या सभेंत होता ही समजूत कशी प्रचलित झाली हा एक प्रश्न आहे. व ह्याचें उत्तर धाकटे चिपळूणकर शास्त्रीबुवा ह्यांनीं आपल्या भवभूतीवरच्या निबंधांत दिलें आहे. तें असें कीं दोन प्रसिद्ध पुरुष असले ह्मणजे त्यांची कोणत्या नाहीं कोणत्या तरी संबंधानें सांगड घालून द्यावी असा जनाचा स्वभावच आहे व ह्या स्वभावाच्या योगानेंच चंद्र, सूर्य, ग्रह, नक्षत्रें वगैरे अंतरिक्षांतील गोलांचीं परस्पर नातीं व नानाविध चरित्रें ह्याविषयीं कथा तयार होऊन भूमंडळावरील राजांच्या वंशावळी थेट सूर्यचंद्रापर्यंत जाऊन भिडल्या आहेत. ह्याच स्वभावानुरूप कवि, विख्यात, गुणज्ञ, दानशूर राजा भोज, आणि कविकुलगुरु महाकवि कालिदास ह्यांची दंतकथांनीं गांठ घालून दिली असावी. उत्तम उत्तम वस्तूंचा एकत्र वास असणें मनाला फार आवडतें; व जें आवडतें त्या विषयीं नाना प्रकारच्या कल्पना करीत बसण्याचा तर मनाला छंदच असावयाचा. अशा कल्पनांनीं बनलेल्या दंतकथांपासून मनाचें रंजन व नीतिबोधही होतो हें खरें;

पण दुसऱ्या योग्य आधारावांचून ह्या चरित्राप्रमाणें खऱ्या धरणें बरोबर नाहीं भोजाच्या कविताप्रियत्वाबद्दल प्रचलित असलेल्या अशा प्रकारच्या दंतकथा एकत्र करून बल्लाल नांवाच्या पुरुषानें भोजप्रबंध नांवाचा ग्रंथ तयार केले-ला आहे कालिदास भोजाच्या पदरीं होता अशा विषयी लेखी आधार काय तो ह्याच ग्रंथांत मिळतो. पण ह्या ग्रंथातील गोष्टी विश्वसनीय मानितां येत नाहींत. कारण एक तर त्यांत कालिदासाच्या कवित्वापेक्षां, त्याचें अंतःसाक्षित्व किंवा अतींद्रियज्ञान ह्यांचेंच अधिक वर्णन आहे. व दुसरें त्यांत कालिदास, भवभूती, बाण दंडी वगैरे भिन्न भिन्न काळच्या अनेक प्रसिद्ध व अप्रसिद्ध कवीचें असंभाव्य असें समकालीनत्व कल्पून त्यांचें कवित्व वर्णिलें आहे. तेव्हां त्या ग्रंथांत अनेक प्रचलित दंतकथा मात्र एकत्र करून ठेविलेल्या आहेत असेंच ह्मणावें लागतें; आणि त्यांत जरी त्या त्या कवीच्या नांवास शोभण्या-सारखीं कित्येक उत्कृष्ट पद्यें आहेत, तरी तो ग्रंथ चारित्रात्मक किंवा इतिवृत्त प्रतिपादक आहे असें कधींही कोणी मानणार नाहीं.

तेव्हां एकंदरींत ह्या सर्व विवेचनावरून कालिदास भोजराजाच्यावेळीं नव्हता, असलाच तर तो त्या नांवाचा दुसराच कोणी सामान्य कवि असावा, असें मानावें लागतें. सारांश, रघुवंशादिकांचा कर्ता महाकवि कालिदास हाच भोजाच्या सभेंत होता अशाबद्दल चांगला सबळ पुरावा मिळेपर्यंत, तो विक्र-माच्यावेळीं ह्मणजे इ. स. पू. पहिल्या शतकांत होता असेंच ह्मणणें बरें दि-सतें. हिंदुस्थानचा इतिहास लिहिणार हंटर साहेब यांनींही शाकुंतल नाटका-चा रचनाकाळ इ. स. पू. पहिलें शतक असा दिला आहे. परंतु पुढें कालि-दासाचा काळ मात्र सहावें शतक असें ते ह्मणतात. हा जो ग्रंथ व ग्रंथकार यांच्या काळांमधील विरोध त्याचा परिहार कसा करावयाचा तें त्यांचें त्यांसच माहीत ! कालिदास विक्रमाच्या पदरीं होता याबद्दल हंटर साहेबांचें मत वि-रुद्ध नाहीं. पण ते ह्मणतात कीं विक्रम या नांवाचे राजे पुष्कळ झाले; व

त्यांपैकीं सहाव्या शतकांत जो विक्रम माळव्यांत झाला त्याच्या पदरीं कालिदास होता. असाच निश्चय करण्यास त्यांस कोण कोणते आधार मिळाले त्यांचें नुसतें दिग्दर्शनही त्यांनीं केलेलें नाहीं. त्या मुळें हें मत कां स्वीकारावयाचें तें समजत नाहीं. उलट उज्जनीचा शककर्ता विक्रमादित्य व भोज ह्यांप्रमाणें तो सहाव्या शतकांतील विक्रम विद्याप्रिय, रसिक, व कवि पंडितांचा आश्रयदाता ह्मणून प्रख्यात नसल्यामुळें त्याच्या पदरीं कालिदास असण्यापेक्षां तो शककर्त्या उज्जनीच्या विक्रमाच्याच पदरीं असण्याचा संभव ज्यास्त दिसतो. कालिदासासारखा अद्वितीय कवीच्या उत्पत्तीस शककर्त्या उज्जनीच्या विक्रमाचा काळच कसा विशेष अनुकूळ होता, व ह्या मतास कालिदासाच्या ग्रंथातील अंत:प्रमाणें कशी पुष्टि देतात, ह्याबद्दल सविस्तर विवेचन मागें झालेंच आहे. तेव्हां तो इ. स. पू. पहिल्या शतकांत होता हेंच मत संग्रहणीय दिसतें.

असो; ह्याचे ग्रंथ १ रघुवंश २ कुमारसंभव ३ मेघदूत ४ ऋतुसंहार हीं चार काव्यें, व १ शाकुंतल २ विक्रमोर्वशीय ३ मालविकाग्निमित्र अशीं तीन नाटकें, हे फार प्रसिद्ध आहेत. शिवाय श्रुतबोध ह्मणून एक वृत्तांवर ग्रंथ आहे तो, ज्योतिर्विदाभरण नामक एक ज्योतिषावरचा ग्रंथ, स्मृतिचंद्रिका ह्मणून एक कर्मकांडावरचा ग्रंथ, तसेंच वसंततिलकभाण, शृंगाररसाष्टक, गंगाष्टक, मंगळाष्टकें, वगैरे कित्येक किरकोळ कविताही ह्याच्या नांवावर प्रसिद्ध आहेत. ह्यांबद्दल सविस्तर वर्णन कै० वा० विष्णुशास्त्री चिपळूणकर ह्यांच्या ह्या कवीवरच्या निबंधांत आहे.

ह्या कवीला शृंगाररसाची फार आवड होती; व तो साधण्याच्या कामांत ह्याचा हातखंडा होता. त्याचे सर्व काव्य--नाटक ग्रंथ प्राय: शृंगाररस-प्रधानच आहेत असें ह्मणण्यास हरकत नाहीं. त्याचा शृंगाराकडे केवढा ओढा होता हें पुढील गोष्टींवरून दिसून येईल.

एकदा भोज, कालिदास व दुसरे दोन कवि सूर्यास्तसमयीं एका बागेंतून फिरत असतां तत्समयवर्णनपर असे चौघांनीं चार चरण ह्मणून एक श्लोक बनावेला. तो असा:—

भोज-- परिपतति पयोनिधौ पतंगः
ए. क.-- सरसिरुहामुदरेषु मत्तभृंगः ।
दु. क.-- उपवनतरुकोटरे विहंगो
कालिदास – युवतिजनेषु शनैः शनैरनंगः ॥ *

रामानें ताटका मारिली त्या वेळचें तिचें वर्णन रघुवंशांत कवि असें करितो:--

राममन्मथ शरेण ताडिता । दुःसहेन हृदये निशाचरी ।
गंधवद्रुधिर चंदनोक्षिता । जीवितेशवसतिं जगाम सा[१] ॥

पहिला प्रसंग सूर्यास्तसमय वर्णनाचा असून व इतर कवींनीं दृश्य सृष्टीचेंच वर्णन केलें असून आमच्या रंगेल गड्यांनीं अंतःसृष्टींतील श्रृंगार-

---

* रवि शिरत असे पयोनिधींत, सरसिरुहोदारें ह्याहि भृंगमत्त. । तरुजठारें तसा अशे विहंग–युवति–तनूंत हळू हळू अनंग. ॥

ही दंतकथा भोजप्रबंधांतील आहे तरी तिच्यावरून कवीच्या श्रृंगार प्रियतेबद्दलची लोक प्रसिद्धि दिसून येते. आणखी एक श्लोक त्यांत असाच आहे. पूर्णिमेच्या चंद्रास्त समयाबद्दल भोजानें " चरमगिरी नितंबे चंद्र बिंबं ललंबे " अशी समस्या म्हटली; व ती तिघांनीं पूर्ण केली. बाण–वहति शिशिर वाते मंद मंदं प्रभाते, भवभूति–अरुण किरण जलैरंतरिक्षे गतर्क्षे । कालिदास–युवतिजनकदंबेनाथमुक्तोष्ठ बिंबे । चरमगिरी..............लिलंबे. ॥

१ रामरूपी मदनाच्या असह्य बाणांनीं जिचें हृदय ( ऊर, पक्षीं मन ) व्याकूळ झालें आहे, व गंधयुक्त ( दुर्गंधयुक्त, पक्षीं सुवासिक ) रक्तरूपी चंदनानें जिचें अंग माखलें आहे, अशी ती निशाचरी ( राक्षसी, पक्षीं अभिसारिका ) जीवितेशाच्या ( यमाच्या, पक्षीं प्रियकराच्या ) घरीं निघून गेली.

सागरांत संचार करून पटदिशीं एक नामी मौक्तिक आणून वाचकांस सादर केलें !

दुसरा प्रसंग वीररसाचा असून कवीनें ताटकेवर अभिसारिका स्त्रीचें रूपक करून उपहासार्थ श्रृंगाराची योजना केली आहे.

कालिदासाच्या कवितेचा विशेष ह्मटला ह्मणजे उपमाचातुर्य हा होय. 'उपमाकालिदासस्य' हें वचन प्रसिद्ध आहेच. ह्या गुणांत ह्याचा हात धरणारा तर काय पण त्याची बरोबरी करणाराही कवि अद्यापपर्यंत निर्माण झाला नाहीं असें ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं. त्याच्या ग्रंथाचें एखादें पान वाचलें असतां वरील निरुपम चातुर्य नजरेस आल्यावांचून रहाणार नाहीं. कल्पनाविशालत्व हाही एक त्याच्या कवितेंतील विशेष गुण आहे. कोमळ-वर्णरचना, पदलालित्य ( सुंदर शद्बांचा जवा ), गंभीर व प्रसन्न अर्थ, समयोचित व चित्ताकर्षक भाषणें प्रसंगोपात्त हृदयंगम श्लेष, इत्यादिक प्रकारही त्याच्या कवितेंत सर्वत्र आढळतात. ह्या सर्व गुणांचीं व प्रकारांचीं उदाहरणें ह्या लहानशा मेघदूत काव्यांतही मिळण्यासारखीं आहेत. ह्याबद्दल मार्मिक विवेचन शास्त्रीबुवांच्या पूर्वोक्त निबंधांत केलें आहे.

आतां मेघदूताबद्दल थोडेंसें लिहून ही कविकाव्यप्रशंसा आटपितों. मेघदूत हें महाकाव्य नसून खंडकाव्य आहे. ह्मणजे हें फार लहान आहे. तथापि हें काव्य गुणांनीं इतकें परिपूर्ण आहे कीं, कालिदासाचे इतर सर्व ग्रंथ नाहींसे होऊन हें छोटें काव्यच जरी शिल्लक राहिलें असतें, तरी त्या कवीची योग्यता हल्लीं आहे त्यांत अणुमात्रही कमी झाली नसती, असें शास्त्री-बुवांनीं त्यांच्या वरील निबंधांत ह्मटलें आहे. ह्या काव्याचें संविधानक ह्मटलें ह्मणजे, एक विरही यक्ष मेघास आपला दूत करून त्याच्याजवळ आपल्या

---

१ रात्रीं गुप्तपणें आपल्या प्रियकराकडे जाणाऱ्या स्त्रीस अभिसारिका म्हणतात.

प्रियकांतेस सांगण्यासाठीं निरोप सांगत आहे, एवढेंच काय तें. आणि विषय-ही,—नासिकाजवळील रामगिरीपासून हिमालयाच्या कैलास नामक शिखरावरील अलका नामक यक्षपुरीपर्यंत, मध्यें ज्या मोठमोठ्या नद्या, पर्वत, नगरें, व मैदानें लागतात त्यांचें, त्यांच्याशीं मेघाच्या संयोगाचें, व उंच आकाशांतून दिसणाऱ्या चमत्कारांचें, वर्णन, त्यांच्या संबंधानें विरही व कामातुर पुरुषाच्या मनांत येणाऱ्या उदात्त कल्पना, व मुखांतून निघणारे हृदयंगम उद्गार, आणि शेवटीं पतिव्रता स्त्रीचें विरहावस्थावर्णन, व स्वकलत्रैकनिष्ठ अशा विरही पुरुषानें आपल्या साध्वी स्त्रीस सांगावयास योग्य असा निरोप;—हाच आहे. पण येवढ्यांत त्या चतुर कारागिरानें जी बहार केली आहे, तिचें पुरतें दिग्दर्शनही प्रस्तुत भाषांतरानें होणार नाहीं. आवडीचा विषय, आणि त्यांत उदात्त कल्पनेस यथेच्छ विहार करण्यास पाहिजे तेवढा अवकाश, इतकी सामग्री मिळाल्यावर मग आमच्या वाग्देवीच्या लालास आणखी काय पाहिजे? असो ह्याप्रमाणें ह्या काव्याचें स्वरूप आहे. ह्यांत अलकेपर्यंतच्या वर्णनाचा एक भाग करून त्यास ‘ पूर्वमेघ ’ व पुढील उर्वरित भागास ‘ उत्तरमेघ ’ अशीं नांवें दिलेलीं आहेत. ह्यांतील मुख्य रस ह्मटला ह्मणजे विप्रलंभ—श्रृंगार होय. तो कोठें कोठें करुणमिश्रित आहे. प्रसंगोपात्त संभोग--श्रृंगार, अद्भुत, शांत, वीर, इत्यादिक रसांच्याही छाया साधिल्या आहेत. कल्पनोदात्तत्व सर्वत्र भरलेलें आहे.

४ मेघदूत हें श्रृंगारिक काव्य आहे; तेव्हां श्रृंगारिक ग्रंथांच्या वाचनानें नीति बिघडते, असा जो त्या ग्रंथावर एक आक्षेप आहे तो कितपत यथार्थ आहे ह्याचाही येथें थोडा विचार करणें अवश्य आहे. लावण्यां-सारख्या विचकट, अप्रौढ व अव्यवस्थित कवितांनीं व त्यांच्याच तमाशां सारख्या प्रदर्शनांनीं मनावर वाईट परिणाम होतो हें खरें आहे; परंतु शाकुं-तल, उत्तररामचरित, मालतीमाधव, कादंबरी, किंबहुना गीतगोविंदही, ह्यांच्या वाचनानें कोणी वदफैली किंवा परदारलंपट झाला असें कोठें पहाण्यांत किंवा

ऐकण्यांतही नाहीं; निदान तसा व्हावा असें वरील काव्यांत तरी कांहीं नाहीं. असें असून त्यांच्या वाचनानें कोणी बिघडला असें कोणाला वाटत असल्यास तो सदरहू काव्यांचा दोष नसून आपल्या सांप्रतच्या धर्मशैथिल्याचा, कर्तव्य मूढतेचा, अलीकडील शिक्षणपद्धतीनें व राज्यपद्धतीनें प्राप्त झालेल्या अनिर्बंध वाचालपणाचा, व एकंदरींत हल्लींच्या बिघडलेल्या समाज--परिस्थितीचा तो परिणाम आहे असें समजावें. हजारों वाचनाचें काम एक उपदेश करितो, व हजारों उपदेशांचें काम एक उदाहरण करितें. ह्यासाठीं आपल्या तमाशांसारख्या अचकट विचकट प्रकारांस शिष्टसंमत, व्यवस्थित, व मनोरम असें योग्य वळण लावणारा कोणी तरी किर्लोसकर आधीं उत्पन्न झाला पाहिजे आहे. ह्मणजे कांहीं अंशीं नीतीचा बचाव होईल. बाकी समाजाची जर कशानें दुराचाराकडे प्रवृत्ति होत असेल तर ती काव्यनाटकांच्या वाचनानें होत नसून वरील कारणांनीं होत आहे.

आतां ज्यामध्यें प्रौढ व गूढ शृंगारवर्णनें आहेत असे ग्रंथ सुद्धां अप्रौढ वयांत किंवा विद्यार्थिदशेंत वाचणें बरोबर नाहीं. कारण त्या स्थितींत त्यांतील खरें इंगित कळत नाहीं; व ज्या वयामध्यें ज्या माहितींची जरूर व उपयोग नाहीं, त्या वयामध्यें ती माहिती झाल्यानें मनांत भलत्याच गोष्टी घोळूं लागून अनिष्ट परिणाम होतात. आपल्या समाजामध्यें ह्या प्रमाणें अकालीं श्रृंगारिक गोष्टींची माहिती मुलांस झाल्यामुळें त्यांच्या शरिराची व मनाची फार खराबी होत आहे. पण ह्याला कारण श्रृंगारिक--ग्रंथ--वाचन हें नसून आपली अविभक्त कुटुंबस्थिती, व विशेष थाटामाटाचे सोहाळे हें होय ह्यासाठीं समाजांतून श्रृंगारिक ग्रंथ नाहींसे करण्यापेक्षां न्हाणोलीच्या मिरवणुकीसारख्या व्यवहारिक मर्यादेचा लोप करणाऱ्या ज्या चाली कित्येक ठिकाणीं प्रचारांत आहेत त्याच बंद झाल्या पाहिजे आहेत.

पण कोंबडा झांकून ठेविल्यानें ज्याप्रमाणें उजाडावयाचें राहत नाहीं,

त्याप्रमाणें ज्या वयामध्यें जे विकार उत्पन्न व्हावयाचे ते त्या वयामध्यें उत्पन्न झाल्यावांचून रहावयाचेच नाहींत ह्यास्तव ते उत्पन्न न होण्याचें उपाय योजण्यापेक्षां, त्यांना योग्य, व्यवस्थित व मर्यादित वळण लावणें हेंच अधिक श्रेयस्कर आहे. प्रौढ व गंभिरार्थक काव्य नाटकें हीं अशा प्रकारचें वळण लावणारीं आहेत. ह्मणून त्यांच्या अस्तित्वाची फार अवश्यकता आहे. मद्य मुळींच न पिणें हें उत्तम पण कोणाला जर तें अज्जीं सुटणें अशक्य असेल तर त्यानें तें मन मानेल तसें पीण्यापेक्षां प्रसिद्ध भिषग्वर्याच्या देखरेखीखालीं त्यानें सांगितलेल्या मार्गानें सेवन करणें चांगलें. श्रृंगारमद्याचीही गोष्ट अशीच आहे. हें मद्य ग्राम्य रीतीनें मर्जीमाफक सेवन करण्यापेक्षां श्रृंगार-दीक्षा-गुरूंनीं उपदेशिलेल्या मार्गानें सेवन करणें हितकारक आहे. वर सांगितल्या प्रकारच्या ग्रंथांतून उंच प्रतीच्या व पूज्य पात्रांचेंच श्रृंगार--वर्णन असल्यामुळें त्यांच्या वाचनानें उच्छृंखल दुर्विकार जागृत न होतां भक्तिमिश्रित उदात्त श्रृंगार--वृत्तींनांच भरती येते.

आतां 'A little Knowlege is a dangerous thing' * ह्या ह्मणीप्रमाणें कोणत्याही विषयाचें थोडेंसेंच ज्ञान, ह्मणजे धड ना ज्ञान ना अज्ञान, हें दुष्परिणामी असावयाचेंच. ह्मणून जर कोणी वरील ग्रंथांचें दर्शन मात्र घेऊन त्यांपासून चावटपणा मात्र शिकेल, तर तें त्याच्या मूर्खपणाचें दर्शक होईल. त्यामुळें ग्रंथांकडे कांहीं दोष येत नाहीं. असल्या ग्रंथांच्या वाचनानें पुरुषांनीं सकलत्रैकनिष्ठ व्हावें, व स्त्रियांनीं पतिव्रता व्हावें असेच ते आहेत. शाकुंतल नाटकांतील नायिकेला हंटर साहेबांनीं जी सीतेच्या जोडीस नेऊन बसविली आहे ती उगाच काय ?

मेघदूत काव्यापासून व त्याच्या प्रस्तुत भाषांतरापासून तरी वरीलच बोध घ्यावयाचा आहे. यक्ष जर स्वकांतैकनिरत नसता तर ह्या काव्यांतील

* अल्पज्ञान हें अनर्थकारक होय.

ऐकण्यांतही नाहीं; निदान तसा व्हावा असें वरील काव्यांत तरी कांहीं नाहीं. असें असून त्यांच्या वाचनानें कोणी बिघडला असें कोणाला वाटत असल्यास तो सदरहू काव्यांचा दोष नसून आपल्या सांप्रतच्या धर्मशैथिल्याचा, कर्तव्य मूढतेचा, अलीकडील शिक्षणपद्धतीनें व राज्यपद्धतीनें प्राप्त झालेल्या अनिर्बंध चौचालपणाचा, व एकंदरींत हल्लींच्या बिघडलेल्या समाज--परिस्थितीचा तो परिणाम आहे असें समजावें. हजारों वाचनाचें काम एक उपदेश करितो, व हजारों उपदेशांचें काम एक उदाहरण करितें. ह्यासाठीं आपल्या तमाशां सारख्या अचकट विचकट प्रकारांस शिष्टसंमत, व्यवस्थित, व मनोरम असें योग्य वळण लावणारा कोणी तरी किर्लोसकर आधीं उत्पन्न झाला पाहिजे आहे. म्हणजे कांहीं अंशीं नीतीचा बचाव होईल. बाकी समाजाची जर कशानें दुराचाराकडे प्रवृत्ति होत असेल तर ती काव्यनाटकांच्या वाचनानें होत नसून वरील कारणांनीं होत आहे.

आतां ज्यामध्यें प्रौढ व गूढ शृंगारवर्णनें आहेत असे ग्रंथ सुद्धां अप्रौढ वयांत किंवा विद्यार्थिदशेंत वाचणें बरोबर नाहीं. कारण त्या स्थितींत त्यांतील खरें इंगित कळत नाहीं; व ज्या वयामध्यें ज्या माहितीची जरूर व उपयोग नाहीं, त्या वयामध्यें ती माहिती झाल्यानें मनांत भलत्याच गोष्टी घोळूं लागून अनिष्ट परिणाम होतात. आपल्या समाजामध्यें ह्या प्रमाणें अकालीं शृंगारिक गोष्टींची माहिती मुलांस झाल्यामुळें त्यांच्या शरिराची व मनाची फार खराबी होत आहे. पण ह्याला कारण शृंगारिक--ग्रंथ--वाचन हें नसून आपली अविभक्त कुटुंबस्थिती, व विशेष थाटामाटाचे सोहाळे हें होय ह्यासाठीं समाजांतून शृंगारिक ग्रंथ नाहींसे करण्यापेक्षां न्हाणोलीच्या मिरवणुकीसारख्या व्यवहारिक मर्यादेचा लोप करणाऱ्या ज्या चाली कित्येक ठिकाणीं प्रचारांत आहेत त्याच बंद झाल्या पाहिजे आहेत.

पण कोंबडा झांकून ठेविल्यानें ज्याप्रमाणें उजाडावयाचें राहत नाहीं,

त्याप्रमाणें ज्या वयामध्यें जे विकार उत्पन्न व्हावयाचे ते त्या वयामध्यें उत्पन्न झाल्यावांचून रहावयाचेच नाहींत ह्यास्तव ते उत्पन्न न होण्याचे उपाय योजण्यापेक्षां, त्यांना योग्य, व्यवस्थित व मर्यादित वळण लावणें हेंच अधिक श्रेयस्कर आहे. प्रौढ व गंभिरार्थक काव्य नाटकें हीं अशा प्रकारचें वळण लावणारीं आहेत. ह्मणून त्यांच्या अस्तित्वाची फार अवश्यकता आहे. मद्य मुळींच न पिणें हें उत्तम पण कोणाला जर तें अज्जीं सुटणें अशक्य असेल तर त्यानें तें मन मानेल तसें पीण्यापेक्षां प्रसिद्ध भिषग्वर्याच्या देखरेखीखालीं त्यानें सांगितलेल्या मार्गानें सेवन करणें चांगलें. शृंगारमद्याचीही गोष्ट अशीच आहे. हें मद्य ग्राम्य रीतीनें मर्जीमाफक सेवन करण्यापेक्षां शृंगार--दीक्षा--गुरूंनीं उपदेशिलेल्या मार्गानें सेवन करणें हितकारक आहे. वर सांगितल्या प्रकारच्या ग्रंथांतून उंच प्रतीच्या व पूज्य पात्रांचेंच शृंगार--वर्णन असल्यामुळें त्यांच्या वाचनानें उच्छृंखल दुर्विकार जागृत न होतां भक्तिमिश्रित उदात्त शृंगार--वृत्तींनांच भरती येते.

आतां 'A little Knowlege is a dangerous thing' * ह्या ह्मणीप्रमाणें कोणत्याही विषयाचें थोडेंसेंच ज्ञान, ह्मणजे धड ना ज्ञान ना अज्ञान, हें दुष्परिणामी असावयाचेंच. ह्मणून जर कोणी वरील ग्रंथांचें दर्शन मात्र घेऊन त्यांपासून चावटपणा मात्र शिकेल, तर तें त्याच्या मूर्खपणाचें दर्शक होईल. त्यामुळें ग्रंथांकडे कांहीं दोष येत नाहीं. असल्या ग्रंथांच्या वाचनानें पुरुषांनीं सकलत्रैकनिष्ठ व्हावें, व स्त्रियांनीं पतिव्रता व्हावें असेच ते आहेत. शाकुंतल नाटकांतील नायिकेला हंटर साहेबांनीं जी सीतेच्या जोडीस नेऊन बसविली आहे ती उगाच काय ?

मेघदूत काव्यापासून व त्याच्या प्रस्तुत भाषांतरापासून तरी वरीलच बोध घ्यावयाचा आहे. यक्ष जर स्वकांतैकनिरत नसता तर ह्या काव्यांतील

* अल्पज्ञान हें अनर्थकारक होय.

उद्गारासारखा एकही उद्गार त्याच्या मुखातून निघाला नसता. किंबहुना त्याच्या मेघाबरोबर निरोप पाठविण्याचीही स्फूर्ति झाली नसती. ह्मणजे अर्थात् ह्या काव्याचा प्रादुर्भावच झाला नसता. सारांश स्वदारपरितुष्टता हें ह्या काव्याचें जीवित--सर्वस्व आहे. ह्मणून त्या भरांत मर्यादेबाहेर गेलेल्या एखाद्या शद्बाची कर्त्यास आपण माफी केली पाहिजे. हाय ! हाय ! ' स्वदारपरितुष्टां ' ची भर्तृहरीच्या वेळेप्रमाणेंच आजही केवढी कमताई आहे ! तेव्हां पुरुषांस एकपत्नीव्रताचा व स्त्रीयांस पातिव्रत्याचा बोध करणाऱ्या असल्या ग्रंथाची फार अवश्यकता आहे. साराश ह्याप्रमाणें स्त्रीपुरुषांमध्यें मनोरंजनपूर्वक स्वकांतैकनिष्ठता उत्पन्न करणें हाच श्रृंगारिक ग्रंथाचा उद्देश व परिणाम असल्यामुळें ते नीति बिघडविणारे नसून वाढविणारे आहेत. असे सिद्ध होतें.

९ ह्या ग्रंथाचें भाषांतर* पूर्वी कै० वा० कृष्ण शास्त्री चिपळूणकर ह्यांनीं केलें असून आणखी हें करण्याचें कारण काय तें येथें सांगितलें पाहिजे. हें भाषांतर करण्याचीं तीन कारणें आहेत. एक असें कीं शास्त्रीबुवांचें भाषांतर साकी छंदांत आहे; व मंदाक्रांताछंद मेघदूत काव्याच्या विषयाला विशेष अनुकूल ह्मणून मूळ कवीनें योजिला असल्यामुळें त्या छंदांत जर श्लोकास श्लोक ह्याप्रमाणें भाषांतर साधेल तर फार चांगलें होईल असें मला वाटलें नंतर नमुन्यासाठीं एका श्लोकाचें भाषांतर करून व तें एक दोन मित्रांस दाखवून त्यांचा अभिप्राय विचारिला. तो अनुकूल पडल्यावरून यथामति हा प्रयत्न केला आहे. दुसरें शास्त्रीबुवांचें भाषांतर शद्बशः नसून स्वतंत्र ग्रंथाप्रमाणें बरेंच स्वछंदपणें केलेलें आहे असें ह्मणण्यास हरकत नाहीं. व त्यांनी ही आपल्या प्रस्तावनेंत तसें स्पष्ट लिहिलें आहे. तिसरें, ' अर्थोगिरामपिहितः पिहितश्चकास्ति ' ह्या कव्युक्तीप्रमाणें काव्याचा अर्थ अर्धवट गूढ व अर्धवट

* ह्या शिवाय यक्ष संदेश व रा. रा. लेले कृत समवृत भाषांतर अशीं दोन भाषांतरे प्रसिद्ध आहेत. ( संपादक )

उघड असा असल्यानें मनाला जी मौज वाटते, ती अगदींच गूढ किंवा अगदींच उत्तान असल्यानें वाटत नाहीं. तसेंच जो अर्थ संस्कृतांत एका वाक्यांत ग्रथित केला असतो तो मराठींत फोडून अनेक वाक्यांनीं सांगितला असतो अगदींच उघड होऊन त्याची मूळची शोभा जाते. आणि होईल तितकी वाक्यरचना मात्र सुबोध व सरळ आणि अर्थ मूळाइतकाच उघड किंवा गूढ ठेऊन, एका श्लोकांतील अर्थ एकाच श्लोकांत आणिल्याखेरीज मूळ काव्याच्या सौंदर्याची खरी कल्पना येत नाहीं. ह्यास्तव मला अशा प्रकारचें समश्लोकी भाषांतर करणें इष्ट वाटलें. व हें केवळ पदशःच नाहीं. तरी पद्यशः असल्यामुळें, ह्याच्यायोगानें मूळ ग्रंथाच्या अध्ययनासही थोडी फार मदत होईल अशी उमेद आहे.

हें भाषांतर करितांना मला तीन गोष्टी संभाळावयाच्या होत्या. पहिली वृत्त तेंच राखावयाचें. दुसरी मूळांतील अर्थ जाऊं न देतां एकाच श्लोकांत आणावयाचा. व तिसरी ठेवितां येईल तितकी भाषा सोपी व सरळ ठेवावयाची. ह्या तिन्ही गोष्टींकडे यथामति लक्ष दिलें आहे. निरुपायास्तव जागजागीं संस्कृत शब्दांचा उपयोग करावा लागला आहे. तथापि प्रचाराबाहेरचे शब्द टाळतां येतील तितके टाळले आहेत. शब्दार्थाकडे विशेष लक्ष न देतां वाक्यार्थाकडेच दिलें आहे; व जेथें संस्कृतांतील रचना अवघड व प्रचारबाह्य वाटली, तेथें मूळांतील अर्थ मात्र घेऊन मराठीच्या रीतीप्रमाणें रचना केली आहे. एकंदरींत वामनमोरोपंताच्या कवितेंत ज्यांचा प्रवेश झाला आहे त्यांना हें सहज समजावें असा कर्त्याचा हेतु आहे. त्यांतून मेघाच्या रसांत वाचकांचीं अंतःकरणें बुडविण्याचें काम शास्त्रीबुवांच्या भाषांतरानें आधींच करून टाकिल्यामुळें, व त्या भाषांतराच्या वेळेपासून आज तीस चाळीस वर्षांत शिक्षणाचा प्रसार बराच झाल्यामुळें तो फायदा मला अनायासें मिळणार आहे.

आतां हा माझा उद्योग कितपत सफळ झाला आहे तें पहाण्याचे डोळे माझ्याजवळ नाहींत. ते विद्वान् व रसिक यांच्याजवळ आहेत. व ज्याअर्थी कितीही केले तरी आपलें दोष आपल्याला दिसणें शक्य नाहीं, त्याअर्थी ह्यांत अनेक दोष राहिले असतील यांत संशय नाहीं. यास्तव हंसक्षीरन्यायानें दोषत्याग करून गुणलेश-ग्रहण करण्याविषयीं विद्वज्जनांस प्रार्थना आहे.

हें भाषांतर तयार होऊन सुमारें १० वर्षे, व तें परीक्षणासाठीं डे. व्ह. ट्रॅ. सोसायटीकडे पाठवून सुमारें ८ वर्षे झालीं. सोसायटीनें पसंत केल्यावांचून प्रसिद्ध करावयाचें नाहीं, असा मनाचा संकल्प असल्यामुळें इतके दिवस पडून राहिलें होतें. आतां सोसायटीनें पसंत करून बक्षिस दिल्यामुळें तें लोकांपुढें आणण्यास धीर आला. ह्यास्तव ह्याच्या प्रसिद्धीचें सर्व श्रेय सोसायटीकडे आहे. तसेंच सोसायटींतील ग्रंथपरीक्षकांनीं, व देवरूखचे वे. शा. सं. सोनशास्त्री साने आणि मालवणदेसाईस्कूलचे हेडमास्तरसाहेब रा. रा. भि. रा. करंदीकर ह्या विद्वान् व रसिक मित्रद्वयानें, कित्येक उपयुक्त सूचना केल्याबद्दल मी त्यांचा फार आभारी आहें.

महाराष्ट्रभाषाभिमानी लोक आपल्या उदार आश्रयानें ह्या अल्प सेवेचा स्वीकार करून कर्त्यास उत्तेजन देतील अशी आशा आहे.

बा. ल. अंतरकर.

भाषांतरकर्ता.

ता. क.--हें भाषांतर छापून प्रसिद्ध करण्याच्या कामीं 'काव्यरत्नावली' मासिकाचे संपादक रा. रा. फडनीस ह्यांनीं, निरपेक्षपणें जी तसदी घेतली तिच्याबद्दल मी त्यांचा अत्यंत ऋणी आहे.

बा. ल. अंतरकर.

# काव्यरत्नावलि.

## अंक १ ला.

## मेघदूतच्छाया.

### पूर्वमेघ.

#### श्लोक.

बव्हर्था ती कविमणिकृती मेघ-संदेश कोठें,
लब्धाल्पार्था मति मम कुठें, यद्गती शीघ्र कुठें;
वंची मोह स्फुरवुनि मना कामना निष्फलाही,
तल्लीलेचें स्फुट फल असे मत्कृती प्राकृतीं ही. १

कोणी यक्ष स्वकृति चुकुनी स्वेश[1]-शापें बिचारा,
झाला कांता[2]-वियुत विभवभ्रष्टही मास बारा;
सच्छायीं[3] तो उटजिं विरही राहि रामाद्रि[4]-भागीं,
सीतास्नानें[5] सुकृतद[6] जिथें तोयेंही[7] जागजागीं. १

त्या शैलीं तो स्मरहत[8] तसे घालवी मास कांहीं,
हस्तांतूनी वलयहि गळूं लागलें हृद्व्यथांहीं;
तों आषाढीं गिरिशिरिं दिसे वेंघला मेघ त्यास,
जाणों खेळे करि उकरुनी पर्वताच्या कड्यास. २

---

१ ( स्व-द्रव्य; आपण×ईश-धनी ) आपला धनी जो कुबेर त्याच्या शापानें. २ स्त्रीविरही. ३ दाट सांवलीनें युक्त अशा. ४ ( नाशिका जवळील ) रामगिरि नामक पर्वतावर. ५ ( वनवासकाळीं ) सीता तेथें असतां तिनें स्नान केल्यामुळें. ६ पुण्यकारक. ७ पाणी. ८ कामपीडित.

राहे कष्टें अति पुढति त्या कौतुकोत्पादकाच्या,
चित्तीं चिंती सुचिर, नयनीं दाटले अश्रु त्याच्या.
स्वस्थाचेंही बघुनि जलदा चित्त अस्वस्थ होतें;
कंठा[1]–श्लेषी जन मग दुरी राहतां काय हो तें? ३
वर्षाकाळीं प्रियगृहिणिला धीर यावा ह्मणोनी
योजी तीतें निज कळविण्या क्षेम मेघाकडोनी;
ताज्या ताज्या कुटजकुसुमीं पूजुनी त्यास भावें,
बोले प्रेमें प्रियवचन, जें स्वागता योग्य व्हावें. ४
कोठें सांठा जड जलद हा वायुतोयादिकांचा,
कोठें सा[2]ध्या सु–चतुरजना मात्र संदेश[2]वाचा !
उत्कंठेनें नच गणुनि हें प्रार्थि मेघास तो; कीं,
होती मोहें स[3]–जिवि अजिवीं दीन कामार्त लोकीं. ५
" होसी वंशीं भुवनविदितीं[4] पुष्करावर्त[5]कांच्या,
इच्छा[6]रूपा ! प्रमुख असती सेवकीं देवपा[7]च्या,
जाणोनी हें तवचि बनलों अर्थि[8] मी दैवहीन
श्रेष्ठीं युक्ता विफलहि, खलीं याचना पूर्णही नें[9] ६
तूं त्रस्तांसी गति, ह्मणुनि, मी स्वेशकोपें विदेशी[10]
आलों श्रेष्ठा ! शरण तुज, ने वृत्त माझें प्रियेशीं.
बाह्योद्या[11]नीं पशुपति वसे, चांदणें तच्छिरींचें
जेथें गेहें खुलवि, अ[12]लकेमाजि त्या जावयाचें. ७

---

१ गळ्याला मिठी मारणारें ( जिवलग ) मनुष्य. २ साधणारी [ निरोपाची वाणी ]. ३ सजीव निर्जिवांच्या [ सर्वांच्याच ] ठायीं. ४ जगांत प्रख्यात अशा. ५ ह्या नांवाचे मेघ. ६ मर्जीस येईल तें रूप धरणाऱ्या. ७ इंद्राच्या. ८ याचक. ९ न युक्ता. १० कुबेराचा कोप झाल्यामुळें देशांतरास गेलेला. ११ नगराबाहेरच्या बागेंत. १२ ( त्या ) अलका नामक यक्षांच्या नगरींत.

होसी जेव्हां पवनतुरगीं स्वार, तैं पांथकांता[1]
आशायुक्ता[2] बघतिल तुला सारुनी[3] स्वालकांतां;
ऐशा काळीं झुरत विरहीं कोण ठेवील जाया,
नाहीं जो मत्सम परवश स्वालया शीघ्र जाया. ८

मार्गीं तूतें सुखकर असा वायु ने मंद मंद,
वामप्रांतीं करि स–मैंद[4] हा चातक स्वादु[5] शब्द,
रत्यानंदें गगनिं बगळ्या मंडलाकार खास
होवोनीया करितिल तुझ्या सौख्यदा ! स्वागतास. ९

बंधो ! शंका न धरिं वहिनी[6] आपुली पाहशील,
विश्वासें जी दिन गणित हे राहिली सत्यशील;
शीघ्रभ्रंशि[7] प्रणयि[8] सुमसें[9] जीवित स्त्रीजनाचें,
आशापांशीं[10] परि विरहिं[11] तें राहि गुंतून साचें. १०

संपत्तीतें सुचवि महिच्या जी शिलींध्रांकुरांनीं[12],
ती कर्णांतें सुखकर तुझी गर्जना आयकोनी,
मार्गीं खाया बिसकिसलयें[13] घेउनी मानसास[14]
जाती जे, ते मिळतिल तुला संगती राजहंस. ११

जो सद्वंद्यें[15] रघुपतिपदें जाहला धूतपाप,
त्या ह्या शैला तव जिवलगा भेटुनी घे निरोप;

---

१ प्रवाशांच्या स्त्रिया. २ आतां पति भेटतील अशी आशा धरणाऱ्या. ३ केसांच्या शेवटांस डोळ्यावरून मागे करून. ४ हर्षमत्त. ५ गोड. ६ तुझी वहिनी, अर्थात् माझी पत्नी. ७ लवकर गळून जाणारें. ८ प्रेममय. ९ फुलाप्रमाणें. १० आशा-रूपी बंधनांत. ११ विरहकाळीं. १२ चंवईच्या कोंबांनीं. १३ कमल तंतु व कळ्या. १४ मानससरोवराकडे. १५ साधूंना वंद्य अशीं रामाचीं पावलें लागल्यामुळें

राहे कष्टें अति पुढति त्या कौतुकोत्पादकाच्या,
चित्तीं चिंती सुचिर, नयनीं दाटले अश्रु त्याच्या.
स्वस्थाचेंही बघुनि जलदा चित्त अस्वस्थ होतें;
कंठा[1]–श्लेषी जन मग दुरी राहतां काय हो तें? ३
वर्षाकाळीं प्रियगृहिणिला धीर यावा ह्मणोनी
योजी तीतें निज कळविण्या क्षेम मेघाकडोनी;
ताज्या ताज्या कुटजकुसुमीं पूजुनी त्यास भावें,
बोले प्रेमें प्रियवचन, जें स्वागता योग्य व्हावें. ४
कोठें सांठा जड जलद हा वायुतोयादिकांचा,
कोठें सा[2]ध्या सु–चतुरजना मात्र संदेश[2]वाचा !
उत्कंठेनें नच गणुनि हें प्रार्थि मेघास तो; कीं,
होती मोहें स[3]–जिविं अजिवीं[3] दीन कामार्त लोकीं. ५
“ होसी वंशीं भुव[4]नविदितीं पुष्करा[5]वर्तकांच्या,
इच्छा[6]रूपा ! प्रमुख असती सेवकीं देवपा[7]च्या,
जाणोनी हें तवचि बनलों अर्थि[8] मी दैवहीन
श्रेष्ठीं युक्ता विफलहि, खलीं याचना पूर्णही[9] नें ६
तूं तप्तांसी गति, ह्मणुनि, मी स्वेशकोपें विदेशी[10]
आलों श्रेष्ठा ! शरण तुज, ने वृत्त माझें प्रियेशीं.
बाह्योद्यानीं[11] पशुपति वसे, चांदणें तच्छिरींचें
जेथें गेहें खुलवि, अलकेमाजि[12] त्या जावयाचें. ७

---

१ गळ्याला मिठी मारणारें (जिवलग) मनुष्य. २ साधणारी [निरोपाची वाणी]. ३ सजीव निर्जिवांच्या [सर्वांच्याच] ठायीं. ४ जगांत प्रख्यात अशा. ५ त्या नांवाचे मेघ. ६ मर्जीस येईल तें रूप धरणाऱ्या. ७ इंद्राच्या. ८ याचक. ९ न युक्ता. १० कुबेराचा कोप झाल्यामुळें देशांतरास गेलेला. ११ नगराबाहेरच्या बागेंत. १२ (त्या) अलका नामक यक्षांच्या नगरींत.

होसी जेव्हां पवनतुरगीं स्वार, तैं पांथकांता
आशायुक्ता बघतिल तुला सारुनी स्वालकांतां;
ऐशा काळीं झुरत विरहीं कोण ठेवील जाया,
नाहीं जो मत्सम परवश स्वालया शीघ्र जाया. ८

मार्गी तूतें सुखकर असा वायु ने मंद मंद,
वामप्रांतीं करि स–मँद हा चातक स्वादु शद्ब,
रत्यानंदें गगनिं बगळ्या मंडलाकार खास
होवोनीया करितिल तुझ्या सौख्यदा ! स्वागतास. ९

बंधो ! शंका न धरिं वहिनी[6] आपुली पाहशील,
विश्वासें जी दिन गणित हे राहिली सत्यशील;
शीघ्रभ्रंशि प्रणयि सुमसें जीवित स्त्रीजनाचें,
आशापाशीं परि विरहिं[11] तें राहि गुंतून साचें. १०

संपत्तीतें सुचवि महिच्या जी शिलींध्रांकुरांनीं[12],
ती कर्णातें सुखकर तुझी गर्जना आयकोनी,
मार्गी खाया बिसकिसलयें[13] घेउनी मानसास[14]
जाती जे, ते मिळतिल तुला संगती राजहंस. ११

जो सद्वंद्यें[15] रघुपतिपदें जाहला धूतपाप,
त्या ह्या शैला तव जिवलगा भेटुनी घे निरोप;

---

१ प्रवाशांच्या स्त्रिया. २ आतां पति भेटतील अशी आशा धरणाऱ्या. ३ केसांच्या शेवटांस डोळ्यावरून मागे करून. ४ हर्षमत्त. ५. गोड. ६ तुझी वहिनी, अर्थात् माझी पत्नी. ७ लवकर गळून जाणारें. ८ प्रेममय. ९ फुलाप्रमाणें. १० आशारूपी बंधनांत. ११ विरहकाळीं. १२ चंवईच्या कोंबांनीं. १३ कमल तंतु व पल्लव. १४ मानससरोवराकडे. १५ साधूंना वंद्य अशीं रामाचीं पावलें लागल्यामुळें ( निष्पाप )

दावी स्नेहा प्रतिसमयिं बा भेट होतां तुझी हा
सोडोनीया चिर[1]विरहजा उष्ण बाष्प[2]प्रवाहा १२
संदेशा[3]तें परिसविन बा मागुनी कर्णपेया[4]
आधीं तूतें सु-पथ सखया सांगतों योग्य जाया.
जातां मार्गीं गिरिवरिं सुखें श्रांत होतां बसावें
त्वां सिंधूचें[5] सलिल हलकें क्षीण होतांहि प्यावें. १३
उड्डाणातें करुनि गगनीं उत्तरेच्या दिशेनें
दिङ्[6]नागांच्या परिहरित जा हस्त[7]गर्वा अयत्नें;
पाहोनी तें ह्मणतिल अती विस्मिता[8] मुग्ध[9] कांता
"बाई ! बाई ! गिरिशिखर ने वायु कीं काय जातां !" १४
वल्मीकाग्रा[10]वरुनि पुढती इंद्रचाप[11] स्फुरे हें,
रत्नांचे कीं जणु मिसळले सु-प्रभासंघ पाहें;
तत्कांतीनें क्षण तव तनू श्याम शोभेल भारी,
श्रीकृष्णाची व्रजवनिं जशी भासुरीं[12] बर्ह[13]भारीं. १५
धान्योत्पत्ती तव करिं सख्या ! यास्तव ग्राम्य नारी
पीती प्रेमें नयनिं तुजला अज्ञ ज्या भ्रूविकारीं[14].
वर्षोनी दे हालिं उखळिल्या क्षेत्र[15]भूसी सुवास,
थोडा मागें फिर, मग जवें जा पुन्हा उत्तरेस. १६

---

१ फार दिवसांच्या वियोगानें उत्पन्न झालेल्या. २ अश्रूंच्या ओघांस, [ पक्षीं वाफाऱ्यांच्या ओघास. ] ३ निरोपाला. ४ कानांनीं पिण्यासारख्या ( गोड ). ५ नद्यांचें. ६ दिग्गजांच्या ( पक्षीं ह्या नांवाचा कालिदासाचा प्रतिस्पर्धी होता त्याच्या. ) ७ सोंडेच्या, [ पक्षीं धिक्कारसूचक हात उडवून दाखविलेल्या ] गर्वास. ८ आश्चर्य चकित. ९ अप्रौढ. १० वारूळाच्या टोंकापासून. ११ आकाशांतील रंगी बेरंगी धनुष्य. १२ तेजस्वी. १३ मोराच्या पिसांच्या समूहांनीं. १४ भुवयांच्या विलासांविषयीं. १५ शेताच्या जमिनीस.

मार्गश्रांता[1] ! देव शमविला त्वां निजें वृष्टिपातें,
हें जाणोनी धरिलाचि शिरीं आम्रकूटाद्रि[2] तूतें;
पूर्वी केलें स्मरुनि हित न क्षुद्रही लोटि दूर
आल्या मित्रा, तुज मग कसा तो उपेक्षील थोर. १७

पक्काम्रांनीं चहुंकडुन तो शैल झांकून गेला,
तैशाच्या तूं शिखरिं बसतां वेणिसा[3] स्निग्ध काळा,
तो वाटेल त्रिदशां[4]-मिथुनां रम्य अत्यंत चित्तीं,
भूदेवीचा स्तन जणु मधीं श्याम गोरा सभोंतीं ! १८

त्याच्या कुंजीं रमति जल-दा ! भिल्लिणी; तूंहि तेथें
राहोनीया घडिभर, जवें वर्षुनी जा स्वपंथें.
जातां मार्गी बघशिल नदी नर्मदा विंध्यभागीं,
नीचोच्चीं[5] जी विखरलि जणू रंगभंगी[6] गजांगीं. १९

वर्षोनी, जें वनकरिमदें[7] उग्र गंधा धरीतें,
जंबूकुंजीं हतजव[8] तिचें तोय घेऊन जा तें.
तोलाया तैं तुज न स-जला वायु होईल शक्त;
पूर्णा येतें वजन, हलका होतसे स्पष्ट रिक्त. २०

नीपें[9] कांहीं हिरविं पिंवळीं अर्धफुलें बघोनी,
आले कोंके प्रथम नव ज्यां खाउनी त्या चवेणी[10],

---

१ थणत्रा. २ आम्रकूट ह्या नांवाचा पर्वत. ३ केंसांच्या वेणीसारखा तेजस्वील्या ४ देवांच्या जोडप्यांस. ५ उंच सखल खडखडीत प्रदेशांत [ पाणी पसर[illegible] विजेच्या मधून मधून दगड वगैरे दिसत असल्यामुळें पर्वतावर चट्टे पट्टे काढिल्याप्रमाणें शोभे[illegible] दिसते. ] ६ रंगाची रचना [ शोभेसाठीं हत्तीच्या अंगावर करितात. ७ ( जलक्रीडेस आलेल्या ) रानहत्तीच्या मदानें. ८ ज्याचा वेग हटला आहे असें [ तोय ] ९ कळंबाचीं फुलें. १० रानकेळी.

जाती भूचा अति सुरभि[1] तो गंध हुंगीत भृंग,
ते जासी तूं लवें[2] गळत, तो जाणवीतील मार्ग. २१

घेती बिंदू अचुक तव, त्या चातकां जे पहातीं,
ओळीनेंची जमति बक त्यां मोजुनी दाखवीती,
ते[3] सोत्कंपा[4] अनुभवुनिया स्वप्रियालिंगनांतें,
सिद्ध प्रेमें स्तनित[5]समयीं गौर[6]वीतील तूतें. ( १ ) क्षेपक

मत्कार्यासी निघसि जरि तूं घाइनें जावयासी,
शंका येते तरि नगिनगीं[7] वेळ मोडेल ऐसी;
केका[8]प्रश्नीं कुशल पुसुनी साश्रु[9] नेत्रीं बघोनी
केकी येती अभिमुखं[10], तदा शीघ्र जा रे निघोनी. २२

जातांची तूं त्यजितिल सरें[11] हंस देशीं दशार्णी[12],
काळीं सारीं बनतिल[13] वनें पक्क जंबूफलांनीं,
उद्यानांच्या सुरुचिर वप्रा[14] शुभ्र सत्केतकांनीं,
पक्ष्यांच्याही पथ[15]तरु तसे व्याप्त नीडो[16]द्यमांनीं. २३

त्या देशाची प्रथित विदिशा नामका राजधानी,
कामित्वां[17]चें फळ तुज मिळे पूर्ण तत्संनिधानीं[18];

---

१ सुनासिक. २ थोड थोडी वृष्टि करीत. ३ ते सिद्ध ( देवयोनि विशेष. ) ४ कंपयुक्त [ स्वप्रियालिंगनांतें. ] ५ [ तुझ्या गडगडाटाच्या वेळीं. ] ६ ( तुझ्या गडगडण्यामुळे प्रियालिंगनाचा लाभ झाला ह्मणून ) तुझा गौरव करितात. ७ प्रत्येक नगावर. ८ केका [ मोराचे शब्द ] हेच कुशल प्रश्न, ह्यांनीं. ९ आनंदाश्रूंनीं युक्त. १० सामोरे. ११ सरोवरें. [ हंस पावसाळा सुरू होतांच मानस सरोवरांत जातात व संपतांच पुन्हा हिमालयाचे दक्षिणेस येतात. ] १२ ह्या नांवाचा देश. १३ ह्याचा अन्वय पुढील दोन चरणांकडही आहे. १४ कुंपणें. १५ वाटेच्या आजूबाजूचीं झाडें. १६ घरटीं बांधण्याच्या उद्योगांनां [ व्याप्त बनतिल. १७ विलासीपणाचें. १८ तिच्याजवळ

कीं शद्वातें करुनि मधुरा वेत्रवत्यग्रभागीं[1]
तें भ्रूभंगें[2] युत मुख जणू तोय पीशी तरंगी[3]. २४
तेथें नीचैर्गिरिवरि[4] बसें बा विसाव्यास खालीं;
त्वत्संयोगें[5] पुलकित[6] जणू जो कदंबीं प्रफुल्लीं,
जो वेश्यांच्या रतिपरिमलें[7] व्यापिल्या कंदरांनीं
तत्रस्थांची स्फुट कथि अती उत्कटा[8] ती जवानी २५
विश्रांती घे, मग वनिं पुढें जा नदी–तीर–देशीं[9],
शिंपीं बागांतुनि, नवजलें तूं जुईच्या कळ्यांशीं;
गालीं स्वेदा पुसुनि कमलें कर्णि कोमेलिं ज्यांच्या,
छायादानें सु–परिचित हो त्या मुखां माळिणींच्या. २६
जातां थोडा पथ जरि तुला वांकडा उत्तरेला,
गच्चया रम्या त्यजुनि नच जा उज्जनीच्या विशाला;
तेथें विद्युत्स्फुरणचकितीं[10] पौरकांता कटाक्षीं
रंगेल्या रे ! जरि न रमसी, व्यर्थ होतील अक्षी[11]. २७
वीचिक्षोभें[12] मुखर[13] विहगश्रेणि[14] ही रम्य कांची[15]
दावी[16], नामी स्खलन गतिचें, नाभि जी[17] भोंवऱ्याची,
निर्विंध्येचा अधररस[18] त्या मार्गि जाऊनि साधीं;
इष्टांशीं[19] कीं वच युवतिचें प्रीतिचेष्टाच आधीं. २८

---

१ वेत्रवती नदीच्यापुढें. २ भुंवईच्या चढविण्यानें युक्त. ३ मंद लाटांनीं युक्त. ४ नीचैः नांवाच्या पर्वतावर. ५ तुझ्या भेटीमुळें. ६ रोमांचित. ७ विलासार्थ नेलेल्या सुगंधी द्रव्यांच्या वासानें. ८ दांडगे तारुण्य. ९ नदीकांठच्या प्रदेशांत. १० विजेच्या चमकण्यानें चंचल झालेल्या ( पौरकांताकटाक्षीं. ) ११ डोळे. १२ लाटा उसळल्यामुळें. १३ शद्ब करणारी १४ पक्ष्यांची ओळ. १५ कमरपट्टा. १६ ह्याचा कांची, स्खलन, व नाभि ह्या तिहींकडे अन्वय आहे. १७ जी निर्विंध्या नदी. १८ [ त्या ] निर्विंध्यानामक नदीचा अधर रस [ खोल गेलेलें पाणी, पक्षीं अधरामृत. ] १९ प्रियकराशीं आरंभीं प्रीतिचेष्टा हेंच भाषण होय. ]

झालें वेणीपरि[1] जल तिचें आटुनी त्वद्वियोगें,
जीर्णें पर्णें पडुनि तरुचीं पांढरीं फट्ट अंगें,
लागोनीया झुरणिस अशी ती तुझें भाग्य[2] दावी;
सोडी जेणें कृशपण सती ती कृती त्वां करावी. २९
ख्याता जेथें उदयनकथा[3] गांठुनी तो अवंती[4]
पूर्वोक्ता जी बवशिल पुरी श्रीमंती[5] उज्जनी ती;
वाटे येतां सुकृत घटुनी[6] स्वर्गवासी जनांनीं
स्वर्गाचें हें शकल अणिलें शेष पुण्यें हरोनी. ३०
हंसांचीं जो श्रवणमधुरें कूँजितें[7] वाढवीतो,
झाला गंधी विकच[8] कमलां स्पर्शुनी, पांहटे तो
शिप्रावायू[9] सुखवुनि तिथें अंगनांगास धामीं[10]
संभोगाचे श्रम हरि, सखा[11] आर्जवी जेवि कामी. ३१
मुक्ताहार ग्रथित सु-महारत्नें, शंख, प्रवालें,
शिंपा, पाचा रुचिर हिरव्या व्याप्त सत्कांतिजालें,
बाजारीं हें बघुनि भरलें तेथ भांडार सारें,
वाटे रत्नोदधिमधिं[12] उरे शेष पाणीच खारें ! ( २ ) क्षेपक
प्रद्योतांच्या[13] इथुनि हरिलें वत्सराजें मुलीतें,
येथें तालद्रुमवन तसें हैम[14] त्याचेंच होतें;

---

१ जटांप्रमाणें. [ थोडें पाणी वाहत असलें म्हणजे त्याच्या पृष्ठभागीं वेणीच्या पेडांसारख्या किंवा जटांसारख्या रेषा दिसतात. ] २ तुझ्या विरहानें स्त्रिया झुरतात हें तुझें भाग्य. ३ ह्या नांवाचा वत्सदेशाचा राजा, ह्याच्या गोष्टी. ( उज्जनीचा राजा प्रद्योत ह्याची मुलगी वासवदत्ता हरण केली वगैरे. ) ४ ह्या नांवाचा देश. ५ संपन्न. ६ कमी होऊन. ७ अस्पष्ट शब्द. ८ प्रफुल्लित. ९ तेथील शिप्रानदीवरचा वारा. १० घरांत. ११ आर्जवें करणारा कामासक्त प्रियकर. १२ रत्नें आणि पाणी ह्यांचा सांठा जो समुद्र त्यांत. १३ उज्जनीचा प्राचीन राजा. १४ सुवर्णमय.

येथें हत्ती नलगिरि मदें मोडुनी खांब मोते,
ह्या गोष्टींनीं रमविति तिथें लोक आल्या जनांतें. ( ३ ) क्षेपक

सूर्याश्वांशीं हरित सजव स्पर्धती अश्व तेथें;
शैलोच्चें त्वत्सम करि सदा वर्षती जे मदातें;
योद्धे युद्धांगणिं दशमुखासंमुखीं ठाकती ते
धिक्कारूनी नगें धरिति जे चंद्रहासव्रणांतें ( ४ ) क्षेपक

जाळ्यांपाशीं बनविल तुला पुष्ट सौगंधि धूर;
नाचोनीया करितिल तुझा मान पाळींव मोर;
स्त्रीपादांकीं अरुणित गृहीं पुष्पगंधप्रसारीं
रम्या शोभा बघत थकवा मार्गिचा दूर सारीं. ३२

जा शंभूच्या भुवनगुरुच्या पुण्यदा मंदिरातें;
हर्षे तूतें बघातिल गण स्वामिकंठप्रभातें.
कांतास्नानें परमसुरभी गंधवत्यूर्ध्ववाही
पद्मोद्गंधी पवन हलवी तेथ उद्यान पाहीं. ३३

मेघा ! जाशी कधिं जरि महाकालसद्मीं अकाळीं,
राहीं जाई नयनपथ जों सोडुनी भानु खालीं;

---

१ हत्तीचें नांव. २ उन्मत्त झाला. ३ पर्वतासारखे उंच. ४ तुझ्यासारखे [ रंगानें आणि वर्षावानें ] ५ अलंकार. ६ रावणाच्या तरवारीच्या जखमांस. ७ खिडक्यांजवळ. ८ [ लाक्षारस लावलेल्या ] स्त्रियांच्या पावलांच्या चिन्हांनीं लाल झालेल्या ( गृहीं ) ९ फुलांचा वास जेथें पसरला आहे अशा ( गृहीं ) १० जगाचा आईबाप जो ( शंकर महाकालेश्वर ) त्याच्या. ११ धन्याच्या ( शंकराच्या ) कंठाप्रमाणें ज्याची प्रभा ( निळी ) अशा ( तूतें ). १२ गंधवती नामक नदीवरून वहाणारा. १३ कमळांचा घमघमाट ज्याच्या बरोबर आहे असा. १४ महाकाळेश्वराच्या देवळांत.

सायंपूजासमयिं करुनी भेरिकार्य[1] प्रभूचें
पूर्णत्वानें मिळविं फळ बा श्लाघ्य[2] मंद्र[3]ध्वनीचें. ३४
कांची[4] ज्यांची रुणझुण करी टाकितां पाउलांतें,
होती कष्टी कर हलवितां चामरें रत्नकांतें,
त्यां[5] घेऊनी तव सुखदसे आद्य बिंदू नखांकीं[6]
वेश्या तूतें बघतिल अलिश्रेणिनेत्रांचलीं[7] कीं. ३५
संध्यारागें[8] धरुनि सुजपापुष्पशी[9] अंगिं लाली,
व्योमीं नेल्या भुजिं शिरुनिया शंभुच्या नृत्यकालीं,
त्याला ओल्या गरज नुरवीं हस्तिच्या कातड्याची;
ही उद्वेगांविण[10] तव उमा भक्ति पाहील साची. ३६
होतां दृष्टी विफल भरुनी मार्ग भारी तमानें
जाती रात्रीं रमणसदनीं योषिता ज्या अमानें[11],
दावीं त्यांनां पथ कनकवद्दीप्तविद्युत्प्रभावें,
वृष्टी किंवा स्तनित न करीं भीरु कीं त्या स्वभावें. ३७
विद्युत्कांता चिर विलसुनी[12] श्रांत होतांच तेथें
काढीं सद्मच्छादिं[13]च रजनी, पारवे सुप्त जेथें.
होतां सूर्योदय पुनरपी शेष मार्गास कंठीं;
यत्नीं होती शिथिल न, सुहृत्कार्य जे घेति कंठीं[14] ३८

---

१ नगाऱ्यांचें काम. २ स्तुत्य ( फळ ) ३ गंभीर. ४ घुंगुरांचा कमरपट्टा. ५ त्या वेश्या ( शंभुसेवेसाठीं नाचणाऱ्या कलावंतिणी. ) ६ ( रतिसमयीं झालेल्या ) नखचिन्हांवर ( सुखदसे ) ७ ( फेर धरून नाचत असतां एकदम वर पाहिल्यामुळें ) भुंग्यांच्या ओळीप्रमाण दिसणाऱ्या नेत्रकटाक्षांनीं. ८ संध्याकाळीं आकाशांत पसरणाऱ्या रंगानें ९ चांगल्या जासवंदीच्या फुलासारखी. १० त्रासावांचून ( शंकर तांडवकालीं हत्तीचें ओलें कातडें अंगावर घेतात व पार्वतीला त्याचा कंटाळा वाटतो. ) ११ अभिमान किंवा रुसवा सोडून. १२ चमकून, ( पक्षीं विलास करून ). १३ गृहआच्छादनावर. १४ गळ्यांत, अंगावर.

तेव्हां अश्रू प्रियकरजनीं खंडितां[1] योषितांचे
वारा याचे त्वरित ह्मणुनी सोड मार्गा रवीचे[2];
अब्जास्यींचें[3] ह्मणि नलिनिच्या तोहि न्यांया[4] हिमास्त्रें[5]
येई, तों त्वां कर[6] अडवितां क्रुद्ध होईल फार. ३९
गंभीरेचें[7] हृदयचि असें तोय जें सुप्रसन्न[8],
त्यामध्यें हे सुरुचिर तुझें रूप बिंबेलें[9] पूर्ण;
यासाठीं बा विफल न करीं ते तिचे दृष्टिपात,
मत्स्योड्डाणें स्फुट दिसति जे लोलें[10] फुल्लाब्जकांत[11]. ४०
तीरश्रोणीसृतें[12], धृत जरा[13] वेत्रहस्तें[14], सुनील,
प्रेमें तोयांशुकें[15] हरुनिया तें तिचें लोंबशील;
कष्टें मोठ्या करिशिल गड्या ! तेथुनी तूं प्रयाण;
सौख्यज्ञ सीजघन उघडें सोडण्या शक्त कोण ! ४१
त्वत्वृष्टीनें जनित[16] महिचा ज्यास लागे सुगंध,
नालपारंध्रीं करिति करि ज्यां[17] शोषितां रम्य शद्ब,
वाहोनीया पिकवि विपिनीं उंबरें जो अपार,
तो तूतें बा सुरगिरिवरि[18] वायु नेईल गार. ४२

---

१ जिला ठकवून प्रियकर दुसऱ्या स्त्रीकडे गेला ती. २ रवीचे ( च्या ) मार्गा सोड. ३ कमलरूपी मुखावरचें. ४ घालविण्यास. ५ दवरूपी अश्रू. ६ किरण, [ पक्षीं हात. ] ७ गंभीरा नामक नदीचें. ८ निर्मळ, [ पक्षीं उल्हासित ] ९ प्रतिबिंबित होईल, [ पक्षीं ठसेल. ] १० चंचल. ११ फुललेल्या कमळाप्रमाणें रम्य. १२ कांठरूपी नितंबांवरून सरकून खालीं गेलेलें. १३ किंचित्. १४ ( खालीं वांकून पाण्याला लागलेले कांठचे ) वेतरूपी हातानें ( धृत ) १५ जलरूपी वस्त्र. १६ उत्पन्न झालेला ( सुगंध ) १७ ज्या वायूला. १८ देवगिरि नामक पर्वतावर.

तेथें राहे गुह[1] सतत, त्या, पुष्परूपा धरोनी.
स्वर्गंगार्द्रीं[2] कुसुमनिकरीं स्नान घालीं वरोनी;
सूर्याहूनी प्रखरतर कीं देवसेनावनातें[3]
ठेवी वीर्य ज्वलनिं[4] हर जें भूषवी त्या वना तें. ४३
ज्याचें खालीं गळुनि पडलें बर्ह तेजाळ भारी
पुत्रप्रेमें श्रवणिं, कमला सारुनी, ठेवि गौरी,
स्कंदांच्या[5] त्या गिरिशशशिभाशुभ्रनेत्रा[6] मयूरा
अद्रिप्रांतीं ध्वनि घुमवुनी नाचवीं रे गरारा. ४४
आराधोनी शिवसुत पुढें चालतां त्वत्पथास
वीणाधारी[7] त्यजितिल जलस्पर्शभीतेंच[8] खास.
सन्मानीं त्या नदिस निपजे जी गवालंभनांतीं[9],
ओघांकारें[10] प्रकटलि जगीं रंतिदेवप्रकीर्त्ति[11]. ४५
प्यायाला तूं सलिल लवतां विष्णुवर्णानुकारी[12]
त्या सिंधूचा पृथुहि[13] दुरुनी ओघ बारीक भारी

---

१ कार्तिकस्वामी. २ आकाशगंगेच्या पाण्यानें ओल्या झालेल्या. ३ देवांच्या सैन्याच्या रक्षणासाठीं. ४ अग्नींत [ शंकराचें रेत कोणाला सहन होईना ह्मणून तें त्यानें अग्नींत ठेविलें; व त्यापासून पुढें कार्तिकस्वामी झाला. त्यानें देवांचा सेनापति होऊन तारकासुरास मारिलें. ] ५ कार्तिकस्वामीच्या. ६ शिवमस्तकींच्या चंद्रप्रभेनें ज्याचे नेत्र अधिकच शुभ्र दिसतात अशा [ मयूरा ] ७ गंधर्व वगैरे. ८ [ विण्याच्या तारांस ] पाणी लागेल ह्या भीतीनें. ९ गाई मारण्याच्या यज्ञाच्या शेवटीं. १० प्रवाहरूपानें. ११ रंतिदेव नामक राजाची कीर्ति. [ ह्यानें यज्ञांत इतक्या गाई मारिल्या कीं त्यांच्या रक्तचर्माची ' चर्मण्वती ' नामक नदी उत्पन्न झाली. तिचेंच हें वर्णन आहे. ] १२ विष्णूच्या रंगासारखा [ काळा ] १३ मोठा असून सुद्धां.

न्याहाळोनी गगनचर बा कौतुकें पाहतील,
भूचा मुक्तासर[1] जणु, भला[2] ज्यामधीं इंद्रनील. ४६

जातां तीर्ते त्यजुनि, पटु ज्या भ्रूविलासांत साच्या,
पक्ष्मक्षेपें[3] स्फुरति वरि भौं[4] नीलगौरा[5] जयांच्या,
शोभा ज्यांची, अलिंचि[5] चलितीं[6] तीं[7] जशी कुंदपुष्पीं,
त्या स्त्रीदृष्टी दशपुरिं[8] करीं लोभिता त्वत्स्वरूपीं. ४७

ब्रह्मावर्ती मग करुनिया सांवली सौख्यदा ही
क्षत्रांच्या जें सुचवि समरा तें कुरुक्षेत्र पाहीं;
भूपालांचीं खर शरिं शिरें जेथ गांडीवधारी[9]
खंडी, जेवी अमित कमलें तूं स्वधाराप्रसारीं. ४८

टाकोनीया प्रियहि मदिरा रेवतीनेत्रकांता[10]
आप्तप्रेमें[11] त्यजुनि रण पी जें हली[12] पातकांता[13],
सेवोनी त्या विमल सलिला तूंहि सारस्वता[14] गा
रंगानेंची मलिन हृदयीं शुद्ध होशील मेघा ! ४९

---

१ मोत्यें ओंवलेला पदर. २ मोठा थोरला. ३ पापण्या वर केल्यामुळें. ४ प्रभा. ५ भुंग्यांची. ६ हालणाऱ्या [ कुंदपुष्पीं. ] ७ शोभा. ८ रंतिदेवाच्या दशपुर नामक नगरांत. ९ अर्जुन. १० रेवती ( बलरामाची स्त्री ) हिच्या नेत्राप्रमाणें मोहक [ अथवा ती जवळ असल्यामुळें तिच्या डोळ्यांच्या प्रतिबिंबानें रमणीय. ] ११ आप्त जे कौरव पांडव त्यांच्या प्रीतीनें. १२ बलराम [ ह्याला मद्य फार प्रिय होतें. ] १३ पातकाचा नाश होण्यासाठीं. [ सूतनामक पुराणिकाचा बलरामानें रागानें वध केला; व त्या पापाच्या प्रायश्चित्तासाठीं नदीचें तीर्थ घेऊन दोषमुक्त झाला. ] १४ सरस्वतीच्या ( सलिला. )

तेथोनी जा कनखल नगीं जन्हुकन्येसि, आली
जी कैलासाहुनि, सगर[1]जां स्वर्गसोपान झाली;
गौरीच्या त्या भ्रुकुटि[2]चलना हांसुनी फेनजा[3]तें
श्रीकंठाच्या[4] शशियुत जटा जी धरी वीचिहस्तें[5]. ६०
व्योमीं तिर्यक्[6] सुरगज तसा खालती लोंबुनीयां
जेव्हां स्वच्छ स्फटिकसम तत्तोय[7] जाशील प्याया,
तेव्हां रम्य प्रकटुनि तुझें बिंब तोयीं सुनील
अस्थानीं[8] ती रुचिर यमुना[9]संगताशी दिसेल. ६१
बैसोनीयां मृग मृगमदें[10] त्या शिला गंधयुक्ता,
जेथें, घे ती जनि[11], हिम[12]सितीं शैलिं त्या जाइं ताता?
त्याच्या श्रृंगीं श्रम शमविण्या जेधवां बैसशील,
श्रीनंदीच्या शिरिं चिखलसा तेधवां शोभशील. ६२
घांसूनी जो प्रबळ भवनें देवदारू निघाला
दावाग्नी तो जरि चमरिच्या[13] तेथ जाळील बालां[14]
आधीं त्यातें शमविं करुनी वृष्टि मोठी जलाची.
आर्तत्राणीं स्फुट सफलता सज्जनांच्या धनाची ६३
उड्डाणें जे शरभ[15] करिती स्वांगभंगार्थ[16] तेथें,
यन्मार्गा तूं त्यजित असतां गांठिती शीघ्र तूतें,

---

१ सगर राजाच्या मुलांना [ हे कपिलाच्या शापानें दग्ध झाले होते. ते भागीरथीच्या पाण्यानें उद्धरून स्वर्गास गेले. ] २ रागानें जें भुंवया वर चढविणें त्यास. ३ फेंसाच्या समूहानें. ४ शंकराच्या. ५ लाटा हेच हात, ह्या हातांनीं. ६ तिरकस. ७ तिचें [ गंगेचें ] पाणी. ८ [ प्रयागाशिवाय ] भलत्याच ठिकाणीं. ९ यमुनेशीं संगम पावलेली. १० कस्तुरीनें. ११ जन्म. १२ बर्फानें पांढऱ्या. १३ हरिणांची एक जात. १४ केंसांस. १५ एक पशू. १६ जणु काय आपल्या अंगाचा नाश करून घेण्यासाठीं.

गारा भारी सडकुनि करीं वृष्टिनें त्यांस चीत.
अन्यापारीं कवण पडतां होत नाहीं फजीत. ६४
पाषाणीं जीं उमटलिं तिथें पावलें शंकराचीं
भावें वंदी, सतत करिती योगि पूजा जयांची,
देहांतीं कीं अघ निरसुनी दर्शनेंची जयांच्या
जाती श्रद्धायुत जन पदीं शाश्वतीं तद्गणांच्या ६५
एका मेळें पुरहरकथा किन्नरी तेथ गाती;
वेळू पांव्यापरि सुपवनें वाजुनी सूर देती;
होईल त्वत्ध्वनि जरि नगीं तैं मृदंगासमान,
भूतेशाचें तरि मग घना ! सांग होईल गान. ६६
ते ते रम्य क्रमुनि हिमवद्भाग, जें क्रौंचरंध्र
झालें हंसां भृगुपतियशा तेवि अक्षय्य दार,
जा लांबोळा बनुनि तिरका त्यांतुनी उत्तरेला,
श्रीविष्णूचा बळिस छळितां जेवि तो पाय काळा. ६७
कैलासाचा अतिथि मग हो, संधिसंघात ज्याचा
लंकास्वामी खिळखिळवि, जो आरसा अप्सरांचा,
राहे उच्चीं धवल शिखरीं व्यापुनी जो नभास,
रुद्राच्या कीं प्रतिदिनिं जणू सांठला अट्टहास ६८

१ जरूर नाहीं अशा भलत्याच उद्योगांत. २ त्याच्या [ शंकराच्या ] गणांच्या [ शाश्वतीं पदीं ] ३ चांगल्या वाऱ्यानें. ४ शंकराचें. ५ यथास्थित. ६ क्रौंच पर्वताचें [ परशुरामानें केलेलें ] विवर. [ ह्यांतून हिमाळयाच्या उत्तरेकडील मानस सरोवरांतील हंस दक्षिणेकडे येतात अशी समजूत आहे. ] ७ परशुरामाच्या कीर्तीला. ८ पाहुणा. ९ सांध्यांचा समूह. ( रावणानें कैलास पर्वत हालवून त्याचे सांधे खिळखिळे केले हें प्रसिद्धच आहे. ] १० आग्रहाचें विकट हसें. ( हंसाचा रंग पांढरा आहे असा कवींचा संकेत आहे. )

गौरत्वें तो आचिरें[1] चिरिल्या लाजवी हस्तिदंता,
काळा तूं त्यावरि रुचिरेंसा[2] कज्जलातुल्य जातां,
शोभा नेत्रां स्तिमित करिती[3] त्या गिरीची दिसेल;
जाणों काळी हलधर[4] वसे घेउनी स्कंधिं शाल. ५९
फेंकूनी तीं भुजगवलयें[5] शंभु दे जीस हात
क्रीडाशैलीं[6] पदिं[7] जरि फिरे ती उमा श्री[8] पहात,
होवोनी तूं हिमें[9] करुनियां पायऱ्या रम्य दाट.
जावोनीयां मणितटिं[10] पुढें हो चढायास घांट. ६०
तेथें पाणी उसळवुनियां कंकणें आपटोनी
कारंजें वा करितिल तुझें देवकांता मिळोनी;
ग्रीष्मक्रीडारत[11] जरि न त्या सोडिती शीघ्र तूतें,
एकाएकीं गडगडुनियां भेडसावीं तयांतें. ६१
जें दे जन्मा कनककमलां तोय घे मानसीं तें,
दे होवोनी क्षण पट मुखीं तोष ऐरावतातें,
वातें कल्पद्रुमकिसलयें हालवीं अंशुकेशीं,
त्या शैलेंद्रीं बहुविध करीं खेळुनी मौज ऐशी. ६२
त्यांच्या[12] प्रांतीं[12] बसलि, जणु कीं स्वप्रियाच्याच अंकीं,
लोळे गंगावसनें[13] अलका ती, स्वयें जाणसी कीं;
त्वत्काळीं ती गृहशिरिं धरी प्रस्रवी[14] अभ्रमाला,
मुक्ताजालें ग्रथित कबरी सुंदरी जेवि बाला. ६३

———————— बाळकृष्ण लक्ष्मण अंतरकर.

---

१ नुकत्याच चिरलेल्या २ रम्य ३ करणारी ४ बलराम ५ सर्पवेटाळी ६ खेळण्याचा कृत्रिम पर्वत ७ पायीं फिरणें ८ शोभा ९ बर्फ १० रत्नखचित कड्यावर ११ ग्रीष्मक्रीडारत देवकांता १२ कैलासपर्वत मध्यप्रदेश 13 गंगानदी हेंच वस्त्र 14 पाझरणारी.

# काव्यरत्नावलि.

अंक २ रा.

## मेघदूतच्छाया.

### उत्तरमेघ.

श्लोक.

सच्चित्रांनीं तव सु-धनुचें, सु--स्त्रियांनीं विजेचें,
पखवाजांनीं दुमदुमुनियां स्निग्ध[1]शा गर्जनेचें,
पाण्याचेंही स्फटिकिं, शिखरीं त्वद्वृ[2]तीं तुंग[3]तेचें,
गेहें तेथें[4] मिरविति तुझें साम्य त्या त्या परीचें. १
स्त्रीच्या हस्तीं कमल अलकीं कुंद[5]वेणी सु[6]कांतीं,
शोभे लोध्र[7]प्रसवरजें आननीं गौर कांति,
कर्णीं साजे शिरस[8], विलसे वेणि कोन्हांटकांहीं,
भांगींही त्वत्समयज[10] सदां नीप[11] न न्यून कांहीं. २
तेथें[12] गुंजारव अलि सदा फुल्ल वृक्षीं करीती,
कांची फुल्ला नलिनिचि[13] बने सस्वनीं हंसपंक्ति,
केकाशद्वीं रत गृहशिखी कांत ज्यांचे पिसारे,
रात्री रम्या, तम न पसरे, चांदणें नित्य सारें. ( १ ) क्षेपक

---

१ गोड अशा. २ तुङ्गापर्यंत गेलेल्या ( शिखरीं-घराच्या कळसांनीं ) ३ उंच-पणाचें. ४ अलकेंत. ५ केसांवर बांधण्याचा कुंदपुष्पांचा गजरा. ६ तेजस्वी अशा ( अलकीं ) ७ लोध्रपुष्पाच्या परागानें. ८ पुष्पविशेष. ९ कोन्हांटीच्या फुलांनीं. १० तुझ्या ( मेघाच्या ) काळीं उत्पन्न होणारें. ११ कदंबपुष्प. १२ ह्यांचा संबंध सर्वत्र आहे. १३ कमलिनीची. १४ शद्बु करणारी.

तेथें हर्षें नयनिं जल ये, ये न अन्यें निमित्तें,
तैसें दुःख स्मरजेंचि, सरे जें सुहृत्संगमें तें,
न प्रीतीच्या क्षणिक रुसण्यावीण कोणा वियोग,
यक्षांना वा वयहि न दुजें नित्य तारुण्ययोग. ( २ ) क्षेपक

ताराबिंबें[2] स्फटिकमयभूभागिं पुष्पोंचि होती,
ऐशा सौधीं[3] ललितें[4] युवती घेउनी यक्ष जाती;
त्वद्गंभीरध्वनितें[5] झडतां चौघडे चित्तहारी
पीती कल्पद्रुमज मदिरा कामसंचारकारी[1]. ३

ज्यांची इच्छा सुरहि करिती त्या तिथें यक्षकन्या
छायेमध्यें अमरतरुच्या वारुनी ताप[6] धन्या
गंगा--तीरीं[7] शिशिरपवनीं खेळतां दिव्य रत्नीं,
कोणी हैमीं[8] पुलिनिं लपवी, शोधिती कोणि यत्नीं. ४

होई ग्रंथी सुटुनि शिथिला पैठणी जी स्त्रियांची,
प्रेमें कांतें निरि हिसकितां [illegible]
लज्जेनी त्या मुठि भरुनि जें फेंकिती चूर्ण[10] हस्त,
वांयां होतें पडुनिहि तिथें रत्नदीपांवरी[11] तें. ५

वायू नेतो ढग तुज[12] असे तेथ माड्यांत उंच;
दूषोनीयां[13] नवजलकणीं ते[14] सु--चित्रां[15] लगेच,

१ कामविकारापासून उत्पन्न होणारें. २ नक्षत्रांचीं प्रतिबिंबें स्फटिकाच्या जमिनींत पडून पुष्पें पसरल्याप्रमाणे शोभतात. ३ गच्चीवर. ४ सुंदर. ५ तुझ्याप्रमाणें गंभीर आहे आवाज ज्याचा असे ( चौघडे ) ६ उन्हाचा त्रास. ७ थंड आहे वारा जेथें अशा ( गंगातीरीं ) ८ सुवर्णमय. ९ वाळवंटांत. १० विलासार्थ जवळ असलेलें केशरादिकांचें सुगंधि चूर्ण. ११ दिव्याच्या ऐवजीं देदीप्यमान रत्नेंच ठेविलीं असल्यामुळें ते रत्नांचे दिवे कांहीं केल्या मालवले जात नाहींत. १२ तुझ्यासारखे. १३ बिघडवून. १४ ते धूर्त ( ढग ) १५ भिंतीवर वगैरे काढिलेल्या किंवा टांगिलेल्या चित्रांस.

जाणों भीती धरुनिच मनीं कंपपूर्णांग साचे
जाळ्यांतूनी निघुनि पळती धूर्त[1] वेषें धुराचे[2]. ६
होतां दूरी पटलें[3] तत्र हें, चंद्र--पादीं सुकांतीं[4]
तेथें येतो द्रव नव छतीं टांगिल्या चंद्रकांतीं[5];
तेणें ग्लानी सुरतजनिता दूर होते स्त्रियांची,
अंगें ज्यांचीं प्रियतम--दृढालिंगनें श्रांत साचीं. ७
तेथें ज्यांचे धननिधि सदा सिद्ध अक्षय्य[6] धामीं,
ते वैभ्राजोपवनिं[7] रमती प्रत्यहीं यक्ष कामी;
क्रीडारंगें सुरयुवतिशीं भाषणीं दंग होती,
रागोत्कर्षे द्रविण--पतिचें[8] किन्नर स्तोत्र गाती. ८
वेगें[9] जातां गळति कुसुमें कुंतलांतून खालीं,
हैमें पद्में तरुकिसलयें सोडिती कर्ण--पाली.
कंठीं कंठे तुटति न टिके शीर्षि मोत्यांचि जाळी,
हीं रात्रीचा पथ कळविती कामिनींचा सकाळीं. ९
तेथें साक्षात् पुर--हर वसे, भीतें[11] तेणें स्वचित्तीं
चापा घेई स्मर न बहुधा ज्यां[12] जैया[13] भृंग--पंक्ति;
भ्रूभंगादी पटुंतर[14] अशा अंगना--विभ्रमेंची[15]
कामी पाशीं गवसुनि घडे कार्यसिद्धी तयाची[16] १०
चित्ताकर्षी वसन, शिकवी भ्रूविलासां सुरा ती,
पुष्पें नामी, किसलय नवे, त्या अलंकारजाती[17],

---

१ ते धूर्त [ ठग ] २ धुराचे [ च्या ] वेषे ३ [ आड आलेला ] तुझा पडदा. ४ तेजस्वी [ चंद्रकिरणांनीं ]. ५ चंद्रकांत रत्नाच्या ठायीं. ६ कधींही कमी न होणारे. ७ वैभ्राज नांवाच्या [ कुबेराच्या ] बागेत. ८ कुबेराचे. ९ अभिसारिका स्त्रिया रात्रीं गुप्तपणे मोठ्या त्वरेने आपल्या प्रियकराकडे जात असतां. १० कानांची पाळ. ११ भ्यालेला. १२ धनुष्याची दोरी. १३ ज्या चापाला. १४ अधिक निपुण [ कार्य-साधक ] १५ स्त्रियांच्या विलासांनींच. १६ मदनाची. १७ दागिन्यांचे प्रकार.

लाखेचा जो मृदु पदतलें रंगवी रंगही तो,
कांता–भूषा सुरतरु तिथें एकटा सर्व देतो ११

वित्तेशाच्या मम गृह असे उत्तरेला, कमान
शोभे ज्याला, दुरुनिहि दिसे इंद्रचापासमान;
पार्श्वीं[1], कांता सुत समजुनी वाढवी, तो तरूही
हातीं येत्या स्तबकिं[2] लवला बालमंदार पाहीं. १२

तैसें क्रीडा[3]सर मरकत[4]प्राय ज्या पायऱ्या तें
झांके फुल्लीं कनककमलीं नाळें[5] वैदूर्य[6] ज्यांतें;
ज्याच्या तोयीं सतत वसती हंस; त्यां भान साचें,
पाहोनीही तुज, जवळच्या होइना मानसाचें. १३

त्याच्या तीरीं, शिखर रचिलें इंद्रनीळें[7] जयाचें,
ऐसा क्रीडागिरि कदलिंनीं वेष्टिला कांचनाचे[8].
विद्युद्युक्ता[9] तुज बघुनिया आठवे तोचि मातें,
कांतेला तो प्रिय ह्मणुनिया आंतुनी चित्त भ्रंतें. १४

कोन्हांड्यांची वइ विलसते कुंदकुंजा[10]सभोंतीं,
लागोनी त्या ललित बकुलाशोक[11] हे शोभताती;
ऐका[12] माझ्यापरिच सखिच्या वक्त्रचें मद्य मानें[13],
इच्छी डावा चरण दुसरा[14], तोडग्यांच्या[15] मिषानें. १५

---

१ बाजूला. २ घोसांनीं ३ खेळण्याचें सरोवर. ४ पाचा बसवून केलेल्या. ५ देंठाच्या ठिकाणीं. ६ एक प्रकारचें रत्न. ७ निळ्या रत्नानें. ८ सोन्याच्या (कदलिंनीं). ९ विजेनें युक्त अशा (तुज) १० कुंदाच्या मांडवाला. ११ बकुल आणि अशोक १२ बकुलाला. १३ आवडतें. १४ अशोक. १५ तरुण स्त्रियांनीं, मद्याची चूळ टाकणें हा बकुलास, व डाव्या पायाचा लत्ताप्रहार करणें हा अशोकास, असे फुलांवर येण्याचे तोडगे (चमत्कारिक उपाय) आहेत असा कवींचा संकेत आहे. त्यांस संस्कृतांत 'दोहद' ह्मणतात.

ह्यांच्यामध्यें स्फटिक[1]फलका दांडि सत्कांचनाची,
ताज्या वेळूपरि मुळिं दिसे बांधिली रत्नि साची;
संध्याकाळीं वरि बसतसे तो तुझा मित्र बर्ही,
तालीं शिंजा[2]ध्वनियुति सखी नाचवी त्यास पाहीं. १६

साधो ! ध्यानीं धरुनि वळखीं ह्या खुणा मत्सु-सद्म,
पाहीं द्वारावरिहि अणखी काढिले शंख-पद्म[3].
सध्या माझ्याविण अवकळा त्यासि आली असेल;
अस्ता जातां रविकमल बा रम्य कैसें दिसेल ! १७

होवोनीया लघु[4] कलभसा शीघ्र जायासि खालीं,
रम्य स्थानीं प्रथम कथिल्या बैसुनी केलिशैलीं[5],
जैशी सौम्या[6] चमक विलसे काजव्यांची मजेची,
तैशी अंतर्गृहिं हळु हळू नेइं दृष्टी विजेची[7]. १८

बिंबोष्ठी[8] जी, मुकुल[9]दशना, सुंदरी, पातळांगी,
नाभी निम्ना[10] जिचि, मृगदृशा, सूक्ष्म जी मध्यभागीं,
श्रोणीभारें गति हळु जिची, वांकली जी स्तनांहीं,
धात्याची[11] जी पहिलिच कृती स्त्रीजनीं, तेथ राही, १९

ती जाणें[12] बा असु मम दुजा, भाषणोल्हास टाकी
होतां मी[13] तत्प्रियं दुरे, जशी एकटी चक्रवाकी;

---

१ जिच्यावर स्फटिकाची फळी आहे अशी (दांडि) २ कांकणाच्या आवाजानें युक्त अशा (तालीं) ३ ह्या नांवांच्या निधींच्या विशेष आकृती. ४ हत्तीच्या छाव्या सारखा (लघु) ५ क्रीडापर्वतावर. ६ मंद, थंड (चमक) ७ विजेनें बनलेली (वीज हीच) दृष्टि. ८ पिकलेल्या तोंडल्याप्रमाणें लाल आहेत ओंठ जिचे अशी. ९ कळ्यांसारखे आहेत दांत जिचे अशी. १० खोल. ११ ब्रह्मदेवाची. १२ समज. १३ तिचा प्रियकर मी (दूर होतां)

उत्कंठेनें कठिण दिन हे लोटितां, पालटोनी
झाली जाणों दुजिच, नलिनी जेवि शीतें झडोनी[1] २०

माझ्या ध्यासें रडुनि रडुनी सूज डोळ्यांस आली,
उष्णश्वासें अधरिं पहिली राहिली नाहिं लाली,
हस्तीं ठेवी वदन न दिसे व्यक्त, कीं व्याप्त केशीं;
त्वत्संसर्गें[2] त्रिकळ[3] विधुचें दैन्य आलें तयाशी. २१

मित्रा ! ऐशी बघशिल तिला कीं, करी देवसेवा;
रेखी[4] माझी विरहकृश[5] ही ध्याउनी[6] मूर्ति किंवा;
मैनेसी वा मधुरवदत्या[7] पंजरींच्या पुसे कीं,
" तूं नाथासी प्रिय, तरि तया आठवीसी सखे ! कीं ? " २२

किंवा अंकीं मलिनवसनीं[8] तंबुरी ठेउनीया
माझ्या नांवावरुनि रचुनी लागते गीत गाया,
तारा अस्त्रीं[9] भिजति, पुसुनी काष्टिं, आरंभितांना
वारंवार स्मृति हरपुनी त्याच त्या घेइ ताना; २३

किंवा दारीं प्रतिदिनि फुलें[10] सांठली ठेवुनी जीं
तीं घेऊनी विरहगतिचे राहिले[11] मास मोजी;
किंवा सेवी रतिसुख मला ध्याउनी कल्पनेचें;
प्राणेशाच्या विरहिं बहुधा हे उपाय[12] स्त्रियांचे. २४

---

१ थंडीनें कमलिनी अगदीं रोगट व विशोभित होऊन ओळखूं येत नाहींत. कदाचित् त्यांचा नाशही होतो. २ तुझ्या सहवासानें ( तूं आड आल्यामुळें ). ३ निस्तेज अशा ( विधुचें ) ४ चित्र काढून त्यांत दाखवितें. ५ विरहानें रोड झालेली ( मूर्ति ) ६ ध्यानांत आणून. ७ गोड बोलणाऱ्या. ८ संस्कार नसल्यामुळें मळकट आहे वस्त्र ज्यावर अशा ( अंकीं ) ९ आंसवांनीं. १० प्रत्येक दिवशीं एक प्रमाणें ठेवून जमलेलीं. ११ शापाप्रमाणें विरहस्थिति संपण्यास ( एक वर्ष पुरें होण्यास ) उरलेले. १२ करमणुकीचे प्रकार; वेळ घालविण्याचे उपाय.

ताही कांहीं करुनि दिवसा मद्वियोगा विचारी
नाहीं शोकाविण गति परी रात्रिचे याम[1] चारी;
जागी लोळे भुइवरि अशी मध्यरात्रीं बघूनी
मत्संदेशें सुखवि तिजला सौधजालीं[2] बसूनी. २५

शेषा[3] पूर्वक्षितिजिं शशिची ती कला एक जैशी,
कांता चिंताकृश किसलयीं[4] लोळुनी राहि तैशी;
मत्संगें जी क्षणसम निशा संगसौख्यांत नेली,
लोटी मोठी अतिच विरहें तीच उष्णाश्रुजालीं[5]. २६

जाळ्यांतूनी शिरति शशिचे अंशु[6] जे थंडगार,
पूर्वप्रेमें नयन निघती त्यांस घ्याया समोर;
झांकी कष्टें फिरवुनि परी साश्रुपक्ष्मीं[7] विलोला[8],
जैशी साभ्रीं[9] दिनिं न नलिनी मीलिता[10] न प्रफुल्ला. २७

उष्णश्वासें अधर सुकुनी हालती केश गालीं,
तैलाभावें परुष[11] बहु जे लोंबती लांब खालीं;
संग स्वप्नीं तरि मम घडो इच्छि निद्रा ह्मणोनी,
दाटे नेत्रीं जलभर परी, मार्ग जाई खुटोनी. २८

केसां माला त्यजुनि दिधली गांठ आरंभि साची,
शापांतीं ती मुदितहृदयें म्यांचि सोडावयाची;

---

१ प्रहर. २ गच्चीवरच्या खिडकींत. ३ ( कृष्णचतुर्दशीच्या दिवशीं ) शिल्लक राहिलेली. ४ पल्लवशय्येवर. ५ त्रासानें तप्त अशा आंसवांच्या समूहांनीं, किंवा समूहांत ( अति रडण्यानें, फार दुःखांत ) ६ किरण. ७ आंत आंसवें जमलेल्या पापण्यांनीं. ८ चंचला. ९ दगांनीं युक्त अशा ( दिनिं ) १० मिटलेली. ( दगांनीं सूर्य झांकल्यामुळें अर्धवट फुललेल्या कमळाप्रमाणें, आंत आसवें असून झांकलेल्या डोळ्यांची स्थिति झाली. ) ११ विरहखेदानें तेल न लाविल्यामुळें ) रूक्ष.

झाली सारे अलक गुंतुनी रूक्षशी ऐकवेणी,[1]
अच्छिन्नीं[2] तीं नखि वरिवरी सारि गालावरोनी. २९
ऐसें भूषाविरहित वपू सद्म जें मार्दवाचें,
शय्यास्थानीं झिजुनि पडलें, फार कष्टेंचि वांचे;
पाहोनी तें नवजलमिषें अश्रु तूं गाळिशील;
अंतर्यामीं द्रव बहु जया, तो दयापूर्णशील. ३०
माझ्याठायीं निरुपम तिचें प्रेम मी पूर्ण जाणें,
व्हावी ऐशी प्रथमविरहीं तर्कितों खास तेणें;
आत्मप्रौढीस्तव न कथितों मी तुला ही बढाई,
बा रे ! सारें लवकरि तुझ्या प्रत्ययालागिं येई. ३१
ज्यातें स्निग्धांजन[3] न, अलकीं रोधिलें[4] कोन ज्याचा,
मद्यत्यागें चिर विसरला भ्रूविलासांस साचों[5],
मीनाक्षीचा लवुनि[6] वरि तो नेत्र तूं तेथ जातां
शोभे, मीनें कुवलयें[7] जसें खालतीं हालवीतां. ३२
नाहीं झालें बहु दिन जिला चिन्ह माझ्या नखांचें,
मुक्ताजाळें[8] चिरपरिचितें सोडिलें स्थान जीचें,
जी म्यां हस्तीं उचित चुरण्या श्रांत होतां रतांतीं,
रंभागर्भसम[9] मृदु तिची वाम मांडी चळे ती. ३३
त्या काळीं ती जरि तुज दिसे गुंग निद्रासुखांत,
राहीं एक प्रहर[10] सखया ! गर्जनाशून्य शांत;

---

१ एक जटा. २ न काढिलेल्या, किंवा न झिजलेल्या. ३ तेजस्वी काजळ. ४ अडविला, झांकिला. ५ मद्य प्याल्यानें स्त्रियांच्या भुंवयांचे चाळे अधिक मनोवेधक होतात. ६ आपला समाचार कळणार म्हणून तिला हा शुभ शकून होईल अशी यक्ष कल्पना करितो. ७ कमळ. ८ कंबरे भोंवतीं लोंबणाऱ्या मोत्यांच्या जाळीनें. ९ केळीच्या गाभ्यासारखी. १० एक प्रहरपर्यंत तिला उठवूं नको.

कीं आलिंगी दृढ जरि मला स्वप्निं पाहूनि देवें,
एकाएकीं मिठि सुटुनि तें लुप्त सारें न व्हावें. २४

एका यामें उठवुनि तिला तोयसंयुक्त वातें
आणावी वा टवटवि, जशी मालतीच्या[1] कळ्यांतें;
जाळीमध्यें स्तिमितनयनीं तूज पाहील जेव्हां,
बोलायासी स्तनितवचनीं[2] लाग धैर्येंचि तेव्हां २५

"त्वन्नाथाचा[3] परम सुभगे ! मित्र मी तोयवाही[4],
तत्संदेशा वेउनि[5] इकडे येइं, चिंता न काहीं.
भेटीसाठीं निजगृहिणिच्या उत्सुकां पांथवृंदा[6]
घाई लावी पथिं करुनि हा स्निग्ध गंभीर शद्बा." २६

हें ऐकोनी जनकतनया वायपुत्रासि जेवी
अत्यौत्सुक्यें बघुनि तुज ती देउनी मान तेवी,
एकाग्रत्वें परिशिल पुढें; कीं गमे कामिनींना
भेटीहूनी कथिलि सुहृदें कांतवार्ता[7] न ऊना २७

मद्विज्ञप्तास्तव, सुकृतही जोडण्यालागिं, सांगें
तीतें ऐसें:-"प्रियतम तुझा रामगिर्याश्रमीं गे
आहे प्राणां धरुनि; पुसतो सुंदरि ! क्षेम[8] तूस;"
आधीं क्षेमोक्तिच उचित कीं दुःखशीलां[9] जिवांसें. २८

अंगें तप्तें अति कृश तुझीं जेवि हीं, तेवि त्याचीं,
उत्कंठेनें तळमळति गे, अश्रुंनीं क्लिन्नं[10] साचीं,

---

१ जाईच्या. २ गर्जनारूपी भाषणांनीं. ३ तुझ्या पतीचा. ४ मेघ. ५ घेऊन. ६ प्रवाशांच्या समूहाला. ( पर्जन्यकाळची मेघगर्जना ऐकल्याबरोबर प्रवाशी मोठ्या त्वरेनें घराकडे जावयास निघतात. ) ७ नवऱ्याची हकीगत. ८ कुशल प्रश्न. ९ स्वाभाविकपणें दुःख ज्यांच्यामागें लागलेलेंच आहे अशा प्राणिमात्रांस. १० भिजलेलीं.

उष्ण श्वासा तुजसम सदा तोहि दूरस्थ टाकी,
आलिंगोनी मनिं तुज असे; दैव रोधी पथा कीं. ३९

बोलायाचें उघड वचनीं जें सख्यांच्या समक्ष
तेंही कर्णी कथि तव मुखस्पर्श व्हायासि दक्ष,
तो कर्णांचा विषय न अजी, दर्शनाचाहि नोहे;
उत्कंठेच्या वचनिं तुजला मन्मुखें सांगतो हें:-- ४०

" वेलीशीं ती तनू, सुनयनें ती मृगी--लोचनांशीं,
वेणी बर्हावलिशिं शिखिच्या, वक्त्रशोभा विधूशीं,
मंदोर्मीशीं तुळि नदिचिया भ्रूकला कल्पनांहीं;
हा ! कोठेंही परि तव सखे ! पूर्ण सादृश्य नाहीं. ४१

लीलेनें तूं रुसलिस अणी मी तुझ्या पायिं लागें
हें रेखाया मनिं करिं शिलापृष्ठिं जों वन्यरंगें,
तों अश्रूंनीं भरुनि भरुनी दृष्टि लोपे सदैव;
हा चित्रींही अदय अमुची भेट साही न दैव. ४२

स्वप्नीं दैवें तुज बघुनिया गाढ आलिंगनातें
शून्याकाशीं भुज पसरितों; देव देवांगना तें
पाहोनीया तरुकिसलयीं अश्रु मोत्यांसमान
कारुण्यानें टपटप किती टाकिती; सत्य मान. ४३

भेदोनीया किसलयपुटें देवदारुद्रुमांचीं
त्यायोगें जो सुरभि बनुनी वाट घे दाक्षिणेची,

---

१ आज त्याचें भाषण नुसतें ऐकूंही यावयाचें नाहीं; इतकेंच नव्हे तर तो डोळ्यांनीं दिसण्या इतकाही जवळ नाहीं. २ मंद लाटांशीं. ३ भुंवयांचे विलास. ४ मनांत आणितों. ५ रानांतील ( कावेच्या वगैरे ) रंगानें. ६ निर्दय ( दैव ). ७ रात्रीं झाडाच्या त्या पानावरून त्या पानावर दंवाचे थेंब टपटप पडत असतात, त्यावर ही अश्रुपाताची कल्पना आहे. ८ पल्लवांच्या जोड्या ( देंठाजवळ एकास एक लागलेलीं दोन दोन पानें. )

तो कैला[1]सानिल के[2]वाळितों प्रीतिनें फार कांते !
वाटे कीं हा खचित तुझिया स्पर्शुनी ये तनूतें. ४४

दीर्घा रात्री क्षणसम मला केवि होईल सानें[3],
तैसा केवी प्रखर दिनही सर्वदा तापहीन,
व्यर्था चिंता छळि आशि, मन स्वस्थ नाहीं जराही;
तीव्रे[4]ामें विरहदहनें तप्त होऊन राही. ४५

आशा मोठी धरुनि मजला मीच गे धीर देईं,
तूंही दुःखा विटुं[5]नि न अती लाडके ! भीति घेईं,
कोणा सारें सुखचि मिळतें दुःख किंवा सदाही !
नी[6]चीं उंचीं स्थिति फिरतसे चक्र[9]नेमी परी ही. ४६

[10]जांगा होतां विषधरिं हरी होइ म[11]च्छाप पार,
लोटीं डोळे मिटुनि उरले तेवढे मास चार;
पश्चात् ते ते पुरवु विरहें चेतले[12] हेतु सारे;
रात्रीही तें खुलतिल शरच्चंद्रिकेच्या प्रसारें." ४७

हेंही सांगे 'निजुनि शयनीं एकदा तूं मदंगीं[13]
एकाएकीं रडतचि अती चंडि[14] ! झालीस जागी;
तें त्वां गालीं हंसत कथिलें आर्जवीतां प्रयासें
कीं, "केली त्वां सवत कपट्या ! पाहिलें स्वप्न ऐसें." ४८

---

१ कैलास पर्वतावरून ( अर्थात् अलका नगरीवरून ) येणारा वारा. २ आलिंगितों. ३ लहान. ४ कडक न अमर्याद अशा विरहाग्नीनें. ५ कंटाळून. ६ खालीं. ७ वर. ८ सुख दुःखाची स्थिति. ९ चाकाच्या धांवेप्रमाणें. १० नारायण शेषावर जागा होतांच. ( भगवान् चातुर्मास्यांत झोंप घेतात, व कार्तिक शुद्ध १२ स जागे होतात. त्या दिवशीं प्रबोधोत्साह किंवा तुळशीचें लग्न करितात. ११ माझा शाप. १२ प्रदीप्त झालेले ( वाढलेले ) १३ माझ्या अंगावर ( मला मिठी मारून ) १४ हे कोपिष्ठे !

जाणें[1] माझें कुशल सखये ! खूण ही ओळखूनी,
नाणीं[2] शंका किमपि हृदयीं लोकवादांवरूनी[3];
" लोपे प्रीती विरहिं " ह्मणती; ऐक तूं सत्य रीती,
भोगाभावें[4] अधिकचि चढे इष्ट वस्तूवरी ती. ' " ४९
आश्वासोनी प्रथम विरहें शोकमग्नासि[5] ऐसी,
नंदी ज्याचीं उकरि शिखरें सोड त्या पर्वतासी[6];
येऊनी तत्कुशलवचनें[7] खूणही सांगुनी या
प्रातःकुंदप्रसवशिथिला[8] राख माझ्या जिवा या. ५०
मित्रा ! माझ्या पतकरिसिना एवढ्या इष्ट कार्या ?
जाणें मी कीं गरज न तुझ्या उत्तराचीच आर्या !
देशी शब्दा न करुनि जला चातकीं[9] मागतांची;
प्रत्युक्ती[10] कीं अभिमतकृती[11] हीच इष्टीं[12] संतांची[13]. ५१
स्नेहें, किंवा करुनि करुणा दुःखितीं ह्या, घना ! ही
इच्छा माझी पुरवि, जरि मत्प्रार्थना योग्य नाहीं;
वृष्टिश्रीमान्[14] फिर मग सुखें तोयदा ! इष्ट देशीं;
होवो ऐसा विरह न तुझा वा कधींही विजेशीं. " ५२
बह्वौत्सुक्यें सम उतरिलें प्राकृतीं ' मेघदूत '
लघ्वास्यीं हा कवल सु-महान् जाणतों हें खचीत;
दंदोनीया तरिहि सुजनां अर्पितों प्रेमभावें;
तच्चिताला गुण-लवहि कीं मान्य होतो स्वभावें. ५३

———— बाळकृष्ण लक्ष्मण अंतरकर.

१ समज. २ आणूं नको. ३ लोकांच्या बोलण्यावरून. ४ उपभोग न घडल्यामुळें. ५ शोकांत बुडालेल्यास. ६ कैलास पर्वतास. ७ तिच्या खुशाली विषयींच्या भाषणानें. ८ सकाळच्या कुंदपुष्पाप्रमाणें डळमळीत अशा ( जिवा ). ९ चातकांना ( मागतांची ) १० प्रत्युत्तर. ११ इच्छिलेलें कार्य करणें. १२ मित्राच्या ठायीं. ( संतांची इष्टीं, अभिमतकृती हीच प्रत्युक्ती कीं. ) १३ सज्जनांची. १४ पर्जन्यवृष्टीच्या शोभेनें युक्त असा तूं.

## कर्तव्य-पंचदशी.*

श्लोक.

दुर्भिक्ष राक्षस जिथें पिडितो महीला;
हा प्लेगरोग सकलां छळण्यास आला;
लोकां विपत्तिशत गांजित नित्य जेथें;
कांहींच कां तुज नसे वद कार्य तेथें ? १

अन्नाविणें मरति लोक जिथें अनेक;
वस्त्राविणें असति जेथ अनेक लोक;
दारिद्य कष्टमय दुष्ट अनिष्ट जेथें;
कांहींच कां तुज नसे वद कार्य तेथें ? २

आरोग्य--पूर्ण बल--पूर्ण सशक्त कोणी
येई युवा न कधिं जेथ पहा दिसोनी;
हे सर्व लोक अति दुर्बल दीन जेथें;
कांहींच कां तुज नसे वद कार्य तेथें ? ३

वीर्यादि--पौरुष--गुणां बहु जेथ वाण;
द्रोहादि--दुर्गुण--गणा अति जेथ मान;
धैर्यादि--नैतिक--गुणांस अभाव जेथें;
कांहींच कां तुज नसे वद कार्य तेथें ? ४

देशी कला सकल जेथिल नष्ट झाल्या;
जेथें समस्त परकी बघ वस्तु आल्या;

---

* जन्मभूमीच्या प्रस्तुतच्या स्थितीला अनुलक्षून ही कर्तव्यपंचदशी कविता कवीनें लिहिली आहे.

चाले प्रभाव अवघा परकीय जेथें;
कांहींच कां तुज नसे वद कार्य तेथें ! ५

लाभे सुशिक्षण मुलांस न जेथ कांहीं;
जेथें सुशिक्षण मुलींस मुळींच नाहीं;
नानाकला--विविध--शिक्षण नाहिं जेथें;
कांहींच कां तुज नसे वद कार्य तेथें ? ६

विद्वज्जनां प्रिय सदा परकीय भाषा;
आहे तिरस्कृत जनीं बघ मातृभाषा;
ही नीच दुःखद असे स्थिति आज जेथें;
कांहींच कां तुज नसे वद कार्य तेथें ? ७

दुःखी स्त्रिया निशिदिनीं बहु जेथ पाहीं;
कष्टी जिथें पुरुषवर्ग सदैव राही;
सारीं मुलें सतत तेजविहीन जेथें
कांहींच कां तुज नसे वद कार्य तेथें ! ८

जेथें सुरीति जन सोडिति या पुराण;
स्वीकारिती जन सुरीति न या नवीन;
दुर्दैव--योग दिसतो दृढ हाचि जेथें;
कांहींच कां तुज नसे वद कार्य तेथें ! ९

स्वातंत्र्यसौख्य न कुणास कधींहि जेथें;
दास्यत्व जेथ बरवें गमतें जनांतें;
दास्यत्व--दुर्गुण जनां जडतात जेथें;
कांहींच कां तुज नसे वद कार्य तेथें ! १०

अन्योन्य--वैर--रत वर्ण अनेक जेथ;
हे अज्ञ सुज्ञ जनही कलहीं प्रसक्त;

हे द्वेष--मत्सर--विषें जन दिग्ध जेथें;
कांहींच कां तुज नसे वद कार्य तेथें ? ११

उत्साह--हीन कृति--विन्मुख लोकनेते;
अज्ञान--पूर्ण अवघी जनताचि जेथें;
कर्तव्य काय समजे न कुणास जेथें;
कांहींच कां तुज नसे वद कार्य तेथें ? १२

लोकीं जयीं घडतसे निज--धर्म--लोप;
होईल तत्फल तदा परमेश--कोप,
हें सत्य चित्तिं उमजे न जनांस जेथें;
कांहींच कां तुज नसे वद कार्य तेथें ? १३

स्वप्नासमान गमतो गत काळ जेथ;
चिंतेंत हा विषम सांप्रत काळ जात;
नैराश्यपूर्ण बघ भाविहि काळ जेथें;
कांहींच कां तुज नसे वद कार्य तेथें ? १४

त्रस्ता हताश पर--वंचित मातृ--भूमि
आर्तस्वरें विनविते सकलां स्वधामीं;
स्वार्थीं तरीहि जन मग्न सदैव जेथें;
कांहींच कां तुज नसे वद कार्य तेथें ? १५

कैसी जनस्थिति असे करिं तूं विचार;
आहे किती तव शिरीं जन कार्यभार ?
कर्तव्यकर्म करिं तूं, न धरीं फलाशा.
तोडील सत्य जगदीश्वर दैन्यपाशा. १६

मल्हार खंडेराव चिटणीस. बी. ए. एल्. एल्. बी.

## चिरवियुक्ताचा उद्गार.

### श्लोक.

वृष्टीमागुनि चंद्रकान्तिधवला ती ये शरत् साजिरी;
तैसा रम्य वसन्त तीव्र शिशिरामागून तो येतसे;
सूतिक्लेश सरे अनन्तर सुखा तें तान्हुलें देतसें;
पाणी ओसरतां समग्र भरती येते पुन: सागरीं; १
धुल्याविष्कृति मोक्षकाल करितो खग्रास झाल्यावरीं;
कृष्णानन्तर शुक्ल पक्ष चढतां तो कौमुदी घेतसे;
प्रातःकाल सुरेख गाढ रजनीमागून तो होतसे;
होतां दारुण कल्प-अन्त फिरुनी सृष्टि स्मिता आदरी! २
या गोष्टी गणणें असे सुलभ गे त्यांला ज्यांच्या मनीं
आशातन्तु नसे अजून तुटला;- ते भाग्यशाली खरे!
कान्ते मत्सम गे परन्तु असती जे या अभागी जनीं,
त्यांची वाट विपत्समाकुल जगीं होणार कैशी बरें!
उत्कण्ठाज्वलनें तुझा विरह हा टाकी मला पोळुनी,
या गोष्टी गणतां हताश हृदयीं माझ्या भरे कांपरें! ३

——————— केशवसुत.

## सुभाषित.

### आर्या.

विद्येसम धन न दुजें धीसम बल अन्य तें न या लोकीं
तोषासम सुख नाहीं तृष्णेसम दु:ख तें नच त्रिलोकी १
रक्षी प्रजाजनांना प्रेमें बहु सौख्य त्यां सदा देई
सत्कीर्तिवान् नृपति तो सुपथच्युत जो कदापि नच होई २

——————— चिंतामण माधव पिंपळसकर.

# काव्यरत्नावलि.

## अंक ३ रा.

## ईशदर्शन.

### गुच्छ १ ला.

सृष्टीची भव्य रचना आणि तींतील नानाविध कौशल्य बघून विचारी मनुष्याच्या मनांत जे विचार येण्यासारखे आहेत, त्यांचें दिग्दर्शन पुढील पद्यांत केलें आहे. ही अलौकिक विश्वरचना साक्षात् ईश्वराचें अस्तित्व दाखविते. ह्मणून या काव्यास " ईशदर्शन " हें नांव दिलें आहे.

श्लोक.

महा ब्रह्मांडाची विविध रचना रम्य बघुनी
जयाच्या आनंदानुभव लवही होय न मनीं
लवे ना वा ज्याचें मन बघुनि ही सृष्टि विनयें
असा कोणी नाहीं मनुज बहुधा व्यंग हृदयें १

समस्त प्राण्यांचें अपरिमित वैचित्र्य बघुनी
महा भूतांच्या वा प्रबल कृति पाहूनि नयनीं
न होई यच्चित्त प्रभुवरगुणप्रश्रय[1]युत
असा कोणी नाहीं मनुज बहुधा या अवनिंत २

पदार्थस्वारस्य[2]ग्रहणपटु जेव्हां स्थिर मनें
निरीक्षी हें विश्व प्रकृतिसुभग[3] ज्ञाननयनें !

---

१ देवाच्या गुणाविषयीं पूज्यबुद्धि. २ पदार्थांचें मर्म जाणण्यांत कुशल किंवा पदार्थांची खरी योग्यता जाणणारा. ३ स्वतःसिद्ध सुंदर.

पृथग्वस्तू[1]मध्यें प्रभुकृति अतर्क्या अनुपमा
गमूनी ईशीं तत्प्रणय[2]मति होई दृढतमा ३
कृपासिंधो विश्वंभर अखिलगामिन्[3] गुणनिधे
चिदानंदागारा सकलशिवमूर्ते अमितधे[4]
त्रिकालज्ञा तूझी विमलमतिशक्ती निरवधी[5]
पुरी वर्णाया मी क्षम[6] न खलु अल्पज्ञ जडधी ४
निसर्गश्रीयुक्त[7] स्थलिं सुखद[8] एकांत समयीं
तुझ्या माहात्म्याचा समज मज जो होय हृदयीं
असो तो वर्णाया मज तव कृपा मंगलकर
तुला ऐशी देवा विनति करितों जोडुनि कर ५
असे जो प्राण्यांत प्रमुख सदसज्ञानकुशल[9]
तुवां केल्या वस्तू जगिं यदुपयोगार्थ[10] सकल
कृतींचें जो तूझ्या अनुकरण अंशें करितसे
तयाची उत्पत्ती अतिशय चमत्कारिक असे ६
तुवां केलीं अन्नें जगिं मनुजपुष्ट्यर्थ बहुत
मनुष्यांगीं शुक्रोद्भव तदर्शनें[11] होय सतत
नरस्त्रीयोगीं[12] तत्कण युवतिगर्भांत शिरुनी
तया कालें येती अवयव तुझी गूढ करणी ! ७
तदंबा[13] जें भक्षी पिउनि रस त्याचा सतत तो
झणी कैसा पूर्णावयव जननीगर्भि बनतो

---

१ निरनिराळ्या वस्तूंत. २ ईश्वराविषयीं पूज्यबुद्धि. ३ सर्व ठिकाणीं गमन करणाऱ्या. ४ अमर्याद बुद्धीनें युक्त. ५ अमर्याद. ६ समर्थ. ७ स्वतःसिद्ध सुंदर. ८ सकाळीं किंवा संध्याकाळीं. ९ बरें वाईटांचें ज्ञान करून घेण्यांत कुशल. १० ज्याच्या उपयोगासाठीं ( ज्यानें उपयोग करावा ह्मणून ११ तीं खाऊन. १२ स्त्रीपुरुषांच्या समागमांत. १३ त्याची आई.

स्वमातेच्या गर्भांतुनि मग नऊ मास भरतां
निघे ' सोऽहं कोऽहं ' करित जणु तो शब्द करितां ८

तयाच्या जन्माच्या प्रथम दिवशीं त्यास बघुनी
समोदाश्चर्यानें मनुजमन तें जाय भरुनी
तया वाटे " अब्जाहुनि मृदु अशा याच तनुचा
कसा होतो कालें रघु, अज, पृथू, पुत्र रविचा ? " ९

कसा हा मांसाचा विरल जड गोळा बनतसे
सुरर्षि व्यास श्रीशुक कविगुरु श्रीधर असे
तया अत्याश्चर्यें प्रथम बघणाऱ्यास गमुनी
बहु प्रेमें त्याच्या निघति बहुधा अश्रु नयनीं १०

पुढें त्या प्राण्याच्या हृदयिं ममता, मत्सर, मद;
तसे लोभ क्रोध भ्रम कुमति काम व्यसनँद !
कसे जन्मा येती प्रबल मग होती बहु कसे
कळे ना हें तेणें मनुजमति बा कुंठित असे ! ११

जडान्नें हें तान्हें क्षम पचविण्याला न ह्मणुनी
स्तनीं तन्मातेच्या मधुर पय ठेवीसि करुनी
कसा मांसग्रंथींतुनि झणि पयोनिर्झर गळे
दुज्या कोणाल्याही खचित तुजवांचूनि न कळे १२

न ये मर्त्या अंगीं सहन करितां फोडहि जरी
रजोमांसास्थींची जड तनु नऊ मास उदरीं
कशी स्त्री आनंदें सहन करि, हा खेळ अवघा
न जाणे कोणीही इतर तुजवांचूनि अनघा १३

---

१ पातळ. २ नारद. ३ कालिदास. ४ दुःख देणार. ५ स्तनांतून. ६ दुधाचा झरा. ७ रक्त मांस व हाडें यांचीं. ८ निष्पापा.

शिशुप्राप्तीपूर्वी कठिणहृदया स्त्री जरि किती
अपत्या[1]ची प्राप्ती प्रथम तिस होतां क्षणिंच ती
स्वदु:[2]शीला कैसी विसरुनि सुतीं प्रेम सगळें
करी; या गूढाचा मनुजमतिला ठाव न मिळे १४
बसूं रांगूं लागे धरणिवर तें बाळ चरणीं
उभें राहूं पाहे मग हळुच भिंतीस धरुनी
पुढें चालूं लागे पडत पडतां तें मग पळे
अशी शक्ती वाढे लवकर कशी हें तुज कळे १५
रजोमांसास्थींच्या अति जड मुखापासुनि गिरा
फुटे अत्यस्पष्टा[3] शिशुस परि जी कर्णमधुरी[4]
पुढें होते वृद्धिंगत गुरुगिरेच्यासम[5] परी
न जाणे त्वल्लीला मनुजमति ही क्षुद्र अपुरी १६
जिथें ज्या वस्तूची गरज असते ज्यास जितुकी
तिथें ती ती वस्तू सतत मिळुनी त्यास तितुकी
जगद्व्यापाराचा[6] क्रम सतत चाले सुरळित
प्रभो होतें तेणें उघड तव चातुर्य अमित १७
प्रमाणें ज्या वृद्धिंगत तनय होई अनुदिनें[7]
प्रमाणानें त्याच स्वपरमति[8] मायायुत[9] मन
विवेकानंदादी सुखकर मनोधर्महि तसे
कळे ना हे होती उभय सहचारी[10] परि कसे १८
पुढें कौमार्याच्या[11] स्थितींत अवघे खेळ करण्या
तशी आई रागें भरलि असतां दूर पळण्या

---

१ मुलाची. २ आपल्या दुष्ट स्वभावाला. ३ अगदीं न समजण्यासारखी. ४ कानाला गोड. ५ बृहस्पतीच्या वाणीसारखी. ६ जगाच्या रहाटीचा. ७ दररोज. ८ आपपरभाव. ९ अविद्यायुक्त. १० बरोबर जाणारे अथवा वाटणारे. ११ बाळपणाच्या.

कशी ये त्या पिंडीं जड बहुत शक्ती कुठुन ही
न जाणे देवा हें मनुजमति अंशेंकरुनही १९
पुढें तारुण्याचा त्वरित भर येतांच पुरुष
सदा होई कामातुर धनमदाहंकृतिवश
सदा बद्ध क्रोधें सतत भवचिंता करितसे
तुझी माया ब्रम्ह्याप्रतिहि न समस्ता कळतसे २०
पुढें तो स्वप्रौढस्थितिंत जन-रीतीस बघुनी
विचारानें वागे नयविनयमार्गास धरुनी
तुझ्या माहात्म्याचा उमज पडुनी तो तुज भजे
घडे त्या त्या कालीं उचित घडण्याला खचित जें २१
जराबाई जेव्हां म्हणि मग मनुष्यास वरि त्या
बहु व्याधी अंगीं जडुनि पडती त्या सुरकुत्या
स्मृति भ्रंशे शक्ति त्वरित निजधामास पळते
जसें पक्कें वृक्षावरिल फळ तन्मूलिं गळतें २२
जरेमध्यें कांहीं गुण परि नरीं पूर्ण दिसती
असे कीं ज्या योगें जरठ बहु मानार्ह असती
असे दूरदृष्टी अनुभवबळें त्यांस सतत
त्यजोनी संसारा असति परमार्थी बहु रत २३

गुच्छ १ ला समाप्त.

विष्णु गणेश नेने.

---

## आगपेटीस.

### श्लोक.

आगपेटि गे ! तुज पाहुनी । कल्पना किती येति मन्मनीं;
व्यक्त वाणिनें त्या करावया । व्हावि आजि वाग्देविची दया. १

---

१ म्हातारपण. २ मान देण्याला योग्य.

सुवर्णवर्णांकित रूप तूझें । पाहून होतें मन दंग माझें.
कौशल्यपूर्णा रुचिरा सुरंगी । वल्ली किती शोभति ह्या त्वदंगीं. २
' बाह्याकृती जाणविते गुणांतें ' । असें जनीं बोलति जें मृषा तें;
रूपें तुझ्या जें अनुमान होतें, । गुणां गणाया न पुरे मुळीं तें. ३
त्वन्मूर्ति शोभेल नृपालयींच, । परी न तूं पाहसि थोर नीच;
जशी नृपाळा तशि मेंढपाळा । सेवावया तत्पर तूं कृपाळा. ४
रंका नृपा साधुखळां समान । तुझी जरूरी, परि नाहिं मान;
कीं अल्प मोठें सुलभा जनासी; । अमानिता सर्व महत्त्व नाशी. ५
पिता तुझा उद्यम, बुद्धि माता, । द्वीपांतरीं झालिस तूं सुजाता;
एके स्थलीं वास तुला न साहे, । ह्मणून पृथ्वीवर हिंडसी हे. ६
येसी प्रवासास्तव पूर्व देशीं, । आह्मां तुझा लाभ अपूर्व देशीं;
परस्थ तूं, येथ परी वसूनी । स्वकीयशी जाशि जनीं मिळूनी. ७
मैत्री जनीं तूं अतिरिक्त केली, । तेणें तुझी किंमत अल्प झाली;
गेला असे गौरव तो लयाला; । न मान लोकीं अतिसंगताला. ८
होतीस जेव्हां नवकी जनांसी, । झालीस आश्चर्यखनी तयांसी;
दैवीच शक्ती गणिलीस कैकीं । अलौकिका जादु तशी कितीकीं. ९
चकमका ह्मणती जनु हें फुका, । टकमकां बघती तव कौतुका;
तव अपूर्व पराक्रम पाहुनी । पळति नांव तुझें न जिथें वनीं. १०
जो अग्नि काष्ठादिक सर्व कांहीं । भक्षी, जळावीण न भी कुणाही,
अपूर्व तत्सख्य करूनि काष्ठीं । तयासही सांठविसी स्वकोष्ठीं ! ११
तुझ्यामुळें अग्नि सदा खिशांत । स्वाधीन राहूनि सुगुप्त शांत
इच्छानुरोधें प्रकटेहि तैसा, । पुण्यप्रभावास नलास जैसा. १२
सामर्थ्य हें अद्भुत पाहुनी जे । होते सदाही गुण गात तूझे,
कृतघ्न आतां अवमानिती ते । हें दुःख गे होत असेल तूतें. १३
परी नको खिन्न अतीव होऊं, । लोकांकडे लक्ष्य नकोच देऊं;

स्वभाव ऐसाच असे जनाचा, । ' नवें हवें, वीटाचि ये जुन्याचा. ' १४
तूं अल्पमोली बहुमोल कैक । नौकागृहादीक करून खाक
कोटीहि पोटीं भरिसी क्षणांत; । अकथ्य सामर्थ्य असे तुझ्यांत ! १५
जरी जनां लाभसि अल्प मोलें, । न्यूनत्व तेणें गुणिं केवि आलें ?
गुणाऽगुणां मी तव पूर्ण जाणें, । कथीन, रागास न तूंहि जाणें. १६
नृपालयीं रंकगृहींहि तैसी । राहून त्यांसी सुख तुल्य देसी;
प्रतारणा मी तुजला न ठावी; । श्लाघ्या न हे वृत्ति कशी ह्मणावी ? १७
भला बुरा तूं न परी पहासी । तेणेंच निंदेसहि पात्र होसी.
साहाय्य चोरास हरामखोरा, । देसी, तदा पूर्ण रजा विचारा. १८
परोपकारा तनु खर्चिसी तूं, । अपात्रि होतो कधिं तो परंतु.
तेणें न पुण्यांश सुकीर्ति साधे, । अकीर्ति पापाश्रय मात्र लाधे. १९
अग्नी ह्मणी पेटवुनी कितीक । त्वां जेववीले पथिं पांथ लोक;
हिमार्तही कंपित संघ त्यांचे । केले तुवां शीतविहीन साचे. २०
परी करूनी सदनांचि राख । केले बरें गांव किती चिराख !
ज्वालावलीढप्रमदार्भकांचे । आक्रोश तूतें गमले सुखाचे ! २१
वाडे जुने जे इतिहाससाक्षी, । मोही जयांची नयनांस नक्षी,
पाहून ज्यांची रचना सुगूढ । ते आढ्यही होति परस्थ मूढ, २२
छाया उभे जे गतवैभवाची । स्मृती तशी पूर्वजविक्रमाची,
देशाभिमाना उपदेशिते ते । केले तुवां गे विषय स्मृतीतें ! २३
क्षणांत अंधार करून दूर । त्वां दाखवीलीं किरडें समोर,
त्यां मारुनी लोक बचावले जे । ती पुण्यकीर्ती तुज पूर्ण साजे. २४
कधीं तुवां चोर खुनी धरोनी, । कधीं तयांतें पळवोनि रानीं,
रक्षीयले प्राण धनेंहि तैशीं; । परी तुझी सर्व कृती न ऐशी. २५
नीचासवें हिंडुनि गुप्तरूपें । रात्रीं तुवां केलिं अनंत पापें;
चोरास ठेवा खुनिलाहि ठावा । दावूनि केला जनिं पूर्ण दावा. २६

नौकेवरी बैसुनि आगटीशीं । मौजेंत गप्पा करिती खलाशी,
घुरूघुरू ओढिति घुर्गुडीतें; । सारे असे श्रेय तुलाच गे तें ! २७
परी मुलें कोमल जीं मनाचीं, । विद्येविना गोष्ट न ज्यां हिताची,
लावून त्यांतें विडि ओढण्याला । कां सांग त्यांचा सखि ! घात केला ? २८
गेल्यास तूं आज महीवरूनी । जातील सारे जरि बावरूनी,
तरी, जशी होइल हानि, तेवी । अनर्थही ते टळतील भावी. २९
कथिले गुण तेवि दुर्गुण । करणें ह्यावरि देवि ! कोप न;
स्तुतिपाठक या जगीं बहू, । परि तो दुर्मिळ जाण निःस्पृहू. ३०

विहंगम.

---

## नवा शिपाई.

### पद.

नव्या मनूंतिल शूर असा मी नवा शिपाई आहें;
कोण मला वठणीला आणूं शकतो तें मी पाहें !
ब्राह्मण नाहीं, हिंदुहि नाहीं, न मी एक पंथाचा;
तेच पतित कीं जे आखंडिती प्रदेश साकल्याचा.
खादाड असे माझी भूक,
चतकोरानें मला न सूख;
कूपांतिल मी नच मंडूक;
मळ्यास माझ्या कुंपण पडणें अगदीं न मला साहे !
कोण मला वठणीला आणूं शकतो तें मी पाहें ! १

जिकडे जावें तिकडे माझीं भावंडें आहेत,
सर्वत्र खुणा माझ्या घरच्या मजला दिसताहेत;
कोठेंही जा—पायांखालीं तृणावृता भू दिसते,
कोठेंही जा—डोईवरतें दिसतें नीलाम्बर तें;

सावलींत गोजिरीं मुलें,
उन्हांत दिसती गोड फुलें;
बघतां मन हर्षून डुले;
तीं माझीं, मी त्यांचा—एकच ओघ अह्मांतुनि वाहे !
नव्या मनूंतिल शूर असा मी नवा शिपाई आहें ! २

पूजितसें मी कवणाला ?—तर मी पूजीं अपुल्याला,
आपल्यामध्यें विश्व पाहुनी पूजीं मी विश्वाला;
'मी' हा शद्बच मजला नलगे, सम्पुष्टीं हे लोक
आणुनि तो, निज शिरीं ओढिती अनर्थ भलते देख !
लहान मोठें मज न कळे,
साधु अधम हें द्वयहि गळे,
दूर जवळ हा भाव पळे;
सर्वच मोठें, साधु, जवळ,--त्या सकलीं मी भरुनी राहें !
कोण मला वठणीला आणूं शकतो तें मी पाहें ! ३

हलवा करितां तिळावर जसे कण चढती पाकाचे,
अहंस्फूर्तिच्या केन्द्राभवतें वेष्टन तेंवि जडाचें;
आंत समचि निर्गुण तिलक, वरी सदृश सगुण तो पाक,
परि अन्यां बोंचाया धरितो कांटे कीं प्रत्येक !
अशी स्थिती ही असे जनीं !
कलह कसा जाइल मिटुनी ?--
चिन्ता वागे हीच मनीं !
शान्तीचें साम्राज्य स्थापूं बघत काळ जो आहे,
प्रेषित त्याचा नव्या दमाचा शूर शिपाई आहें ! ४

केशवसुत.

## श्रीगायत्रीवंदन.

### श्लोक.

सुभक्तवरदायिनी विमलकीर्तिमंदाकिनी
सुरव्यसननाशिनी असुरसंघविध्वंसिनी
महादुरितहारिणी भगवती जगद्व्यापिनी
नमो प्रणवरूपिणी हृदयवासिनी स्वामिनी १

अहो पतिततारिणी सुखकरे नतोद्धारिके
अभीष्ट फलदायिके बलवती जगन्नायिके
अनन्य शरणागता असति तूंचि चिंतामणी
नमो प्रणवरूपिणी हृदयवासिनी स्वामिनी २

तपस्वि करुणानिधी सुकृति जे क्षमी जाणते
सुरर्षिमुनि नारदादिक महर्षि राजर्षि ते
सदैव रत जाहले खचित कीं तवोपासनी
नमो प्रणवरूपिणी हृदयवासिनी स्वामिनी ३

असंख्य जन सत्कवी गुणनिधी महा सन्मती
विशुद्ध सुयशोमृताप्रति तुझ्या सदा सेविती
तुझे सुगुण वर्णिले बहुत त्यांहिं बंदीजनीं
नमो प्रणवरूपिणी हृदयवासिनी स्वामिनी ४

तुझ्या चरणदर्शनें प्रयत होउनी पातकी !
अनत नर दुष्कृती तरति हो महाघातकी
स्वदास परिपाळिसी सतत दुष्ट निर्दाळुनी
नमो प्रणवरूपिणी हृदयवासिनी स्वामिनी ५

अनाथ बहु जो तुला विमलमानसें आळवी
स्मरे तव पदांबुजां पतित जो प्रपंचार्णवी

कृपा करिसि त्यांवरी सकलतापसंहारिणी
नमो प्रणवरूपिणी हृदयवासिनी स्वामिनी ६

भवव्यथितचित्त हें विकलसें पहा जाहलें
मदादि रिपुनीं सदा बहुत निश्चयें गांजिलें
तयावरि दया करी त्वरित सन्मनोल्हादिनी
नमो प्रणवरूपिणी हृदयवासिनी स्वामिनी ७

ममत्व न सुटे मति प्रचुर चंचळा जाहली
पहा किति भवार्णवी बहुविधामिषें मोहिली
त्वरें स्थिर करी हिला नतमनोव्यथाहारिणी
नमो प्रणवरूपिणी हृदयवासिनी स्वामिनी ८

तुझीच जगदंबिके चरणपद्मसेवा घडो
जडो सुयशवर्णनी मम मती, अहंता झडो
स्वधर्म सुख दे बहू करि कृपा अशी या जनीं
नमो प्रणवरूपिणी हृदयवासिनी स्वामिनी ९

गायत्रिवंदन करील अनन्यवृत्तीं
लाभेल त्यांसि यश, सन्मति' सौख्य मुक्ती
दीनाप्रती करितसे जगिं हे सनाथ
गूढार्थ हाच कथितो कवि रंगनाथ १०

रंगनाथ एच. अधिकारी.

## सज्जनांची थोरवी.

श्लोक.

भारी तीव्र पळांत भस्म करितें जें कालकूट क्षिती;--
त्यातें प्राशुनिया सुरांस सुख दे अत्यंत गौरीपती.

नीलग्रीवहि जाहला तरि नसे त्या दुःख कीं, सज्जनां,--
स्वार्थी प्रीति नसे, परार्थच रुचे अत्यादरें तन्मना. १

दैत्यीं गांजियलें ह्मणून धरणी जेव्हां पडे संकटीं,
तैं धांवे प्रभु कूर्मरूप धरुनी, दे पाठ ती खालतीं;
होतो भार अपार अल्प अथवा हें नाठवे सज्जनां,--
स्वार्थी प्रीति नसे परार्थच रुचे अत्यादरें तन्मना. २

सारी लख्ख करी प्रकाशुनि मही जो चंद्रमा तो स्वतां,
देहाचा न पुशी कलंक गमतें आश्चर्य हें तत्वता.
याच्या ह्या कृतिमाजि अर्थ दिसतो हा स्पष्ट कीं सज्जना-
स्वार्थी प्रीति नसे परार्थच रुचे अत्यादरें तन्मना. ३

अग्नीचें उदकासवें सततचें ठावें जनां वैर जें,
तें सोडी उदरांत वाडव धराया अब्धि केवी सजे?
वाटे हा मथितार्थ यांतिल असे कीं सत्कृती सज्जनां,-
स्वार्थी प्रीति नसे परार्थच रुचे अत्यादरें तन्मना. ४

पृथ्वीचा गुरुभार शेष शिरिं घे आधार होई तिला;
जाणना पळमात्र नित्य करितां हें कार्य विश्रांतिला;
साही हें श्रम, दुःख अल्प न गणीं; हें सार कीं सज्जना,
स्वार्थी प्रीति नसे परार्थच रुचे अत्यादरें तन्मना. ५

आहे ज्यास सुवास फार ह्मणुनी जो आवडे हो नरां
सत्कारी सुजनां तसाचि भुजगां दुष्टांहि जो आसरा;
ऐसा चंदन दे सुगंध झिजुनी स्वांगें सदा; सज्जनां,--
स्वार्थी प्रीति नसे परार्थच रुचे अत्यादरें तन्मना. ६

वाजी सप्तमुखी विलक्षण असे, तो पांगुळा सारथी,
तैसाची रथ एकचक्र फिरणेंही अंबरीं ज्याप्रती;

तो भानू टळला न हो ! परहिता अद्यापिही सज्जना,-
स्वार्थीं प्रीति नसे परार्थच रुचे अत्यादरें तन्मना. ७

ज्याचा देह असे रसेंचि भरला त्या इक्षुदंडा किती,
घाणा घालिति गाळिती दुखविती लोभें छळीती अती;
पाळी त्यापरि गाळित्यासहि तरी देई रसा सज्जना,-
स्वार्थीं प्रीति नसे परार्थच रुचे अत्यादरें तन्मना. ८

देती वृक्ष फळें सदैव दुभती धेनू किती ह्या अहा !
पृथ्वी सर्व चराचरां शिरिं धरी साहूनि भारा महा,
हा साराच परार्थ न स्वहित हें शोधा मनीं. सज्जनां,--
स्वार्थीं प्रीति नसे परार्थच रुचे अत्यादरें तन्मना. ९

श्रीव्यासादि महर्षिनीं मथुनियां वेदोदधी काढिला,--
साचा बोधसुधारस प्रचुर तो प्रेमें जनां वाढिला.
" संसाराब्धि तरावया वद मुखें श्रीराम बापा ! सदा,--
साधीं होइल तेवढ्या परहिता " जाशील तू सत्पदा. १०

भृंग.

---

## गर्व व काळ.

श्लोक.

बुद्धि द्रव्य कुल प्रताप पदवी प्रौढी वृथा सर्वथा,
येतां तो प्रतिकूळ काळ ढळवी अभ्रंकषां पर्वतां;
ऐश्वर्यद्रविणोपभोग अवघे आहेत हे बुद्बुद,
मृत्यूचा अगदीं समीप निवसे नक्तंदिनीं जासुद. १

पाहे मृत्यु न रंक राव, अथवा दारिद्र्य वा वैभव,
येतां काळ तया निवारिल असा कोणी नसे मानव.

मृत्यूची अनिवार्य चाल जगतीं, ती कोणता आडवी ?
तो दण्डध्वजचामरादि निमिषें धूळीमधें पाडवी ! २

कोणी धीर गभीर वीर अपणा युद्धांत नांवाजवी,
खड्गातें परजोनि जो अरिमुखीं दंतावळी वाजवी;
त्याचेंही परि चंडदंडयुग तें निस्त्राण होतें लुलें,
काळाचीं थरकांपकारक यदा तीं वाजतीं पाउलें. ३

संमानें जन आदरून तुमची गाती स्तुती संप्रती,
सत्कृत्यास्तव भूषवून तुमच्या माळा गळां घालती;
ही कोमे परि माळ, काळवश हो ! आहोंत सारे जण,
कर्तव्यास करा, परी मिरविणें हें व्यर्थ मोठेंपण. ४

ज्यांची सत्कृति, शौर्य, दान, सुमति प्रख्यात होती जनीं,
त्यांची विस्मृति आज हाय ! पडली लोकां, स्मरा हें मनीं
कालोपद्रुत विश्व सर्व, मग हीं गर्व, प्रसिद्धी, यश
कोठें होत निरूढ ? मूढ मनुजा ! होई न आशावश. ५

——————— बाळकृष्ण अनंत भिडे बी. ए.

## मेघास उद्देशून.

### श्लोक.

मेघा ! धन्य तुझें खरोखर जिणें धन्य त्रिलोकांतरीं
नाहीं शक्त तुझी सख्या त्रिभुवनीं कोणी कराया सरी
आहे सांगति थोर ईश्वर परी त्याच्याहुनी तूं मला
श्रेष्ठा ! श्रेष्ठ असा सदैव दिससी वानूं किती मी तुला १

वृक्षाच्या तळिं मी सचिंत बसलों होतों जयीं मंदिरीं
माझी दृष्टि तयीं सलील वळली तूझ्याकडे अंबरीं

गंभीराकृति पाहतां क्षणिं तुझी आनंद दाटे मनीं
वाटे राहुं पहात काय तुजला अभ्यास हा सोडुनी २

विश्वाची जननी महाप्रणयिनी सौदामिनी मोहिनी
मानोनी तिजलागुनी हरिखुनी तूं लाडकी भामिनी
आनंदें फिरसी विहार करिसी दिव्य प्रदेशांतरीं
इच्छा होइल त्या स्थलीं तिजसवें चेतश्चकोरापरी ३

रंगामाजि सुनील रंग ह्मणती आरोग्यकारी अती
कैसेही जरि रोग दुर्घट तरी त्याच्यामुळें नाशती
देवाचा तरि वर्ण नील अपुलें शास्त्रज्ञ हें सांगती
ऐसी मंगलकारिणी विलसते त्वद्विग्रहीं कांति ती ४

औदार्यें जल देउनी निशिदिनीं संगोपिसी तूं घना
तैशी पूर्ण करीसि शुद्धहृदयें अभ्यर्थिली कामना
माया लोभ विशेष दावुनि कृपा संपादिली त्वां सदा
लोकीं यास्तव धन्य ! धन्य ! गमतें तूझें जिणें वारिदा ५

लीलेनें करिसी नभस्तलवटीं गंभीरलीला जयीं
लोकांचीं अपुल्याकडेस सुमनें आकर्षिसी तूं तयीं
कामें सारुनि बाजुला कितिक त्या प्रेमें स्त्रिया पाहती
जातें गुंगुनि मात्र खास समयीं तैशी कवीची मती ६

जाणोनी तव थोरवी चहुंकडे आहेत जे फांकलें
तें सारें घननील शुभ्र तुजला भेटावया लागले
कोणी त्वत्पद वंदिती जवळ ते कोणी उभे राहती
कोणी त्वन्मय आपुल्यास करिती भेटोनि तूझ्याप्रती ७

मेघा ! मंदगती तुवा प्रथमतां स्वीकारुनी युक्तिनें
सर्वांना वश सत्वरीं करुनिया त्वां घेतलें बुद्धिनें

आतां धारण उग्ररूप करुनी निःशंक तूं निर्भय
स्वच्छंदें सगळीकडे विचरसी ही सन्मती हा नय ८

वर्षें आजवरी असंख्य ह्मणती झालीत त्यांनां जरी
नाहीं लेशहि लोपली सुरुचि त्या तारांगणाची तरी
ज्यांनां सूचक मानिती महितळीं दुःखा सुखाचें सदा
त्यांनां लोपविसी पळांमधि पहा तूं चातुरीनें कदा ९

मेघा ! फार तुझा पराक्रम असे याच्याहुनी आणखी
तें सामर्थ्य वसे रवींत अथवा वायूशशी पावकीं
इच्छा होइल काळिं त्या भिवविसी ब्रह्मांडगोलास या
स्वर्गीचें सुर कांपिती थरथरां त्वच्छौर्य पाहोनिया १०

आहे दुःस्थितिमाजि राष्ट्र पडलें फारादिसा पासुनी
गेले लोक ह्मणोनिया बहुत हे मद्देशिंचे कावुनी
त्यांनां उत्तम बोध हाच कथितों मेघाकडे जा पहा
तेणें जाइल निश्चयें घडिमधीं नाशाप्रती ताप हा ११

चक्रवाक्.

## सुभाषित.

### आर्या.

शाश्वत धर्म खरा तो विबुधानां सर्व मान्य जो होतो
उत्तम शांतिसुखाचा मनुजांते नित्य लाभ कीं देतो १
जाणावा बान्धव तो आपत्कालींहि मैत्रि न त्यजितो
कपटाचारा सोडुनि जो संतत मित्रसाह्य आदरितो २

चिंतामण माधव पिंपळसकर.

# काव्यरत्नावलि.

अंक ४ था.


## ईशदर्शन.

### गुच्छ २ रा.

#### श्लोक.

सुषुप्तीच्या[1] वेळीं सकळ नृमनोधर्म[2] तिमिरीं[3]
लया जातां आणी कवण मग त्यांतें क्षितिवरी
शरीराचे सारे अवयव करी कोण सबल
तुझ्यावांचोनी ही इतर कवणा शक्ति अतुल ? १

तुला भावें, नीत्याचरण करुनी जो भजतसे
तयाच्या कल्याणाविषयिं तुज चिंता बहु असे
कसेंही त्या येवो कठिण सहण्या संकट तरी
कृपा तूझी त्याचें सतत अवघें संकट हरी २

नराचा तूं नारायण करिसि तद्भक्तिमुदित[4]
कृपेनें तूं मूकां[5] सुरगुरुगिरा[6] देसि खचित
कृपा होतां तूझी गिरिवर चढे पंगु चरणीं
अशी आहे ख्याती बहु तव कृपेची त्रिभुवनीं. ३

ध्वनी ऐकूं यावा अविरत[7] दिसावें त्रिभुवन
कळावा वस्तूंचा परिमल[8] रुची तेंवि ह्मणुन

---

१ निद्रेच्या. २ मनुष्याचे मनोधर्म. ३ अंधकारांत. ४ त्या मनुष्याच्या भक्तीनें प्रसन्न होत्साता. ५ मूकयांना. ६ बृहस्पतीची वाणी, ७ सदोदित. ८ सुवास.

मनुष्यां तूं देशी श्रवणनयनघ्राणरसना[1]
नसे देवा तूझ्या खचित उपकारास गणना. ४
जसा ज्या मानाचा मनुज जगिं अन्याय करितो
तसा त्या मानाचा प्रचुर[2] लघु त्या दंड घडतो
असे ज्याची जैसी सुकृति मिळतें त्या फल तसें
असें तूझें न्यायीपण अमित देवा ! दिसतसे. ५
जरी आहे ऐसें निजुन उठल्यापासुनि किती
निजाया जाईतोंवरि नर करी कल्मषकृती[3]
दिनाच्या रात्रीच्या मिळुनि घटिका साठहि जरी
दिनीं नेमानें त्वद्गुण अठविणारे किति नरीं ? ६
जगन्माता पृथ्वी त्रिभुवनिं महाभूत पहिलें
जयामध्यें नानाविध विषय आहेत भरले
असे कीं एक्याही विषयिं शतवर्षांतहि जन
नसे प्रायः पारंगत बहु तदभ्यास करुन. ७
सजीवांचा तैसा विटपगिरिचा[4] थोर नियत
महा भूदेवी जी सहन करिते भार सतत
तृणें धान्यें भू जी उगवि निजपृष्ठावरि सती
असो माझी तीतें चिर सविनय प्रश्रयनती[5]. ८
धरित्रीच्या पोटीं विपुल मिळती शुभ्र हिरवे
मणी, धातूहेमामलरजतलोहादि[6] बरवे
तसे अंगारादी[7] बहुत उपयोगीहि खनिज
दुज्या वस्तू तेथें असति किति जाणे न मनुज. ९

---

१ कान, डोळे, नाक आणि जीभ. २ मोठा. ३ पापकृति. ४ झाडाचा डोंगराचा. ५ नियम आणि पूज्य बुद्धि यांनीं युक्त असा नमस्कार. ६ सोनें, शुभ्ररुपें लोखंड आदिकरून. ७ कोळसे आदिकरून.

तिच्या पोटीं जंतू असति नयनागोचर[1] किती
विषारी सर्पादी किति उरगे[2] भूमींत वसती
किती कैशी कंदा रुजवि निजगर्भांतरिं मही
न भूगर्भाभ्यासी क्षम समजण्या हें अजुनि ही. १०

निघे कोठें उष्णोदक बहु कुठें शीत सलिल
निघे कोठें गोडें मचुळ अथवा खारट जल
कसे भूगर्भी हे अविरत चमत्कार घडती
न भूगर्भाभ्यासी कधिंहि समजे पूर्ण सुमती. ११

जिथें बीं पेरावें अतिशय लवू या जमिनिंत
तिथें येतीं कैशीं बहुत कणसें धान्यभरित
जसें तें बीं तैसा खचित फुटतो अंकुर सदा
अशक्त ज्वारीला[3] सबल गहुं येई नच कदा. १२

सदा ज्याचीं पानें जलदसदना[4] जाति धरण्या
हजारों पांथा जे क्षम विपुल छाया सुखविण्या
असे अश्वत्थादी तरु बहुत दृष्टीस पडती
बघूं जातां त्यांचा उगम परि आहे अणु[5] किती. १३

जलाधारें वेगें सतत जड बीं जीव धरुनी
कसें येई भूमींतुनि अवयवीं पूर्ण बनुनी
पुढें होई कैसें सकुसुमफल[6] तें कालगतिनें
सुलीला जाणावी तव कशि अशी म्यां अमतिनें १४

तरूमध्यें साऱ्या सुरभिकुसुमांचे[7] तरु किती
कितींतें रंगांचीं रुचिर[8] सुमनें[9] मात्र असती

---

१ डोळ्याला न दिसणारे. २ उरानें चालणारे (सर्प) ३ जोंधळ्याला. ४ मेघमंडळाला. ५ सूक्ष्म. ६ फुल आणि फळ यांनीं युक्त. ७ सुवासिक. ८ सुंदर. ९ फुलें.

तशीं कित्येकांतें अतिशय फलें येति सुरस
फलें पुष्पें दोन्हीं असति बहु कित्येक तरुंस. १५

लताही या वृक्षांसम असति नानाविध किती
फुलांच्या कांहींशा कितिक सुफलांच्याच असती
फलांचें ओझें तें जडतर कशा साहति लता
अगाधा ही आहे खचित तव देवा ! चतुरता १६

न बीजें लावाया विपुलजल द्याया प्रतिदिनीं
असूनी कोणीही नर, गिरिवरी घोर विपिनीं[1]
त्वदिच्छेनें होती सुसुमफल वेली तरु कसे
कशाला गर्वानें मनुज मिरवे जाणत नसे १७

गुच्छ २ रा समाप्त.

विष्णु गणेश नेने.

## शारदीला.

### श्लोक.

अखिल हें जग निर्मुनि जो तया— । वरि करी जननीसदृशी दया,
बहुपरी पुरवी नवभा सदा; । नमन मी करिं त्या प्रभुच्या पदा. १
करि उदार दया सुदिनावरी, । पुरवि हेतु कधीं कर नावरी;
विपुल वारि तसा घन वर्षुनी । जनसुखार्थ फिरे जणुं येथुनी. २
झिजविला निज देह जयास्तव, । सकलसस्य विनष्टचि, यास्तव
धरुनि खंति मनीं, भरजीवन[2] । समजुनी जणुं तो भ्रमला घन— ३
अतिजळें अवनीतळ पंकिल, । शरदिं तें तरि होय अपंकिल.
जनमनीं बहु हर्ष तदागमीं । नच तसा सुदिनास सुरागमीं[3]. ४

---

१ अरण्यांत. २ भार. ३ सुरागम=कल्पवृक्ष.

मळविलें गगनास जरी घनें, । शरद निर्मळ त्या करि ईक्षणें.
सुजनसंग घडे क्षण पामरा, । सकल सिद्धि तया वरिती नरा. ५
उडुसती युवती धरुनी करें । हळु हळू गगनीं विधु संचरे.
बघुनि त्यां न कळे मज, सुप्रभा । विधुस दे नभ वा विधु त्या नभा. ६
विधु करें पसरी महिं गौरता, । हिमवतासहि आणवि गौणता.
नच घडो वदना जणुं दुष्ट ते । ह्मणुनि तो धरि काजळबोट तें. ७
भगण बालगणापरि वाटतो, । अतिविशाल नभोंगणिं खेळतो,
तंव विधूदय हो सहसा नभीं, । गळुनि तेज जणूं धरि चित्तिं भी, ८
जणुं करी विधु जीवनरक्षण. । उधळिती भसुमेंच तरु क्षण.
उपकृती करि अल्पहि जो नर । स्मरति, कां न बहू करित्या नर ९
गढुळ फार मळें उदकाशय, । शरदिं त्यांतिल होय मळक्षय.
सुजनिं ये गमलें जरि आपदा । भिउनि ते पळते दुरि तत्पदा. १०
उगवतां रवितेज नभीं भरे, । कमलिनी फुलती जगतीं भरें,
पतिस देखुनिया युवती जशी । अति मुदें डुलते सरसी तशी. ११
भ्रमरसंघ रवा करुनी फिरे, । परि मनोरथ होति न ते पुरे.
स्वमनिं लोभ धरी अति जो जन । अणुहि तो लभतो कधिं तोष न. १२
सरस तें गमतें नभ विस्तृत, । सुधवलें कमलें विधु शोभत,
भ्रमर तें मृगलांछन वाटतें, । करिप मेघ विधूप्रति झांकितें. १३
रमति हंस तिथें दिनयामिनीं, । परि तिथें नच सौख्य बका मनीं.
सुजन सज्जन पाहुनि हर्षतो, । गमतसे कुजनां पविवर्ष तो. १४
पवन पद्मसुवास सुशीतल । सुखवितो पसरूनि महीतल.
अरुणशीं कमलें धवलें किती । फुलति तेथुनि नेत्र न हालती. १५
करिप केलिसुखार्थ जलीं शिरे । कमलिनी गतवैभव तो शिरें
पदिं करी, न शिवेहि विचार तो. । कृपण आत्महितासचि देखतो. १६
पिकुनि धान्य मही नव शोभते, । बघुनि वर्ण बरा मन लोभतें.

उतरली अवनीवरि संपदा । आजि गमे हरली मनुजापदा. १७
भरलि लोंब असे लवली, पहा, । अपुरि रिक्त धरीत मदा महा.
शिकवि काय मही जणु यामिषें । बहुत नाडियले नर या विषें १८
सकल जीवगणा सुख दे सदा । अणु नसे परि वीट मनीं कदा.
भजक–भक्ति बघूनि जसा हरी, । भजक–दुःख तसेंच मही हरी. १९
बघुनि शालि सुपक्क चहूंकडे, । विहग धांवति लंघुनिही कडे.
वसति सन्निध लोक धनागमीं, । परि न पाहति ढुंकुनि निर्गमीं. २०
वसन पीत मही धरि नूतन, । कनक लज्जित त्या मनिं देखुन.
सुनवयौवनलब्धचि कामिनी । विहरते पतिशीं जणु ती वनीं. २१
फलभरें तरु आणिक त्या लता । लवति, खेद नसे तरि तत्वतां.
जसि जपे जननी स्वसुता सदा । सहुनिही बहुतापरि आपदा. २२
झटुनि वर्षभरी श्रमती परी । सफल देखुनि हर्ष जनांतरीं.
करुनि कष्ट जनां फळ जें मिळे, । जगतिं अन्य गमे नच तत्तुळे. २३
शरद उत्तम उद्यमकाळ, हा । त्यजुनिया बसतां ह्मणवील हा !
ह्मणुनि घालविती न कृषीवल । पळहि, वेंचिति सर्वहि तें बळ. २४
करिति लोक जणूं शरदुत्सव । झटुनि अश्विनमासिं दिनीं नव.
भजुनिया नवरातिंत अंबिका । सुख जनांस वसंतिं जसें पिका. २५
मिळविती सुमनांस कुमारिका, । बहुपरी गुफुनी सुममालिका
भगवतीनिलया मग जाउनी । नमिति तत्पद त्या शिरिं वाहुनी. २६
दशम तो विजयादशमीदिन, । करिति लोक जमूनि शिलंगण.
प्रमुख पूजिति ते शमि आपटा. । ह्मणति ‘ वित्त ’ परस्पर ‘ या लुटा ’ २७
मग जना जन पर्ण समर्पिती, । ह्मणति ‘ घ्या धन हें ’ बहु हर्षती.
न सुदिनास घडे कधिं दर्शन । वदति त्या सुजनांसह हर्षुन. २८
सण दिवाळि पुढें सरसावला, । ह्मणुनि तोष जनांमधि दाटला.
बसति बालकचित्तिं फटाकडे, । ह्मणुनि तन्मन जाय हटाकडे. २९

स्वजनसंगतिलाभ न ज्यां मिळे । निजगृहास्तव होति उताविळे.
सकळ तीं जमतीं घरिं माणसें । गृह गमे दिनिं त्या सुरलोकसें. ३०
उजळितात गृहीं जन दीप, ते । बघुनिया जनतामति दीपते.
उडविती किति बार घरोघरीं, । करिल उत्सव कोण बरोबरी ? ३१
करुनि अन्न परोपरि वाढिती । सुगरणी, करणी जणुं दाविती.
मिळवुनी सुजनां धनपूजन । करुनि आदरिती बहुधा जन. ३२
तनुस तैल सुवासिक लावुनी । धुविति ती सुजलें मग आंगणीं.
सुवसनें शरिरीं निज लेउनी । दवडिती दिनरातहि खेळुनी. ३३
आजिच ये निजबंधु निजालया । ह्मणुनि होति समुत्सुक त्या स्त्रिया;
बघुनि त्या वदती ' बहु हें भलें । करिसि, भाउ ! अह्मां बहु लाभलें ' ३४
करुनि कृष्णविवाह सुसाजरा । निवति पाहुं सुतेप्रति सद्वरा.
परतती किति पाहुनि सुस्थलें, । फिरफिरूनि किती अति कष्टले. ३५
सकळ मंडळि कार्तिकपौर्णिमे । शिवगृहीं तनयांसह ती जमे,
उजळुनी त्रिपुरा, शिव वंदिती, । परतती निलया किति सन्मती. ३६
' बहुत कष्ट तुह्मीं जन ! साहिले, । ह्मणुनि उत्सव हे अजि पाहिले.
कसुनि कास पुढें तिळही सरा. ' । शरद सांगतसे जणुं हें नरा. ३७

बा. सी. जोशी.

---

## मोहपाश.

श्रीमद्भागवतांतील कथेचा आधार घेऊन एका कपोत पक्ष्याचा मोहपाश खालील कवितेंत कवीनें व्यक्त केला आहे.

### आर्या.

एका निबिडारण्यीं, बहु उंच विशाल एक तरु होता;
कोटरिं कपोत त्याच्या राहे घेऊनिया सवें कांता. १

ती एक साच कांता; स्वगुणें संतोषवी पतिस्वांता,
कांत श्रमोनि येतां मधुरवचें मोद दे तया श्रांता. २
कांतेसम कांतहि तो पुरवायातें मनोरथास तिचे–
दक्ष सदोदित राहे प्रेमानें; थोर भाग्य त्या सतिचें ! ३
तरुकोटरस्थनीडीं राहुनि, कीं करुनिया वनविहारा,
काल अनिश घालविती दोघे तो विहग आणि तद्दारा. ४
संसारमग्न असती, करिति परस्पर सदा बहु प्रेम;
दुःखहि गमेल सुखसें प्रीतीनें सर्वमान्य हा नेम. ५
अशनीं, पानीं, शयनीं, गमनीं वा अन्यकार्यिं कसल्याही–
दंपत्य एकजीवचि तें; उभयीं द्वैतभावना नाहीं. ६
जेथें गृहस्थगृहिणी अन्वर्थक वसति, आणि एकमतें–
चालति, तिथें कशाचें न्यून ? तयाहून ऊन नंदन तें. ७

जायापती उभयतां कालक्रमणा अशी सुखें करिती.
ईश्वरवरप्रसादें पत्नी गर्भास जाहली धरिती. ८
गर्भवती भार्येचें पुरवी प्रेमें कपोत तो कोड;
कष्टें दे इष्ट तिला, वागवि तळहातिंचा जसा फोड. ९
मग योग्य काळ येतां घाली आंडीं समीप ती पतिच्या.
आस्वादिती सुखातें आनंदें एकमेक संगतिच्या. १०
कालगतीनें झाली पूर्वीच्या उदकयुक्त आंड्यांत–
अवयवरचना; हरिची शक्ति असे अखिलविश्विं विख्यात. ११
त्यांतुनि यथावकाशें कोमलतनु बालकें अहा ! निघती;
जननीजनक तयांतें वात्सल्यें नेत्र भरुनिया बघती. १२
तीं गृहनिधानबाळें बघुनि तयां होय परम आनंद;
श्रीकृष्णदर्शनानें भार्येसह जेंवि हरिखला नंद. १३

पारावार नसे तैं आनंदा करिल कोण वर्णन तें ?
हृदयांतिल भावांतें व्यक्त करायास शक्त वर्ण न ते. १४

त्या सान बालकांचें पतिपत्नी उत्तमप्रकारानें–
लालनपालन करिती हिंडुनि भक्ष्यास्तव स्वतां रानें. १५
दिवसानुदिवस वरिती वृद्धीला ते कपोतशिशु सकल;
जणुं शुक्लपक्षिं अनुदिनिं वाढत जाई कलानिधी विकल. १६
रुचिरां बालांचे त्या परिसुनिया शब्द बहु मनोहर ते,
निरखुनि नाना क्रीडा, खगयुगमोदा उद्दंड ये भरतें. १७
पक्षी जयिं जाय वनीं वास करी पक्षिणी तदा भवनीं,
दक्ष शिशूंचे अवनीं, नवनीतचि शुद्ध तन्मनोभवनीं– १८
जरि तीं दोघें गेलीं आणायाला वनांतरीं भक्ष्य,
वपु मात्र तथापि तिथें लागे अवघें पिलांकडे लक्ष्य– १९
परतोनि गृहा येतां मातापितरें तयांस निरखाया–
येती पुढें पिलें तीं हर्षित होऊनि. पार न सुखा या ! २०
आश्चर्यभरित होती पाहुनिया कौतुकास बालांचे;
मानिति कृतार्थतेनें उपकार अपार विश्वपालाचे. २१

बहुकाळ या प्रकारें भोगी सुख विहग तो सपरिवार;
परि दुर्निवार दैवें ओढवलें दुःख एक अनिवार ! २२
अमृतांत गरल अथवा दुग्धघटीं लवणकण जसा पडला;
खग सुखनिधिंत विहरतां दुःखाच्या भोंवऱ्यांत सांपडला ! ! २३
एके दिनीं वनांतुनि परताया लागला अधिक वेळ–
ललनेसहित कपोता;–मांडी दुर्दैव तों गृहीं खेळ. २४
मातापितरें नव्हतीं नीडांत म्हणून ते शिशु स्वैर–

तेथेंच आसमंतात् बागडती; त्यांस ना कळे वैर. २५
भवितव्य परि टळे ना बहुधा यत्नें अशक्य चुकवाया;
ये व्याध तया ठायां बाळां निर्मत्सरांसि ठकवाया. २६
वर्णें कज्जलगिरिसम तो, नयनें भव्य शोभती लाल.
कालव्यालचि जणु तो, किंवा प्रत्यक्ष्य कूट सहकाल; २७
सामुग्री पाशाची दडवुनि कक्षेंत धरुनि वंचक तो--
प्राप्त जहाला तेथें दुर्मति निजकार्यिं काय हो ! चकतो ? २८
पसरी पाश तिथें तो बहु निष्ठुर दुष्ट पक्षिहननास;
निष्कारणशत्रु अहो ! सजला त्यांचा करावया नाश २९
फांस कसा त्यांस कळे जगदनुभव ज्यांस लेशही नाहीं;
दिसते रीति अशी कीं 'पीडावे दीन सुकृतहीनांहीं.' ३०
पाशांत गवसलीं तीं सर्व पिलें हाय ! हाय ! त्या कालीं !
झालीं अतीव दुःखित, परि परमेशा न तद्दया आली ! ३१
स्वविलापरवें करिती परमाक्रोशास व्हावया सुटका;
परि जठरपूर्तिसाधन सारें दवडील फुकट तो शठ कां ? ३२
आक्रंदनें तयांच्या वाटे- होते दुभंग काय मही-- ?
तरि तद्रवें द्रवे ना तो द्रवता मूर्त तेधवा यमही ! ३३

किंचित्काळें आलीं पितरें, पाशांत देखिलीं बाळें;
मरणोन्मुखशीं झालीं पिटिती वक्षःस्थळें तशीं भाळें. ३४
व्याकुळ होती, गळती शोकाश्रू घळघळां, धरेवरती-
दुःखावेगें पडती, गात्रें क्षीणें न त्यांस सांवरती. ३५
मातेला भान नुरे देहाचें, स्नेहभाव पाझरला;
सरला वृत्ति तियेची ऐशी प्रीती दुजी जनीं विरला ! ३६
ती पक्षिणी पिलांच्या मोहें सत्वर उडोनिया पडली--

मरण न गणूनि पाशीं; माशी जैशी मधाप्रती जडली. ३७
“ लाभें लोभ दुणावे ” व्याध न अपवाद होय ह्या नियमा;
आणिक लाभा वांछी प्रिय व्हाया दुष्कृतें करोनि यमा. ३८

अवलोकिला कपोतें झालेला तो प्रकार सगळाही;
लाही तनुची झाली; शून्य तया भासल्या दिशा दाही. ३९
अज्ञानें सुत! शोकें त्यांच्या व्यसनीं पडे अहा! कांता!
आठवुनि रमाकांता, करिता झाला कपोत आक्रांता. ४०
बोले प्राणप्रिय शिशु गृहरत्नें अहह! सर्वसुखहेतु;
खंडुनि आशातंतू कालकरीं ओपिले मम विधे! तूं. ४१
दुर्दैवा! तरिही तव वैराची हाव जाहली न पुरी;
अधमा! त्वां निजहस्तें मत्कांता लोटिली कृतांतपुरीं! ४२
खाद्यपदार्थां घेउनि आल्यावरि पाहुनी पिलां पाशीं,
दुःखी अपार झालों; मग काय उणें असे विलापाशीं? ४३
होती परंतु कांहीं भार्या असल्यामुळें मनीं आशा.
मज मूढा केंवि कळे? झालें उद्युक्त दैव मम नाशा! ४४
ती आसही निमाली! अतां कैसें धरील धीर मन?
कळनाहि पडे जालीं! दूर करीं! संकटें रमारमण! ४५
माझी प्रिया पिलांसह मृत्युमुखीं आज सांपडे हाय!
घरव्यांत एकला मी कंठूं अवशिष्ट दुष्ट दिन काय? ४६
आसन्नमरण पाशीं व्याधासन्निध बघोनिया सकळां,
बहु ओरडे, धडपडे धरणीवरि, ये तयास मृत्युकळा. ४७
सावध होय, विचारें बोले हें पूर्वजन्मकृतपाप--
भोंवे अपाप; आतां उरला एकचि उपाय “ अनुताप. ” ४८

ह्या लोकींच्या सौख्यीं-- गृहधनसुतकामिनींत-- आजवरी--
रममाण जाहलों! पण निर्दय दुर्दैव तेंहि आज हरी!! ४९

इतुके दिवस न केले परलोकींच्या सुखार्थ मीं यत्न!
अंतरलों सुगतीला; घालविलें व्यर्थ रुचिरवपु रत्न!! ५०

मोक्षेतरपुरुषार्थत्रयसंपादन जयामुळें व्हावें,
तो आज गृहस्थाश्रम भार्याशिशुमृत्युनें लया पावे! ५१

सारांश इहपरत्रीं आंचवलों सर्वथैव सौख्या मी !
हर ! हर ! गेलें व्यर्थचि मज्जन्म, करीं कृपा जगत्स्वामी ! ५२

जगतांत मूर्ख, पापी माझ्यासम मीच एक, आन नसे.
हा ! हंत ! हंत ! दिसती दोष अजी दर्पणांत आननसे ! ५३

सर्वस्वाला मुकलों, अंतरलों मी सुखास हा ! हंत !
श्रीकांत ! मदंतसमयिं न उपेक्षीं मज; बघूं नको अंत. ५४

बहुवार मनीं ऐसा खेद करी तो कपोत, देहाचें--
भान तयासी न उरे, कर्तव्याचें न आत्मगेहाचें. ५५

व्याधोदरपूर्तीस्तव अथवा निजदुःख परिहरायास--
खग परिवारसन्निध पाशांत रिघे स्वतां मरायास ! ! ५६

संतुष्ट दुष्टबुद्धि व्याध, न खाद्यास त्यास आयास--
पडले; गेला मोदें गृहिं परिवारास तोषवायास. ५७

एवंच सर्वतोपरि सर्वस्वा नाशिते भवासक्ती;
अतिशयलालनपालन मोहाची अमित वाढवी शक्ती. ५८

संसार वृथा गेला, खग जीवा जिवलगांसहित मुकला;
चुकला परमार्थाला, तत्सुखनिधि तत्क्षणीं अहा ! सुकला ! ! ५९

" निबिडारण्य जग असे, संसार अपार थोर तरु तोच;
कोटर तें भ्रामकसुख, तदाश्रयें जीव खग वसे साच. ६०
परिवार षडरिवारचि, जीवाला मोह पाडितो आधीं;
अंतीं अनुतप्त करी, भोगाया लावितो तया आधी. ६१
तो व्याधकाळ साचा; सरतां आयुष्यदक्षतक्षकसा--
राहे जीव हराया; दृष्टांताचि हा गमे मनास असा. " ६२

निश्चित जलबुद्बुदसमनश्वर जग आणि त्यांतिल पसारा.
ऐसें असोनि ह्मणतों आह्मी नेणोनि सारचि असारा ! ६३

आसक्ति प्रभुनामीं कृपणद्रव्यासमान ठेवावी;
रघुवरनामसुधा हे जिव्हेनें सतत सेव्य सेवावी. ६४
श्रीराम ! राम ! जयजयराम ! हरे ! राम ! मंत्र हा वदनीं--
संतत यावा, व्हावा मार्ग खुला जावयास हरिसदनीं. ६५

भृंग.

---

## मानवीदौर्बल्य.

साकी.

मंदिल केला मनुजा ! त्वां परि शिर केलें कोणी ?
कापड विणिलें तूंच खरें, परि कापुस ये कुठुनी ? १
फुलझाडें तूं लाविलिं, परि त्यां कोठुनि आलिं फुलें ?
तेज रंग अणि गंध त्यांमधीं वद कैसे शिरले ? २
राइपरी बीं बारिक त्यामधिं पिंपळ राहि कसा ?
अग्नि लागतां क्षणांत कैसा होई नाहींसा ? ३
नकशीकामें बघुनि वहावा कसब्याची करिसी ;

लांकुड, धातू करणाराला विसरुनिया जाशी. ४
चित्र मातिचें करितां, परि ती माति न ये करितां;
जीव त्यामधें न ये घालितां, गर्व फुकट धरितां. ५
जीव असे तों बसतों, हंसतों पळांत केवि पळे ?
आला कोठुन ? गेला कोठें गूढ न कांहिं कळे. ६
वाफ, उष्णता, तेज, वीज, आणि खनिज, पवन, पाणी,
वर्णुनि ह्यांचे गुण दाखविसी ज्ञानाची बाणी; ७
बुद्धिबलानें जाणुनि त्यांचे गुण, त्यांच्याकडुनी,
नाना यंत्रें योजुनि, घेसी कार्यें करवोनी; ८
त्यांमधिं आले गुण कैसे हें कळतें काय तुला ?
गुण जाणे ती बुद्धी कैशी झाली सांग मला ९
पाउस पडतो कैसा, कळतें, घमंड ही धरिसी;
मग वेळीं जरि न पडे तरि कां हांका मारिसी ? १०
सूर्य उगवतो मावळतो कां, सर्व मला कळतें,
ऐसें मानिसि; परि पळ तरि का थांबविशी त्यातें ? ११
नरा ! दुर्बला व्यर्थ मारिशी फुशारकी कां रे ?
बल तव लव बा, वर्ण्य कवीला दौर्बल्यचि सारें ! १२

विहंगम.

## होळी.

### पद.

होळीसाठीं करुनि धुमाळी, गर्जुनि आळी जन देता.
दंडपात्र हें भंडपणानें बंड कशाला माजवितां ? धृ.
गतानुगतिका लोकांसम कां अविवेकाला आदरितां ?
चोरीमध्यें मानुनि थोरी रत अविचारीं कां होतां ?

अंगें रंगें भरवुनि, दंगे रस्तोरस्तीं कां करितां ?
शिष्ट ह्मणवुनी, दुष्ट कृतीनें नष्टचर्य कां अनुसरतां ?
धर्म ह्मणूनी वर्म न कळतां, अकर्म कां हो आचरितां ?
खोड लागली गोड वाटते, जोड सुखाची ती नसतां ?
भला धर्म सो--डूनि आपला, शांतिसुखाला कां मुकतां ?
सज्जन ! कर्दम--ऱ्हदीं निमज्जन सज्ज कराया कां बनतां ? १

बालक पालक--वर्तन पाहुन, नर्तन करितिल तसेंच कीं.
दूरदृष्टिनें विचार बरवा; सार नसे तें अविवेकीं.
सच्छीलावर घालुन घाला, नेतां त्याला रसातला.
कळे परी मन वळे बळें तें कवटाळाया अवनतिला.
दुर्वचनाचा विटाळ रसना मना करी, कां नये मना ?
मूळ निसटलें, खूळ धूळ ही असे उधळली; सत्य गणा.
पुढें पुढें जायाचें सोडुनि, मागें मागें कां सरतां ?
भ्रमांत पडलां, जन्म दिला त्या जगदीशाला विस्मरतां ? २

——— कै० बळवंत जनार्दन करंदीकर.

## मयूरासन आणि ताजमहाल.

### श्लोक.

कामें दोन सुरेख त्या नृपवरें केलीं:---मयूरासनीं
ज्या तो बैसुनि शोभला, प्रथम तें, सा कोटि ज्या लागले,
राजे ज्यापुढते जुळून अपुल्या हस्तद्वया वांकले,
झाले कंपित, तत्करीं शिर असे हें येउनीया मनीं;
प्रेमें मन्दिरही तसें निजसखीसाठीं, तयें लावुनी
कोटी तीनच, त्या गभीर यमुनातीरावरी बांधिलें;

धूर्तीं आसन तें दुरी पळविलें—स्मर्तव्य कीं जाहलें !
आहे अद्भुत तो महाल अजुनी तेथें उभा राहुनी ! १

विल्हेवाट अशीच रे तव कृती त्या सर्वदा पावती
मत्त भ्रान्त नरा ! सदैव कितिही तूं धूप रे जाळिला
स्वार्थाच्या प्रकृतीपुढें—निज मनीं ही याद तूं जागती
राहूं दे—तरि धूर होइल जगीं केव्हांच तो लोपला !
काडी एकच गन्धयुक्त, नमुनी प्रीतीस, तूं लाव ती;
तीचा वास सदा जनीं पसरुनी देईल तो तुष्टिला ! २

केशवसुत.

## सुभाषित.

### आर्या.

या विश्वांत जयाच्या निष्कामप्रेम मनिं वसे न खरें,
त्याला शिवेल कैसें सांगा परमेशभक्तिचें वारें. १
जें आपणांस वाटे सत्य, परी आज वाटलें खोटें,
खोटें सत्य तरी, तें बोलायातें धरीं न भय कोठें. २
लोकांत कीर्ति व्हावी असेल ऐसें मनांत जरि मनुजा,
तरि सत्कृत्य सदा करि, वरिल तुला मग तदीय ती अनुजा. ३
निष्कामकर्म करितां फळ मिळतें नित्य चांगलें लोकीं,
परमेशहेतु ऐसा दिसतो मनुजा मनांत अवलोकीं ४
सदसद्विचार सद्गुरु सांगे, ऐके न जो कधीं नर तो—
मनिं जाण निश्चयानें संकटजळधी कधीं न तो तरतो ५

बा. सी. जोशी.

# काव्यरत्नावलि.

## अंक ५ वा.

## ईशदर्शन.

### गुच्छ ३ रा.

श्लोक.

मुळें पाळें पानें कुसुम कलिका कंटक फळें
त्वचा काष्ठें शेंगा विविध तरुचे भाग सगळे
मनुष्याच्या केले असति उपयोगार्थ सगुण
कसे देवा फेडूं मनुज जड आह्मी तव ऋण. १

वसूनी जें प्रेमें रुचिर[1] ललनांच्या[2] तनुवरी
विलासी लोकांच्या हृदयिं बहुकामोद्भव[3] करी
महा मोलाचें तें कुठुनि इतुकें अत्तर मिळे
मिळे तें वृक्षाच्या दलकुसुमकाष्ठांत सगळें. २

महा रोगाचें जी हनन करण्याला क्षमे[4] पुरी
प्रभावें मोठ्या जी खचित मृतसंजीवन[5] करी
कुठें ती मोलाची बहुगुणयुता[6] औषधि वसे
मुळीं पाळीं काष्ठीं दलिं सुमिं फलीं ती वसतसे. ३

नृपांचीं जीं मोटीं दिसति सदनें आठमजलीं
तयांमध्यें भिन्ना असति फलिका[7] युक्त शर्कलीं

१ सुंदर. २ तरुण स्त्रिया. ३ रतिसुखेच्छा. ४ समर्थ. ५ मेलेल्यांस पुन्हा उठवणें. ६ बहुगुणांनीयुक्त. ७ लांकडाच्या फळ्या. ८ तुकड्यांनीं.

कुठें या वस्तूंचा उगम इतुका विस्तृत असे
तरूंच्या काष्ठांतीं उगम अवघा तो वसतसे. ४
तरूंनो वेलींनो प्रियकर तुह्मी खास हरिचे
कसें वर्णावें मी विमल अवघें भाग्य तुमचें
अहोरात्रीं तूह्मी परहित करायास झटतां
मनुष्यापेक्षांही अधिक तुमची हो सदयता. ५
मनुष्यांमध्यें जे परहित करायास झटती
अशा लोकां ज्ञाते जरि सतत देवांत गणिती
स्वदेहाच्या नाशें परहित करीतात तरु जे
अशा श्रेष्ठां कोठें स्थल उचित द्यावें न समजे. ६
कृतज्ञाबुद्धीनें तरुंस जन जे पूज्य गणिती
तया कांहीं पापी जन, समजुनी मूर्ख, हंसती
कृतज्ञा बुद्धी ज्यां नसुनि दुसऱ्याचीहि न सहे
मनुष्यारी[1] ऐसे नरपशु न हे कोण तरि हे. ७
समस्त प्राण्यांना हितकर बहू नित्य असणें
बरें वाटे वृक्षां ह्मणुनि अति विस्तीर्ण तनुनें
समस्तांचें नानाविध हित करीती तरुलता
लतावृक्षांचा जो जनक[2] किति त्याची चतुरता. ८
तरूंच्या वेलींच्या त्रिभुवनिं किती जाति असती
किती कोठें कैशा वसति मनुजाला न कळती
मनुष्यप्राण्या ! तूं जरि चतुर आहेस बहुत
मती तूह्मी आहे प्रभुमतिपुढें क्षुद्र खचित. ९
शिरें ज्यांचीं जातीं गगनतल भेदूनि बहुधा
हजारों कोशांची तनु करिति जे धारण सदा

१ मनुष्य जातीचे शत्रु. २ बाप.

असे वासस्थान[1] क्षितितल[2] अशा उंच गिरिचें
कसा वर्णाया मी क्षम सहनशीलत्व[3] महिचें. १०

हिमागौरस्थानप्रमुख[4] गिरिंनो शांतिनिलय[5]
करीताती तूह्मांवरि सुरमुनी शांत हृदय
नद्या गंगादी ज्या करिति जग हें पूत निखिल
तुह्मी आहां त्यांचे जनक तुमचें भाग्य अतुल. ११

महा शैला ! रे ! ज्या जनसुखकरा औषधिलता
तया सर्वांचा तूं सदय असशी रक्षक पिता
असे तूझा साक्षात् अतुलबल[6] जामात उदधी[7]
तुझें वर्णायाला विमल यश सारें मज न धी. १२

मुनींची देवांची सतत तुजला संगति गिरे !
नद्या कन्या तूझ्या सलिलनिधि[8] जामात तव रे !
दिशा तूझीं वस्त्रें जिवलग तुझा मित्र अनिल[9]
कळे कीं थोरांचें खचित असतें थोर अखिल. १३

गिरे ! सिंहव्याघ्रादिक पशु महाकाय[10] अदय[11]
सदा जागोजागीं वसति न तया लेशहि भय
मिळे तूझ्या गर्भांतरिं गुरु महामूल्य[12] उपल[13]
अशी तूझी काया जनहितकरा फार पृथुल[14]. १४

महाज्वाळा जेथें तव गुरु[15]सुखांतूनि निघुनी
दिशा होती धूमाकुल[16] सकल मागूनि पुढुनी

---

१ ऱ्हाण्याचें ठिकाण. २ पृथ्वीचा तळ. ३ सहन करण्याचा स्वभाव. ४ हिमालय पर्वत मुख्य आहे ज्यांमध्यें. ५ शांतीचें घर. ६ अनुपम आहे बळ ज्याचें. ७ समुद्र. ८ समुद्र. ९ वायु. १० विशाळ देहांचे. ११ क्रूर. १२ महा मोलाचे. १३ दगड ( रत्नें ) १४ विस्तीर्ण. १५ विस्तीर्ण. १६ धुरानें त्रासलेल्या.

दिसे तूझी काया मधुनि मधुनी पावकमय[1]
कळे ऐशा वेळीं असशि किति तूं रे ! प्रतिमय[2] १९

गुच्छ ३ रा समाप्त.

विष्णु गणेश नेने.

---

## कृष्णाकुमारी.

गाणें.

[ चाल—चंद्रकांत राजाची राणी. ]

कळी उमलली जों न पावली पूर्ण विकासाला,
अदय कराचा तोंच तिजवरी पडला कीं घाला !
सुनील गगनीं चमकूं लागे सुंदर इंदुकला,
तोंच तिचा निर्घृण राहूनें धरिला हाय ! गळा !
भीम नृपाला प्रियकर बाला कृष्णा वेल्हाळा,
नडली, पडली बली अकालीं, त्या योगें, काळा !
स्वार्थ संसृती, लोभपरायण जगताची रीती,
उठे सुतेवर पिता हितास्तव, विसरे नयनीती ! ८

उपवर झाली भीमकबाळी रूपवती कृष्णा,
तत्प्राप्तीस्तव सहज लागली भूपवरां तृष्णा;
जयपुरराजा ह्मणे गुणवती व्हावी मम भाजा,
जोधपूरचा भूप ह्मणे तो भाग असे माझा !
शिंद्याच्या जोरावर चढला मारवाडवाला,
वांच्छी व्हावी प्राप्त आपणा कृष्णेची माला;
जयपुरची मागणी तयानें धाकें परतविली,
राजस्थानीं वैराग्नीची ज्वाला भडकविली;

---

१ अग्निमय. २ भयंकर.

कृष्णेसाठीं सज्ज जाहले खड्गाचे हात,
घोर युद्ध माजलें, वाहले रक्ताचे पाट !

अमीर नामा पठाण घातक, नीच, अविश्वासी,
उदेपुराधिप मानासाठीं ये भीमापाशीं;
वदे " हितास्तव करा स्वदुहिता अर्पण मानातें,
अपकारक होईल जोडिलें अन्याशीं नातें;
अथवा हें खंडूनच टाका मूळ अनर्थाचें,
कां कारण होतां पाडाया बळी सहस्रांचे ? "
विचार पडला, कसा पोटचा गोळा तोडावा ?
चुकवावें वा काय उपायें शत्रूंच्या घावा ?
चालक, मंत्री अजित नृपाचा तोच मार्ग दावी,
" समयींच " ह्मणे " ही अग्नीची ज्योत मालवावी ! "

आप्त जवळचा दौलत त्यावर ये ती कामगिरी,
कोसळून आकाश गमे त्या पडलें काय शिरीं !
" धिक्कार असो ! " वदे " जीविता तुमच्या धिक्कार !
व्यर्थ जन्म घेऊन जाहलां धरणीला भार !
छत्र शिरीं मिरवितां, ह्मणवितां स्वता लोकपाळ !
पोर एक पोटची तिचाहि न करवे सांभाळ !
हाच काय पुरुषार्थ ! कुलाचा हाच काय मान ?
पुरुष सजावा कीं अबलेची कापाया मान !
रजपूतांचे छावे आह्मी अबलांचे साथी
वागवितों तलवार कटीला नित्य तयांसाठीं !
वदा कोण, त्या मृणालिनीच्या जीवावर उठला ?
तद्रक्ताचा तिच्या कपाळीं लाविन खास टिळा !

पडेल जेथें मृगनयनेचा अश्रुबिंदु एक,
अरिरुधिरानें त्या स्थानावर लिहूं सूड–लेख !
नको बुद्धि ती, नका अमंगल वच तें उच्चारूं,
धीर न सोडा; धर्म आपला रणीं मरूं–मारूं ! ”

बोध खलास न रुचे, अहिमुखीं दुग्ध होय गरल,
श्वानपुच्छ नलिकेंत घातलें होईना सरल !
दौलत थिजला; परि न खलांचा दुष्ट यत्न विझला;
जवान दुसरा ती नव कलिका तोडाया सजला !
करूनिया निर्धार मनाचा, धरून तलवार,
गेला कृष्णेजवळ नीच तो करावया वार !
करीत होती हार फुलांचा जाईच्या रमणी,
जणों करी स्वकरें तरुणांचीं हृदयें बद्ध गुणीं !
हिमधवलांगी धवलचंद्रिकाहृदया बाला ती,
धवल फुलें तीं धवल करानें धवल गुणीं गांठी !
कृष्ण हृदय धवलतेजवळ तें झालें धवल पळीं,
नवल न धवलच बिंब शशीचें विलसे नील जलीं !
तिच्या दिव्य तेजानें दिपला, भरला कंप करीं,
उगारलेलें शस्त्र तयाचें गळलें भूमिवरी !
टिकलें पुण्य–प्रभावापुढें नाहीं पळ दुरित,
भग्नमनोरथ परत दुरात्मा गेला थरथरत !

गळून पडलें शस्त्र पुढें तें–निशाण मरणाचें !
धरून जें स्वकरीं भूमिवरि स्वैर मरण नाचे !
परि नाहीं ती धैर्यदेवता तिळभर डगमगली,
मधु स्मिताचीं खळीं कपोलीं उलट तिच्या पडलीं !

परि मातेनें तिच्या मांडिला एकच आकांत,
मातृहृदय तें ! करील कैसा सहन सुताघात !
पिटी उरःस्थल, कुंतल तोडी, कर माथां हाणी,
धाय मोकलुनि रडे, घेतला अश्रूंनीं न्हाणी. ६८

पाषाणालाही शोकानें त्या पाझर फुटता,
परि न तयानें वळले खळ ते, त्यजी न विष कटुता !
शस्त्र न चाले ह्मणुनि विषानें भरलेली वाटी
आणून दिली जनकाज्ञेनें कृष्णेच्या हातीं !
स्मित वदनानें करीं विषाचा धरून तो प्याला,
पदरें नयन पुशी मातेचे, वदे वीरबाला:—
" कां करिसी हा शोक ? आणिसी कां नयनीं पाणी ?
कवण वांचला सांग, भूवरी आजवरी प्राणी !
मृत्यु सखा सोयरा जिवाचा असे सदा साथी,
मृत्युबलानें तुटे भवाची दुःखाची गांठी !
वाट जिवाला चिर सौख्याची मृत्यु मात्र दावी,
वद, मग आली मरणाची का संधि घालवावी ?
जन्म जयानें दिला तोच या जीवाचा स्वामी,
भाग्यवंत ती, पडे संकटीं जनकाच्या कामीं !
धिग् जीवित ! ज्याकारितां पडती बळी असंख्यांचे,
मरण यशाचें, जर त्यायोगें देश–धर्म वांचे ! " ८४

देऊन असा धीर, विषाचा घेई ती घोंट,
मोहमूढ मातेस नावरे अश्रूंचा लोट !
एकदोनदा घोंट विषाचा नाहीं तिस पचला,
दुष्टांनीं यास्तव नाशाचा बेत नवा रचिला !

हाय ! कुसुंबा प्याया धरिला पुढें तिच्या ओठीं,
मालविली यापरी खलांनीं ती रत्नज्योती !
केला, अनुमोदिला जयांनीं कृष्णेचा अंत,
त्या शासाया चुकला नाहीं न्यायी भगवंत !
जसें करावें, तसें भरावें; बीज तसे दाणे !
'विनायका'ला करी बोध हा कृष्णेचें गाणें.

विनायक.

---

## वेश्या.

### आर्या.

अस्थिस्नायुग्रथिता, मांसाची बाहुली असे नारी
वेश्या कशी सुरम्या भासे चित्तीं तुझ्या सदा भारी १
जरि मांसरक्तबाष्पा तन्नेत्रींच्या करूनिया भिन्न
पाहसि तरि सुंदरता नाहीं मग ती करी मना खिन्न २
कोठें केशहि शोणितयुक्तचि वारांगनाकलेवर तें
लोकीं निंद्य बहु परी हृदयीं तव वाटतें कसें वर तें ३
सुंदर वस्त्राभरणीं भूषविती लोक हे तिच्या देहा
परि मांसभक्षकाचें पशुचें तें अन्न गोड नोहे हा ! ४
धवला मुक्तामणिच्या दुग्धासम शुभ्रशाहि हारांनीं
भूषवि वेश्यास्तन परि मृत होतां भक्षिती पशू रानीं ५
वाटे रमणीय वरी धनहरणा ती करीतसे लोकीं
नच शुद्धता तदंगीं रम्यत्व मृषा असे मनिं विलोकीं ६
दे मद मदना वेश्या आणिक मदिरा तसीच कीं लोकीं
पाडी पाशींच जना मोहे हें मानसांत अवलोकीं ७
वारांगनामृगजळीं मोहित होती सकाम नरहरिण
व्याकुळ कामतृषेनें होतां निजशुद्धि सोडितेंहि मन ८

युत केश कज्जलानें स्पर्श भयंकर दिसे मनोरम कीं
दुष्कृत्याग्निज्वाला जाळी कामी जना तृणासम कीं ९
सरसा भासे हृदयीं परि नीरस वारयोषिता गमती
त्या रौरवानलाचीं कामीजन इंधनें गमे चित्तीं १०
विस्तृत कबरी, चंचल तारक नयना; मृगांकवदना ही
विकसित पुष्पापरि करि हास्य जरी, शुद्ध गरल तें पाहीं. ११
वारांगना विलोला, वित्त हरूनीहि आयु संहारी
हर ! हर ! मनुजा संतत वेश्यासहवास दुःख दे भारी १२
अवयव शोभित करुनी ठकवाया जी नरास तत्पर कीं
ती विषवल्ली वेश्या पुण्य हरूनीहि लोटिते नरकीं १३
दाउनि नाना अभिनय नरमृग मोहावया फिरे जगतीं
जणुं पारधीण वेश्या यत्पाशीं कामयुक्त जन पडती १४
कामीजन विहगातें धरण्यास्तव पंचबाण व्याधानें
प्रस्तृत वेश्याजाला केलें मोहावयास नादानें १५
रतिरूपशृंखलेनें करि वेश्या बद्धमत्तचित्तकरी
मोहस्तंभीं तिष्ठत सुटण्याला शक्तिवंत होय परी १६
जेवि लगाम तुरंगा, हस्तीतें सांकळी करी रुद्ध
या वारयोषिताही पुरुषा करिती क्षणामधें बद्ध. १७
जी दोषरत्नपेटी अडकाविली दुःखशृंखला जीतें
ऐशा वेश्येपासुनि, नाहीं अत्यल्प सौख्य मनुजातें १८
वित्ताची देहाची दुःस्थिति करि हानि तशिच मानाची
अंतीं दुर्गति देते कोठुनि आशा नरा विमानाची १९
चिंताच वारयुवती जाळी जीवास जी जिवंतपणीं
बरवी चिता तियेहुनि जाळितसे जी नराप्रती मरणीं २०

य. त्र्यं. धर्माधिकारी.

## तारका.

### श्लोक.

अस्तास जाय रवि जो गगनोदरांत
डोकावुनी सहज कोण इथें पहात
हे नील अंबर करोनि हळूच दूर
कीं अप्सरा नभिं लकाकत काय थोर १

केली नभःसलिलिं कीं रति ये कराया
ये एकली ह्मणुनि यत्नचि होय वांया
कासार हे नलिनि काय फुलें वहाते
मोदें सख्यास मधुपास गमे मनातें २

ही थोर भव्य अति सुंदर चंद्रशाला
बारींतुनीं बघत ही जणु चौदिशेला
कंठांतला तुटुनि हारमणी गळाला
तो काय येउनि इथें स्थित आज झाला ३

क्रीडा करीत असतां जणु कंदुकानें
उड्डाण घेउनि बसे आजि येथ मानें
कीं प्रीतिराग सखिचा निजमूर्तिमंत
ये येथ येकवटुनी समयीं प्रशांत ४

गे चारुहासिनि समुज्वल अंबरीं या
कां आज जोतिवसनें हसतेस वाया
येतो फुटोनि अनुराग वरी तुझा हा
लोकीं सुपात्र नर कोण विभागि व्हाया ५

न्हाऊनि रक्तवसना परिधान केलें
बाहेर हें वदन काढुनि याच वेळे

तूं वाट पाहसि अशा समयीं कुणाची
प्रेमांध हा कवि तुला वद हेंच याची ६

द्रक्पात हा हलवितो हृदया सदैव
संताप देइ परि नित्यचि यांस दैव
तूं मूर्तिमान करुणा करि तृप्त याला
लोकीं तरी खचित हा मम धन्य झाला ७

वनवासी.

---

## शांतीचा बोध.

( दोहाछंद )

शान्ति देवि ! तव बोल गे ! कोठें रम्य निवास ?
तुला शोधितां जाहलों आहे पूर्ण हताश ! १
निर्जनशा गिरिकंदरीं मी केला तव शोध,
मनीं मानुनी सर्वथा तव संसारविरोध. २
एकाएकीं त्या स्थळीं घुसुनी झंझावात
ह्मणे, " मूढमति पामरा ! न इथें शांति रहात. " ३
' जा, जा इथुनी मानवा ! ' दणाण गर्जे रान;
' सरसर, झरझर ' गुणगुणे तरुशाखास्थित पान. ४
दरी सोडुनी चाललों, झालों मी वनपार,
जननी वियुक्त बाळसा भ्रमलों विगताधार. ५
तों नयनां गगनांगणीं दिसलें सुरपतिचाप,
मनास रुचलें शांतिचें स्थान तेंच निष्पाप. ६
शतरंगीं मन दंगलें, बसलों धरुनि ध्यान,
दैन्यभय क्षण भंगलें, सुटलें शरीरभान. ७

तोंचि अमितशत दुंदुभीसम कडकडले मेघ,
रेखी नयनविघातिनी विद्युत् गगनीं रेघ. ८
चळलों तत्क्षण मानसीं, शांति पळाली पार !
काय सांगु जे जाचले चित्ता क्षुब्ध विचार ? ९
तेथुनि मी मग धांवलों करुनीया अति वेग,
बहुशत केले यत्न मी रोधाया उद्वेग. १०
शांतिलिप्सुनें देखिलें म्यां सुंदर उद्यान,
जेथें होते रेखिले कुसुमताटवे छान. ११
शुक्लद्युति मधुगंध तें पुष्प जाइचें रम्य,
कोमलता शुचिशीतता पाहुनिया अनुपम्य, १२
हेंच वाटलें शांतिचें होय खरें माहेर,
ना तरि ही रमणीयता कशी आंत बाहेर. १३
स्नेहोत्कंठित मी तदा गेलों कुसुमसमीप
क्षणैक झालों, नंदनीं जसा सुखाढ्य शचीप. १४
सुमान्तरीं म्यां पाहिलें मधुरप्रभ दलमूल,
पराग जेथें डोलती, परिमळ ज्या अनुकूल. १५
हातीं धरिलें पुष्प तें, मी रोमांचित काय,
तोंच दचकलों मी जणूं पडे अहीवर पाय ! १६
परागसंघीं लोळती मर्मच्छेदी कीट,
हायहाय ! सुम फेंकिलें मनांत भिनला वीट ! १७
भ्रांत चित्त मी झटकलों, व्यथित हृदय निस्तेज,
दिसे कुसुमसम जेंचि, तें ठरतें कंटकसेज ! १८
पथीं भटकतां, भेटला प्रवया नर मज एक,
शांतमुद्र जो भासला नयज्ञ मूर्त विवेक. १९
त्यास विनविलें प्रांजली, “भगवत् ! सांगा साच,

कोठें शान्ती राहते ? वारा सारा जाच. २०
गभीरदृष्टीं तो मला वृद्ध निरखुनी शांत,
कुरवाळुनिया प्रीतिनें स्वकेश हिमनिभकांत, २१
देता झाला आदरें मज मुष्टीभर धान्य,
ह्मणे, " असे हें शांतिचें वासस्थळ बुधमान्य. २२
जा, जा, तरुणा, येथुनी, यांचा रांध अपूप,
दाखवील बा ! तो तुला श्रीशांतिप्रियरूप. " २३
असें बोलुनी जाहला गुप्त जरठ सहसाच !
चकितचित्त मी तिष्ठलों, निवला न परी जाच. २४
शांते ! शांते ! देवते ! कोठें गे तव वास ?
किंवा निकटचि राहुनी, करिसी मम उपहास ? २५

——————— बाळकृष्ण अनंत भिडे. बी. ए.

## दुरितेच्छानिरसन.

मातृबोध ( संवाद. )

आर्या.

**मुलगाः—** पूर्णतमोमय-रजनी-कालीं करितां गृहांत झांकोनी
माझीं अवलोकाया कुलें भूवर असेल कां कोणी ? १

**आईः—** आहे, सर्वांठायीं ईश्वर, मूर्त प्रकाशमय सार
अनुपम शक्ति जया जो शक्त कराया प्रकाश अंधार. २

**मुलगाः—** असतां मदितर सगळी जनता शयनीं सुसुप्त मी कां न-
दुरिताचरण करावें विशंक या झांकुनी तमीं कान ३

**आईः—** छे. छे. तृण पर्ण डुले किंवा हाले वनांत मुक शील
तेंही कळे जिला, त्या कैसा तूं दृष्टितून हुकशील ? ४

मुलगा:— वदलों असत्य कोणाजवळी किंवा मनांत पुटपुटलों
ऐकेल तो कसा, मी कां मग त्याच्या न दृष्टितुनि सुटलों ? ५
आई:— नाहीं ज्यानें केलें मन तें शोधावयास शक्य न का–
त्या ? स्वर्णकार त्याला जाणाया कठिण कायसें कनका ? ६
देऊं नकोचि थारा तव हृदयीं विभ्रमास बाळा या
तो पूर्ण सर्व साक्षी कोण तयाला समर्थ टाळाया ? ७
रानीं, वनीं, स्मशानीं, किंवा गिरिकंदरीं, दिशा दाही
त्रैलोकीं, सप्ततळीं, एकांतीं, त्याविणें नसे कांहीं. ८
जेथें जेथें जाशिल तें तें स्थळ तो भरोनिया राहे
त्या भीतां दुरिताला स्थान नुरे हृत्स्थळींहि तो आहे. ९
करितो मानव जें जें तें तें त्या त्या स्थलीं तया कळतें
दुरिताचरणें सदया हृदयाचें चित्त फार हळहळतें. १०

नारायण.

---

## पतंगास.

( दिव्यावर उड्या टाकतांना पाहून )

साक्या.

थांब पतंगा ! थांब न करिं वा तूं ऐसा अविचार
स्वस्थ रहा क्षण ऐकुनि घेई गोष्टी बऱ्या चार १
मूर्खा ? करिसी अज्ञत्वें हा किमर्थ जीवितघात ?
आत्मघात हा बरा नसे बा सौख्यलेश ना यांत २
कंटाळा, पांखरा ! तुला कां आयुष्याचा आला ?
म्हणुनि टाकुनी उड्या दिव्यावरि इच्छिसि तूं मरणाला ३
छे ! छे ! नोहे रीत बरी ही संकट मोठें आलें
तरी पतंगा ! त्यास विवेकें सहन पाहिजे केलें ४

संकटसमयीं शरण रिघावें भावें जगदीशातें
शुद्धभाव पाहुनि जगदीश्वर देतो विमलसुखातें ५
अथवा तेजःपुंज दीप हा सुखकर वाटे तूतें ?
तदालिंगनें सौख्य मिळे या जरि धरिसी हेतूतें ६
हाय ! हाय ! ही तुझी कल्पना भ्रममूलक रे खास
तेज दिव्याचें सुंदर बघुनी तूं भुलुनी गेलास ७
सरसावुनि टाकिसी उड्या तूं हाय ! कसा त्यावरतीं
नेम चुके ह्मणुनीच टिके तव आयुष्याची ज्योती ८
घडे पतंगा ! स्पर्श तुला जरि दुर्दैवें दीपाचा
क्षणांत होइल हाय ! नाश तव या मृदुतर देहाचा ९
दीप असे हा ज्वलन, तयातें स्पर्श घडेल जयाचा
भस्म करुनि टाकणें तयातें तत्स्वभाव हा साचा १०
परंतु नाहीं दीन पतंगा ! ज्ञान एवढें तूतें
यास्तव जाई येथुनि आतां सोडुनि या हेतूतें ११
“ बाह्यरूप पाहोनि भुलोनि न जावें ” हा उपदेश
चित्तीं धरुनी बाग सदा मग दुःख नसे तुज लेश १२

———————— विष्णु बाबाजीराव कुळकर्णी.

## प्रीति.

———

गाणें.

प्रीति मिळेल का हो बाजारीं ?
प्रीति मिळेल का हो शेजारीं ?
प्रीति मिळेल का हो बागांत ?
प्रीति मिळेल का हो शेतांत ?

प्रीतिची नसे अशि ग मात;
पहा शोधुनी हृदयांत ! ३

नन्दनावनामधीं आला
कल्पलतेला बहर भला;
तिचीं हृदयिं बीजें पडलीं,
प्रीति त्यांतुनी अवतरली !
प्रीतिची असे अशि ग मात;
पहा आपुल्या हृदयांत ! ६

प्रेमळ कुस्यांची माळ
प्रियजनकण्ठीं तूं घाल;
द्विगुणित मग तो प्रीति तुला
देइल, न धरीं शंकेला.
प्रीतिचा असा असे सौदा
प्रीतिनें प्रीति ग सम्पादा ! ९

हृदयीं आलिंगन पहिलें,
चुम्बन मुखकमलीं वहिलें,
आणिक रुचतिल ते चार
होती प्रीतिस उपचार.
प्रीति वाढली, गडे, सतत
पहा तूं प्रियजनहृदयांत !
प्रीति असेल का ग बाजारीं ?
वेडे !
प्रीति मिळेल का ग शेजारीं ? १३

केशवसुत.

# काव्यरत्नावलि.

अंक ६ वा.

## ईशदर्शन.

### गुच्छ ४ था.

श्लोक.

शिरोभागांतूनी घन[1]तरुलतायुक्त गिरिचे
झरे येती खालीं पळति जणु कीं देहे[2] फणिचे[3]
अशा सौंदर्याचें कथन करितांना सुकविही
ह्मणे " वर्णाया हें सकल मति माझी क्षमे[4] न ही " १

गिरी कांहीं स्थानीं असति चढण्या फार कठिण
असे कीं थोडीही सरळ न जयांना उतरण
अशाही शैलांच्या शिखरिं नर जाऊनि बसतो
अशीं मोठीं कार्यें नर मतिबलें नित्य करितो २

गिरी जो निःशंक प्रबल जड[5]सृष्टींत रुचिर
तसा जीव[6]सृष्टिप्रमुख नर जो फार चतुर
तयां दोघांना जो सतत करि उत्पन्न सहज
कशी त्याची बुद्धी बल सकल जाणेल मनुज ३

फळांनीं पुष्पांनीं सुभग विहगांनीं परिवृत[7]
तरू मोठे नानाविध असति जेथें अगणित

---

१ दाट अशा झाडांनीं आणि वेलींनीं युक्त. २ शरीरें. ३ सर्पाचीं. ४ सम. ५ निर्जीव सृष्टींत. ६ सजीव सृष्टींतला मुख्य. ७ युक्त

मनुष्याचें जेथें कधिंहि न दिसे एकहि घर
वनें ऐशीं लक्षावधि असति मोठीं महिवर ४
वनीं[1] ऐशा झाडी अतिशय असे कीर जिकडे
पशू सिंहव्याघ्रप्रमुख असती हिंस्र तिकडे
असे कीं यद्घोर[2]ध्वनितसमयीं गर्भपतनें[3]
करी धेनू तैसें नरहृदयही जाय भिउन ५
बिळें मोठीं तेथें करुनि तरुमूलांत बहुत
रहाती नागादी विषमय महा जंतु अमित
असे कीं फूत्कारें[4] करुनि अपुल्या जे अकरुणें[5]
क्षणामध्यें एका करिति मनुजप्राणहरण ६
वनीं कोठें कोठें असति उदकाचे बहु झरे
जयांतील स्वादू[6] विमल जल केव्हांहि न सरे
मनुष्याचें तेथें मन रमतसे फार अखिल
रमे रम्यस्थानीं नरमन तयीं काय नवल ७
तपस्वी भस्मालंकरणं[7] करुनीया तनुवरी
जटा चक्राकारी[8] बहुत करुनी धारण शिरीं
तरूंच्या वल्कांचीं[9] रुचिर वसनें[10] नित्य करुनी
करी चित्तस्थैर्यें[11] तप बहु अशा घोर विपिनीं ८
ध्रुवश्रीवाल्मीकिप्रमुखऋषिंनीं याच विपिनीं[12]
फळीं मूळीं कंदीं विमल सलिलें[13] देह धरुनी
करूनीया नानाविध बहुतपस्या[14] शुभकरी
उभा केला कालेंकरुनि अपुल्या सन्मुख हरी ९

---

१ रानीं. २ ज्याच्या घोर गर्जनेच्या वेळीं. ३ गाभ टाकणें. ४ सुस्काऱ्यानें. ५ निर्दय. ६ रुचकर. ७ भस्म हाच दागिना. ८ चाकासारख्या वाटोळ्या. ९ सालींची. १० वस्त्रें. ११ चित्ताच्या स्थिरतेनें. १२ वनांत. १३ पाण्यानें. १४ तप.

वनीं नाना वृक्षांवरि असति पक्षी अगणित<br>
तयांमध्यें कांहीं सुभग[1] नयनां मात्र बहुत<br>
न शोभा कांहींना परि करिति ते शद्ब मधुर<br>
कितीकांनां शक्तीविण गुण न कांहींहि इतर १०

क्वचित् पक्षी स्वर्णासम तनुशिरोभागीं[2] पिंवळा<br>
नभाच्या[3] तो रंगासम सकल मध्यामधिं निळा<br>
प्रभातींच्या बालद्युमणिसम[4] मूलांत अरुणें[5]<br>
प्रभूत्वीणें नान्या रुचिरजगदुत्पादनगुण[6] ११

मयूरादी पक्षी मृदुतनु मनोवेधक किति<br>
पिसाऱ्यांचे त्यांच्या अनुपम किती रंग असती<br>
गुणज्ञा शिल्प्याला श्रम करुनि आयुष्यभरही<br>
असें रंग प्रायः कधिं न करितां येतिल गृहीं १२

मनुष्याच्या नेत्रा सुखकर असें रूप रुचिर<br>
तयाच्या कर्णाला सुखकर असा शद्ब मधुर<br>
निसर्गानें[7] ऐसे अनुपम महा दोनहि गुण<br>
शुकादी कांहींशा विरळ खगिं येताति दिसुन १३

तनूनें शक्तीनें खचित खग जो क्षुल्लक दिसे<br>
जयांमध्यें ज्ञानांकुरलव निसर्गेंच न वसे<br>
किती कंठीं त्याच्या श्रवणहर[8] माधुर्य असतें<br>
अहाहा ! विश्वेशा अतुल तव चातुर्य दिसतें १४

प्रभातीं गाणारा खग जंव सुखें गायन करी<br>
मनामध्यें येती फिरुनि फिरुनी सौख्यलहरी

---

१ सुभग. २ सोन्यासारखे शरीराच्या वरल्याभागीं. ३ आकाशाच्या. ४ बाल सूर्याप्रमाणें. ५ तांबडा. ६ सुंदर जग उत्पन्न करावयाचा गुण. ७ स्वतःसिद्ध. ८ कर्णेंदियाचें हरण करणारें.

बघूं जातां त्यातें परि बहुत दुर्दर्शन दिसे
स्वरूपाभावीं[1] तो अनुपमगुणालंकृत[2] असे. १९

ईशदर्शन काव्य समाप्त.

विष्णु गणेश नेने.

---

## ही कोण माझी दशा ?

ह्या कवितेंत कै० बळवंत जनार्दन करंदीकर ह्यानीं आपली स्थिति वर्णन केली आहे. ह्या कवीचें संक्षिप्त चरित्र गेल्या वर्षाच्या बाराव्या अंकांत दिलेलें आहे. ही कविता लिहिल्यावर अगदीं थोडक्याच दिवसांत कवीचा अंत झाला.

श्लोक.

जें आवश्यक जीवनास न मिळे वस्त्रान्न तेंही पुरें.
मोठा निष्ठुरही द्रवेल बघुनी जे हाल होती बुरे.
कष्टें ते करितों कसे सहन मी, माझें मला ठावकें
चित्तस्थैर्य अशी तरी अवनता–वस्थान भंगू शके. १

माझी दीन दशा अशी बुडवितें मोठ्या जरी शोचनीं;
अश्रूतें स्खलितों, विवेक न फुटूं बाहेर दे, लोचनीं
सोसूं दुःख कसें मनांत कढतें, जें आंतल्या आत तें ?
देती त्रास कढावरी कढ अहा ! बाहेर ओसांडतें. २

कोणीही न सहाय दुःस्थितिंत ह्या, आहेंच मी एकटा
भेदायास विपत्तिच्या न शकतो दुर्भेद्य मोठ्या तटा
लावी दुर्गम आपला मम शिरो–भागावरी बावटा.
कोण्या,–प्रश्न करी विदीर्ण हृदया,–नेईल ती शेवटा. ३

---

१ स्वरूपाऐवजीं. २ अतुल गुणांनीं युक्त.

दुर्दैवा ! छळिशी मला, छळ सुखें, संतोषशी तूं जरी.
संतोषास पडेल लेश न उणें माझ्या परी अंतरीं.
यच्चित्तीं सुखदु:खभावसमता नांदे यदृच्छाबळें,
त्याला तूं छळितां मिळेल तुजला कांहीं न, कैसें कळे ? ४

जे मोठे जन आपणा ह्मणविती, ज्यांना तसे मानिती;
त्यांनीं द्रव्य असो किती मिळविलें; त्यांची दिसो सुस्थिती
द्रव्याचा अति लोभ त्यास न सुटे; दु:खांत तो लोटितो.
थोडे फार मिळे तयांतच सुखी, संतुष्ट मी राहतों, ५

मारामार पडे परंतु तितकें थोडेंहि संपादितां.
आधिव्याधि छळावयास उठती, त्यांना न ये वारितां.
सांगूनी इतरा कळेल न, मला कोण्यापरी गांजिती.
पोळ्यातें मधुमक्षिका न पळही, तैशा मला सोडिती. ६

आहे जीवन तोंवरी दिन बरे-वाईट जातील ते.
अंतीं ऐहिकसौख्यवैभव न कां सोडावया लागतें ?
तें नेतां समवेत ये न मनुजा, राही स्थलींच्या स्थलीं.
देतों शांति, विचार हाच करुनी, भंगूं न चित्तांतलीं. ७

येतें सर्व करावयास जरि हें मोठ्या मनोनिग्रहें;
होतां वेळ दुपारची लटपटे सारें परी ज्ञान हें.
आली वेळ अशी असेल कितिदा, ही उक्ति खोटी नसे.
केली मीं न कधीं, करीन न पुढें, चिंता करावें कसें ? ८

गेले पुष्कळ, थोडकेच उरले, आतां मदायुर्दिन.
ते जातील कसे तरी; दृढमनें दु:खीं सुखीं काढिन.
आली धांवत शक्तिपात करिते ग्रासावया ती जरा
वार्धक्यीं मज एक मात्र दिसतो, देवा ! तुझा आसरा. ९

दुर्दैवें असतों अपंग अथवा निर्बुद्ध भारी जरी;
झालें कारण दुर्दशेस असतें तें योग्य माझ्या तरी.
ज्ञानाचा महिमा असो बुधजनीं मोठा किती मानिला;
अज्ञानासम सौख्यदायक परी न ज्ञान वाटे मला. १०

शाखापर्णविहीन शुष्क तरु जो भूभार कीं केवळ;
आहे पात्र दिसावयासचि जिचें मोठें नदी निर्जल;
ह्या होतील मला कशींच उपमा. संतोषणीं दुर्बळ
माझ्या मी. बळवंत नांव असतां हें काय त्याचें फळ ? ११

ज्याचा आश्रय सर्वथैव सुटला, जो डोंगराचा कडा
केव्हां कोसळुनी पडेल न कळे भूमीवरी बापडा ?
जें संघट्टन सुस्थितींत सगळ्या वस्तूंस आकर्षितें
कोठें, काय, कसें चुके न समजे, तें कां मला सोडितें ? १२

एकाकी स्थिति चांगली मुनिजनां प्रापंचिकां कां तशी ?
माझ्या दुःसह, शोचनीय तरि ती वांट्यास आली कशी ?
आहे जीव जरी स्थितीस असल्या अत्यंत कंटाळला;
देहीं प्राण असेल तोंवर न ती सोडील वाटे मला. १३

होता दुःखित, खिन्न आमरण जो पाहून माझी स्थिति;
झाली लेश कधीं जयास सुखदा ज्याला न माझी कृति;
वार्धक्यें न, कुटुंबभार थकला होता शिरीं वाहतां;
गेला सोडुनि तो, सुतास ह्मणती छत्रापरी जो पिता. १४

भारी कष्टदशेंत भार उदरीं माझा जिनें वाहिला;
झाला ताप समग्र एक पुढच्या आशेवरी साहिला;
आशा ती न तिची सुतें पुरविली दुष्टें कृतघ्नें महा;
गेली वत्सलताच, ती न जननी, लोकांतरातें अहा. १५

आहे श्रेष्ठ बलांत सर्व ह्मटलें जें बांधवांचें बळ,
तें नाहीं, मज चार बंधु असुनी, मी एकटा केवळ.
मी कोणावर भार आजवर जो नाहीं कधीं टाकिला
आणी तो सहसा प्रसंग न विधे ! टाकावयाचा मला. १६
जाणे मी बहुतेक सर्व अनुजीं आहे मला टाकिलें.
ह्याला कारण दोष मी समजतों आहेत माझ्यांतले.
प्रेमाला बहुधा न दोष दिसती, पाही न वा त्यांकडे.
प्रेमाभाव ह्मणू, तरी मजसवें त्यांचें नसे वांकडे. १७
बंधुप्रेम न ज्यावरी स्वजन कां त्या आप्त होतील ते ?
त्यांना लेश सहानुभूति न तशी आत्मीयता वाटते.
त्यांचा दोष ह्मणावया मज न ये; मीही तसा वागतों.
भ्राते, आप्त सुखी असोत सगळे चित्तीं परी चिंतितों. १८
जे कोणी मज एक दोन असती सन्मित्र त्यांचा ऋणी.
त्यांचे हो सुहृदत्व कारण सुखा थोडें तरी जीवनीं.
मित्रावांचुन होय जीवन वृथा; तैशीच कीं सृष्टि ही
आधीं वंदन साधु त्यास करिती ह्याकारणें प्रत्यहीं. १९
आकाशीं वर फेंकिला दगड तो ये शेवटीं खाली.
आशोत्साह मनोनभांत चढला, तो पावला ती गती.
गेली सर्व भरून एक हृदयीं माझ्या उदासीनता.
आलें जीवन हें कळून पुरतें आहे कसें तत्वता. २०
एकामागुन एक मित्र मजला सोडून हा चालला.
दु:खातें कमती करी न उलटें तो वाढवूं लागला.
आली काय मनीं अशी विषमता ? सोडून गेले कसे ?
त्यांच्यावांचुन शून्य चित्त नयना अंधार सारा दिसे. २१

———— कै. बळवंत जनार्दन करंदीकर.

## हरपलें श्रेय.

( उदात्त बुद्धीला संसारांत राम नाहीं. अलौकिक असें जें कांहीं तिला पाहिजे असतें, तें तिच्या हक्काचें असून देखील, त्याच्या प्राप्तीकरितां तिला झुरत पडावें लागत नाहीं काय ? )

पद.

त्रिखंड हिंडुनि धुंडितसें,
न परि हरपलें तें गवसे ! ॥ ध्रु० ॥
होत्यें अजाण माहेरीं
तों खेळ खेळले परोपरी,
लटूपटीच्या घरदारीं
लटकीच जाहल्यें संसारीं;
तेव्हांचें सुख तें आतां
खऱ्या घरींहि न ये हाता !
चुकचुकल्यापरि
वाटे अन्तरिं,
होउनि बावरि
निजश्रेय मी पाहतसें,
न परि हरपलें तें गवसे !
प्राप्त जाहलें तें तुजला
तूं मागितलें जें देवाला;
ज्याचें मोल तुवां दिधलें
तेंच तुझ्या पदरीं पडलें.—
या वचनें चुकला सौदा
उमगुनि हृदया दे खेदा !

दिलें हिरण्मय,
हातीं मृण्मय;
हा हतविनिमय !
परत मला मम मिळे कसें ?
न परि हरपलें तें गवसे ! ११
किरण झरोक्यांतुनी पडे,
अणूंसवें त्यांतून उडे
परोक्षविषयीं मन माझें,
विसरुनिया अवघीं काजें;
हयगय त्यांची मज जाची,
परि न मला पर्वा त्याची !
वेडी होउन
बसल्यें अनुदिन
एकच घेउन—
मज माझें लाभेल कसें ?
न परि हरपलें तें गवसे ! १६
जेथें ओढे वनराजी
वृत्ति रमे तेथें माझी,
कारण कांहीं साक्ष तिथें
मम त्या श्रेयाची पटते;
ह्मणुनी विजनीं मी जात्यें
स्वच्छन्दें त्या आळवित्यें.
स्वभास दाउनि
परि तें झटदिनिं
जाई लोपुनि !

मग मी हांका मारितसें,
न पारि हरपलें तें गवसे ! २१
जन ह्मणती कीं ' ही उठली, '
माझी मर्यादा फिटली;
ती धरुनि कसें तें मिळतें
न असे मर्यादा ज्यातें ?
एक शद्ब बोलेन जरीं
सकलां कुण्ठित करिन तरी !
अशी आगळी,
परी बावळी
आहें दुबळीं;
कांकीं त्याविण सुचत नसे !
न पारि हरपलें तें गवसे ! २६
स्वपतिचितेवरि उडी सती
संसृतिविमुखी घेई ती;
दीपशिखेवरि पतंग तो
प्रेमें प्राणाहुति देतो;
मी न करिन का तेंवि तधीं
माझें मज लाभेल जधीं ?
मजपासोनी
हाय ! हिरोनी
नेलें कोणीं !—
ह्मणुनि जीव पाखडीतसें !
न पारि हरपलें तें गवसे ! ३१

केशवसुत.

## नदी आणि कवि.

श्लोक.

असो कवीचें कुल अप्रसिद्ध । होई कवीच्या कवनें प्रसिद्ध.
तसा नदीच्या उगम–स्थलाला । नदीमुळें गौरवलाभ झाला. १
काव्यें कवीचीं जगतांत गावीं; । त्याचें न त्याच्या परि चोज गांवीं
नदी सुदूरस्थजनां पवित्र । विटाळिती तीर्थ तिचेच पुत्र. २
बाल्यांत उच्छृंखलवृत्ति दोन्ही. । ठावा नसे आडथळा ह्मणोनी.
लागो दरी खोल, उभा पहाड, । जातात तीं धांवत धाडधाड. ३
जाई जसें अंतर होत खोल, । गाभीर्य ये वृत्ति निवे विलोल.
रेखून मार्ग क्रमितात संथ । करीत कल्याण जगीं अनंत. ४
अभंग त्यांच्या हृदयीं तरंग । निःसंग ते त्यांत सदैव दंग.
गाऊन गाणीं भ्रमतात रानीं; । ते धन्य ज्यांच्या पडतात कानीं. ५
स्वजीवनानें उगवून दाणे, । नदी जिवां दे चिर जीवदानें.
तैसे कवीच्या कविताप्रवाहें । जीवांत संजीवन दिव्य लाहे. ६
राष्ट्रें बुडालीं नृप थोर गेले; । नदी कवी मात्र अनंत ठेले.
भागीरथीला खळ लेश नाहीं । अखंड रामायण लोक गाई. ७
महाकवी थोर नदाप्रमाणें; । मी बापडा ओघळ अल्प जाणें.
धाके न ओढा झुळझूळ वाहे. । माझी तशी ही गुणगूण आहे. ८

विनायक.

---

## कवीचें ऐश्वर्य.

श्लोक.

झालें तुझें वदन खिन्न कशास कांते ?
त्वन्मानसीं असुख कां ? वद तूं प्रियातें.

तूं गे असोन विमला रमणी कवीची,
दारिद्र्य काय हरि शांति तुझ्या मनींची ! १

राजापरी तव असे पति भाग्यवान
कोठें नृपाल सुख भोगितसे समान ?
पुष्पें सुगंधि लतिका नटुनी कशा या
माझ्या गृहावर पहा करितात छाया ! २

त्यांचीं विचित्र सुमनें वरती फुलोनी
दुर्गापरी करिति भव्य कुटी गुच्छांनीं
द्वारीं सखे निजकरें बनमोगऱ्याला
तूं लाविलें. सुखद तारेणें तो जहाला. ३

सूर्योदयीं वर बसे, भिजला दंवानें
मातें तरी उठवि बुल्बुल गोड गानें
बंदी[3] प्रकामें यश गात असे नृपांचा;
त्याचा मनुष्य गुरु; देव असे खगाचा. ४

ज्यांच्यावरी चमकती गण मौक्तिकांचे
ऐसें सुरेख बघ हें द्वय गालिच्यांचें
आदर्श रम्य दिसतें मधलें तडाग;
देती फुलें चवकडीस सुवर्णराग. ५

मीं जातसें अनुदिनीं मृगया कराया;
मार्गी जपे श्रम समीरण तैं हराया.
मोदें सुगंध पसरी. नव मंजरीच्या
ढाळीतसे मजवरी चवऱ्या वनींच्या. ६

---

१ झोंपडी. २ कमान. ३ स्तुतिपाठक. ४ यथेच्छ. ५ आरसा. ६ सोनेरी रंग. ७ वारा.

मैदान सुंदर असे नभ हें अफाट.
हे मेघ अश्व गमती. किति रम्य थाट !
हे उंट खेचर तसे अति भव्य हत्ती
मेघोदरीं जनन घेउन धांवताती. ७

रत्नांहुनी बहु अमोलिक काव्यरत्नें
माझ्याकडे असति जीं मिळती न यत्नें.
नेत्रांस ना रमविती परि मानसांतें;
कोणी समर्थ न जगीं हरण्यास त्यांतें. ८

माझा निरोप जगता कळवावयास
माझ्यापुढें असति तत्पर शब्द-दास
इच्छीं मनांत जरि मीं तरि ते पळांत
पाताळ, भूमि अथवा नभ धुंडितात. ९

घेवोनिया स्वकरिं सुस्वर तंतुवाद्य,
मी चांदण्यांत छेडितों मधुराग आद्य;
त्यांचें विचित्र बल गुंगवि त्वन्मनाला
देसी बळें प्रियतमे मग चुंबनाला १०

ते नाटकी, सुबक, कृत्रिम बोल शांत
कर्णांत जे पडति सुंदर मंदिरांत.
त्यांला न मूल्य कधिं ये तव भाषणाचें
का कागदी कुसुम होइल पुष्प साचें ११

सानंदचित्त मजला धन हें अपार.
सत्यापरी न बळ या जगतांत थोर
दारिद्र्य राहिल कसें अमुच्या समोर
दे दे सखे मधुर चुंबन एकवार १२

——————— पांडुरंग बाळकृष्ण दडकर.

## पद्यरचनेचा ओनामा.

### ( ईशस्तवन )

श्लोक.

धरा, थारा आह्मां वसति करितों जीवर सदा;
जिथें सर्व प्राणी वसति विभुजी ! अक्षय मुदा;
अनेकां वस्तूंनीं पदिं पदिं दिसे जी रुचिरशी;
प्रभो ! पृथ्वीमाजी खचित भरला तूंच असशी. १

नद्या ओढे, गोडें उदक बघ देतात सकलां,
त्ररी तृप्ति प्राणी पिउनि ह्मणिं त्यांच्या सुसलिला;
त्वदंशावांचोनी वरिल जनता तृप्तिस कशी ?
प्रभो ! त्यांच्या ठायीं खचित भरला तूंचि असशी. २

असे खारें पाणी जलधिंत विषारी जलचरें,
जयांतें पाहोनी त्वरित जनचित्तीं भय शिरे;
परी तोही देई लवण बहु, मोत्यें सुबकशीं,
प्रभो ! त्याच्या ठायीं खचित भरला तूंच असशी. ३

नभीं राहे, वाहे जलदगण, जो स्वैर विचरे,
अह्मां तो वारी दे, उपकृति अशी कोण विसरे ?
विजेच्या संयोगें बहुत दिसतो सुंदर मशी,
प्रभो ! मेघामाजी खचित भरला तूंच असशी. ४

रथा ओढी, काढी विणुनि पट, नानापरि अशा—
करी अग्नी कार्या, उदकसहवासें बहुतशा;
लकाके तेजानें भजक भजती ज्या दिननिशीं,
प्रभो ! अग्नीमाजी खचित भरला तूंच असशी. ५

प्रकाशाचा राशी रवि बहु जनांतें सुखकर;
समुद्राचें खारें जल करि करांहीं रुचकर;
असे वस्तू जैशी रविच नयनां दाखवि तशी;
प्रभो ! सूर्यामाजी खचित भरला तूंच असशी. ६

हलाया, चालाया, सुगुण तव गाया गुणनिधे !
कराया भक्तीतें, सकलमनुजां वायु बल दे.
स्व-रूपीं त्या न्याया किति अवधि लागेल तुजशी ?
प्रभो ! वायूमाजी खचित भरला तूंच असशी. ७

पहा आकाशानें ध्वनि परिसणें नित्य घडतें;
तयावांचोनीया सहज अमुचें काम अडतें,
कवींच्या ऐकाया कुठुनि मिळल्या सूक्ति मजशी ?
प्रभो ! आकाशींही खचित भरला तूंच असशी. ८

प्रभो ! सर्वांमाजी खचित भरला तूंच असशी,
अजाणां आह्मां तूं परि नच विभो ! कैंवि दिसशी ?
" सदा ध्यावे गावे तव गुण तसें नामहि मुखें,—
सुखें सत्काव्यीं हे जडमति जडो; " देच इतुकें. ९

भृंग.

---

## निदान.

### श्लोक.

चित्ता अनेक गद झोंबति सर्वकाल
याचे ह्मणोनि जगिं होति सदैव हाल
या रोगबीज सकलाप्रति मोहजाल
तो दुर्मदें उपजवीत अपार शूल १

हा कामवात कफलोभ छळी जिवाला
कीं क्रोधपित्त चिर जाळितसे उराला
तीन्हीं मिळोनि उपजे मग सन्निपात
अर्थात यास्तव नराप्रति होय पात २
ईर्षा असे खरुज विज्वर मच्छरानें
हा ग्रस्त दद्रुममता धरि या मदानें
कीं कुष्ट दुष्ट कुटिलाइ करीत ताप
तो गर्वही अडकवीत तनू सपाप ३
तृष्णा असे उदरवृद्धि तशी तिजारी
ती ईषणा कपट दंभहि नारु भारी
एकेक होय गद जेथ जिवासि भारी
सर्वत्र येथ मिळतां मग कोण तारी ४

वनवासी.

## सुभाषित.

### श्लोक.

काका पद्मवनीं प्रमोद न घडे हंसासि कूपोदकीं
विद्वत्संगमिं मूर्ख लेश न वसे सिंहासनीं भृत्यकीं
सत्संग व्यभिचारिणीस न रुचे वर्तेचि नीचासवें
जी ज्याची प्रकृती स्वभावजनिता कोणा न ती टाकवे १
राहे व्याघ्र सदैव काननिं गुहेमाजी वसे केसरी
सेवी हंस विकासयुक्त नलिनी गृध्र स्मशाना धरी
वागे साधुजनींच साधु खलही वर्तेचि दुष्टांसवें
जी ज्याची प्रकृती स्वभावजनिता कोणा न ती टाकवे २

रंगनाथ हरी अधिकारी.

# काव्यरत्नावलि.

अंक ७ वा.

## ध्यास तो भास.

अकबर बादशहाच्या मायावी राज्यकर्तृत्वाला भुलून पुष्कळ नामांकित रजपूत वीरांनीं यावनी धर्माची दीक्षा घेतल्याची गोष्ट इतिहासांत प्रसिद्धच आहे. त्यापैकीं एकाचें पश्चात्तापचित्र पुढें दिलें आहे.

आर्या.

स्तंभासमीप होता तो त्या समयास एकटा बसला
नव्हती वृत्ति ठिकाणीं; चिंतेच्या सागरीं दिसे फसला. १
तेज मुखावर नव्हतें. गळली होती उरस्थलीं मान
हृदय उडे, आंत कढे, चिरडे जैसें पडून पाषाण. २
तंतूच्या वाद्यावर इष्ट सुरास्तव फिरे जसा हात
भालीं कर तो फिरवी वरचेवर, मग्न निज विचारांत. ३
तेथें एक तयाच्या पडला निःश्वास तेधवा कानीं
न कळे त्यास उमटला कैसा, कोठून, का तया स्थानीं. ४
हा काय भास झाला, कीं कांहीं खेळ कल्पनाच करी ?
सांदींतून असावी आली कीं काय वायुची लहरी ? ५
शिर वर करून फिरवी दृष्टि तलावाकडे परंतु जल
स्थिरचि दिसे पडलेला तेजाचा आरसा जसा अचल. ६
तृण वाढलें चळे ना—तरुचें हाले न एकही पातें
दुर्गध्वज न फडफडे—आली कीं झोंप त्याजला वाटे. ७

सर्वत्र दिसे स्थिरता–ऐकूं येई न वायुचें नांव
निःश्वास मग कशाचा ? कैसा त्याचा कळून ये ठाव ? ८
वर खालीं दृष्टि करी–इकडे तिकडे पुनः पुन्हा पाहे
चाळा तोच तयाला लागे, त्यांतच तयास सुख लाहे. ९
परि एकदा सहज तो पाहे डावीकडे वळून जसा
तरुणी रमणी बसली दिसली तो चकित होय त्यासरसा. १०
घेऊन शस्त्र हातीं शत्रु उभा तेथ ठाकला असता
तत्रापि यापरी तो पुरुष भयाभीत जाहला नसता. ११
हें काय चिन्ह ? न कळे स्त्री ही कैशी कुठून अवतरली ?
भरली सौंदर्यानें मूर्तिमती तरुणता पुढें सरली. १२
धन्या रसिककन्या हे मंगलदायिनी अमरकन्या ?
अन्यायवर्तिनी कीं स्मशानवासी पिशाचिका वन्या ? १३
उकले ना गूढ तया, न फिटे पडली मनास जी भ्रांती
पाहे, पुन्हा न्यहाळी तें मुख, तें रूप, दिव्य ती कांती. १४
ती मोहना तयाची सखी, तिची खूण त्याजला पटली
प्रीति करी त्याजवरी; आतां परि सर्वथा तया विटली. १५
परिणय त्यांचा झाला असतां तीं नांदलीं सुखें असती.
परि यवनधर्म धरिला तयें, तया बुद्धि जाहली असती. १६

होता गुलाब गालीं–ओष्ठावरती तशी तिच्या लाली
चिंतेचा ढग भालीं धरि त्यावर सांवली परी काळी. १७
नेत्रांत तेज होतें, परि निश्चल त्या सरोवरावाणी
चंचलता मावळली. शून्यपणा काळजी तया आणी. १८
सार्वेसुधेंच पातळ. हिरवी अंगांत कंचुकी ल्याली
कृष्ण कुरळ केश तिचे ते अस्ताव्यस्त विखुरले भालीं. १९

बोलावयास्तव तिनें कर वर केला तयांतुनी पार
दिसता चंद्र तुह्माला—असा तिचा काय दिव्यतासार. २०

" भक्ति जयावर करितें आलें मी त्याकडे स्थलीं वन्य
हेतु मला सुख व्हावें—वाटावें त्याजला जगीं धन्य. २१
उल्लंघिलें तटाला—आलें वंचून रक्षका दक्ष
तुज भेटलें सुरक्षित येथ करायास सोक्ष कीं मोक्ष. २२
वदती कुमारिकेच्या पवित्रतेचें अपूर्व तेज जनीं
विजनीं उग्र मृगेंद्रहि तिज दिपती—लागती तिच्या भजनीं. २३
जो श्वापदांत रानीं राखी ईश्वर तिची अशी लाज
त्यानेंच मज सुरक्षित यवनचमूंतून आणिलें आज. २४
हेतु धरून मनीं मी आलें चालून आपल्या पायीं
होतां तो विफल मला जाण, दिशा शून्य जाहल्या दाही. २५
तूं मुकलास मला; मी अंतरलें तुज अखंड अंतरलें
ही शेवट भेट समज, येथेंच प्रेम आपलें स्थिरलें. २६
पूज्य स्वधर्म त्याचा नित्य वहावा मनांत अभिमान
मान तयांतच; धर्मा न चळावें कापितां कुणी मान. २७
श्रेयस्कर मनुजातें आलें निजधर्मरक्षणीं मरण
सिंहासनास्तव नको परि, करणें धर्मबाह्य आचरण. २८
निज धर्म त्यजिला त्वां. यवनाचा निंद्य धर्म तुज रुचला
टाकून अमृतवल्ली आवडिनें घेतला करीं कुचला. २९
कर जोडितें; पसरितें पदर; तुझे चरण मस्तकीं धरितें
आज्ञापिशील तें तें करितें; परतें; न दुर्जनांत रतें. ३०
हा धर्म नको तुजला, यवनांचाही नको नको छंद
नलगे कुराण; बरवें पुराण; भज रामकृष्ण गोविंद. ३१

होईन तुझी दासी--त्वत्पदकमलीं विलीन राहीन
व्हाया सुख उभयाला आड असे यवनधर्म हा हीन. ३२
होऊं उद्यांच आपण एकत्र विवाहबंधनें पुण्य
राहूं आजन्म सुखीं; घेऊं ह्मणवून या जगीं धन्य " ३३

" होणार विवाह कुठें ?–जिथें चितेवर कलेवरें जळतीं
मळती धुळींत कोणी–कीं जीवित संशयांत तळमळती. ३४
कारण हिंदुत्वावर पडणार उद्यांच आमची टोळी
नलगे विलंब तुमचीं देवघरें व्हावयास वाटोळीं. ३५
बाल असो, तरुण असो स्त्री किंवा पुरुष जरठ ह्मातारा
त्याजवरी असिधारा धरूं, करूं देश शून्य हा सारा. ३६
तूं प्राणप्रिय मजला; तुझे सखेसोयरे कृपापात्र
समरांतून उद्यांच्या सत्तेनें वांचणार ते मात्र. ३७
तुमच्यांत जन्मलों मी--मजमध्यें हाडमांस तुमचेंच
तूह्मास न त्यजावें; परि मज तुमचीच लागली ठेंच. ३८
तुमचा--नव्हेचि--माझा होता जो पूज्य धर्म आजवरी
त्याजवरी मी उठलों--काय करूं ?–हाय ! हृदय लाज वरी. ३९
परि एक देव जाणे याचा माझ्याकडे नसे बोल
फोल प्रयत्न केले; कळलें माझें न बांधवा मोल. ४०
देशहितास्तव झटलों, धर्माचें वाहिलें शिरीं काज
माजविला दंभ न मीं, केला न जनांत शुष्क आवाज. ४१
कर्तव्य मनःपूर्वक केलें तें बांधवां न आवडलें
नडले येऊन मला, ते मम मार्गांत आडवे पडले. ४२
ते नीच, मत्सरी ते, दुर्व्यसनासक्त, दुर्मती, कपटी
नांव नको, गांव नको त्यांचें; त्यांना असो दुरून नती. ४३

विटलों–विटलों त्यांना; झालों मी त्यांजपासुनी दूर
होईन शांत, जेव्हां त्यांचा पाहीन जाहला चूर. ४४
व्हावा जर मी तुजला, माझा सहवास वाटतो गोड
जोड मला, सोड तयां–हितकर ही सुचविली तुला तोड. ४५
भ्राता मी, भगिनी मी, देव, पिता, माउली तुझी मीच
माझ्यांत सर्व नातें–मी असतां तुज कशास हे नीच ? " ४६

स्कंधीं शिर आधारी, त्याच्या ती मृदुल कर गळां घाली
भ्याली भीरु उसासे, स्फुंदे, अत्यूष्ण आसवें ढाळी. ४७
वाहे मंद समीरण; अमृताची वृष्टि तो शशांक करी,
एकांतिं अशा समयीं रमणीची कोण लालसा न धरी ? ४८
त्यांतुनि ही अनपेक्षित, सहज अनाहूत भेटली जर ती
नाहीं येणार कशी पुरुषाच्या हृदयसागरा भरती ! ४९
परि सुप्रसंग ऐसा त्या वीरा हेतु जाहला असुखा
भुजवलय नव्हे, पडला, गमलें, नागीणिचा गळां विळखा. ५०
झालें प्रशांत मस्तक, होतें जें सागरापरी क्षुब्ध
हृदय उडे ना; त्याचे सारे व्यापार तेधवां स्तब्ध ५१
पाहे त्या स्त्रीचें मुख तों पालट केवढा दिसे त्यांत !
ती मोहना प्रियतमा आहे किं नसे अशी पडे भ्रांत ! ५२
रूप तिचें तेंच असे; फिकटपणा ये परंतु त्याजवरी
जीवांश त्यांत न दिसे--प्रकाश जो सकल अवयवां वितरी. ५३
वदन निमीलित झालें--कीं बैसे मृत्युची तयास खिळी
बोले बोल जरी ती, श्वास उमटतां दिसे तिचा न मळीं. ५४
हृदय न उडे–पडे तें गार--न नाडींत राहिला त्राण
नेत्रीं तेज लकाके, परि न दिसे त्यांत जीव कीं प्राण. ५५

चित्रें स्वकल्पनेनें वातावरणीं करून निर्माण
होती छांदिष्ट कवी त्यांच्या अवलोकनांत रममाण. ५६
नटती नवीं नवीं तीं विराटरूपें क्षणोक्षणीं नाना
तीं कल्पनाविनिर्मित जाणुनिही भय न वाटतें कोणा ? ५७
तैसेंच लाडकीचें स्वरूप एका क्षणांत पालटलें
अवलोकून भयें त्या तरुणाचें हृदय तेधवां घटलें. ५८

" छे, छे नको नको हा अविचार करूं; विवेक कर कांहीं "
ती स्त्री वदली " मम--मत्प्रेमाची क्षिति तुला नसो—नाहीं. ५९
चाड धरीं पितरांची, स्वकुलाची, पूज्य मातृदेशाची
धर्माची--ईशाची--अनुकंपा नित्य पाहिजे ज्याची. ६०
मी स्त्री अनाथ, अबला; वृक्षाचा कोण त्या तुला पाला ?
एकाकीच तुझ्यास्तव राहीन करीत चिर विलापाला ! ६१
जन्म दिला, वाढविलें, तुजसाठीं नित्य वाहिले कष्ट
त्या मातापितरांना स्वकरें का पाहसी करूं नष्ट ? ६२
तव वीरकुल, जयाच्या शौर्याची गाजते जगीं ख्याती
त्याची स्वनिंद्य कृतिनें करणार जगांत काय तूं माती ? ६३
देश तुझा ज्यासाठीं वीरांनीं वाहिल्या किती माना !
तूं एक मात्र, त्याच्या, जन्मा आलास, हेतु अपमाना ! ६४
तव धर्म लघु मुखानें म्यां त्याची काय थोरवी गावी ?
तो टाकून हिरा त्वां अंधपणें गार काय ही घ्यावी ? ६५
परमेशप्राप्तीची तीच खरी सुलभ एकटी वाट
असतिल—असोत दुसरे पंथ नसे तथ्य यापरी त्यांत. ६६
हा निंद्य मार्ग तुजला ईशापासून नेतसे दूर
पडशिल, रडशील तुझ्या जेव्हां फांकेल दृष्टिचा धूर ६७

होईल ईश्वराचा कोप तुझ्यावर धरून परशील
तरशील कसा तेव्हां ? कवणाचे चरण सांग धरशील ? ६८
स्वजन त्यजून धरिले हृदयीं ह्मणवून यवन जे आप्त
ते धांवतील तुज, कां गमतें, पाहून संकटव्याप्त ? ६९
बुडवून तुझ्या धर्मा, तव देशाची करून रांगोळी
आले हे येथ सुखें पिकवाया नित्य आपली पोळी. ७०
तूं आयताच त्यांना नवसाला पावलास कीं देव
तद्धेतु परी पुरतां होशिल पाषाण समजुनी ठेव. ७१
तुज तुच्छितील मग ते, करितील पदोपदीं तिरस्कार
तेव्हां नको नको हें होईल जिणें तुझें तुला भार. ७२
स्वजन त्यजून धरिली परकीयांची जयें स्वयें कास
ते परकीय तयाचा धरिती न--धरूं नयेचि--विश्वास. ७३
स्वजना अंतरलासच; परही होतील पारके तुजला
भाग तुझा मग फिरणें भूवर ढाळीत नित्य अश्रुजला. ७४
कां संकटांत पडशी ? करिशी दुःखास कासयास गडी ?
कां घालितोस कळतां, कळतां प्रक्षुब्ध सागरांत उडी ? ७५
हा चंद्रमा विलसतो निजतेजें व्योममंडलीं नील
हा कृष्ण घन जवळचा त्याला एका क्षणांत झांकील. ७६
जें अभ्र आड आलें यथावकाशें पडेल तें पार
चंद्रप्रभा पुन्हा या टाकील करून भूतला गार. ७७
त्या अवधींत तुझें जर मोहापासून या न मन ढळलें
वळलें सुविचारास न, अक्षय तव समज, विमल यश मळलें. ७८
पितरांचे, आप्तांचे, इष्टांचे भोंवतील शाप तुला
कोपून ईश्वर तुझ्या पडतील शिरीं अखंड तप्त शिला. ७९
जागा हो, जागा हो, नको नको हा करूं दुराचार

नाहीं तर दासीचा शेवटचा तुज असो नमस्कार " ८०

ह्मणती ह्मणोत कोणी, विकार गुणरूप होय अभिमान
विस्मरती ते झाली त्याजमुळें जी जगांत धुळधाण. ८१
उदधीनें, भूकंपें, विद्युत्पातें अनर्थ जे घडले
अभिमानवश नराच्या कृतीपुढें सर्व ते फिके पडले. ८२
अभिमानें वाहविले रक्ताचे या जगांत पाट किती !
गळले अश्रु तयांची करवेल सरस्वतीसही न मिती. ८३
किति संसार बुडाले; किति पडलीं नांदतीं घरें ओस;
किति मंदिरें मिळालीं धूळीला माजला असंतोष. ८४
विसरे स्वापत्य पिता; भाऊ भावावरी उठे रुष्ट
स्नेह लयाला गेला; उदयाला कलह पावला नष्ट. ८५
चुकलें कळे, उमजतें चुकणें कवणास या जगीं चुकलें.
" चुकलों " परी न ह्मणती अहंपणानें सुखास ते मुकले. ८६
होतीं पुराणकालीं, जन ह्मणती, स्वर्गभूमि अविभक्त
भजतीं परस्पराला भावें देवास ज्यापरी भक्त. ८७
' उभयांत कोण मोठा उद्भवला सहज वाद त्यामाजी
भूमि ह्मणे मी मोठी; स्वर्ग वदे थोरवी असे माझी. ८८
कोणीच हार नेघे—उभयांची दृष्टि मीपणें अंध
होय कलह वादाचा—कलहानें प्रीतिचा तुटे बंध. ८९
जीं एकरूप होतीं, रोषें जाऊन दूर तीं बसलीं
फसलीं अहंपणानें; संतोषें परि न आजवर हसलीं. ९०
स्वर्ग समर्थ बली, तें स्वगुणें वरवरच चाललें आहे
अबला भू खचत असे; परि ताठा केवढा मनीं वाहे ! ९१

जे मातापितरांचे प्राप्त अपत्यांस तेच गुण वाण
वृक्ष तसें पुष्प मिळे; कंठ जसा त्यापरी निघे तान. ९२
माता भू अभिमानी, पुत्र तिचा पुरुष तोहि अभिमानी
भू स्वर्गा अंतरली; पुरुषाचीही तशींच हो हानी. ९३
बोध प्रियकरिणीचा त्या वीराच्या मनास मानवला
ती स्त्री मी पुरुष अशा अहंपणें तो परी न त्या लवला. ९४
" जें झालें तें झालें; आतां हा बोध होय वायफळ
वदनांतून निघाला कवण करी ग्रहण तो पुन्हा कवळ ? ९५
धर्म नको मज तुमचा, देश नको, लोकही नकोत मला
वाटेल तर रहा वा जा तूं; तव पथ नसोचि आडविला." ९६
सहज वदून असे तो स्मितवदनें प्रियतमेकडेस बघे
तों ती गुप्त जहाली; न कळे भूमींत वा नभांत रिघे. ९७
चोळी नयन पुन्हा तो पाहे विस्मितपणें सभोंवार
परि ती कोठेंचि नसे—न दिसे त्या; केवढा चमत्कार ! ९८
आसन नसे तयाचें चळलें. न्हवती परिस्थिती फिरली
होते शांत पहुडले चंद्रकिरण पूर्ववत् तडागजलीं. ९९
न्हवता दुर्ग सरकला. स्तंभ जसाच्या तसाच तेथ उभा.
ध्वज आपल्या पटानें होता सप्रेम पालवीत नभा. १००
आश्चर्य थोर, झाली गुप्त कशी तीच एकली रमणी
ऐसा करीत बसला खिन्नपणें तरुण तो विचार मनीं. १०१
आलें कळून त्याला हा सारा खेळ कल्पना नटली
ज्याचा ध्यास मना तो भास सदा होय गोष्ट ही पटली. १०२

———— विनायक.

## गायींचा अकबर बादशहास अर्ज.

( अकबर बादशहाच्या दरबारांत बिरबलानें एके दिवशीं एक गाय बरोबर नेऊन बादशहास विनंति केली कीं, ही गाय आपल्या जातीची मुखत्यार ह्मणून अर्ज करण्यासाठीं आपल्या चरणापाशीं आली आहे; परंतु आपल्या अलौकिक गुणांमुळें उत्पन्न झालेला पूज्यभाव व स्वतःचें दुःख ह्यांमुळें तिचा कंठ दाटून येऊन तिच्यानें एक शब्दही बोलवत नाहीं. ह्मणून तिचें ह्मणणें मीच खाविंदांच्या चरणापाशीं जाहीर करीत आहें. असें ह्मणून त्यानें बादशहास गायीचें ह्मणणें निवेदन केलें. व तें ऐकून बादशहानें आपल्या राज्यांत गोवध बंद केला. अशी आख्यायिका आहे. त्या गायीच्या ह्मणण्याचा सारांश पुढील पद्यांत ग्रथित केला आहे. )

पद.

( उद्धवा शांतवन कर जा--इ० ह्या चालीवर. )

दीनोद्धर अकबर शाहा ! । गायींचा अर्ज तुला हा ॥ धृ० ॥
बहु झाले यवनाधिप ते, । परि कोणि न तव तुलनेतें,
धर्मासम तूं न्यायातें । परिसुनि हें आलें येथें.
दूर करीं मम दुःखातें. । मारिति तव जन आह्मांतें.
जो प्राणी देइ न तापा । उपकार उलट करि बापा
त्या वधुनि करिति कां पापा । अपराधा ह्या नच साहा. १

ह्मणती मज आत्मा नाहीं । मौल्र्यांची शर्थ असे ही
वृक्षादिक वल्ली पाहीं । शास्त्रमतें आत्मा त्यांही.
न प्रत्यय ऐसें नाहीं । वेल कसा आश्रय पाही.

---

१ एखादी वनस्पती काळोखांत लाविली असतां तिचे शेंडे उजेडाकडे वळतात. तसेंच वेलीचे अंकुर प्रथम कोणीकडे असले तरी शेवटीं त्यांना जिकडे झाडाचा किंवा दुसऱ्या कशाचा तरी आधार मिळतो तिकडे ते वळतात हें अनुभवसिद्ध आहे.

मग जीतें मारूं जातां । हंबरडा भेदी चित्ता,
तिस आत्मा नाहीं ह्मणतां । धिक्कार असो ह्या मोहा. ६

एकदांचि मारुनि मांस । पाळुनि मज रोज घृतांश
सेविति नर दूधदह्यांस । अमृत पळे पाहुनि ज्यांस
मांसाहुनि दसपट खास । शास्त्रमतें सत्त्व घृतास
मिष्टान्नें जन जीं खाती । तीं काय तुपाविण होती
घृतसम रुचि कवणा हो ती । सांगू दे बापडि जिव्हा ८

जें कृत्य कृतघ्नपणाचें । त्यासमान पाप न साचें
करिती मम पुत्र नराचें । कामहि महि नांगरण्याचें
तैसें मलमूत्रहि अमुचें । तें कारण विपुल पिकाचें
मत्पुत्र ओढि गाड्याही । पाठीवर ओझें वाही
यत्कार्यिं झिजवि तनु त्यांहीं । मारावें धर्मचि का हा ? १०

तव राज्यीं सुख सकलांतें । दुःख मला मात्रचि कां तें ?
गवताचें पय मी करितें । तें तुह्मां फुकटचि देतें
ह्याविण मम काय गुन्हा तें । न कळे जरि शोधुनि बघतें
मम वध ही शिक्षा नोहे । हा दंड्य गुन्हा कीं आहे.
यवनेशा आण मनीं हें । दीनांची चिंता वाहा १२

ह्या भारत भूमीमाजी । करिती जन पूजा माझी
रामादिक राजे गाजी । तेही मत्स्तवना राजी
सर्वस्वाचि त्यांचें मी जी । किति मदर्थ झाले आजी

---

१ धान्याद्दशगुणं पिष्टं पिष्टाद्दशगुणं पयः
पयसोऽष्टगुणं मांसं मांसाद्दशगुणं घृतम्

२ युद्धें.

मी इष्ट वस्तु देणारी । जग पावन मी करणारी
मी अमृता पाजिवणारी । आजि दुबळी झालें पाहा १४

जो कोणी तृण धरि दांतें । मारी ना शत्रुहि त्यातें
मी तर तृण नित्यचि खातें । नर नाहीं शिवतहि ज्यातें
किति सांगू दैन्य तरी तें । वदवे ना मूकचिं होतें

पय गोडें हिंदूलोकां । अणि यवना कडु देतें का ?
हननेच्छा यवन धरी कां ? । झांकिसि तूं नेत्र कसा हा ? १६

येइ न तुज कां रे करुणा । मम चर्म न सोडी चरणा
नीचहि जरि येई शरणा । थोर न त्या देई मरणा
वाहिलि म्यां तनु उपकरणा । पात्र नसें दूरीकरणा

अव्हेर जरी मम करिशी । तरि कीर्ति उरे तत्र कैशी
असु माझे यश तव रक्षीं । भूषण तूं भूपसमूहा १८

विहंगम.

---

## वरानें वधूला घातलेले दहा घांस !

श्लोक.

माझी तूं सहधर्मिणी प्रियतमे ! झालीस गे ! यापुढें,
तेव्हां योग्य गमे तुला सुचविणें जें जें मला आवडे,
वायां कां मग सुप्रसंग दवडूं हा मी वृथा लाजुनी ?
सद्बोधान्वित घास घालि तुज जे हो तृप्त ते भक्षुनी ! १

घेई आर्ये ! सुखद पहिला घांस हा लाडवाचा,
मोठा तूतें सुगुण शिकवी शिष्ट सन्मान्यतेचा !
अंगीं साधेपण धरुनियां जो अधिष्टान पावे,
व्हावें तैसें प्रियकर जना आपुल्या सुस्वभावें ! २

घे सुग्रास ह्मणीं दुजा प्रियकरी श्रीखंड आणी पुरी,
ऐक्याची महती सुयुक्तिकपणें दावील तूतें खरी !
संयोगें उभयांस दोषरहिता आली खुमारी जशीं,
तैशी येइल गे स्वकीय चरिता तत्त्वा जरी लक्षिसी ३

साध्वी घ्यावा मधुर तिसरा घांस हा घीवराचा,
स्वीयांगानें सुचवि तुजला ग्राहकत्वास साचा !
छिद्रें जैशीं बहु दिसाति या तत्त्व घ्याया अमोल,
राहो तैशीं हृदयिं वचनें सांठवाया समोल ! ४

सुमधुर जिलबीचा घांस घाली चतुर्थ,
सुचवित तुजला गे त्यांतला गर्भितार्थ !
बहु रसरसलेली अंतरंगीं जशी ती,
हृदय तव भरू दे प्रीतिनें याच रीती ! ५

फेणीचा पांचवा हा तव मुखिं गृहिणी घालितों घांस घेई,
आणोनी तत्त्व ध्यानीं विमल मृदुलता आत्मचित्तास देई !
जैशी त्वत्कोमला ही तनु धरि उपमा सार्थ पद्मांतरंग,
तैसें अक्षय्य व्हावें मृदुतम तव गे बोधितों अंतरंग ! ६

मांड्याचा घे त्वरित सुमती साहवा घांस शुभ्र,
बोधी जेणें हृदयनभ गे होउ तूझें निरभ्र !
उल्लंघूं हा भवनिधि तयें शांतशा मानसानें,
सान्निध्येंही दृढ वसुं तसे स्वर्गलोकीं सुखानें ! ७

अर्धांगी सातव्यानें परमशुभ तुला घालितों मी करंजी,
मिष्टान्नासक्त लोकां करित बघ जिचें आंतलें सत्व राजी !
शुद्ध ज्ञानास तैशी हृदयिं धरुनिया पूर्ण सत्वान्विता हो,
तेणें विद्वज्जनांच्या मुखिं तव विलसो कीर्तिचा दिव्य लाहो ! ८

घांस घालिं आठवा तुला अनारसा सती,
त्याजपासुनी खमंग होउं दे तुझी मती !
भाषणें तशीं पदोपदीं सुअर्थयुक्त तीं,
बोलुनी सुवास देइं माझिया मनाप्रती ! ९

घेई प्रेमें नवम चतुरे ! घांस माझा चिरोटा,
यत्तत्त्वार्था मनिं निरखितां नाहिं सौख्यास तोटा !
मायेची ती वरि पसरितां शर्करा गोड कोणी,
द्यावा तीतें नच लव कदा ठाव चित्तीं भुलोनी ! १०

आतां ग्रासा दशम सुमुखीं केशरी भात घालीं,
यत्सौगंध्यें सहज असते चित्तवृत्ती निमाली !
संपादोनी ह्मणुनि सखये कीर्ति आमोदरूप,
सद्यत्नानें निववि हृदयें सज्जनांचीं अमूप ! ११

घातले तुला घांस हे दहा !
दाखवावया सत्पथा महा !
जाउनी तयें कीर्तितें वरीं,
स्वर्गिं पितर ते धन्य मम करीं ! १२

——————— राजहंस उर्फ इंजिनियर वार्तिकर.

## जलप्रवाहास उद्देशून.

### श्लोक.

जलप्रवाहा ! तव शीघ्र वेग । पाहूनि होते मम बुद्धि गुंग
चित्तांत नाना उठती विचार । त्यातें कथावें मनिं हेतु फार १
उंचावरोनी तव लाट येत । धो धो असा नाद जवें करीत
नसे तुझा स्वच्छ मुळींच रंग । कृष्णत्वशुभ्रत्वयुत त्वदंग २

मेघासमाना तव कांति वाटे । यन्नामयोगें मनिं तोष दाटे
आहे परी तात तुझा पयोद । तैसीच तूझी प्रतिमा जलौघ ३
परोपकारी गमसी अतीव । देसी जनां सतत सौख्य--ठेव
अनेक कार्यें तव साह्ययोगें । सुदुर्घटें तीं घडतात वेगें ४
विद्युल्लता जेंवि सखी घनातें । तसी शिला ही रमणीय तूतें
हीच्यासवें केलि करीसि नित्य । आहे तुझें प्रेम अपार सत्य ५
वियोग तूतें तव कामिनीचा । अजूनपर्यंत घडे न साचा
तूं भाग्यशाली गमसी खचीत । सुखें सख्या ! भोग सुखां नितांत ६
कालानुसारें जगिं फेरफार । होतात तैसें विविध प्रकार
परी तुझी जी गति तीच आहे । त्याच्यामधें व्यंग कदापि नाहे ७
फारा दिसांपासुनि या स्थलांत । वास्तव्य तूझें जरि मूर्तिमंत
आला तुला वीट न या स्थलाचा । वाढे क्रमें हर्ष परी मनींचा ८
अहंपणा तो तुज आतळे ना । कौटिल्य मात्सर्य हृदीं वसे ना
उदार गंभीर तुझें स्वरूप । संतोष देतें मनुजा अमूप ९
जन्मास येऊनि कितीक गेले । नानापदें दडपून मेले
चिरत्व कोणा परि ना मिळालें । रहस्य तें मात्र तुला उदेलें १०
जेवी शरीरीं तव रंग दोन । कर्मद्वयें तेंवि मग प्रधान
पुण्यास संज्ञा अति शुद्ध तोय । नीळ्या जलाला कृति गर्हनीय ११
प्रतिक्षणीं आचरितों अघातें । तेणें न लाभे सुख मानसातें
चिंता निशाचारिणि दाहकारी । जाळीत माझी तनु सत्वधारी १२
परावलंबी स्थिति पाहुनीया । क्षाळीत अश्रू नयनांतुनी या
अंगांत वारें शिरतें विचित्र । नाहीं सख्या रे परि मी स्वतंत्र १३
प्रार्थीं परेशा मज न्यावयाला । परंतु येई करुणा न त्याला
सोडीं विधे ! बंधन हें पराचें । दावी त्वरेनें दिन ते सुखाचे १४
जलप्रवाहा ! सुख भोग मोदें । क्रीडा करोनी सखिशीं विनोदें

स्पर्शो तुह्मा ना कधिं दुष्ट विघ्न । प्रेमें रहा संतत सौख्यमग्न १५
जातों अतां मी अपुल्या गृहाला । भोगावया दुःसह दुःखमाला
येईल जेव्हां यम न्यावयाला । जाईन त्याच्यासह मी दिवाला १६

चक्रवाक्.

## राष्ट्र-संगीत-लक्षण.

Song should like a river flow.
( Barry Cornwall )

आर्या.

जैसा हिमाद्रितुनि मधु,--निर्मल--गंगांबु--पात घसरावा
पुष्पांतुनि गंध जसा,--गीतांतुनि अर्थ--गंध पसरावा १
तें गीत--जें स्मरण दे, इतिहास--पुराण--वीर--पुरुषांचें--
निज--पूर्व--वैभवाचें, आर्यांच्या विक्रम--प्रसंगांचें २
तें गीत--जें पळवितें, देशद्रोहादिकल्पना--रिपुतें
जें संकटीं रिझवितें, मानव--चिंतेस नित्य घालवितें ३
तें गीत--ऐकतां जें, देश--हित--विचार चित्तिं खळबळती
किंवा ज्याच्या स्मरणें, परमार्थ--सुखार्थ लोक तळमळती ४
तें गीत--ऐकतां जें, नरमनिं कर्तव्यजागृती व्हावी
ईर्षा दे प्रबलातें, जेणें दुबळ्यांस वीरता यावी ५
संगीत तें ह्मणावें,--जें शिकवी देव--देशभक्तीतें
ज्याच्या पठणें श्रवणें, ध्यानें नरदेह जाय मुक्तीतें ६

बा. बा. गद्रे.

# काव्यरत्नावलि.

## अंक ८ वा.

## गणिकोद्धार.

**कथासूत्रः**— श्रीयुत वासुदेव गोविंद आपटे बी. ए. यांच्या अशोकचरित्रांत अशी एक कथा आढळते. ते वेळीं मथुरा नगरींत वासवदत्ता ह्मणून एक गणिका होती. ती एकनिष्टपणें एकाच यजमानाची सेवा करीत असतां, तेथच्याच उपगुप्त नांवाच्या एका बुद्ध उपासकावर तिचें मन गेलें. तिनें त्याच्या प्राप्तीकरितां हवी तशी खटपट करून पाहिली. परंतु तो ईश्वरपरायण साधुपुरुष तिच्या कुमार्गप्रवृत्तीस अनुकूल झाला नाहीं. शेवटीं एकदां दैवयोगानें आपल्या यजमानाचा धनलोभास्तव खून केल्याचा आळ येऊन, ती स्तननासिका छेदन होऊन स्मशानांत विव्हळत पडली असतां उपगुप्त तेथें गेला; आणि त्यानें तिला उत्तम बोध केला. त्याच्या योगानें तिचा उद्धार झाला. ही कथा पुढील कवितेंत गुंफिली आहे. अशोकचरित्र प्रसिद्ध होण्यापूर्वीं ही कथा कवीला माहीत नव्हती. तेव्हां या कवितेचे सर्वांशीं प्रेरक श्रीयुत आपटे हेच होत. त्याबद्दल कवि त्यांचा अत्यंत ऋणी आहे.

साक्या.

रुधिरें सिंचित पटासारखें दिसे पश्चिमाऽऽकाश
सूर्यास्तानें दिसूं लागलें भुवन उदास ! उदास. ! १
पतिनिधनास्तव अशौचदर्शक कृष्णपट दिशा ल्याली
पति प्रकाश स्त्रीचा--त्याविण काळेंच तिच्या भालीं. २

चिता धडकल्या--ज्वाळा उठती--भरे दशदिशा धूर
कंवट्या फुटती, अग्नीमाजी होय अस्थिचा चूर. ३
घटिका ती राक्षसी--मृत्युचा, स्मशान तें, दरबार
स्थल देण्याचें इहलोकींचा मानवास करभार. ४
उठे दीर्घ रोदन स्मशानीं त्या समयास भयाण
निराश्रिता कवितेची जैशी उदासवाणी ताण. ५
प्रत्येक स्वन त्यांत मधुर, परि आर्त, करुणतापूर्ण
करील ज्याचें श्रवण निश्चयें पाषाणास विदीर्ण. ६

मथुरापुरची वारयोषिता वासवदत्ता नामें
सौंदर्यास्तव--तारुण्यास्तव जिला भजावें कामें. ७
पुराभरण, सुखवैभवशाली गणिकांची जी राणी
सेवेस जिच्या सिद्ध संपदा जोडून सदा पाणी. ८
सहज जयावर दृष्टि जियेची पडे, धन्य तो मानी
तिच्या मधुरभाषणीं, न तें सुख तरुणांस सुधापानीं. ९
जन्में गणिका, परी चंद्रिका आचरणें अकलंक
परपुरुषस्पर्शें न जियेचा विटाळला पर्यंक. १०
एकासच मानून देवता करी त्यावरी प्रेम
तोच जिवाचा सखा तियेचा; ती सीता, तो राम. ११
मदनमंजिरी, भुवनसुंदरी तीच त्या स्थलीं वन्य
धुळींत लोळत पडली होती हाय ! छिन्नविछिन्न. १२
मृदुशय्येवर जी पहुडावी ओढुनि तलम दुशाला
तीच धरेवर पडली उघडी भुज घेऊन उशाला ! १३
अधरस्पर्शें कपोल व्हावे रक्त, असे सुकुमार
खावा लागे आज त्यांजला धूलिकणांचा मार ! १४

सेवेस जिच्या तत्पर होत्या सदनीं अगणित दासी
एकलीच ती त्या समयाला अभागिनी वनवासी ! १५

इहलोकींचें नश्वर वैभव—हा क्षणभंगुर खेळ
जलबुद्बुद—भोंपळा भ्रमाचा फुटे न लगतां वेळ. १६
समृद्धिसागर आज असे जो दीनांचा कैवारी
तोच उद्यां होऊन भिकारी, फिरतो दारोदारीं. १७
प्रकाश झळके आज, उद्यां त्या गृहीं भरे अंधार
हास्यविनोदस्थलीं क्षणांतच उसळे हाहाकार. १८
घालून मिठी गळां प्रियाच्या निजे जी सुखासीन
उजाडेल दिन येता दुःखीं तिज गमलें स्वप्नीं न. १९
नाथ स्तनमंडलीं तिच्या शिर ठेवुनि निद्रामग्न
असतां, कोणीं खड्गें केलें हृदय तयाचें भग्न. २०
विव्हळला, फोडिली तयानें एक दीर्घ किंकाळी
खडबडून त्यासरशीं शयनीं गणिका जागीं झाली. २१
गळां घातला हार फुलांचा व्हावा जैसा व्याळ
चांदण्यांत मस्तकीं पडावा कीं आगीचा लोळ. २२
तशी तिची जाहली अवस्था—न सुचे तिजला हाय !
कोसळलें आकाश तिच्यावर, रडे मोकलुनि धाय. २३
कुंतल तोडी, कपाळ फोडी, करी थोर आकांत
कांताविरह तो नव्हे, गमे तिज, सर्वस्वाचा घात. २४
अंकीं घेई नाथाचें शिर, अश्रुजलें त्या न्हाणी
फुटणें नाहीं जीव मृताला किती घालितां पाणी. २५
शव न द्रवलें नवल न, विरले नाहींत जयें जीव
लटकें ह्मणती स्फुंदन रोदन, करुणा न तिची कीव. २६

धनलोभास्तव, ह्मणती, केला हिनें प्रियाचा घात
जिरवूं पाही दुष्ट कृत्य तें करून ही आकांत. २७
न्यायदृष्टिनें दोषी ठरली—अपराध तसा दंड
पडे स्मशानीं होऊन स्तनयुगलनासिका खंड. २८

आप्त, इष्टजन, दासदासिगण धनानुगामी सारे
मोहर झडतां आम्रतरूवर कवण पांखरूं थारे. २९
बहुत परिजनांवरी चालवी जी अप्रतिहत सत्ता
एकलीच बापडी स्मशानीं पडली वासवदत्ता. ३०
भू शय्या, भुज उशी, ओढणी वातावरण उदास
स्फुंदन कालक्रमण, चितांचा प्रेतांचा सहवास. ३१
स्वभावता मन असतें स्त्रीचें पुष्पासम सुकुमार
त्यांत जाहला असा त्यावरी दुःखाचा भडिमार. ३२
अधिकच तें अलवार जाहलें—नवस करी मरणास;
परी थरर कांपवी तयाला सहज निघाला श्वास. ३३

जंबूक हुकी करिती प्रेतें स्वच्छंदें उकरीत
घूत्कारें दशदिशा घुमविती विक्राळ दिवाभीत. ३४
पाचोळा तरुतळीं सळसळे गमनानें उरगांचे
झंझावातें अग्नि चितांचा गर्जना करी, नाचे. ३५
नाद भयंकर असे स्मशानीं कांपवितील भयाला !
कां न त्यामुळें सुकून जावी दुःखी अबला बाला ? ३६
वाटे प्रेतें गर्जत आलीं करावयाला ग्रास.
कोरड पडली. धडकी भरली. गुंतत चाले श्वास. ३७
चितावे त्यापरी कल्पना पुढें आणितें चित्र.

साच पातलें जवळ, वाटलें तिजला, भूत विचित्र. ३८
जीव नकोसा झाला, तरि तो त्यागवे न कोणाही.
विटली जीवा मरणभयानें रडली धायींधायीं. ३९
पिशाच दृष्टीआड कराया घट्ट मिटी नयनातें
तळहातें झांकिलें; चिन्ह तरि अदृश्य होई ना तें. ४०
" हाय संकटीं पडलें बुडतें मरतें देवा ! तारीं.
कोण तुझ्याविण जगीं दयाळा ! दीनांचा कैवारी ? ४१
निरपराध मी ठावें तुजला कण्हतें मरणद्वारीं.
घात पातकी करून उलटा विहरे सौख्यागारीं ! ४२
न्यायमूर्ति तूं स्वता ह्मणविसी सत्याचा अभिमानी
तव राज्यीं खल हसती; न खळे सज्जननयनीं पाणी. ४३
कशी अशानें चालेल जगीं तुवां लाविली रीत ?
सत्याची गत व्हावी कैशी ? कशी टिकावी नीत ? ४४
निरपराध मी मरतें—मेले—किती पुढें मरतील !
कसा भरंवसा मग अस्तित्वीं तुझ्या लोक धरितील ? " ४५

निखंदून यापरी प्रभूला, बघे नेत्र उघडून--
चिन्ह जसेंच्या तसें दिसे तें बसलें जणूं अडून ! ४६
भूत ह्मणावें तरी करी ना माझा हें कां अंत ?
अंत कोठवर बघे असेलच अवतरला भगवंत ? ४७
" आला समजूं पिशाच आपण घडी भराया माझी ?
दीनेस्तव कीं प्रगट जाहला करुणाघन देवाजी ? " ४८

" मजकरवीं भूतपदापुरता घडला न दुराचार.
लालसा, परी देवपणाचा पतितास न अधिकार. ४९

सामान्य कुलीं जन्म पावलों मी मानव उपगुप्त.
संसाराच्या घोरवादळीं नसतों परी सुषुप्त. ५०

बुद्धगुरूच्या कृपाप्रसादें झालों गणिके, जागा
जगावेगळी, कळलें, जीवां असे मिळविणें जागा. ५१

उदर पुढें हें, परी लागलें आहे सकलापाठीं
जुलमी राजा असह्य; त्याहुनि उदररीति उरफाटी ! ५२

अनयशील नृप करें आकळी मात्र जन व्यवहारी.
विरक्त योग्यांवरही सत्ता उदर करी कांतारीं ! ५३

मी पामर मग उघडच आहें पात्र उदरकरभारा;
माजवून ठेविला नसे परि मीं त्याचा देव्हारा. ५४

यास्तव मजला कधीं करावा लागे ना अपहार.
कामाचा तो काय, मिळविला कपटानें जो हार. ५५

वणिग् वृत्तिनें उपजीवन मम, परि न आचरण खोटें
दीनांस पदीं तुडवून नको मजला होणें मोठें. ५६

मिळेल त्यावर तुष्ट राहतों विलीन भगवन्नामीं
पडेल अंतीं तेंच, न ऐहिक धनदौलत, मज कामीं. ५७

स्मरत असेल, तुवां दर्शविली मम भेटीची आस
क्षमा करावी, केलें तुज मी त्या समयास निराश. ५८

श्वानासम तुजपुढें नाचले जन त्रिभवीं असतील.
मी न त्यांतला; गणिके ! संकटसेवा हें मम शील. ५९

आलों आतां; सेवेस तुझ्या सादर केला काय.
संकोच त्यज; सांग, करावी तुझी चाकरी काय. " ६०

" गोड बोल हे त्या समयीं मीं धरिले असते माथीं.
मरणानंतर अधरीं धरिली व्यर्थ सुधेची वाटी. ६१

खिडकींत उभी असतां पाहत निज रमणाची वाट
मदनमनोरम मूर्ति आपली आली दृष्टिपथांत. ६२
मंद मंद टाकीत पाउलें होतां मार्गीं जात.
रोंवीत जणूं ध्वज मदनाचे तरुणींच्या हृदयांत. ६३
जलौघ वाहे सभोंवतीची काय वनश्री त्यास ?
तशी दृष्टि आपली न पाहे तरुणीभृकुटिविलास. ६४
अक्ष अचल राहून फिरवितो चक्रास सभोंवार;
स्वता न ढळतां तसें झुरविलें मीं बहुतां साचार. ६५
दृष्टीं पडतां रूप आपलें हरला तो अभिमान.
शरण रिघालें हृदय; आपणापुढें वांकली मान. ६६
वरून मीं फेंकिलें, कराया खूण, पुष्प आरक्त
पुष्प नव्हे तें, प्रणयलेख तो वा हृदयच अनुरक्त. ६७
न कळत गमतें, पडे आपला पुष्पावर त्या पाय.
हाय ! केवढा तेणें बसला मम हृदयावर घाय. ६८
हृदय तळमळे तरी न माझी दृष्टि आपणा सोडी
गेलां. झालां आड. तिला तरि त्याच दिशेची गोडी. ६९
अशनीं, शयनीं मज दिनरजनीं आपला निदिध्यास
अखंड चिंतन, घडेल कैसा मला सुखद सहवास. ७०
लज्जा हरली. भीति निमाली. झालें अगदीं धीट.
मदन काय कराविणार नाहीं स्त्रीकरवीं विपरीत ? ७१
पुष्पहार घाडून बाहिलें आपणास बहुमानें.
आपण अव्हेरिलें; हिरकणी त्यजिली अज्ञानानें. ७२
आली चालून घरा लक्ष्मी दिधली तिजला पाठ
परत फिरविलें स्वयें आंगणीं आलें अमृत वहात. ७३
येतां जर त्या समयीं नव्हती आपल्या सुखा जोड.

प्रीतिबलानें केली असती भू स्वर्गाहुनि गोड. ७४
तारुण्याचा भर मम अंगीं; ओसंडे लावण्य.
सहवासीं मम तुछ वाटते विषय आपणा अन्य. ७५
अनुरक्तस्त्रीसहवासीं सुख न तें सुरेशपदांत
विश्वामित्रें व्यर्थ मारिली काय तपाला लाथ ? ७६
नव्हती सदनीं द्रव्यसंपदासुखास कांहीं वाण.
आपणांस पुष्पांत ठेवितें मानून स्वप्राण. ७७
उरलें आतां काय ? जाहली ऐश्वर्याची होळी.
आशाप्रेत धरून उराशीं अश्रु येथ मी ढाळी. ७८
क्षणोक्षणीं वाटतें विझाया आयुर्दीपक लागे.
यमपाश गळां पडले. निर्दय दूत लागले मागें. ” ७९

“ ह्मणून आलों आतां गणिके, तुजला साह्य कराया.
अज्ञानाच्या पंकीं रुतली धेनू उद्धाराया. ८०
हेतु तुझा, प्याला विषयाचा लावावा मम ओठीं
परि तुज कळलें नाहीं यौवन–रूप–संपदा खोटी ८१
पडलों असतों तेव्हां जर मी तुझ्या मोहपाशांत,
येता कोण तुला दावाया या अंधारीं वाट ? ८२
तूं पतिता, मी पतित जाहलों असतों तव संगानें.
बसतें कंठीं अढळ भवाचें माझ्याही रडगाणें. ८३
दृढ करपाशीं धरिलें ज्यांना गणिके त्वां हृदयाशीं,
जिवलग ते तव आहेत कुठें ? कवण आज तुजपाशीं ? ८४
यौवन चंचल, चंचल जैसा असतो संध्याराग.
कसा टिकावा चांचल्यावर केलेला अनुराग ? ८५
विकसितकलिकारस चाखाया होय अलींची दाटी.

कोमजतां ती परी बिचारी एकही न तिज साथी. ८६

सुंदरपणही भ्रम नयनाचा; मूढ समज हृदयाची !
देशोदेशीं भिन्न कल्पना प्रचरे सौंदर्याची. ८७
परी समज सामान्य–हसतमुख; विशाल काळे डोळे;
सप्रमाण रचिले मांसाचे अस्थिपंजरीं गोळे. ८८
आच्छादन त्यावरती केलें चर्म गौर, सकुमार;
अधरीं लाली, गुलाब गालीं, शिरीं कृष्ण कचभार. ८९
परिसीमा ही लावण्याची; तया भुलावें काय ?
साच मृत्तिकापिंड ह्मणविला कोमल सुंदर काय ! ९०
गर्भीं नरकीं काल कंठिला अज्ञानें नवमास.
दुजा नरक आदरिती ज्ञानी बघून गोंडस मांस ! ९१
अमृत नांव देऊन सेविती अधरीं भरली लाला.
रीत जगाची "सोन्या" ह्मणणें प्रिय विद्रूप मुलाला ! ९२

आणि संपदा काय ? वेसवा फिरणारी बाजारीं !
बऱ्या त्या तरी; नसती इतुक्या मूढ, अंध, अविचारी. ९३
त्यांतही निघे वसंतसेना* गुणलुब्धा एकादी.
परी संपदा मूर्ख, दुर्गुणी जनां मात्र आराधी. ९४
परवा न तिची ज्यांस, उधळिती जे तिजला लाथांनीं,
त्यावर ही चामरें ढाळिते गात यशाचीं गाणीं. ९५
आपली जिला समजून मनीं राहिलीस तूं धुंद
कामीं आली काय शेवटीं ती तुजला स्वच्छंद ! ९६
यौवन सरलें. स्वरूप विरलें. दिला धनानें गोता.

* ह्या दाखला देतांना कांहीं कालातिक्रम घडला असल्यास रसिक क्षमा करोत.

पडून मोहीं ज्यांच्या झाला तुझा सर्वथा तोटा. ९७
विसरलीस गणिके ! शाश्वत तूं भुलुनी अशाश्वताला.
फेकून सुधा वदनीं धरिला भ्रमें विषाचा प्याला. ९८
गेलें जावो; उरलें थोडें आयु सार्थकीं लाव.
स्मर करुणेश्वर; तोच स्वपदीं देईल तुला ठाव. ९९
दुर्विकारविष हृदयीं भरलें अश्रुमिषें तें काढीं.
सुविचाराची आतां घालीं हृदया दृढतर आढी. १००
पश्चात्तापें पापें जळती; निर्मल होय स्वांत.
सहज मिळे फल त्याचें सद्गति पतितातें निभ्रांत " १०१

उपदेशें ज्या, वदती ज्ञाते, झाला गणिकोद्धार,
सादर केलें त्याचें रसिका गोड गमो हें सार. १०२

विनायक.

---

## *कविमित्रास पत्र.

श्लोक.

बा ! पारखा ! प्रकट जें तत्र होय वृत्त
या आजच्या प्रकृतिसुंदर केसरींत
वाचूनिया खळखळां मज ये रडाया
वाटे क्षणैक जणुं निश्चळ होय काया १
हातांतुनी गळुनि केसरि भूतळाला
गांठीतसे परि कळे न मुळीं मनाला

---

* कवीनें हें पत्र नासिक येथील कविमित्र बळवंत खंडूजी पारख हल्ली परलोकवासी आहेत. त्यास पाठविलें होतें. हें पत्र मागेंच प्रसिद्ध व्हावयाचें, परंतु कांहीं अडचणीमुळें त्यावेळीं प्रसिद्ध झालें नाहीं. १ केसरी वर्तमानपत्रांत.

माझ्या मना असुखवेग असह्य होय
शोकें गमे हृदय काय उलून जाय २

इच्छा नव्हे पळ तया उचलावयाला
त्याणेंच काय गमलें अपराध केला !
तो बापडा कथितसे मज सत्य वृत्त
त्याचा नसे अणुभरी अपराध त्यांत ३

पत्रांतलीं परिसुनी करुणार्द्र वाणी
ये पारखा ! खळखळां नयनांस पाणी
नाहीं मुळीं नवल यांत तुझी कहाणी
वाटे मला द्रव कठोर शिळेस आणी ४

लाधूनिया विनयशील सुतांस चार
कैसें तयांस मुकणें न चुरील ऊर
मित्रा असा निजमनीं करितां विचार
ती दुःस्थिती तव मला भिववी अपार ५

वैशाखमासिं मम दोन अशींच बाळें
नेलीं बरें उचलुनी महिन्यांत काळें !
संबोधितों निज मना तरि तें मधून
जातें उगाच असुखें अगदीं गळून ! ६

नाहीं तयाप्रति उपाय कळे मला हें
चित्तीं विचार करुनी असुखास साहें
तो शोक दुःसह तरी निजसंततीचा
केव्हां विवेक पळवी स्वबळें मनींचा ! ७

हा केवढा तुजवरी अनिवार घाला
दुःखास पार न दिसे तव बा ! मनाला

धैर्या धरून परि पाठ दिलीस त्याला
हें योग्य जाण तुझियासम जाणत्याला ८

येऊं नये तुजवरी परि वेळ आला
वाटेल ईश्वर तुला मनिं रुष्ट झाला
त्याचे न हेतु कळती परि आपणांला
वाटे मला उतरलासि पुरा कसाला ९

ठेवील देव जगतांत तसें रहावें
कष्टी मनांत अपुल्या अगदीं न व्हावें
त्याच्या पवित्र चरणांस मनीं धरावें
धन्यत्व नित्य जगतांत गुणें वरावें १०

पापी स्वतांस समजे न उगाच बापा !
देतात हे विषय ऐहिक नित्य तापा
सारेंच चंचल असे जगतांत जाणें
एकास आज दुसऱ्यास उद्यांहि जाणें ११

तो केसरी करितसे परि गर्जनेतें
द्यावा तुवां समजुनी बहु मान तीतें
कर्तव्यकर्म अपुलें नियमें कराया
राहूं नको तुजसिं हें न लगे कथाया १२

मित्रा ! तुला अधिक मी कथणार काय
टाकीं विवेक धरुनी बुजवूनि घाय
उद्विग्नता न सहसा स्वमनीं धरावी
संसार सार करुनी वरता वरावी १३

बा ! पारखा ! निजमनीं न उदास व्हावें
तो पारखा न समजेल तुला स्वभावें

जो चालवी अखिल हें जग विक्रमानें
तो काय बा ! तव गती हृदयीं न जाणे ! १४

वाणी दिली प्रभुवरें तुजलागिं गोड
आहे तुझ्याजवळ सत्सहवासजोड
वाणीस तूं सतत देशहितास जोड
गा ईश्वरास बरवी मनिं मान तोड १५

जे पातली स्थिति तिला मनिं मान गोड
जो मोह नित्य रडवी खळ त्यास सोड
चित्तांतला झटुनि संशयवृक्ष तोड
अन्तीं अचिंत्य परमेशपदास जोड १६

माझा असे न अधिकार तुला कथाया
मित्रत्व सिद्ध करितें मजला लिहाया
ओळी अशा कळविल्या तुजलागिं चार
प्रेमें धरीं करिं जरी असल्या असार ! १७

मोरो गणेश लोंढे.

## नागपंचमी.

पद.

चाल– " विभव स्वकरें देईन झुगारुन सारे "

मजसि न कळे–मी अथवा हे जन चुकले– धृ०

प्रपंच मोठा आपलपोटा
परमार्थाचा पथ वा खोटा
पडलें मज गूढ न उकले. १

मिथ्या का जो प्रपंच भासे ?
परमार्थास्तव मात्र उसासे.
टाकून जीव हे सुकले. २

प्रपंचावरी जग आधारे
भासरूप परमार्थ विचारें
स्वहिताला नादीं मुकले. ३

मी, माझें पण असतें हरलें
" विश्वच घर " जर हृदयीं ठरलें
असतें का जग मग टिकलें ? ४

मी–पण ज्यांच्या हृदयीं बाणे
तेच जगाचे बनले राणे
श्री–विभव त्यांकडे झुकलें. ५

परमार्थाच्या पडले पाशीं,
फिरती दारोदार उपाशी;
अश्रुपूर नयनीं न खळे. ६

शत्रु, मित्र समजून, उराशीं
धरिले, ते वमले विषराशी
विष अमृत--तरूवर पिकलें. ७

नागपंचमी सण तरि करिती
आत्मविनाश बळें आदरिती
समजून समंजस चकले. ८

———————

विनायक.

## सतारीस.

### श्लोक.

प्रियतम असती तूं रम्य माझे सतारी !
विरहित हृदयाला होसि आनंदकारी.
मधुर रव तुझे हे दुःख गे शांतवीती,
नयन हळुच माझे बाष्पतोयें भरीती. १

रुसुन मजवरी ती झोंप जाई पळून
न कळत रजनीला घालवीसी ह्मणून.
विगलित गति होई जेधवां दुर्दिनाची,
त्वरित चपलता तूं देसि त्याला विजेची. २

परिसुनि तव जेव्हां बोबडे बोल सारे
वदत मजसि होते—" फेंक ही दूर बा ! रे !
कटु किति रव आहे ! त्रास देई किती हीं !
सुखकर तुजला ही जाण होणार नाहीं. " ३

क्षणभर नच माझें लक्ष्य गेलें प्रलापीं;
प्रथम तुजसि गाणीं दाविलीं फार सोपीं.
श्रवण जरि करीं मी गान सानंद आतां
अमरपुरपलांचा वाटतो भास चित्ता. ४

वन उपवन होई गे ! तुझ्या संगतीनें;
तव विरह करी गे भव्य गेहांस रानें.
स्वजन, कनक किंवा मित्र गेले त्यजोनी
स्मित तव रव आणी मन्मुखीं आळवोनी. ५

जनन सहज देई वैभवातें नृपाला;
क्षणभर नच पाही त्याचिया लक्षणांला.

अचतुर नर घेई जन्मतां स्थान मोठें
परि तुज वदवाया मूर्ख ना शक्य कोठें. ६

अनल उदक टाकी प्राशनें आटवोनी
करि नरवपुरक्षा दिव्य जिव्हांकुरांनीं
परि तव शुभ तारा अग्नि जो फेंकताती
नयनिं उदक आणी श्री भरी वीरचित्तीं ७

गतविभव अशा या बापुड्या आर्यभूचें
निशिदिनिं सखये गे गीत गाई स्ववाचे.
मग मम हृदयाच्या उच्चभागीं पडोनी,
मिसळ निधनकालीं श्वास माझा स्वगानीं. ८

——————— पांडुरंग बाळकृष्ण दडकर.

## सुभाषित.

### श्लोक.

लक्ष्मीचा उपयोग दान करणें, विद्याहि पुण्यार्जना,
ब्रह्मीं लक्ष जडावयास्तव सदा चिंता असावी मना,
जेणें होय परोपकार बरवा ऐसें मुखीं भाषण;
हें ज्याचें व्रत धन्य सज्जनचि तो भूदेवताभूषण. १

दाता देवविता न होयचि, तसा दाता दुजा होइ ना,
देई देववि तो मुखें मधुरशा वाणीस उच्चारि ना,
देणें, देवविणें, सदुक्ति वदणें, हे सर्वही सद्गुण—
ज्यामाजी वसतात निश्चित असा तो एक पैं सज्जन. २

———————— भृंग.

# काव्यरत्नावलि.

## अंक ९ वा.

### वीरमती.

**कथासूत्र**– औरंगजेबाचा प्रसिद्ध मांडलिक जोधपूरचा राणा जसवंतसिंग हा एकदां समरास पाठ दाखवून माघारा फिरला. क्षात्रश्रीदास कलंक लावणारें त्याचें तें कृत्य अर्थातच त्याच्या मानी स्त्रीस खपलें नाहीं. तिनें त्याबद्दल त्याचा मोठा धिक्कार केला. त्याचें वर्णन या कवितेंत, खपेल तेवढीच पदरची भर घालून, केलें आहे. अशा प्रसिद्ध वीरस्त्रीच्या नांवाबद्दल इतिहास मुग्ध आहे, हें मोठें नवल होय. " रूपनगरची राजकन्या " या कादंबरींत ती चंपावती या नांवानें झळकते. वीरबाला या गुजराथी नाटकांत ती महादेवी होऊन आली आहे. असा मोठा मतभेद दिसतो. या कवितेंत तिला तिसरेंच नांव दिलें आहे. पण तें तिच्या स्वभावाचें द्योतक. अर्थात विशेष अन्वर्थक होईलसें वाटतें.

आर्या.

त्या रात्रीं जसवंता घडलें इच्छा नसून जागरण
निद्रा न ये तयाला मिटून धरिले जरी तयें नयन. १
मोहून बाह्यरूपा राजश्री आणिली गृहीं ज्यानें.
साच तयें हृत्प्रांतीं चिंतेचें अढळ बसविलें ठाणें. २
राजमुकुट कनकाचा त्यावरती जडविले अमोल हिरे;
परि आंत कंटकांनीं खचिला जे पाडिती शिरास घरे. ३
चंड किरण मार्तंडासम ज्याचे हालवी जगा सकल,
तो राजदंड काल व्याल, स्वरदें करी नृपा विकल. ४

सिंहासन भूपाचें मृदुल परांचें असें दुरून दिसे
त्यावर बसे फसे तो, युक्त विषें झोंबती तयास कुसें. ५
परि या न उपाधींनीं विन्मुख निद्रेस जाहला नृपती.
सुख होय आंगवळणीं पडलेलें दुःख जाणते जगती. ६
होती नवीच त्याच्या हृदयाला आज काळजी जडली.
चिंता वैरीण तिची सन्निध पाहून झोंप अवघडली. ७
निद्रेचीं उपकरणें होतीं जोडून हात सिद्ध तिथें.
परि तीं निष्फल ठरलीं. चिंतामग्नास सौख्यही रुततें. ८
चंद्रकरें न्हालेल्या गच्चीवर उंच मंचकीं शयनीं
भूपाजवळ पहुडली होती सर्वांगसुंदरा रमणी. ९
वर मंडप वेलींचा वायूची डोलवी जया लहरी;
शय्येवरी फुलांची वृष्टि करी; गंध दशदिशा पसरी. १०
रजनी षण्मासाची ऱ्हस्वच कोणासही तदा गमती
परि दुर्दैव, पळेंही जसवंता भावलीं युगासम तीं. ११
शयनावरी तळमळे, फिरवी कर मस्तकावरी डावा
ढाल करून कराची चिंतेच्या चुकवितो जणूं घावां. १२
उजवा हात तयाचा स्वस्त्रीच्या आडला उशाखालीं
न तरी त्यानेंही तो शिर निज आच्छादिता तया कालीं. १३
परि झोंपमोड तीची विचार सहवे न त्यास हा नुसता.
हातच काय, तयानें तिजकरितां प्राण खरचिला असता १४
प्राणप्रिय दयितेला त्या अंतरणार आज तो होता.
त्याच विचारें त्याच्या हृदयाला पीळ चढविला मोठा. १५
शतदां अतृप्त नयनीं असेल बसला तिला न्यहाळीत.
परि तिजकडे वळाया आज बहुत होय तो भयाभीत ! १६
ती रात्र कंठिता तो पडून अवघडत मंचकीं तैसे.

परि नाद दुंदुभीचा हृदयीं वज्रप्रहारसा बैसे. १७
युक्ति करून तयानें सोडविला, हात गुंतला, अधर;
तों नखशिखान्त दिसली निजदयितामूर्ति त्यास रम्यतर. १८
कुंतलल्कारमंडित भालावर घर्मबिंदु चमचमती.
इंदुकरें रंगविले सर मोत्यांचेच गुंफिले गमती. १९
झालें अंकित सावज; यास्तव जणुं मदन पारधी स्वकरीं
तूणीर नयन झांकी, भ्रूधनुशीं स्वगुण चढविला उतरी. २०
श्वास सुगंधित वाहे. घर्म उठे रंजित स्मितें गालीं
ताजी गुलाबकलिका, विलसे ती, दहिंवरें जशी न्हाली. २१
पवनें पदर सरकला. प्रकट तिचा होय रम्य हृत्प्रांत
दर्शन करील ज्याचें योग्याचेंही मनास विभ्रांत. २२
टक तिजकडेस लावी; न तयाची पापणी ढळे–हाले.
भूपास तोडवेना मोहानें दाट पसरिलें जाळें. २३
निजला, उठून बसला, हसला, रडला, पुनःपुन्हा नृपती
आंदोलीं मन पडलें करवी देहाकडून तीच कृती. २४

“ राज्य कशाला व्हावें ज्यासाठीं माजती जगांत रणें,
करणें दूर प्रियजन, झुरून विरहांत शेवटीं मरणें ? २५
येतों गरिबा पोटीं जावें का आज लागतें समरीं
वरितों उटजीं स्त्रीसह सुख, अनुभविलें नसेल जें अमरीं. ” २६
केला खेद असा तरि नव्हतें जाणें तयास चुकणार
यास्तव तेणें केला निघावयाचा मनांत निर्धार. २७
दृढ एकदा धरावी स्वसखीला आवळून हृदयाशीं
एकच चुंबन घ्यावें ह्मणून तो लगटला तिच्यापाशीं. २८
कंठांत मिठी घाली; अधरामृतपान तो करूं लागे.

किति वेळ असा गेला, त्याची न तथापि ती तृषा भागे. २९
कर चंद्रें आंखडिले, रजनीरमणीस लोटिलें दूर.
भरला उतरे न परी मोहाचा भूपलोचनीं धूर. ३०
दुंदुभिरवें उठविली सारी सेना जमे ध्वजाजवळी.
परि भूप बाहुपाशीं प्रियदयितेला पुनःपुन्हा कवळी ! ३१

जागी झाली शयनीं; सस्मित वदनें परी न वीरमती
प्रतिदान पतिकृतीचें करावया विषयलीन वा स्वमती. ३२
लोचन धुंद जहाले, विषयभरानें नव्हे, प्रबल रागें
आली लाली गालीं चढूनिया रक्त वर, न अनुरागें. ३३
नव्हते खंडित व्हाया स्फुरत अधर, मर्मभेदनास परी
न उडे हृदय जुळाया; त्वेषाच्या त्यांत उसळती लहरी. ३४
नव्हता अप्रिय तिजला कांतसमागम तथापि ती वेळ
योग्य नसे प्रेमाचे ते खेळायास लाडके खेळ. ३५

क्षत्रियधर्म—निर्घावें समरा सांडून वाढलें ताट
अव्हेरून प्रेमें वा स्त्रीनें घातला गळां हात. ३६
त्यास स्वपति विसरला; पित्त तिचें फार भडकलें तेणें
तें क्षात्रतेज उज्ज्वल गृहधनरतिसुख रणापुढें नेणें. ३७
" गेलां असाल समरा रात्रीं समजून शांत मी निजलें;
थिजलें बघून तूह्मा उजाडतां विषयसेवना सजले. ३८
स्त्रीसह पडून शयनीं, अंकीं घेऊन वा मुलें तान्हीं,
नृपपद काय मिळविलें तुमच्या प्रिय, पूज्य, शूर पितरांनीं ? ३९
मृत्युमुखीं विचरावें, रगडावे बाण संगरीं दांतीं,
तलवारीचें पाणी प्यावें ये राज्य तेधवां हातीं. ४०

जें आयतें मिळालें त्याचा करवे न काय सांभाळ ?
संसार मग कशाला ? बरवी घ्यावी करांत जपमाळ. ४१
कैसे विलास सुचती शत्रूंनीं देश वेढितां सारा ?
काय दिसे न तुह्मास्तव रिपुंनीं उघडून ठेविली कारा ? ४२
रणदेवी सुयशाची अर्पण वीरास ज्या करी कंठी,
आह्मी क्षत्रियबाला मिठी तयाच्याच घालितों कंठीं. ४३
जा समरीं; फडकूं द्या स्वयशाचा अरिवरी जरीपटका;
जन्मांत न ये कोणा ही सोन्याची पुनःपुन्हा घटका. ४४
तुमच्या जर रणगमना मी दुर्भाग्या असेन आडथळा
पडतें मरून चरणीं, करून देतें तुह्मास मार्ग खुला." ४५

यापरि निखंदिला नृप गेला सहकटक संगरीं तडक.
परि मन घरींच ठेवी जरि दयिताशब्द झोंबले कडक. ४६
केली समरीं त्यानें लगट; परी सर्व होय वायफळ
मन विरहित कायेचे कष्ट वृथा, पावतील काय फळ ? ४७
बल त्याचें बहु खचलें. उरलें दल लागलें पळायाला.
आला भूपावरही कालाचा उघड तेधवां घाला. ४८
येतां मरण कशाची दिसते रमणी करी विचार मनीं;
मुख अपयशें मळालें घेऊन निघे घरास वीरमणी. ४९

पतिरणविन्मुखतेची दुर्वार्ता आयकून वीरमती
रागेजे; त्याविषयीं होय तिची तेधवां विषण्ण मती. ५०
मान्य न वीरमतीला अयशाचें मळमळीत सौभाग्य.
येते वैधव्य यशें तिज गमतें साच उघाडिलें भाग्य. ५१
करिती गजर जयाचा, जर नाथ तिचा रणीं लढत मरता

परि तापद होय तिला वार्ता जीवंत तो फिरे परता. ५२
समरास पुरुष भ्याला सत्य तयें स्वयश मिळविलें धवल
मुख झालें तें काळें दूर बरें; अशुभ मज नको जवळ. ५३
चिंतून मनीं ऐसें शीघ्र तिनें बंद करविली वेस
पाठविला जसवंता दूताकरवीं सखेद संदेश. ५४

" नृपवंश उदेपुरचा सूर्योद्भव गाजते जगीं ख्याती.
ध्याती तयास सारे. तद्यश कवनीं घरोघरीं गाती. ५५
वीर पराक्रमशाली किती उदेले तयांत आजवरी,
गणती करवे कोणा ? कवण तयांचा रणांत हात धरी ? ५६
समरव्रत जागविलें घेऊन शिरें करांत आमरण
कर्तव्य वाटलें त्या वीरां कुलकीर्तिरक्षणीं मरण. ५७

गोष्ट असो पुरुषांची, समराचें सहज त्यांजला कृत्य.
त्यासाठीं त्या घडिलें, दिधलें तैसेंच त्यांस सामर्थ्य. ५८
परि तनु कोमल ज्यांची जातिलतेवर जसें हसे सुमन
सुमन प्रेमल ज्याचें लव ताप सहावया असे क्षम न. ५९
शौर्य रणीं गाजविलें ऐशा सकुमार सदय अबलांनी
पुरुषां स्फुरण चढविलें स्वकुलाची राखिली जगीं बाणी. ६०

त्या वीरकुलीं वीरोत्पन्ना मी नम्र आपली दासी
प्रेमें वीरांबेनें मज वाढविलें धरून हृदयाशीं. ६१
खेळ धनुर्बाणाचे शिकवी मज वीर बंधुची जोडी
साहसपराक्रमाची बालपणीं लागली मला गोडी ६२
वीरपती मिळवावा होता निर्धार हा मनीं केला

प्रेमें तुह्मास वरितां तो पण सिद्धीस वाटलें गेला. ६३
हर ! हर ! परि मी फसलें—ढांसळलें सर्व मम मनोराज्य
धरिला गुलाबभावें निज हृदयीं कर्णिकार मीं त्याज्य. ६४
वीर ह्मणून जयाच्या अंकीं निर्धास्त झोंप मी घ्यावी
वीर नव्हे, पुरुष नव्हे, जो दुर्बल भीरुता रणीं दावी. ६५
अबलाच ती ह्मणावी; पुरुषाचा मात्र घेतला साज
ओष्टीं का मिरवावी मिशी तिची राखवे न जर लाज. ६६
जन्मून वृथा जगतीं धरणीला मात्र जाहलां भार
स्वकरीं धरून निष्फळ विटाळिली विजयपात्र तलवार. ६७
काय जिणें जर न घडे करणी तुकवी जियेस जग मान
तो वांचला ह्मणावा ज्या देती सान थोर जन मान. ६८
अपमानाचें जीवित ! मरण बरें फार फार त्याहून
मान नव्हे प्राण तुह्मी आलां समरांत आज वाहून. ६९
प्राण प्राणास रुचे; दिसतें बाह्यस्वरूप आवडतें
जातां प्राण; नकोसें होय न कां रम्य रूप आवडतें ? ७०
विगतप्राणशरीर प्रेतच ! का आणितां घरां सांगा
प्रियकर शवही अशुभच गृहीं; स्मशानींच त्याजला जागा. ७१

नव्हतें तुह्मास; परि मीं तुमच्या क्षत्रियव्रतासही वरिलें
जगलां तुह्मी, परी मम सौभाग्य तया व्रतासवें सरलें. ७२
झालें विगतधवा मी; सहगमनच योग्य जी सती तिजला
त्या दुर्लभ पुण्याची करावया जोड जीव हा सजला. ७३
नेलें शव स्मशानीं जीवंत उठे कधीं कधीं ह्मणती.
गणती पिशाच परि तें, त्याचें जिवलगहि त्यास अवगणती. ७४
विगत क्षात्रव्रत तनु तुमची निर्जीव त्यापरी उठली

डोळांही न पहावी; तिज मग सहगमनपात्रता कुठली ! ७५
पतिशव न मिळे तेव्हां स्वपतीची करविती सती प्रतिमा.
सेव्य धनुर्बाण मला जी साची क्षत्रियव्रतप्रतिमा. ” ७६

संदेश मर्मभेदी हा, न बसे, पाठवून ती नुसती
क्षात्रव्रतास साजे ऐशी सहगमनसिद्ध होय सती. ७७
कवच तनूवर घाली; चढवी निजमस्तकीं शिरस्त्राण
क्षत्रियशीलप्रतिमा, दृढ हृदयाशीं धरी, धनुर्बाण. ७८
योग्यच शरधनुषासह सहगमना सिद्ध होय वीरसती
कीं शरधनुषाठायीं वीरांचे मूर्तिमंत गुण वसती. ७९
ठेवून पुढें छाती धनुष सदा काढितें रणीं वाट
गुण भंगला न तोंवर दावी न रिपूस तें कधीं पाठ. ८०
जीवांत जीव आहे तोंवर तें केवढा धरी ताठा
तो स्वाभिमान उज्ज्वल सुगुणांचा मानिला जगीं सांठा. ८१
अभिमान ज्या स्वताचा नाहीं, जो वांकवी भयें मान
कुलदेशधर्म यांचा राखील जगांत काय तो मान ! ८२
करिती परस्परांची नित्य धनुर्बाण संकटीं साथ
जे निजसंघबलानें शत्रूची फोडिती फळी दाट. ८३
सरल गमन सरळाचें, तिळहि नसे वांकडेपणा बाणीं
ढळवी न एकदा जी जडली एकाग्रदृष्टि संधानीं. ८४
जें अल्पसैन्य होतें नगरीं घेऊन संगतीं सर्व
धारातीर्थास निघे ती साधाया जणों महापर्व. ८५
मूर्तिमती वीरश्री जयघोष करीत चालली वाटे
कीं चपला गगनींची स्त्रीवेषें चमकली जगीं वाटे. ८६
कीं प्रलय निवाराया माजविला या जगांत जो असुरीं

वीरमतीच्या रूपें अवतरली आदिशक्ति ही दुसरी. ८७
ज्याचा स्वभावगुण जो नाहीं तो अधिक त्याजला साजे
प्रौढाच्या वचनांत न, सुभाषितीं माधुरी मुलाच्या जे. ८८
सौंदर्य यौवनानें शोभे, खुलवी तयास नरवेष,
आणी विशेष शोभा देहीं जो फडकला रणावेश. ८९
स्फुरते अचेतनाचे, तें वीरा रूप पाहतां, बाहू
सेना तिची कशी मग न ह्मणेल प्राण संगरीं वाहूं ? ९०
परि केवा काय तिचा, शत्रुदलाचा अफाट विस्तार
कामा न ये गजाला बद्ध कराया मृणाल सुकुमार. ९१
सिंहीण उडी घाली मत्त गजावर धरी न भीति मनीं
तैसी अल्प दलासह ती खलबलसागरीं पडे रमणी. ९२
नव्हते शत्रु असावध; घेरा तिजभोंवतीं दिला त्यांनीं
जैसा कळप वृकांचा हरिणीला एकल्या धरी रानीं. ९३
करिते बद्ध तिला रिपु; अथवा समरीं तिचा बळी पडता
परि सांवरून धरितो परमेश्वर पक्ष आपला पडता. ९४

व्याघ्र व्यथित जहाला मर्मावर बाण लागतां उलटे
धांवे शरानुरोधें माराया मर्मभेदकास झटे. ९५
स्त्रीसंदेशशरानें जसवंताच्या मना घरे पडले
मंदावलें असे जें वीर्य, नवें तेज त्याजला चढलें. ९६
स्वस्त्री समरीं गेली घेऊन स्वशिर आज तळहातीं
मग काय जगीं उरलें ? वांचायाचें वृथा कुणासाठीं ? ९७
समरपरित्यागानें धवलतरा कीर्ति जाहली काळी
प्रेम स्त्रीसह; गेलें उदासता राजवैभवा आली. ९८
उद्वेगून असा तो क्रुद्ध व्याघ्रापरी अरींत शिरे

वाताहत त्यांस करी खड्गें उडवुनि नभीं असंख्य शिरें. ९९
शौर्यें समजविली स्त्री होती तद्वीरुतेस जी विटली
नटली विजयश्रीनें, हृदयींची तेधवां गुढी सुटली. १००

अनुभव, जेत जिताचें युक्तिबलें क्षात्रतेज मालवती
निःस्वत्व जे तयाचीं सहजच जेतापुढें शिरें लवती. १०१
आलें न रजपुतांचें परि यवनां सर्व हरवितां पाणी
कारण **वीरमती**सम असती जागृत गृहीं स्त्रिया मानी. १०२

विनायक.

---

## तारातरंग.

श्लोक.

[ अच्युतं केशवं रामनारायणम्—या चालीवर. ]

माझिया लोचनानों! पहा हो पहा! । श्रीनिशा देविचा राष्ट्रविस्तार हा,
केवढा हा अवाढव्य भव्याऽकृति! । ईश्वराची किती ही अगम्या कृति! १
कृष्णरात्रीचिया कृष्ण पीठावरी । कृष्ण आकाश, हें कृष्ण छत्रापरी,
त्यांत कोट्यावधी तारकांचे हिरे । लाविले, ज्यामधीं दिव्य तेज स्फुरे. २
कृष्ण तें जीतुकें, शुभ्र हे तीतुके, । स्थूल तें जीतुकें, सूक्ष्म हे तीतुके,
अंबरें तारका शोभती सुंदर, । तारकांहीं दिसे शोभिवंतांबर, ३
ज्यांमधीं शांतसा कांतिचा संग्रह । दीसताहे, असे हे अनेक ग्रह,
अन्य–तारावली–केंद्र ह्या तारका । स्वप्रकाशें कशा हो मनोहारका! ४
चंड मार्तंडशा त्या प्रचंडा, तरी । भासती अल्पशा काजव्यांच्यापरी!
बाह्यरूपास पाहोनिया लोचनीं, । वस्तुचें वास्तव ज्ञान नोहें मनीं. ५
हे असंख्यातशा तारकावृंद हो! । काय हीं आमुचीं लोचनें अल्प हो!
वृंद हे तूमचे पाहतां पाहतां । होतसे त्यांजला भ्रांति की तत्वतां! ६

नीच धूळींतले जंतु जे मानवी, । त्यांस कैशी कळे तूमची थोरवी ?
ही असंख्यातता, ही अमर्यादता, । दिव्यता, भव्यता, नेणवे तत्वता ! ७
ज्ञान हें तूमचें व्हावया व्यक्तसें, । ज्ञानवंतापरी बुद्धि आह्मां नसे.
ती महा नीचशा तर्कटें गंजली, । क्षुद्र जात्या असे, मंद तैशी भली. ८
नम्रभावें तुह्मां वंदुनी, प्रार्थुनी, । तूमच्या प्रेक्षणें नेत्र हे तर्पुनी,
योजितों कल्पना मी तिथें संप्रति, । दृष्टिचीही जिथें कुंठताहे गति. ९
उंच उंच स्थलीं, फार उंच स्थलीं । मारुनी ती भरारी पहा चालली !
शैल तों लंघिले, वातही लंघिले, । तारकासंघही सर्व उल्लंघिले. १०
ये अतां ती तया पुण्यलोकाप्रति । तत्ववेत्ते परं--धाम ज्या बोलती,
बोलती ज्यास निर्वाण वा सन्मुनी, । उन्मनी पावती ज्याचिया चिंतनीं. ११
निर्मिला हा जगद्--व्यूह ज्या नायकें, । तेविं विश्वें असंख्यें अशीं मायिकें,
तो विराजे तिथें दिव्य सिंहासनीं । विश्वकर्मा समाधी महान् लावुनी. १२
सर्व तारांगणांतोनि देवांगना । दिव्यवीणांवरी बैसल्या गायना;
रम्य गंभीरसे तंतु ते वाजती, । भैरवीचे ध्वनी अंबरीं गुंगती. १३
आळवोनी अनंता जगत्--कारणा । वानिती अप्सरा त्या तयाच्या गुणां.
वाङ्मनातीत त्या निस्तुला, ईश्वरा, । पूर्ण वर्णूं ह्मणे कोणती हो गिरा ! १४
गा त्रिभो ! आमुचा नाथ तूं एकला, । सर्व सामर्थ्यवान्, सर्वसाक्षी, भला,
तूंच सर्वोत्तमा ! थोर सर्वांहुनी, । दीपलों वैभवातें तुझ्या पाहुनी ! १५
गूढ लीला तुझी मूढशा बालकां । जाणवे ना अह्मां गा जगच्चालका !
गोल एकैक हा अद्‌भुतांचा निधी, । ह्यापरी निर्मिले गोल कोट्यावधी ! १६
काय ही कल्पना ! काय कौशल्य हें ! । काय विस्तार हा ! काय गांभीर्य हें !
ह्याच तर्कांमधीं गर्क झाली मति । हे अगम्या ! असो तूजलागीं नति ! १७
ह्यापरी चालतां गान देवांगनीं । नाद विस्तारला तो दिगंतांतुनी;
जाय एका ग्रहाहूनि दूज्या ग्रहीं । ये रितीं संचरे तो ग्रहोपग्रहीं. १८
दूर--दूरस्थ नक्षत्रतारांतुनी । नादसंयोग तो राहिला गुंगुनी,

शेवटीं व्यापला सर्व दिव्यांगणीं, । लीन तेणें जगत् श्रीजगज्जीवनीं ! १९
नादसंयोग तो स्वर्ग लोकांतला । माझिया कर्णरंध्रीं गमे पातला,
सेवुनीया सुधातुल्य तन्माधुरी, । अंतरात्मा अहो ! नृत्य माझा करी ! २०
ह्यापुढें लोक हा व्यर्थ, निःसारसा । भासतो दग्ध चितानलानें जसा !
सौख्य होणार जें स्वर्गलोकीं मना । होय त्याची इथें अल्पशी कल्पना. २१
मानवांचें जिणें, मानवश्रेष्ठता, । कः पदार्थांवरी येथ झाली अतां !
ह्या प्रचंड–प्रभा--गोल--संख्येपुढें । सार्वभौमासही दैन्य ये रोकडें ! २२
हे परंज्योति ! हे सर्व सामर्थ्यवान् ! । वस्तुमात्रांत जो तूं सदा दृश्यमान्,
आदिहेतूहि जो भीमकर्मास या, । ये प्रभो ! त्या तुला काय माझी दया ?२३
सर्पटे भूतलीं दीन जंतूच हा । एकदाही तया तूं दयाळा, पहा !
गा पहाशील कां ? कां न तूं पाहसी ! । सार्थ संज्ञा तुला ‘ सर्वसाक्षी ’ अशी.२४
तूंत जें भूतवात्सल्य देवा, असे । ह्या नभासारिखें तेंहि निःसीमसें;
जेविं निःसीमसें, तेविं निःसंगसें, । राव कीं रंक, हा भेद त्यातें नसे. २५
तत्कृपा, लेशही हे कृपासागरा ! । स्वेच्छया तूंच देशील ह्या पामरा.
त्वत्प्रसाद–प्रभा लाभलीयावरी । दैववान् कीटही काय मौजा करी ! २६

अहो ! तत्वें सारीं असति किति हीं उन्नत तरी !
तयांसंगें जातां मन उडुनि उत्कर्ष–शिखरीं,
अहंभावाचें तें घनपटल त्याचें वितळतें;
द्युति ज्ञानार्काची मग सतत त्यातें उजळिते. २७
कळे नित्यानित्य त्वरित मद जावोनि विलया,
भयानें ईशाच्या मन धरितसे तें सुविनया,
नया उल्लंघाया कधिं नच धजे कीं, उपरमे
रमेशाच्यापायीं, भवविभव त्यातें भ्रम गमे. २८
वृथा संसारींच्या मृगसलिलशा सौख्यलहरी !
वृथा शृंगारांनीं तनु सजविणें ही वरिवरि !

वृथा सन्मानाचा प्रसर ! सगळे संभ्रम वृथा !
महत्वाकाक्षांही क्षणिक इहलोकांतिल वृथा ! २९

कळे हें सारेंही, तरि जडमती मी किति पहा !
रचाया काव्यातें जडित बसलों शब्दनिवहा;
सुखें निद्रा घेतां सकळ जन, मी काय शिणतों !
अहा ! विश्रांती जी हितकर फुका तीस मुकतों ! ३०

कृती माझी सारी सरसरमणीया उतरुनी,
मला संतोषानें वरिल कविकीर्ती बुधजनीं,
अशा आशापाशा-मधिं अडकुनी मी तडफडे,
यशःप्राप्ती ? तों ती विधिवश, घडे वा नहि घडे ! ३१

असे गंजीफांचे धडधडित वाडे वसवितां,
दंवाच्या बिंदूंचे नवलपरिचे हार करितां,
दिगंतीं धांवोनी रजनिकर-चेंडू कवळितां,
मनातें देहातें घडति परिताप श्रम वृथा ! ३२

अनाद्यंता ईशा ! बहु बहकतों मोहतिमिरीं;
मला सन्मार्गातें करुनि करुणा ने झडकरी !
मिळे शांती जेणें क्षितिस असतां आमरण ती
परंधामीं नामी तव निकट अक्षय्य वसती. ३३

किती हो तृष्णा ह्या विफल मरणाधीन मनुजां !
किती दीर्घोद्योग, प्रबलतर आशा तदनुजा !
परी, सारीं मिथ्या ! शिवशिव अहो मोहमय तीं
ठकाचीं कालाचीं अघटित भुतें की भुलविती ! ३४

चंद्रशेखर.

---

## सिद्धांतत्रयोदशी.*

साक्या.

विश्वनाथ गुरु वंदुनि, योजीं विश्वभयासि हराया
स्वानुभवें भयरहिता विमला बुद्धिवाणि माझ्या या. १
शिष्यवत्सवात्सल्यें ज्याच्या कृपाधेनुनें दिधलें
बोधदुग्ध, निर्गुणोपासनापात्रामधिं सांठविलें, २
श्रद्धाचुल्लीवर ठेवुनि तें कर्मकाष्ठकें खालीं
ज्ञानाग्नीनें जाळुनि त्याची ज्वाळा मोठी केली, ३
तापवुनि तिनें मधुर करुनि तें यथेच्छ पिउनी धालों,
योगानंदा चित्सुखकंदा वंदुनि त्या कृति झालों. ४
देह नव्हें मी; मलिन, जडहि हा, दर्शनविषय, विकारी,
रोगांचें घर, नाशहि पावे; मदन्य हा भ्रमकारी. ५
निर्मळ, निन्मय, अव्यक्तचि मी, विकार नाहीं मातें,
सुखमय, नित्यहि स्वसंवेद्य मी, पावें नच नाशातें. ६
क्षुधातृषादिक व्याकुल करिती ज्यातें ऐसा प्राण
नव्हेंचि; कीं मी विकारविरहित, निश्चल संतत जाण. ७
मनःहि वासनामय विषयांच्या संगेंची जें स्फुरतें
नसेंचि मी तें; कीं मज माझें स्फुरण दुजाविण होतें. ८
क्षणांत जन्मा नाशा पावे बुद्धि नव्हें हो मी ती;
कीं मज नाहीं आदिअंतही, अखंड माझी वसती. ९
अहंभावनायुक्त जीव जो भोक्ता भेदज्ञानी,

---

* हें आत्मनिर्णयपर स्तोत्र वामन नांवाच्या नुकत्याच होऊन गेलेल्या एका साधुपुरुषानें मूळ तेरा श्लोकांत संस्कृतांत रचिलें आहे. त्याचें हें भाषांतर आहे. हें स्तोत्र प्रस्तुत कवीचे रसिकमित्र कै० रामचंद्र विठ्ठल करंदीकर यांजकडून मिळालें. व हें भाषांतर त्यांच्यासाठीं करून त्यांसच अर्पण केलें आहे.

तोहि नव्हें; कीं भेदरहित मी अलिप्त सुखदु:खांनीं. १०
अहंकार आणि बुद्धी जेथें उपजे विलया जाई,
ज्यानें प्रेरित वारा वाही, व्यक्त जिथें मन होई. ११
रसनाघ्राणश्रवणादिक हीं ज्याच्या स्फुरणें स्फुरती,
तो मी सच्चित्सुखमय आहें सर्वांतरिं मम वसती. १२
" मी " शद्वानें बोधित जो तो इंद्रादिक अमरांत,
तसाच आहे मनुष्यराक्षसपशुपक्ष्यादिगणांत. १३
फार कशाला अनंतकोटी ब्रह्मांडांमधिं नाहीं
दुसरा माझ्याविण कोणीही, अनुभव ऐसा पाहीं. १४
मातीमध्यें उपजुनि तींतचि वाळिंबे वावरतीं,
तैसे सांबादिक मशकावधि जींत जिनें व्यवहरती, १५
ती चिच्छक्ती एकचि आत्मा मूळाधार जगाचा;
अद्वय तेंची ब्रह्म निरामय अचल विमल मी साचा. १६
मी आहें ही स्मृति ज्या अर्थीं माझी लुप्त न होई
तिन्ही त्रिकाळीं, सद्रूप खरा त्या अर्थीं मी होंई; १७
ज्ञानमय असें भान कधींही नच लोपे माझें हें
सुषुप्तिमध्येंही, त्या अर्थीं चिद्रूपाचि मी आहें; १८
माझी माझ्याठायीं प्रीती निरुपम अखंड राहे,
आनंदचि मी ह्मणुनि; असा सच्चिदानंद मी आहें. १९
स्वर्गनरक ते, मृत्यु, अमरता नाहीं हें मज कांहीं;
तैसें आत्मज्ञानहि अथवा देहबुद्धिही नाहीं. २०
पुण्यवान कीं पापी अथवा नाहीं शूद्र द्विजही;
जो मी जैसा नित्य तसाची; विकार मजला नाहीं. २१
ज्याच्या प्राप्तीसाठीं करिती श्रौतें कर्में सांग,
आत्मज्ञा तो स्वर्ग बापुडा सुखविल कैसा सांग. २२

अपुल्या ठायीं नित्य तुष्ट या त्या स्वर्गे द्यावें काय ?
वेदवाद हा भ्रमवी व्यर्थचि सकामलोकां हाय ! २३
कोणाला मी भजूं सुज्ञ हो ? कोण असे मद्भिन्न ?
मलाच मी जरि, पीठ दळुनिया काय होय निष्पन्न ? २४
काय जाणुं मी ? काय ऐकुं मी ? काय पाहुं मी सांगूं ?
वास कशाचा घेउं ? मजविणें काय कुणाशीं मागूं ? २५
संस्कार जसे घडले असती पूर्वजन्मकृतकर्मीं,
चित्त, इंद्रियें, प्राणादि, तसे चालुत अपुल्या धर्मीं. २६
देह पडो हा काशीमाजी किंवा घाणीमाजी,
नसेचि मजला त्याची परवा निःशंका धी माझी. २७
काष्ठीं अथवा भिंतीवरि वा पाषाणीं जें ठेलें,
पाउल तें भूवरीच; तैसें चिन्मय सर्वहि झालें. २८
नदी, पाट, आणि लाट, बुडबुडे, फेंस, भोंवरे, सारें
जलचि, जलनिधीहुनि न निराळें; पाहीं तूंचि विचारें. २९
तसेंच देहेंद्रियघटपट हें व्यक्तरूप विश्वाचें,
चित्समुद्र जो मी त्या माझ्याहुनि न भिन्न बा साचें. ३०
जें जें ऐकें घोष मला तो ‘ तत्त्वमसी ’ वाक्याचा;
बोलें जें जें जपमंत्रचि तो चित्सुखसद्ब्रह्माचा; ३१
जें जें करितों धर्म असे तो; ब्रह्मचि जें जें पाहीं;
जें जें चिंतीं तें तें ब्रह्मध्यान, दुजें मज नाहीं. ३२
सिद्धांतांची त्रयोदशी ही परडी सुरसुमनांची,
**वामन**कविनें जगदुद्धारा आणिली भूवरि साची. ३३
स्वमतिसूचिनें प्राकृतगुणिं तीं पुष्पें ओंवुनि केली
माला **राम**सुहृत्कंठीं ही **बलवतें** अर्पियली. ३४

विहंगम.

# काव्यरत्नावलि.

अंक १० वा.

## मोहानंतर.

( कथासूत्रः– कर्तव्यपालन ह्मणजे खडतर तपाचरणच होय. दोवांच्याही शेवटीं दिव्यप्राप्ति असते, हें खरें आहे. परंतु तें दिव्य मिळवावयास " भयंकर दिव्य "च करावें लागतें. महत्कार्यें ज्यांनीं शेवटास नेलीं, त्यांना कसकशा अडचणी येत गेल्या हें सर्वांस– कोणास " आपबिती " वरून, तर कोणास " परबिती " वरून– माहीत आहे ज्यांचा मनोनिग्रह मोठा, ते त्या अडचणींतून पार पडतात; आणि कमी बलाचे असतात, ते कच खातात. तथापि वर्तनक्रम सारखाच चिंतनीय व बोधप्रद होय. आणि ह्मणूनच पुराणांत शुकाचा मनोजय आणि विश्वामित्राचा तपोभंग यांना सारखेंच महत्व दिलेलें आढळतें. युद्धास जातांना सुधन्वा स्त्रीच्या मोहपाशांत सांपडून कर्तव्यास कसा चुकला, याचें वर्णन या आख्यानांत आहे. कथा " पुराणी " आहे; ती " शैले "च्या उक्तीप्रमाणें नव्या आनंदानें ( " To sing old songs wilk new gladness " ) गाइली आहे, इतकेंच )

साक्या.

" हाय ! करावें काय, सुचेना प्रमाद घडला थोर.<br>
कळतां कळतां उडी घातली, आज संकटीं घोर. १<br>
आमिषांतला गळ समजेना, ह्मणून मरतो मासा.<br>
मात्र धान्यकण पाहुनि भुलले, आडकती खग फासा. २<br>
झेंप दिव्यावर घालून पडे पतंग मरणापाशीं;

त्यापूर्वीं त्या ज्योत वाटते केवळ तेजोराशी. ३
फसतात–फसायाचे प्राणी ज्ञानविचारविहीन.
ज्ञानी ह्मणवून जगीं फसती मानव तदधिक हीन ! ४
जाळायाचें ज्ञान काय तें, पडे न जें उपयोगीं ?
धड कांट्यावर घालून बळें, मनुज यातना भोगी ! ५

अचिंत्य करणी भगवंताची, अगम्य सारा खेळ.
स्वधारणेवर जो तो बसवी विधिघटनेचा मेळ ! ६
सुंदर धरणी, सुंदर गगनीं सुंदर सुंदर तारे.
सुंदर पुष्पें फुलती; भ्रमती सुगंध वाहत वारे. ७
बागडती मृग सुंदर; पक्षी गाती मधुर रवानें
शेतें पिकलीं, वृक्षलतांनीं दिसती हिरवीं रानें. ८
पृथ्वीपोटीं मुक्ता, रत्नें सिंधुजलामाझारी.
कोणासाठीं करी सिद्धता परमेश्वर ही सारी ? ९
कुणा कळेना परमेशाचें हृदय, तयासच ठावें.
परी वाटतें मनुजासाठीं केलें सर्व असावें. १०
गगन खगांस्तव, विपिन मृगांस्तव, अब्धि जळचरांसाठीं,
दिसे निर्मिला; परि सकलांचें नियमन मनुजाहातीं. ११
विहंगमाची जाईलहि नभ–मर्यादेवर धांव.
जलचरांस लागेल कदाचित वा सिंधूचा ठाव. १२
अगाध सागर, अफाट नभ जो परी करी निर्माण,
त्या ईशाचा मार्ग जाणतो मानव मात्र सुजाण. १३

उतरुनि आलों जगीं, परि असे स्वर्गात चढायाचें.
अनुभव, उतरण सोपी, तितुकी चढण चढाया जाचे. १४

संचित सरतां प्राणी दिव्य स्वर्गसौख्य अंतरतो;
स्वर्गपात्रता संपादाया भूमीवर अवतरतो. १५
हेतु जिण्याचा विसरविते, परि जगांत भरली माया.
संसाराचे खेळ तेच ते लावविते खेळाया ! १६
भोगविलासस्थल जग नोहे, परी कठोर कसोटी
तरला तोच, भवाची जाणे जो सुंदरता खोटी. १७
खालीं सुंदर पुष्पें, तारे तेजस्वी आकाशीं;
फुलें घडीचीं, परी तारका अक्षय तेजोराशी. १८
अधोदृष्टि जो, वरचा त्याला अदृश्य होय पसारा.
क्षणिक फुलाला भुलला, न तया दिसती अक्षय तारा. १९
स्वर्गपथावर कनककामिनी विघ्नदेवता सिद्ध.
पडला नाहीं त्याच्या मोहीं तोच जाहला सिद्ध. २०
राजपुत्र मी मज कनकाचा नाहीं लोभ, नसावा.—
काय करावें, परी साधिला स्त्रीनें समरीं दावा. २१

काय उणें त्या, परमेशानें धरिलें ज्यांना हातीं !
सुवर्णता पावते प्रभूच्या कृपाप्रसादें माती. २२
बलाढ्य कौरव हरले समरीं देवद्वेष करून.
विलीन पांडव विजय पावले कृष्णपदांस चुरून. २३
झाला ज्यांचा श्रीपरमात्मा कृष्ण सखा कैवारी,
कां न सजावें त्यांनीं जगती जिंकायातें सारी ! २४
अश्व सोडिला; संगें दिधली विजयशालिनी सेना
नर नारायण सेनानी, ज्या जगतीं जोड दिसेना. २५
गर्विष्ठांचीं नमवीत शिरें, करीत वक्रां नीट,
श्यामकर्ण तो अश्व आमच्या आला नगरा धीट. २६

प्रतापशाली पार्थ, तयाचा श्रीकृष्ण सखा पाठी;
कसें धजावें रणांगणावर घ्याया त्यांची गांठी ! २७
क्षात्रधर्मही नव्हे अरिपुढें तृण दातांत धरावें.
परि बाहुबलें मारून दहा, मग समरांत मरावें. २८
मिळावयाचा नाहीं, न मिळो जय, तो हेतु नसावा.
समरनिमित्तें परी भुकेल्या नयनां कृष्ण दिसावा. २९
जगन्नाटकीं दिधली देवें भूमिका तया दावूं;
पडोन समरीं चरणीं त्याच्या देह सार्थकीं लावूं. ३०
करून ऐसा सुविचार मनीं, हय बांधविला द्वारीं;
मदीय जनकानें युद्धाची केली शीघ्र तयारी. ३१
शिंग फुंकिलें; ध्वजा रोंविली; पुरीं फिरविली द्वाही.
धारातीर्थीं सज्ज असावें सान थोर पौरांहीं. ३२
अनाहूत सुप्रसंग आला न तया जन जो साधी.
सुतप्ततैलकटाहीं त्याची पडेल आहुति आधीं. ३३

प्रभुपददर्शन लाहूं—दावूं त्या दो हात करून.
धरून ऐसी हूप निघालों मी सावेश धरून. ३४
चरणवंदना गेलों असतां वदली मजला माता,
" तूंच मुला आह्मां वृद्धपणीं जगतीं काठी आतां. ३५
आशा नुरली; पूर्ण तृप्तता ये जीवितरसपानें
गळावयाची वाट पहातों आह्मी पिकलीं पानें ! ३६
रोंप लाविलें; वाढविलें तें घालून करीं पाणी;
वृक्ष तयाचा थोर जाहला, लढला पुष्पफलांनीं; ३७
शिरीं तयाची छाया पडतां कृतार्थ होई माळी
जन्मसांगता पितरां तैसीं बाळें करतीं झालीं. ३८

केवळ संवर्धनें न होई समुद्धरण वंशाचें.
वंशकीर्तिसंगोपनवर्धन हें संतर्पण साचें. ३९
पुत्र तोच जो करी कुलाचा स्वकृतीनें उद्धार
तोच जन्मला; तोंच वांचला; अन्य मात्र भूभार. ४०
विश्वास तुझा नांव आमचें मागें चालविशील.
संधी आली पहावयाची आतांच तुझें शील. ४१
पदकमलें दिसती न जयाचीं आचरून तप भारी,
तो परमात्मा स्वयें आपल्या आला नगरद्वारीं. ४२
निजकर्तव्यपरीक्षा दे त्या; प्रसंग आला नामी !
कसास उतरे, देव तयाच्या स्वयें राबतो धामीं." ४३

उत्साहानें पुढें चाललों समरभूकडे वाटे.
ओढ घराची; न कळत वळले चरण परी त्या वाटे. ४४
हृदयामागें स्त्रीच्या सदनीं धांवत गेले पाय.
इच्छा होती समरा जावें; हरले परी उपाय ! ४५
चोपाळ्यावर दिसली पडली कांता रंगमहालीं.
कृष्ण केश मोकळे विखुरले हृदयीं, स्कंधीं, भालीं. ४६
तळहातावर गाल टेंकिला; दुःखांत दिसे चूर.
दीर्घ उसासे निघतीं; चाले अश्रूंचा भर पूर. ४७
परदुःखानें हृदय तळमळे; परी स्वतास्तव आलें—
प्रियनयनीं जल बघून, हृदयीं प्राणी कोण न धाले ? ४८
मम विरहानें नयनीं आले अश्रु, तयांच्या लोटें--
प्रिया प्रियतमा झाली; न सुचे ठेवूं तिजला कोठें ! ४९
धीर न धरवे; घट्ट सखीला धरिलें मी करपाशीं
अधर चुंबिला, जसा सेवितो पक्वान्नें उपवासी. ५०

धन्य चतुरता परमेशाची, निर्मी एकच ठायीं—
हितपरिणामीं अमृत, त्यापरी खर विष जीवनदाहीं. ५१
जैसा ज्याचा अधिकार, तशी तया फलाची प्राप्ति.
सागर मथितां अमृत सुरांना, सुरा दानवाहातीं ! ५२
स्त्रीच्या ठायीं अन्यवस्तुपरि अमृतविषांला थार.
स्त्रीच्यापायीं तरले थोडे; बहुत बुडाले ठार ! ५३
कटाक्षपातें दाह जाहला, आलिंगन त्या शांती—
समजून स्त्रीपीनकुचांवर पुरुष घेइ विश्रांती. ५४
उणावे न; परि वाढे उलटा, तो अधरामृतपानें.
शमवूं जातां धुंदी चढते, सर्व हरपती भानें. ५५
" अमृत " कशाचें ! सुराच भरली आहे स्त्रीच्या ओठीं.
विचार पळवी, निशा तियेची, बुद्धि उपजवी खोटी. ५६

द्विधा चित्त जाहलें; कळेना जावें कीं स्थित व्हावें !
सुचे न मजला निरोप घ्याया शद्ब काय योजावे. ५७
एक परी मन समरभूकडे उत्साहें घे धांव;
भरे अंतरीं पराक्रमाची, यशकीर्तीची हांव. ५८
परी पाहतां मूर्ति रतीची चातकी उभी ठेली.
स्मितनयनांनीं अमृत पाझरी; क्षणीं दिसे रागेली. ५९
पराक्रमाला विटे मन--गमे कीर्ति कोरडा भास !
समरभूमिका कशास व्हावी ? तथ्य जगांत विलास ! ६०
रंगमहालीं उंच पलंगीं केली शेज फुलांची.
सेवेसाठीं सिद्ध लाडकी पुतळी शृंगाराची. ६१
युद्धोत्साहें पाषाणासम जें मन होय कठोर,
कुसुममृदुलता त्याला आणी विषयलालसा चोर ! ६२

पुन्हां भुजलता गळां वेढिली ललनेच्या अनुरक्त.
करें हनुवटी हळू उचलिली; अधर चुंबिला रक्त. ६३
सस्मित अर्धोन्मीलितनयनीं रमणी मज अवलोकी.
स्वर्गसौख्य त्या समयीं, गमलें, अवतरलें भूलोकीं ! ६४

परी प्रतिज्ञा एकाएकी आठवली जनकाची.
रंग भंगला. अपकीर्तीची भीति मानसा जाची. ६५
" येतों आतां; निरोप सखये ! दे मज समरीं जाया,
श्रीकृष्णाचें दर्शन घ्याया, यशें तुला नटवाया. " ६६
बोलें ऐशा मनीं विरसली. कंठांत मिठी घाली.
झाली भीरु, उसासे, स्फुंदे, अश्रु मजवरी ढाळी. ६७
स्फुंदत वदली, " फुलें लतेवर सुगंध, कोमल, नामी;
शापाचे दिन तसे कंठितों भूवर अबला आह्मी. ६८
सुगंध, कोमलता, सुंदरता उभयांची परभोगी.
अभुक्ततेनें एक काननीं, दुजी मंदिरीं जोगी. ६९
दिवसरात्र, सणवार आमचे लहरीवर पुरुषांचे.
स्त्री पुरुषास्तव जगों सोडिलें रान मोकळें साचें. ७०
मुखीं आमच्या जलबिंदु पडे तृषा जधीं पुरुषास !
पुरुष भुकेले नसतां आह्मीं काढावे उपवास ! ७१
सूर्यकमलिनी सूर्यदर्शना असतां नित्य भुकेली.
हाय ! ढगांनीं आड येउनी, तिची निराशा केली ! ७२
शुक्ति भुकेली स्वातिजलाची, असतां मुख पसरून–
दुर्दैवचि तें आतां तिजला मेघें अव्हेरून ! ७३
दिव्य तळवटीं नसेल, शिखरीं परंतु भय पतनाचें.
बरी झोंपडी–राजमंदिरीं दुःखकाळजी जाचे. ७४

मृदु शय्येवर कंटक खुपती; पक्वान्नीं विष साचें.
स्मित सुहृदाचें लटकें; कपटी आलिंगन भावाचें ! ७५

हातीं काठी, खांदां कांबळ, वहाण तुटकी पायीं,
ओढ्याकांठीं ऐन दुपारीं गोप चारितो गाई. ७६
दुडदुड धांवे, गाई वाळी, भाळीं घर्म विराजे.
फिके त्यापुढें, रत्नहार जे गळां घालिती राजे ! ७७
दुपार झाली, वेळ भुकेची, आणील स्त्री खाणें;—
स्वस्थल, यास्तव, करी ध्वनित तो मुरलीमधुररवानें. ७८
शिरीं शिदोरी, मन्मथ हृदयीं, चंचलता नयनांत,
हंसगामिनी तिथें गोपिका येई गाणें गात. ७९
उभय भेटती; मिठी घालिती प्रियकंठास करांनीं;
निर्भय चुंबन घेती रानीं, तो राजा, ती राणी ! ८०
वृक्षाखालीं बसून खाती तिखटभाकरी खाणें.
उभयां देती घास, रिझविती मन, घेऊन उखाणे ! ८१
' रुक्ष भाकरी, तिखटासंगें तिजला गोडी आली;
अरसिक गोपी गोपालाच्या चरणीं पावन झाली. ८२
तिखटावेगळ भाकर न धके जरि तें हृदया जाळी;
गोपगोपिका आजन्म तशीं ना होतात निराळीं. ८३
धन्य ! धन्य ! तें जिणें; त्यापरी नसेल अमरपुरींत.
हेवा त्याचा देव अप्सरांसह असतील करीत ! ८४
चढे मस्तकीं मुकुट, त्यासवें पडती शाप उदंड.
घडतें पातक, द्यावा लागे त्यास सुखाचा दंड. ८५
ह्मणोन आह्मी राजमंदिरीं वसून सौख्यविलासीं--
तळमळ करितों; वाटे आह्मां धन्य गोप वनवासी ! ८६

स्वसुख--विघातक राज्य नको तें, एश्वर्य जळो मेलें !
त्यांच्यापायीं दिवस सुखाचे फुकट आजवर गेले. ८७

प्रेमैक्यबळें या विश्वाची चाले सर्व रहाटी.
प्रेमैक्याचा महिमा, यास्तव, सद्धर्म जगीं गाती. ८८
देव प्रेमा, धर्म प्रेमा. प्रेमरूप संसार.
पडला प्रेमक्षीरसागरीं परंतु मनुज क्षार. ८९
देव विसरला, धर्म विसरला, सर्व विसरला नातें.
आकाशीं फेंकिला दगड, त्या न कळे, फोडी माथें. ९०
कर्तव्य जगीं एक करावा प्रेमाचा विस्तार;
धर्मसूत्र हें मुखीं, परि करीं मनुजाच्या तलवार ! ९१
भावभुकेला ईश्वर आला, तयास भेटायाला--
व्हावी ही तलवार कशाला ? करीं त्यापरी भाला ? ९२
स्वमनीं व्हावें प्रेम, दिसाया ईशरूप नयनास.
प्रेमपूर्ण हृदया न बघवते स्त्रीचे अश्रुश्वास. ९३
अप्रसन्न गृह, अप्रसन्न तर गमेल सुंदर सृष्टी.
पाहूं जातां देव लोचना, दिसेल ललना कष्टी. ९४
चंद्रदर्शनें जैसा होई अमर्याद जलकोश;
असेन वाहवलें मी तैसी. तो प्रेमाचा दोष. ९५

धन्य वाटलें पदरीं पडली ऐसी ललना ज्ञानी.
वचन स्त्रीचें नव्हे, ऐकतों, गमे, शारदावाणी. ९६
भीड सखीची मोडवे न मज; झालों मी रममाण.
मान विसरलों, ज्ञान विसरलों, सर्व हरपलें भान ! ९७
लढतां लढतां समरभूवरी व्हावी तनु जी शांत,

शयनीं रमणीसवें पहुडली ती निर्लज्ज निवांत ! ९८
मानधनांचा गर्व हरावा समरीं ज्या बाहूंनीं,
स्त्रीसेवेला तयीं घेतलें हाय ! आज वाहूनी ! ९९
वक्षस्थल जें विंधित व्हावें अरिच्या कठोर बाणीं,
तें मूढें टोचून घेतलें स्त्रीपीनकुचाग्रांनीं ! १००
कृष्णवदन हें कैसें दावूं कैसें मम जनकाला ?
सैन्यास कसा जाऊन मिळूं ? केलें काय कपाळा ! १०१
जनक असेल सचिंत मुलाची समरीं वाट पहात.
म्यां अविचारें येथेंच परी केली रात्र पहाट ! १०२
मोह समंजस टाळी, जिंकी शूर मनुष्य तयातें.
ज्ञान शूरता नसतां, बरवें न बघावें त्या वाटे. १०३
" मोहानंतर " होय मना, तो पूर्वी होतां खेद,
दुणवेल सुरलोक--भूतलांतला खेदकर भेद ! १०४

खेद यापरी करीत सुधरी समराची तो वाट.
पुढें वर्तली कथा असे ती पुराणप्रियां ज्ञात. १०५

विनायक.

---

## मेघनादवधकाव्य.

### सर्ग ३ रा.*

इंद्रजित् श्रीरामाबरोबर लढावयास गेल्यामुळें त्याच्या विरहामुळें सुलोचनाराणीस झालेलें दुःख-- त्या दुःखाचें तिच्या सख्यांकडून सांत्वन-- सुलोचनेची पतीला भेटण्यास जाण्याची तयारी-- तिचा आपल्या सखींसह-

---

* या काव्याचे पहिले दोन सर्ग काव्यरत्नावलीच्या १६ व्या वर्षाच्या ९ व्या आणि १० व्या अंकांत प्रसिद्ध झाले आहेत.

वर्तमान लंकानगरींत प्रवेश-- तिचें व तिच्या सखीचें मारुतीशीं व श्रीरामाशीं झालेलें संभाषण-- शेवटीं तिच्या पतीची व तिची भेट-- पार्वती व तिची सखी विजया यांचा संवाद-- इत्यादि विषय या सर्गात आले आहेत.

आर्या.

स्वपतिवियोगें झाली शोकपरायण सुलोचनाराणी;
स्मरुनी प्राणपतीतें, आणी नयनां क्षणोक्षणीं पाणी. १
होऊनि शून्यचित्ता हिंडे एकाकिनी तदा रमणी;
कोठें हृदय रमेना, क्षणही झाली उदास फार मनीं. २
होतां वनस्थली तें विरह मधूंचा[1] जशीं सुमें सकल;
दासी म्लान जहाल्या शोकें प्रमिलेस[2] पाहुनी विकल. ३
शमला प्रखर रवीचा ताप, सतीचा परी न लवमात्र;
विरहीजनमनतापद आली तो क्रूर तामसी रात्र ४
रात्र नव्हे; ही आली दंशाया कालसर्पिणी वाटे,
फाटे हृदय भयानें, सखये मत्कंठ गहिंवरें दाटे. ५
"येतों क्षणांत मागें" गेले पतिराय सांगुनी मजला,
येती परी न अजुनी. विधि वाटे दुःख द्यावया सजला ! ६
वदुनी ऐसें प्रमिला वासंतीच्या[3] त्वरें गळां पडली,
स्मरुनी प्रियोत्तमातें रडली, चिंता तिच्या मना जडली. ७
बोले मग वासंती "चिंता सीमंतिनी ! मनीं धरिसी--
कां गे ? येइल मागें सत्वर तव नाथ नाशुनी अरिसीं. ८
कुंजवनीं चल जाऊं, आनंदें विरहदुःख गे साहूं;
गुंफुनि हार फुलांचा येतां प्रियनाथ तत्पदीं वाहूं." ९
पुष्पें वेंचाया मग गेल्या दोघी जणी विलासवनीं.
स्थल रम्य तें वदावी त्याची रमणीयता किती कवनीं. १०

---

१ वसंतऋतु. २ इंद्रजिताची राणी सुलोचना. ३ सुलोचनेच्या सखीचें नांव.

ठायीं ठायीं तेथें लतिकांचे कुंज निर्मिले चित्र;
कूजति तयांत कोकिल कल्पुनि आला वसंत निजमित्र. ११
होते जागोजागीं कुंजीं त्या दीप लाविले शतशा;
सुख देती नयनां जें गगनींच्या तारका न लेश तशा. १२
फुललीं कमलें सलिलीं अलि[1] करिती त्यांवरी बसुनि गान;
पान मधूचें करितां गेले विसरून सर्वही भान. १३
वाहे मलयसमीरण, तरुंचीं पर्णें अखंड मर्मरती[2];
चमकति खद्योत तयां पाहुनि नयनांस होय परम रति[3]. १४
कुसुमें वेंचित असतां सूर्यमुखी[4] पाहुनी विगतकांति,
राहुनि तिजजवळ उभी बोले प्रमिला हळूच एकांतीं,-- १५
" जातां नाथ लयातें सविता निस्तेजता तुला आली,
सखये सूर्यमुखी ! मम तुजसम झाली दशा निशाकालीं. १६
संसार शून्य भासे, दारुण विरहानलें जळे काय;
पाय प्रभुचे केव्हां दिसतिल हतभागिनीस या हाय ! " १७
सुमनें वेंचुनि सुमनें त्यांची रमणीय गुंफुनी माला;
प्रमिलाहृदय जहालें उत्सुक अर्पावया प्रियतमाला. १८
नाहींत नाथ ह्मणुनी दुःखें सोडूनि दीर्घ निःश्वास,--
बोले " मृगराजातें न कळे अजि घातला कुणीं पाश ? १९
जाऊं चल वासंती ! सत्वर लंकापुरीस निजनाथा--
पाहुनि, माला वाहुनि, चरणीं ठेवूं तयाचिया माथा. " २०
' अगणित राघवसेना राहे व्यापूनि सर्वही लंका.
होई प्रवेश कैसा तींत मला देवि ! वाटते शंका ' २१
परिसुनि वचन सखीचें प्रमिला खवळे मनांत बहुरागें;
वेगें ह्मणे तिला तूं भीरूसम बोलसी वचन कां गे ? २२

१ भृंगे. २ वृक्षाच्या शुष्क पानांचा आवाज होणें. ३ आनंद. ४ सूर्यफूल.

सोडुनि गिरिपृष्ठातें सिंधूतें भेटण्या नदी धांवे
अप्रतिहत गति तीची कवणें तीतें पथांत रोधावें ? २३
श्वशुर दशानन माझा स्वामी घननाद दैत्यकुलजा मी
जाउनि लंकाधामीं पाहूं बळ कायसें वसे रामीं २४
ऐसें वदुनी प्रमिला आवेशें जाय भूषणागारीं
चमकुनि चपला वाटे फिरली गगनोदरांत माघारी २५
घालुनि किरीट शीर्षी समरोचित भूषणें विविध ल्याली
प्रमिला त्वरें निघाली महिषासुरमर्दना जणो काली २६
घनपतिसम गज गर्जति वाजी खिंकाळती गभीर रवें
सज्ज जहाल्या रामा लंकाधामास जावयास जवें २७
शिंग तुतारी भेरी दुंदुभिची घोर गर्जना झाली
परिसुनि ती भय उपजे जनहृदयीं स्वर्गमृत्युपातालीं २८
आली निजसेनेसह लंकेच्या तूर्ण पश्चिमद्वारीं
होता जेथें हनुमान् रामाचा परमदास कैवारी २९
" कोण तुह्मीं ? कां ? कोठुनि आलां ? येथें वृथा मरायातें
अथवा फसवायातें घेउनि हे वेष रामरायातें ? ३०
लक्ष्मण बिभीषणांसह रघुपति येथें असे सदा जागा
मुकतां फुका कशाला प्राणां येथूनि सत्वरी जा गा " ३१
परिसुनि हनुमद्वचना प्रमिलेची बोलली सखी रागें
रे ! बर्बरा ! तुझ्या त्या सीतानाथास आण जा वेगें ३२
तूं क्षुद्र जीव वानर तुजवर म्यां शस्त्र हें न उचलावें
पाहुनि शृगाल त्यावर सिंहीनें काय चालुनी जावें ३३
पतिपद पूजायातें घननादाची सुलोचना रमणी
लंकापुरींत जाई रोधी तन्मार्ग कोण वीरमणि " ३४
पाहे सुत पवनाचा घननादाची प्रिया दुजी चपला

रतिसम सुंदर साक्षात् स्मरवन्हीची जणो शिखा[१] चपला ३५
" आलीस कां अकालीं सांग मला सुंदरी त्वरें हें तूं
सांगुनि रघुरायातें करिन तुझे सकळ पूर्ण मी हेतु " ३६
परिसुनि वच मारुतिचें बोले " माझी सखी तुवां दूती
रामाकडेस न्यावी माझा सांगेल त्यास हेतू ती " ३७
बसला होता राघव शिबिरीं लक्ष्मण उभा तयापाशीं
जाई हनुमान् तेथें प्रमिलेची घेउनी सवें दासी ३८
बोले मग ती दूती कर जोडुनि करुनि गुरुजनां नमन
" दासी मी प्रमिलेची जीचा घननाद वीर हो रमण ३९
प्रमिला देवी आली प्रेमें पूजावयास पतिचरण
जायास मार्ग देई अथवा येई करावयास रण " ४०
परिसुनि दूतीवचना बोले करुनि स्मितास मग राम
" रावण वैरी माझा करणें मज त्यासवेंच संग्राम ४१
सर्व तुझी कुलबाला सोडा मनिंच्या समस्त शंकेला
रोधील कोण तुमचा मार्ग तुझीं जा खुशाल लंकेला " ४२
शिरली प्रमिलादेवी लंकेच्या मग मनोहर द्वारीं
घेउनि सख्यांस संगें, वाजति शिंगें महास्वनें भेरी ४३
कांहीं काळें गेली प्रेमानंदें पतीचिया सदनीं
जो हर्ष दंपतीतें झाला तो वर्णवे न हो वदनीं ४४
टाकुनि वीराभरणें बैसे स्वर्णासनीं सनाथसती
धैर्यातें प्रमिलेच्या बंदीजन सर्वही तदा स्तविती ४५
कैलासीं हांसुनि तैं वदली गौरी " पहा सखे खालीं
प्रमिलासती पतीला भेटे आनंदसागरीं न्हाली ४६
घननाद स्मर साक्षात् रति अपरा ती सुलोचना राणी

१ ज्वाला.

सौंदर्याची खाणी ऐशीला कोण कवि न वाखाणी ?" ४७
परिसुनि वचन शिवेचें विजया[1] बोले तदा तिला सभय
"प्रमिलासौभाग्यरवी[2] कैसा समरांत पावणार जय ?" ४८
सौमित्रि वीरपुंगव शौर्य तयाचें प्रसिद्ध रिपुदलनीं
टाकिल घननादरवि ग्रासुनि मग ती सुकेल ना नलिनी ?" ४९
"प्रमिलामदंशभूता घेइन तत्तेज काढुनी आतां
मग संग्रामीं लक्ष्मण घननादा संहरो नसे चिंता ५०
होईल तो शिवाचा दास, प्रमिला मदीय गे दासी
देईन संगरीं मी कीर्तिजयश्री उदार रामासी" ५१
ऐसें वदुनी सखितें शयनागारीं शिरे त्वरें दुर्गा
भवभालस्थशशिकलातेजें[3] कैलास लाजवी स्वर्गा ५२
तिसरा सर्ग 'समागम' रचिला मधुसूदनें सुकविरत्नें
वंगीं, रूप मराठी त्यास दिलें माधवानुजें यत्नें ५३

माधवानुज.

## मृग आणि वेणु.

पद.

( ला बाइला । बेलाचें पान० या चा० )

वेणुरवें;— मृगबाळ चिमुकलें धांवे १
वेधुनिया,— धांवत आलें त्या ठाया २
कौतुकलें,— ऐकुनि रव हर्षित झालें ३
मधुनादें,— डोळे बहुतांचे आनंदें ४
बागडलें,— खुललें, स्तंभितही झालें ५

१ पार्वतीच्या सखीचें नांव. २ इंद्रजित्. ३ शंकराच्या मस्तकावरील.

पदतालें,— मधुरहि तें नाचूं सजलें ६
लीलाहीं,— गुंगचि केलें मज पाहीं ७
बोलविलें,— निर्भय तें जवळीं आलें ८
कुरवळलें,— गोंजरिलें, हृदयीं धरिलें ९
त्यासमयीं,— मनिं विचार लहरी येई १०
ईशपदीं,— जरि ऐशी लागे तंद्री ११
मी तूं हें,— जाउनि मन तल्लिन हो हें १२
प्रेमरसीं,— रंगे वृत्ती ती खाशी १३
सुखही तें,— वर्णवे मुळीं ना मातें १४

——— गोविंद पांडुरंग देवधर बी. ए.

## प्रभुप्रार्थना.

पद.

घे पदरीं तव दास । विभो हा ॥ ध्रु० प० ॥
कांस तुझी ही आस असे मज ध्यास न आणिक यास १
भवदवपावकतप्त त्रिनवितों मी तुज जीवनदास ॥ विभो० ॥ २
सुख कैचें जें दुःखविमिश्रित नच सुख हा सुखभास ३
सकल विषय हे चंचल करितिल व्याकुल शेवटिं खास ४
आप्तप्रेमा व्याप्त आधिनीं दावि न तव सुपदास ॥ विभो० ॥ ५
अंतिं विरस हें विषयसुख न दे अखंड आनंदास ६
मृत्यु असे फसवाया पाठिशिं केवि धरूं विश्वास ७
चिंतुनि ऐसें बलवंतकवी लागे तव छंदास ॥ विभो० ॥ ८

विहंगम.

# काव्यरत्नावलि.

## अंक ११ वा.

## वसन्तचंद्रिका.

चंद्रकान्त राजाला एकुलती एक कन्या होती, तिचें नांव चंद्रिका. अमात्यपुत्र दुराचार ती आपणाला प्राप्त व्हावी ह्मणून प्रयत्न करीत होता. परंतु तिनें त्याचा धिःकार करून पूर्वीचा लोकप्रिय अमात्य सत्यध्वज याचा गुणसंपन्न पुत्र वसन्त याला वरिलें. ही गोष्ट दुराचाराला आवडली नाहीं. वसन्ताचा नाश करून राजकन्या हस्तगत करून घ्यावी, ह्मणून त्यानें गुप्तपणें कारस्थान चालविलें. प्रथम राजकन्येची विश्वासू दासी कमला इला वश करून घेतलें. नंतर एके दिवशीं वसन्ताला शिकारीच्या मिषानें आपल्या बरोबर घेऊन गेला. इकडे कमलेनें वसन्ताच्या जिवावर दैविक अरिष्ट आलें आहे, असें चंद्रिकेच्या मनांत भरवून दिलें. व त्याची शान्ति करण्याकरितां ह्मणून, गुप्तपणें रात्रीं तिला स्मशानांतील अंबिकालयांत घेऊन गेली, व तेथें तिला अडकवून ठेविलें. दुसरे दिवशीं दुराचार व त्याचा पिता अमात्य दुष्टबुद्धि यांनीं राजकन्येचा खून झाला, अशी गांवामध्यें बातमी उठविली, व कांहीं तरी चौकशी करून, "हा अपराध राज्यलोभानें वसन्तानेंच केला" असें अमात्यानें ठरविलें. राजा दुःखांत निमग्न झाल्यामुळें, कांहीं एक विचार न करितां त्यानें वसन्ताला मरणाची शिक्षा दिली, व त्याला चांडालांच्या स्वाधीन केलें. इकडे ग्रामाध्यक्ष मित्रचंद्र हा सहज अंबिकालयांत गेला होता; त्यानें राजकन्येची सुटकाकरून दुराचाराला कैद केलें. व चांडाल वसन्ताचा वध करणार इतक्यांत चंद्रिकेसह तेथें

जाऊन त्याचा प्राण वांचविला. हें वर्तमान समजतांच राजाही तेथें धांवत आला. नंतर सर्व राज्य चंद्रिकेच्या स्वाधीन करून तो तपाला चालता झाला. यापैकीं वसन्ताचा विलाप व त्याची मुक्तता इतका प्रसंग जागोजाग संस्कृताचा आधार घेऊन पुढील कवितेंत वर्णिला आहे.

दिंडी.

असुनि तुह्मी चांडालकुलोत्पन्न, । हाय! दिसतां कां सर्वथा विपन्न?
वृत्ति तुमची परजीवितापहार, । प्रेमपाझर कां दाटला अपार ? १
जन्म ज्याचा चांडालकुलीं झाला— । काय येई चांडालता तयाला ?
होय लोकीं चांडाल तो खराच,— । सज्जनातें जो पीडितो उगाच. २
असे तुह्मां अन्तिमा प्रार्थना ही, । मनीं कांहीं कामना अन्य नाहीं;
अहा ! कांपा हें त्वरित कंठनाल, । सोसवेना मज दुःख हें विशाल. ३
आद्य विधिची जी युवतिरत्नसृष्टि, । जणों कमला उतरली भूमिपृष्ठीं,
सद्गुणाकर कामिनीशिरो-भूता, । नष्ट झाली ती प्रिया प्राणभूता ! ४
करुनि परितां सर्वदा अमृतवृष्टि, । करी माझी शान्त जी लोलदृष्टि,
लुप्त झाली ती हाय ! चंद्रकोर, । दुःख करितों अनिवार मी चकोर ! ५
करुनि शाखाकर अमृतमसृण कंठीं, । सुखानें मी सर्वदा काल कंठीं;
असे यौवनपुष्पिता गंधशाली, । प्रेमवल्ली ती लोपली अकालीं ! ६
मनस्तापातें सर्वथा निवारी, । सदा वर्षे जी अमृतरूप वारी;
नियतिझंझानिल निरसि ती विशाला, । अहा ! रमणीया दिव्य मेघमाला. ७
शून्य भासे सखिविणें विश्व सर्व, । प्रसृत झालें सर्वत्र दुःख—पर्व,
सोसवेना यातना विरहजन्य, । प्राण कां हा मम जाइना अधन्य ! ! ८
दुष्ट विलसित मांडिलें वक्रकालें. । प्राणभूत स्त्रीरत्न नष्ट झालें,--
त्यांत मजवरि हा थोर दोष आला. । डाग मोठा लागला सत्कुलाला ! ! ९
असे लोकीं ही नियति चित्ररूपा, । क्षणामध्यें करि रंक थोर भूपा;
करी रंकातें भूपही क्षणांत, । असे अनिवार्या सत्य ती जनांत. १०

परम संमत मानिला भूवरानें, । लोक ज्याला पूजिती आदरानें,
वैभवाचलशिखरस्थ जो सुखांत, । हाय ! अवचित जाहला तन्निपात ! ११
लोक पूर्वी जे नाचले समोर, । नभीं मेघातें बघुनि जेंवि मोर;
तेच आतां करितात तिरस्कार ! । असे दैवाचा काय हा प्रकार ? १२
बघुनि माझा हा त्वरित अधःपात, । विचारी जन करितात अश्रुपात.
' असे सकला चंचला ही विभूति. ' । येत याची ही समक्षानुभूति. १३
" कालवदनस्थित हाय ! हा वसन्त. । पडति निष्कारण संकटांत सन्त. "
मला जे जे जन मानिती अपाप-- । वदुनि यापरि ते वरिति मनस्ताप. १४
व्यर्थ सज्जनहो ! करुनि शोक काय, । अल्प येथें नच आपुला उपाय.
राजशासन अनिवार परम घोर, । होति त्याला वश लोक थोर थोर. १५
अससि भूपाला ! खचित दुर्विचार, । कसा त्यजिला निःशंक नयाचार ?
तुला गणिती देवांश सत्य लोकीं, । नसे विहिता तुज रीति ही विलोकीं. १६
भूप होतां दुर्मन्त्रिकराधीन,-- । दंड निष्कारण पावती सुदीन,
होत दुष्टांची चहुंकडे समृद्धि, । नाश पावे तो नृप तदा कुबुद्धि. १७
चकोरातें ज्यापरी चंद्रकान्ति.-- । असे मन्नयना तेंवि चंद्रिका ती;
हृदिस्था ती अधिदेवताच हाय ! । नाश तीचा मी करिन तरी काय ? १८
मनीं नाहीं हा आणिला विचार, । तसा माझा निर्दोष सदाचार,
कोण याचा भोगील दुर्विपाक ? । तूंच किंवा तत्र कुटिल-सचिव-काक १९
दुर्जनांचा अग्रणी दुराचार, । पिता त्याचा दुर्बुद्धि अधम फार,--
कुटिलनीतीची खचित पूर्ण खाणी; । कशी त्याची श्रद्धेय गमे वाणी ? २०
कपटनाट्याचा तोच सूत्रधार; । तोच भूपा अविचार शिकविणार,
स्वयें रचुनी अपराध घोर साचा, । दोष मजला लाविला सत्य त्याचा. २१
खला विप्रिय मीं तव न अल्प केलें, । तुझ्या कल्याणा हृदय हें भुकेलें;
तुला अपुला मानिला परम मित्र, । कसें केलें तूं कर्म हें विचित्र ! २२
करुनि अवघी तूं कपट योजना ही, । जींत सत्याचा किमपि अंश नाहीं--

तूंच नेलें मज दूर करुनि छद्मा, । ह्मणुनि मुकलों प्रियसखीवदनपद्मा ! २३
करी जें जें दुष्कर्म मनुज लोकीं, । सर्वसाक्षी परमेश तें विलोकीं.
लोकदृष्ट्या अपराध मींच केला, । काय जगताचा ईश परि निजेला ? २४
प्राणभूता हरपली प्रियसखी ती, । नसे आतां मज किमपि मरणभीति;
शून्य भासे जग काननासमान, । स्वयें वेगें जातील मम प्राण. २५
परी "लागुनियां डाग मन्मुखाला । हाय! मजला हा निंद्य मृत्यु आला,–
दोष आला निर्दोष पूर्वजांतें." । ह्मणुनि चित्ता वरि बहु मनोरुजा ते ! २६
जमुनि जेथें हे पौरजन विनीत, । सदा गाती मम विमलयशोगीत,–
त्याच मार्गीं चांडाल करुनि घोष, । हाय ! माझा हे बोलतात दोष ! २७
गळति नयनांतुनि अविरताश्रु धारा, । ह्मणुनि भिजला हा हाय ! काय सारा !!
स्खलन पावें समभूमि-मार्गिं हा मी, । निघति बाहेर न शद्ब कंठगामी !! २८
गळां घालुनियां रक्त-कुसुम-हार, । रक्तवसनांहीं सजविलें अपार.
गणुनि मजला बलि काक जमुनि येती, । करुनि का का रव शीघ्र झेंप घेती. २९
रक्तचंदनलिप्त हा सकल काय, । जणों भूषविला यज्ञपशुच काय !
दशा माझी ही बघुनि दीनवाणी, । लोक नेत्रांतुनि गाळितात पाणी. ३०
" उदकबुद्बुदचंचला लोकयात्रा, । साधुसंतातें काय तिची मात्रा !
जगीं झाला तव जरि न गोड अंत, । तुला स्वर्गीं देईल सुख अनन्त. ३१
इंदु भास्वान् कल्याण-कोटि-धाम, । जीवलोकां जे सुखविती निकाम,
असुर त्यांनाही ग्रासिती कराल. । सांग सुटला कोणास विपत्काल?" ३२
अशी बोलुनियां प्रणयपूर्ण वाचा, । सुजन देती हे धीर मला साचा.
मला सोडविण्या शक्ति यांस नाहीं, । ह्मणुनि करिती अभिषेक लोचनांहीं. ३३
होय संचर मम राजमार्ग जेव्हां, । साब्जवातायन नगर होय तेव्हां;
दुर्दिनाकुल अजि अश्रुसिंचनानें, । त्रस्त झालें हें कुजन शिखिस्वानें. ३४
बसुनि सौधावरि विकलमुखच्छाया, । अश्रुधारा वर्षिती अंगना या.
मृदुलहृदया स्त्रीजाति होय लोकीं, । स्वयें पडते परदुःख बघुनि शोकीं. ३५

"चकोरातें सुखवितां विमल इंदु, । जसा ग्रासि तया असुर कपटसिंधु;
तसा पौरवधूनयनमहोत्साह, । खलें गिळिला हा प्रेमवारिवाह ! ३६
लोकनयनीं जो धूलि फेकणारा, । जीवलोकातें ताप वितरणारा,
सुगुणपुष्पाकर वसन्ता महाघ, । हाय! वेगें तो ग्रासि खलनिदाघ !! ३७
"सदा देवो तुज सौख्य सर्वसाक्षी." । असें बोलुनियां वचन सारसाक्षी,—
बद्धमुग्धांजलि विनत ऊर्ध्वदृष्टि, । वदति "ईशा करिं शीघ्र कृपा-वृष्टि." ३८
मार्ग सोडुनि सुजनहो! चला दूर, । जमुनि इकडे हे येति खल क्रूर.
बघुनि साधुजनां अवदशाभिभूत, । दुर्जनांना सुख होतसे प्रभूत. ३९
स्नेहनिर्झर मूर्तिमान् तुह्मी सन्त, । जरी मरणोन्मुख दीन हा वसन्त,
बघुनि तुह्मांतें चित्त होय शान्त. । काय तुह्मांहुनि भिन्न रमाकान्त? ४०
असे दैवदशा काय ही विचित्र ! । अहा ! फिरले मम आत्मभूत मित्र !
बघुनि माझी अवदशा अशी पूर्ण, । वदन झांकुनि हे पळति दूर तूर्ण! ४१
सदा मानीं मी प्राणभूत ज्यांना, । झटुनि केले उपकार नित्य नाना,
विपत्कालीं ज्यां जाहलों सहाय, । दूर आतां ते पळति सर्व हाय ! ४२
विपत्कालीं जो मित्र पळे दूर, । स्वार्थतत्पर तो कपट-मात्र-शूर;
व्याप्त पृथ्वी ही अशा वंचकांनीं. । आयकावें तन्नामही न कांनीं. ४३
विपत्संपत्समयास एकरूप, । प्रेम ठेवी निरपेक्ष जो अमूप;
असा लोकीं सन्मित्र विरल फार. । इतर मिळती सर्वत्र दुराचार. ४४
दैव माझें फिरतांच अल्पमात्र, । हाय! झालों मी नृपतिकोपपात्र;
ह्मणुनि फिरले हे मित्र सर्व माजे, । सर्वशक्तिमती नियति ती विराजे! ४५
पुण्यशीले! हृदयाधिदेवते! गे! । मला सोडुनि गेलीस कशी वेगें?
काय विप्रिय मीं सांग असें केलें! । ह्मणुनि विमल प्रेम तें लया गेलें. ४६
"राज-वंशालंकार चंद्रिका मी;— । नीचवंशोद्भव हा वसन्त कामी,—
उचित नाहीं हा मम समागमातें;" । असें समजुनि टाकिलें काय मातें? ४७
"असे पापमयी सकलही धरा ही, । सतत संकटसंकुला खलनरांहीं;

कशी येथें ही राहुं विपंका मी!' । ह्मणुनि झालिस काय तूं स्वर्गगामी? ४८
असे माझी ही काय दुष्ट शंका, । ठाव देशि न तूं दुर्विचारपंका.
असे प्रेमल तें हृदय तुझें शुद्ध, । कसें मजशी होईल गे! विरुद्ध? ४९
दूर कोठें मी अल्पमात्र जातां, । सखे! होशी घाबरी तूं सुजाता.
कसे आतां भोगिसी स्वर्ग-भोग? । मला देउनि अत्यन्त हा वियोग,— ५०
जसा पौलोमीनाथ अमरपाल, । स्वर्गलोकातें शासि सुचिरकाल;
सखे! शासावी तेंवि धरा मींही; । वसे इच्छा सर्वदा तव मनीं ही. ५१
अझुनि नाहीं वाहिला राज्यभार; । अझुनि नाहीं सेविले चिरविहार;
अझुनि भरिली नच भूमि तूं यशानें; । तुला आला निर्वेद मग कशानें? ५२
गगनरंगीं दावून नवविलास, । जशी चपला क्षणमात्र दे सुखास;
तसें सुखवुनियां अल्पकाल मातें, । स्वर्गलोका सेविले तुवां कान्ते! ५३
नयनसुखदा मम दिव्यचंद्रिका ते, । सदा सुखवी मन्नयनचकोरांतें;
कुजनराहु ग्रासि तो तीस हाय! । बुडालों मी तिमिरांत निःसहाय! ५४
मनीं योजुनियां कपटयुक्ति थोर, । खलें केलें दुष्कर्म हें अघोर!
मला नेउनियां अन्यमिषें दूर, । हेतु अपुला साधिला महाक्रूर! ५५
शुष्क झाली दाक्षिण्यनिम्नगा ती, । नाश पावे लावण्य-कुसुम-जाती,
आज विफलालोक ही भू असार, । हाय! झालें चारित्र्य निराधार!! ५६
आत्मभूता तूं असिसि सखे! साच. । तशी नयनातें अमृतवर्तिकाच,
उभयवंशश्री सकलगुणनिधान, । कसा मारिन मी तुज खलासमान? ५७
प्रेमभावें मीं सकलसुखनिदान. । सदा केलें तव अधरसुधापान.
सखे! सोडुनियां सकल दया हाय! । करिन अयशोविषपान सांग काय? ५८
लता कोमल लववुनी निजकरांहीं, । तिचीं कुसुमें खुडिलीं न मीं कदाही;
सखे! होउनियां राज्यविभवकामी, । कशी मारिन निज नयनचंद्रिका मी! ५९
राजवंश्या तूं रूपवती बाला, । मला वरिलें या हीनवंशजाला,
तसे केले उपकार नित्य नाना; । कसा सखये! विसरेन सांग त्यांना? ६०

' राज्यलोभानें मारिलें तुला मीं, ' । असें वदतो हा दुराचार कामी !
सत्य गमलें तें भूपसत्तमातें, । ह्मणुनि झाला हा दंड घोर मातें. ६१
खरी लोकीं तूं मूर्तिमती लक्ष्मी, । कोण सोडुनि तुज वरिल राजलक्ष्मी ?
पुण्यशीला तूं सकलसुखनिदान; । राज्यलक्ष्मी ही विविधविपत्स्थान ! ६२
कपट करुनी साधिलें वैर त्यानें, । सकल आशा आमची लयाला ने;
जगुनि आतां मज सौख्य अल्प नाहीं, । प्रियाघातक मज मानिलें जनांहीं ! ६३
होय आतां हा भारभूत काय; । भुवन सारें हें विजनवनप्राय;
नष्ट झाला जीवनोपाय सारा; । व्यर्थ विभवाचा गमत हा पसारा. ६४
अंधकाराकुल होय पूर्ण दृष्टि, । स्मशानासम ही भयद जीवसृष्टि,
कसा क्रमिशिल तूं गगनमार्ग लांब ? । मीहि आलों प्रियसखे ! ' थांब थांब ' ६५
अहा ! कोणाचा ऐकुं येइ शोक,-- । चकित कां हे बघतात सर्व लोक ?
निजस्कंधीं घेऊन बालिका हा,-- । साश्रुलोचन ये त्वरित कोण हा हा ! ६६
अहा ! माझा हा अनुज रत्नपाल, । असे प्रेमाचा थोर जो प्रणाल,
बघुनि माझी अवदशा विकल झाला, । मरणसमयीं धांवून शीघ्र आला. ६७
असे बंधु खरा प्रेमरसागार, । तोच आपत्समयास निजाधार,
तोच सिंचुनि पीयूषवचनधारा, । विपत्समयीं परिताप हरी सारा. ६८
कृपा आतां चांडालहो ! करा ही, । अन्य कांहीं प्रार्थना तुह्मां नाहीं.
' मरणसमयीं हा एकवार बंधु-- । मला भेटो केवल स्नेहसिंधु. ' ६९
त्वरित आलिंगन देइं मला बापा ! । सुधास्पर्शें हरिं सकल मनस्तापा;
जरी मरणोन्मुख अवदशाविपन्न, । तुला पाहुनि मम हृदय हो प्रसन्न. ७०
कपटनाटकयोजनासूत्रधार, । करी आपण दुष्कर्म दुराचार;
दोष त्याचा मज लाविला शठानें, । सिद्ध केला तो कुटिलनयपथानें ! ७१
नसे बंधो ! जरि नृप विमृश्यकारी, । कोण धर्माधर्म तो मग विचारी ?
तोच येथेंही जाहला प्रकार, । मरण आलें हें मला नीच फार ! ७२
रक्तचंदनलिप्त हा करुनि काय, । गळां घालुनिया रक्तहार हाय !

यज्ञकालीं ज्यापरी महाजास; । तसे नेती मज कंठ चिरायास ! ७३
व्यर्थ करिशी कां बाष्पसलिलवृष्टि ? । सुलभविपदा ही सकल लोकसृष्टि;
धर्म आतां मज एकला सहाय. । नसे इतराचा अल्पही उपाय. ७४
तरंगाकुल विपुलार्णवीं उदंड, । एक जागीं मिळुनिया काष्ठखंड,
प्रवाहानें जातात दूर साच. । जगीं भूतांचा समागम तसाच. ७५
सुता माझी ही चारुमुखी गोड, । मधुरवचनांहीं पुरवि सदा कोड,
असे जीवित जी आमुच्या कुलाची, । दीनवाणी जाहली आज साची; ७६
मला पाहे ही चकित लोचनांहीं, । तिला दुःखाची कल्पनाहि नाहीं,
असे सुलभानंद हा बालभाव. । हाच मोठा अनभिज्ञता-प्रभाव. ७७
जशी आतां आनंदरूप कन्ये ! । रहा पुढती आजन्म तशी धन्ये !
नसो दुर्जनसंपर्क तुज कदाही, । सदा चित्तीं तव वसो विमलता ही. ७८
व्यर्थ वर्षिसि कां बाष्पजलासार ? । त्वरित आवरिं तो करुनिया विचार.
तूंच बंधो ! जरि धीर सोडशील, । कोण मातेतें सांग शान्तवील ? ७९
अहा ! साक्षात् जी प्रेमनिम्नगाच, । जीव माझ्यावरि फार जिचा साच;
हाय ! माझी ऐकून निधनवार्ता, । काय आतां करिल ती विप्रुवार्ता ! ! ८०
पिता आह्मां सोडून शीघ्र जाय, । ह्मणुनि करि ती सर्वदा हाय ! हाय !
दीनवाणी ती पंकमग्न गाय, । वृत्त परिसुनि हें करिल तरी काय ? ८१
महादारुण हा वृद्धपणीं घाला, । सांग कैशी सोशील रत्नपाला !
प्राण सोडिल ती वृत्त ऐकतां हें, । तिला आतां तुजवीण कोण आहे ? ८२
मिळाले हें चहुंकडे दुष्ट सारे, । कालवदनीं देतील तुजहि बारे !
तरी आतां येथून शीघ्र जाईं, । दुष्ट नगरीं क्षणमात्र या न राहीं. ८३
सुखें जेथें मुनिवृंद निवसतात; । अभय जेथें मृगकुलें विचरतात;
नसे जेथें अणुमात्र खलत्रास; । अशा विपिनीं जाऊन करीं वास. ८४
पहा जमला हा जनसमूह दाट, । नसे जाण्याला अल्प मात्र वाट.
दूर यांना चांडालहो ! करावें, । राजशासन दुर्लंघ्य आचरावें. ८५

वयोभाव क्रमुनिया जसा प्राणी, । जवळ करितो यमभूपराजधानी;
विविध चत्वर लंघुनी मुमूर्षू मी, । करीं सन्निध तेंवि ही प्रेतभूमि. ८६
भूप राजपदभ्रष्ट होय जेव्हां, । भृत्य निघुनी जातात सर्व तेव्हां,
मरणसमयीं मज तेंवि एक एक, । दूर जाती टाकून लोक देख ! ८७
वनीं काष्टच्छिद् घेउनी कुठार, । वृक्ष जेव्हां तोडितो दुराचार;
जात तेव्हां खगसंघ दूर जेंवी, । मला सोडुनिया मित्रवृंद तेंवी ! ८८
दिसे प्राग्भागीं हें स्मशान साचें, । कालनिद्रास्थान जें सकळिकांचें,
श्रेष्ठ पृथ्वीपति रंक वा अभागी, । अहा ! येतिल शेवटीं याच जागीं ! ८९
गमे वध्यातें भयद हें स्मशान, । मला वाटे परि परमसुखस्थान.
प्रियाशोकें जो विकल जन हताश, । अहा ! त्याचा होईल शीघ्र नाश ९०
अहा ! उच्छिखशिखिभीषणा चिता या, । धूमलेखांनीं व्यापिती विहाया;
सुटे चोहिंकडे दग्धमांसगंध, । दिसति कोठें विच्छिन्न हे कबंध; ९१
अर्धदग्ध प्रेत हें वृकशृगाल, । फाडफाडुनिया भक्षिती खुशाल;
तसें कुजलेलें पूतिगंधिमांस, । आवडीनें खातात आसमास; ९२
असे शूळावरि अर्धभाग साचा, । खालिं लोंबतसे अर्धभाग ज्याचा,--
कलेवर हें दिसतसे असें एक; । शिवा त्याला या ओढिती अनेक; ९३
बलें ज्यांनीं मर्दिले व्याघ्रसिंह, । ख्यात पूर्वी जे परम पुरुषसिंह;
तेच पडले निरुपाय हे अचेष्ट, । शिवा त्यांना या तोडिती यथेष्ट ! ९४
बघुनि पूर्वी जे कुपित रक्तवर्ण, । होय वीराचें वदनही विवर्ण,--
गृध्रमालांनीं गोल फोडितांच, । नेत्र खांचा जाहले तेच साच ! ९५
होय सागर कल्पनातरंगाचा, । मनोवृत्ति–प्रासाद थोर साचा,--
विविधतृष्णांचें सद्म जें विशाल,-- । अहा ! पडलें हें जीर्ण नरकपाल ! ९६
कृष्णवर्णा ही वक्रगति अनंत, । सदा ग्रासितसे लोक जी अनंत,
विषमचरिता ती कालदशा जैशी, । सदा वैतरिणी वाहतसे तैशी. ९७
नसे मरणाची भीति अल्प मातें, । पुत्रजन्मासम सुखद तें मनातें;

'शुद्धवंशा मलिनता हाय! आली;' । हेंच माझ्या हृदयास फार जाळीं! ९८
असे शान्तिप्रद मृत्यु हा खराच; । शोकचिन्ताप्रतिकार हाच साच,
विपत्तीचाही हाच नाशकर्ता, । जगीं त्याच्यासम कोण दुःखहर्ता! ९९
भाव ज्यावरि ठेविला शुद्ध नित्य, । जगच्चालक अविनाश जो अनित्य,–
तोच पावो मज विश्वनाथ आतां. । मरणसमयीं या कोण दुजा त्राता? १००
पहा उत्कंधर राहिलों उभा मीं, । त्वरित मजला पाठवा कालधामीं.
करुनि उल्लसिता असिलता कराल, । चिरा माझें हें शीघ्र कंठनाल. १०१
दयामेघा! वामना! दीननाथा! । तुझ्या चरणीं दे ठाव या अनाथा;
दुर्जनांनीं गांजिलें मला भारी; । मला आतां तुजविणें कोण तारी? १०२
धरुनि अंसावरि मुक्तकेश–भार, । ऊर्ध्व अपुले करुनियां बाहु फार,
वदत मोठ्यानें 'थांब थांब' याला, । येत इकडे ही त्वरित कोण बाला? १०३
जलाभावें सुकतांच जीवसृष्टि, । जशी यावी सुखकरा द्रोणवृष्टि;
अहा असतां यमपाशबद्ध मीही; । त्वरित आलि तशी कोण शुभांगी ही! १०४
चंद्रिका ही रातली काय अन्या, । काय अथवा परतली तीच धन्या!
भ्रान्त झालों पाहूनियां इला मी, । नसे झाली काय ती स्वर्गगामी? १०५
कालवदनांतुनि यास सोडवाया, । स्वर्ग सोडुनि पातली काय जाया?
तिची अथवा ही तदनुरूप आली, । तिचें घेउनियां रूप काय आली? १०६
सकलवसुधासौंदर्यसार भूता, । विकलदेहातें सुखद जी प्रभूता,
तृषित नेत्रातें अमृतवर्तिकाच, । अहा! माझी ही चंद्रिकाच साच!! १०७
बाष्पधाराजलबिंदुसंततींहीं, । रचित हारावलि कुचतटावरी ही,--
कालवदनीं मी गवसतांच हाय! । त्वरित आली संजीवनी सहाय. १०८
तुझ्यासाठीं जो जन निबद्ध झाला, । मुक्त केलें प्रियसखे! तूंच त्याला.
अहा! कळला प्रियसंगमप्रभाव, । तसा दुष्टांचा अधम तो स्वभाव. १०९
पूर्वजन्मार्जित वैरि दुराचार, । त्यजुनि धर्मन्यायही सदाचार,--
स्वयें पडतां नरकांत त्या खलानें, । स्पर्श केला मज कुटिलता–बलानें. ११०

'सखे! होउनियां राज्यविभवकामी, । दुरात्म्यानें तुज मारिलें अहा! मी;'
असा मजवरि आणिला दोष थोर; । ह्मणुनि झाला हा दंड मला घोर. १११
प्रकट होतां मुखचंद्र तुझा बाले! । त्वरित अयशस्तम सकल नष्ट झालें.
हर्ष वाटे सन्नयनचकोरातें, । दुष्टकौशिक पळतात दशदिशातें. ११२
येइं येईं गे मम प्राणभूते! । त्वरित आलिंगीं विकल या तनूतें.
ईशचरणीं मम एक याचना ही, । 'विरह होवो नच आमुचा कदाही.' ११३
अशी वाणी बोलला गुणवतीस, । तोच आलिंगी वरतनू पतीस,
प्रेमधाराजल वर्षली अपार, । कंठ होई बाष्पावरुद्ध फार. ११४
नाथ-वक्षस्थल-निहित-मस्तका ती, । उचितवृक्षाश्रित काय सुभग जाती;
वदे वाणी सविनया त्यास गोड, । त्वरित त्याचें जी पुरवि सर्व कोड. ११५
'नसे तुह्मां प्रिय जिच्याविण कांहीं, । मंदभाग्या आपली चंद्रिका ही;
जिच्या दोषानें थोर हा अनर्थ, । प्रिया! तुह्मांवरि येइ अहा! व्यर्थ. ११६
मनीं योजुनियां कपट नाटकातें, । मला कमला ने अंबिकालयातें.
मृगी सांपडतां व्याघ्र जसा रानीं, । तसें केलें दुष्कर्म दुर्जनांनीं. ११७
दुर्जनांचा अग्रणी दुराचार-- । करी तेथें मजवरी बलात्कार;
प्रिया! कमलेला घेउनी कटांत, । खलें आह्मां पाडिलें संकटांत. ११८
परी दीनांचा एक पुरस्कर्ता, । साधु लोकांचा सकल दुःखहर्ता,
सर्वसाक्षी तो तें न बघे काय! । तोच संकटसमयास ये सहाय. ११९
मित्र अपुला हा साधु मित्रचंद्र, । सर्व लोकातें जेंवि पूर्ण चंद्र,
येइ अवचित त्या अंबिकालयातें; । त्यास धिःकारुनि मुक्त करी मातें. १२०
निघे सदना मजसवें साधुवृत्त, । कळे आह्मांते तोंच हें कुवृत्त;
ह्मणुनि आलों धांवून या स्थळाला; । तरी अपुला मुखचंद्र दृश्य झाला' १२१
वदे सत्वर तो मित्रचंद्र त्याला; । 'त्वरित आलिंगीं दीन या जनाला;
खलानें जो योजिला कपटबंध, । अहा! ईशें तो नाशिला सबंध. १२२
सरलहृदया ही विमलराजबाला, । तिचा धरितां अभिलाष त्या खलाला,--

करी सर्वात्मा ईश थोर दंड; । पडो पापी नरकांत तो अखंड. १२३
जसा ज्योत्स्नेसह चंद्र राहुमुक्त, । तसा संकटमुक्त तूं प्रियायुक्त;
तुला पाहुनियां होय बहुत हर्ष, । जणों तनुवरती होय सुधावर्ष! १२४
सर्व वार्ता ऐकुनी सुखकरा हे, । भूप धावुनि इकडेच येत आहे;
उचंबळलें सुख अन्तरीं अमूप. । ह्मणुनि दिसतो हा सुप्रसन्न भूप.' १२५
बघुनि कन्येसह कुशल वसन्तातें, । तोष झाला अत्यन्त नृपवरातें;
क्षेम देई मग शीघ्र त्यास भूप; । देत विप्रांतें तेंवि धन अमूप. १२६
पुत्रभूता एकली प्रियसुता ते, । राज्य सारें अर्पिलें तिला तातें.
निघे नंतर नृप काननां तपार्थ, । वदे जामाता ' माग अभीष्टार्थ.' १२७
तदा बद्धांजलि वदतसे वसन्त, । बोल ज्याचे परिसतां तुष्ट सन्त;
' प्राप्त झाली प्रियचंद्रिका पुन्हा ही, । तशी होई चारित्र्यशुद्धि पाही. १२८
करी आह्मां अपकार जो उदंड, । दुष्ट तोही पावला योग्य दंड;
नसे प्रियकर याहून मला कांहीं, । असो संतत तरि उक्ति मंगला ही. १२९
उदक वर्षुनियां विपुल योग्यकालीं, । करो अंभोधर भूमि पाकशाली;
न्यायनीतीनें वागुनी नृपाल, । करो पालन भूमिचें सर्वकाल.' १३०

——————— श्रीपाद नारायण मुजूमदार बी. ए.

## वेदाध्ययनानंतर शिष्यास गुरु उपदेश करितात.

( आर्या. )

वत्सा ! सत्य वदावें; आचरणीं धर्म नित्य पाळावा;
शिकलासि आजवरि जें त्याचा अभ्यास त्वां न सोडावा. १
प्रिय दक्षिणा गुरूला देउनि मग तूं गृहस्थ-आश्रम घे;
चाले सुवंश तेणें ऋण पितरांचें न राहतें मागें. २
सत्यपराङ्मुख तैसें धर्मपराङ्मुख कधीं न त्वां व्हावें;
जें जें कल्याणप्रद तें केल्याविण तुवां न राहावें. ३

ऐश्वर्यलाभदायी सन्मार्गाला कधीं न सोडावें;
शास्त्रकलाध्ययनीं त्वां दक्ष असावें, जनास शिकवावें. ४
देवांचीं पितरांचीं कार्यें आहेत जीं करायाचीं,
तीं हव्य-कव्य-कर्में करिं तूं, तुज होय जोड सौख्याची. ५
माता दैवत आहे, आचरणीं मातृदेवभक्ति करीं;
देवासम ताताला मानीं, पितृदेवभक्ति चित्तिं धरीं. ६
गुरु तर देवाचि आहे, देवासम नित्य त्यासि पूजावें.
अतिथीस देव मानुनि गौरव करुनी तयासि सुखवावें. ७
व्यवहारीं लोकीं जीं कृत्यें असतील चांगलीं मान्य,
वत्सा ! तींच करीं तूं, परि न करीं होत जीं जनीं अन्य. ८
आहेत आमुचीं रे ! जीं कृत्यें चांगलींच पुण्यकर,
वत्सा ! तींच करीं तूं, परि न करीं आमुचींहि जीं इतर. ९
आह्मांहुनि जे कोणी श्रेष्ठहि असतील थोर मान्यवर,
बा ! आसनादि देउनि त्यांचा सन्मान ठेविं तूं फार. १०
दान करीं श्रद्धेनें, श्रद्धा—दानांत पुण्य रे ! थोर.
श्रद्धा जरि तुज नसली तरिही देईं, करीं सदुपकार. ११
संपद्विभवीं देईं; लज्जेनें देइं; भीतिनें देईं;
प्रेमें स्नेहें देईं; दान करुनि धन्य रे ! जनीं होईं. १२
धर्माचरणीं अथवा कुलधर्मीं पावुनीहि मोहातें
जर संदेह तुला कीं—काय करूं वा करूं नये—वाटे, १३
तर जे विमृश्यकारी क्रोधरहित जे नियुक्त वा इतर
नीतिज्ञ धर्मबुद्धी कोणी असतील जे जनीं थोर, १४
ते वागतात जैसें त्वांही तेथें तसेंचि वागावें;
शिष्टाचार असा हा पाळी जो तोचि धन्यता पावे. १५
लोकापवाद—दूषित त्यांसह वर्तन कसें असावें तें

बा ! न कळे तुज कांहीं जेव्हां होईल मोह चित्तातें, १६
तेव्हां विमृश्यकारी क्रोधरहित जे नियुक्त वा इतर
नीतिज्ञ धर्मबुद्धी कोणी असतील जे जनीं थोर, १७
त्यांचें वर्तन कैसें असतें तें पाहुनीहि त्वां तैसें
वागावें हें उत्तम; आचरणीं हाचि मार्ग उचित असे. १८

आदेश हा धर्म व शास्त्र यांचा; । हा आमुचा बा ! उपदेश साचा;
हें सर्व वेदांतिल सार पाहें; । ही ईश्वराज्ञा सकळांस आहे. १९
कर्तव्य हें नित्य तुवां करावें, । कीं हें तुझें जीवित धन्य व्हावें.
आम्हीं तुला जें कथिलें कृपेनें, । वत्सा ! करीं तें दृढ निश्चयानें. २०

धरिं सदा उपदेश मनांत रे ! । मग सुखें भवसागर हा तरे.
विमल पावन वर्तन आचरे. । विभु तुला यश देइल साच रे ! २१

मल्हार खंडेराव चिटणीस बी. ए. एल्. एल्. बी.

## बागेंतील फुलपाखरास.

### श्लोक.

मनोहर किती तुझा मधुर वर्ण हा शोभतो !
सुरेशधनुकांतिला रुचिरताबळें मोहितो;
सतेज नयनांबुजद्वय शिरीं चकाके किती !
तुझी सकल गोजिरी तनुचि गुंगवीते मती. १

तुला निरखितां दिसे प्रतिपदीं नवें, चांगलें-
शरीर तव, काय हेममणिमाणिकीं कोंदलें ?
भुले मन विलोकितां क्षण तिथेंचि तल्लीन तें;
स्वभावरमणीयता मन बळेंचि आकर्षिते. २

प्रकाश रविचा पडे, परिमळें भरे वासितें-

अशा उपवनीं तुला बघुनि खेळतां वाटतें,–
यदर्थ झटती जगीं सकल जीव हे, सौख्य तें–
विलोलुप पदीं तुझ्या, तुजसवें सदा नांदतें. ३

अहा ! विविध रंग हे कुशल चित्रकारें कुणी–
दिले तुज ? कृतार्थ तूं खचित सुंदरा जन्मुनी !
गुणार्णव जयासि हा नटवि रम्य इच्छावशें,–
जगत्पटिं, तया पहा सकल आदरीती कसे. ४

मनीं कधिं न ठाउकी तुजसि काळजी, बा गड्या !
खुशाल वनिं मारितां नवलतानिकुंजीं उड्या;
न पक्ष तव हे, खरे मिरविसी तयाचे जनीं–
यशोध्वजचि, जो तुला निपजवी जगाचा धनी. ५

कुठें तनु तुझी ! कुठें अखिल विश्व हें एवढें !
किती तव महत्त्व तें सकल या जगाच्या पुढें !
दयार्णव परी तुला विसरला नसे पांखरा.
भिजे कणहि रेणुचा जळिं, न पारखा सागरा. ६

पहा विकसली कशी सुमनराजि ही सुंदर !
हितास्तव तुझ्याचि बा तुजसि वाहते सादर;
इथें विहरसी सुखें, विहर तूं सख्या, एकला--
मुखें मधुमरंद सेवित फुलांतला चांगला. ७

परंतु मति पांखरा, मम शिरे तुझ्या चिंतनीं,
भय प्रबल जें करी विकल चित्त अन्यक्षणीं;
मृणालवपु हें तुझें परम सुंदर प्राणिया !
कृतांतखरपाश सज्ज असतीच ओढावया ! ! ८

———————

दातार.

## सुभाषित.

आर्या.

जल, अन्न, सुभाषित, हीं रत्नें तीनच महीतलीं जाणा;
परि देति रत्नसंज्ञा मूढ पहा हो ! वृथैव पाषाणां. १

संसृतिबंध सुटावा, इच्छिसि तूं साच हाच अर्थ जरी;
श्रीरामपदांबुजयुगीं मन गढवीं करुनि निग्रहास तरी. २

संसार असार, तरी सार अशीं त्यांतही स्थळें चार;
काशीवास, शिवार्चा, गंगोदक, सुजनसंग, साचार. ३

स्तुति अद्यापि कुमारी राहे; न वरी असज्जनाला ही,
सज्जन हीस रुचे, पण न रुचे नवरीच सज्जनाला ही. ४

खल छिद्र करी, गुणवान् सज्जन झांकी तयास; हें बघुनी,--
खल अगरडें सुईचें, सज्जन नेडें, असें गमे स्वमनीं. ५

भृंग.

---

श्रीमच्छंकराचार्यांचा एका मुलास

## तत्त्वोपदेश.

श्लोक.

सांगें कोण मुला ! प्रकाशद तुला ? आदित्य मातें दिवा.
रात्रीं ? वन्हि, दिवा. तयांस बघण्या कोणी असे कीं, न वा ?
डोळे. ते मिटल्यावरी कवण बा ? बुद्धी, पहाया तिला--
तेथें मीच. जगत्प्रकाशक तरी तूंचि प्रभो ! एकला. १

विहंगम.

---

# काव्यरत्नावलि.

अंक १२ वा.


## सालअखेर.

( कवितेचा निरोप. )

श्लोक.

( सुंदरीवृत्त.* )

करुणा करुनी प्रभो ! तुवां । मज रत्नावलि जी दिली नवा,
सरले सर हे तिचे दहा । अणखी सात; तुझा प्रसाद हा. १
सदया ! उदयास आणुनी । नव वर्षीं करिं मान्य ही जनीं;
नग आन गळां न माझिया । नव बा ! यास्तव तेज दे यया. २
रसिका ! नव कामिनीपरी । न रुचे का तुज काव्यसुंदरी ?
धरिं हीस करीं रमावया; । टपला काळ हरावया वया. ३
भजले मज विक्रमादिही, । धरिलें मत्पद मस्तकीं तिहीं;
परि ती परितप्त अंतरीं । फिरते दीन अजी घरोघरीं. ४
न नृपाश्रय संप्रती मला, । नच विद्वज्जनिं मान राहिला,
इतरीं परनेयबुद्धिता; । वद ठेवूं पद कोठ सुस्थिता? ५
रसिकत्व कवित्व रोकडें । द्वयही येइ अजी कवीकडे;
रचितां कविता कवी बने, । रसिकाचें करि काम वाचनें. ६
कुसुमें लतिकाच झोलिती, । मधुपानें कमलेंच डोलती,
कुचमर्दनिं दंग कामिनी, । रसिकांचें रसिकत्व जेमनीं. ७

---

* अयुजोर्यदि सौ जगौ युजोः । सभरागौ यदि सुंदरी तदा. छंदोमंजरी

अयि ! विश्वविधातृधातया ! । करिं बापा ! मनुजांवरी दया;
रसना विविधान्नसेवना । करिसी देउनि काय वंचना; ८
कवितारससेवनावहा । रसना देसि न, हानि ही महा;
कवितामधुमाधुरीभयें । धरि नाकीं वसती सुधा स्वयें. ९
दिसतें सुमगंध घ्यावया । दिधलें नाक तुवां विधे ! यया;
परि काव्यसुगंधसेवना । करिसी कांहिंच कां न योजना ? १०
दिधलें वरनेत्रयुग्म यां । रमणीया निज सृष्टि पाहया;
परि एक[१]हि कां न अर्पिलें, । कविसृष्टी बघण्यास जें भलें ? ११
जनहो ! स्थिति भूषणास्पदा । दिसते का तरि ही तुह्मां वदा;
कविता सकला कलांतली । पहिली पायरि का न पावली ? १२
तुमच्या रमवूनिया मना । पुरवी कोणति ही न कामना ?
जगदीशगुणांस गावया । शिकवी कोण कवी त्यजूनिया ? १३
कवि दे अमृतत्व हा गरा । सुखहेतुत्वहिं दुःखसागरा;
वितरी विभवा धनाविना; । हरि सारी विपरीत भावना. १४
विषयोन्मुखता निसर्गजा, । परि धीरोन्नत वृत्ति यत्नजा;
जरि इच्छितसाल उन्नति, । कवि अव्हेरुनि केंवि होय ती ? १५
वितरून मनास शक्तिला । उपदेशी निजदेशभक्तिला;
जननी निखिलां गुणांसही । कविता देशिच वस्तु का न ही ? १६
असलीं तरुंचीं घनें वनें । तरि पोसा लतिकेस जीवनें;
न तरू खुलतो तिच्याविना, । न फिटे वा जनदृष्टिपारणा. १७
तव कार्य रसज्ञनायको[२] ! । शुभरत्नावलिलाभदायको !
गमतें मज जीवितापरी; । तव निष्ठाधृतिला नसे सरी. १८
कविभूपविनायका[३] ! वरा ! । मतिमोहप्रदचंद्रशेखरा[४] !
दुसरे कविवाचकादिहो ! । प्रभु इष्टप्रद तो तुह्मांसि हो. १९

---

१ नेत्र. २ संपादक यांचे संबोधन. ३ विनायककवि. ४ चंद्रशेखरकवि.

फल होय विनाशि देखत, । परि कर्त्तव्यमहत्त्व शाश्वत;
स्मरुनी भगवत्पदा पहा । निज कर्मी रत व्हा; निरोप हा. २०

विहंगम.

---

## मेघनादवधकाव्य*.

### सर्ग ४ था.

( इंद्रजित् श्रीरामलक्ष्मणांशीं युद्ध करून त्यांत जय मिळवील या भावी आशेवर लंकेंतील सर्व लोक आनंदोत्सवांत मग्न आहेत; श्रीसीता अशोक वनांत शोक करीत आहे; व आपली सखी सरमा हिनें विचारल्यावरून तिला लंकेंत येण्यापूर्वी झालेली सर्व हकीकत सांगत आहे.

आर्या.

भारतकविकुलतिलका ! आदिकवे[1] ! करितसें तुला नमन;
गुरु तूं सकल कवींचा ध्याउनि तरले तुला असंख्य जन. १
श्रीहर्ष, बाण, दण्डी, भर्तृहरी, कालिदास, भवभूति,
तुझिया कृपाप्रसादें गेले मिळवुनि चिरंतन[2] ख्याति. २
तव काव्योपवनींचा मेळवुनी कल्पनाकुसुमराशि,
रचितों हार मनोहर; दे दासा दीन कविवरा ! आशी[3]. ३
रम्या सुवर्णलंका होती आनंदसागरीं न्हाली,
वाजति वाद्यें बहुविध; वाटे दीपावली पुन्हा आली. ४
प्रतिसदनीं जन झाले त्या रात्रीं मग्न नृत्यगीतांत;
कोणी मदिरापानीं, कोणी गेले गढूनि सुरतांत. ५
माला रम्य फुलांच्या नयनातें रमविती प्रतिद्वारीं;
ध्वज उडती सदनांवर, पुष्पांची वृष्टि होय शुभकारी. ६

---

* या काव्याचा ३ रा सर्ग १० व्या अंकांत आलेला आहे. १ वाल्मीकि २ अक्षय्य ३ आशीर्वाद.

होते जागृत सारे लंकेंतिल बालवृद्ध त्या रात्रीं;
निद्रादेवी गेली लंकेतें सोडुनी विमलगात्री. ७
" श्रीरामलक्ष्मणांतें वधिल उद्यां मेघनाद समरांत,
जिंकुनि बिभीषणातें, घेइल तो धन्य ह्मणुनि अमरांत. " ८
" लंकाचंद्रकलेचा केला श्रीरामराहुनें ग्रास,
त्यांतूनि मुक्त होउनि दाविल ती तेज सर्व विश्वास. " ९
लंकापुरींत होती आशा हें गीत गात सर्वत्र;
गेली अशाप्रकारें असुरांची उत्सवांत ती रात्र. १०
सीता करीत होती शोका एकाकिनी अशोकवनीं,
विरहव्यथा तियेला दारुण हो वर्णवे न ती कवनीं. ११
विहरे निःशंक वनीं व्याघ्री टाकुनि जशी मृगी विकल,
सोडूनि जानकीतें उत्सवरत राक्षसी तशा सकल. १२
खनिगर्भी[1] हीनप्रभ[2] राहतसे जेंवि सूर्यकांतमणि,
पर्णकुटींत तमोमय होती निस्तेज तेंवि ती रमणी. १३
सीतावस्था पाहुनि मारुत उच्छ्वासुनी विलाप करी,
दुःखें तरु मरमरती[3], खगगण गाई न मूकभाव धरी. १४
बसतां विषण्ण सीता आली तेथें उदारधी परमा,
रक्षःकुलराजश्री असुरवधू सुंदरी सती सरमा[4]. १५
" रत उत्सवीं जहाल्या, गेल्या देवि ! त्यजूनि तुज दासी,
परिसुनि हें मी आल्यें, पूजायातें त्वदीय सुपदांसी. १६
द्यावी आज्ञा मजला भालीं सिंदूर तिलक लावाया,
या वेषा उचित न तूं असुरपती छळितसे तुला वाया. " १७
वदुनि असें मग लावी सरमा सीतेचिया तिलक भालीं;

---

१ खाणीच्या पोटांत २ निस्तेज ३ ' मरमर ' शब्द करिती ४ बिभीषणाची स्त्री; ही सीतेला श्रीरामाचें कुशलवृत्त सांगत असे.

दे शोभा वदना तो गगना तारा जसा निशाकालीं. १८
" दोष न दशाननाचा, मार्गी मी फेंकुनी दिले हार,
स्वर्णालंकार तसे दुष्टें करितां वनांत अपहार. १९
भूषणचिन्हांवरुनी यावे लंकेस नाथ हा हेतु;
जाणुनि तो पतिरायें शोधियला मार्ग, बांधिला सेतु. २०
मुक्तामणिहार सखे ! मजलागीं सांग काय कामाचे ?
जरि ते दुरावले गे ! मजपासुनि दिव्य चरण रामाचे !" २१
" धालें परिसुनि विधुमुखि ! मधुर तुझें तें स्वयंवराख्यान.[1]
विपिनीं वसलीस कशी सांग सखे, हरुनि ने तुला कवण ?" २२
सरमे ! हितैषिणी तूं मत्पूर्वकथा समस्त परिसावी;
वचन वदे वैदेही जणु गंगा गोमुखांतुनी[2] यावी. २३
" पंचवटी घोरवनीं होतों गोदावरीतटीं आम्ही –
वास सुखें करित सदा मी माझे परमपूज्य गे ! स्वामी. २४
होते वनांत अमुची प्रेमें सेवा करीत भावोजी;
आणूनि नित्य देती सेवायातें फळें मुळें ताजीं. २५
प्रभु जाती मृगयेतें परि घेती जीव ते न जीवांचा;
' करुणासागर ' राघव विदित जगातें स्वभाव हा त्यांचा. २६
कन्या मी राजाची तुच्छ परी राजवैभवा मानीं;
राम वनाचा राजा मी त्याची तत्परायणा राणी. २७
सांगूं काय तुला मी वैभव सखये ! मदीय उटजाचें !
फुलती फुलें सभोंतीं भ्रमरतती त्यांवरी सदा नाचे. २८
प्रात:कालीं कोकिल मधुरालापें करी मला जागी;
सांग अशी कोणाची राणी धन्या जगांत सुख भोगी ? २९

---

१ यापूर्वी सीतेनें हें वृत्त सरमेस सांगितलें असें कवीनें गृहीत धरलें आहे. २ हिमालयांतील एक गंगेचें मुख; सीतेच्या वचनाला गंगेच्या ओघाची उपमा दिली आहे.

पसरुनि दिव्य पिसारा नाचे हर्षें मयूर मद्वारीं;
येती खग मृग अतिथी आदरिलें त्यां सदैव सत्कारीं. ३०
पुष्पांचे रम्य सखे ! करुनि अलंकार घातिले इतुके–
कीं, मूर्तिमती आली वनदेवी नाथ बोलले कुतुकें. ३१
हाय ! मला पाय पुन्हा दिसतिल ते परमपूज्य सांग कसे ?
क्रूरा ! दैवा ! छळिसी कां मजला या अभागिनीस असें ? " ३२
वदतां असें सतीच्या नयनांतुनि अश्रु खळखळां गळले;
पाहुनि तिची अवस्था सरमेचें हृदय फार खळबळलें. ३३
पूर्वकथास्मरणानें व्यथित तुझें मन जरी सये ! होतें,
कर पुरतें, थांब, नको, त्याहुनि मग मरणही बरें हो ! तें. ३४
जरि म्यां न गे ! रडावें तर मग वद ती रडेल कोण दुजी ?
कथियें दुर्दैवाची सरमे ! तुज काहणी समस्त अजी. ३५
" जलें[1] तुंबतां तडागीं फोडावा लागतो जसा पाट, "
हृदयस्था दुःखातें द्यावी लागे रडूनियां वाट. ३६
पंचवटीकांतारीं वसतां सौख्यें अनंत अनुभविलीं;
स्वप्नीं वनदेवींचीं मंजुळ गाणीं मनोहर श्रविलीं. ३७
येति कधीं ऋषिपत्नी साध्वी प्रेमें मदीय उटजाला;
त्यांचा पुण्यसमागम हृदया आनंद वितरिता झाला. ३८
केव्हां सुखें बसें मी अजिनासन घालुनी तरूखालीं,
छाया सांद्रे[2] तरूची सखये ! मज सहचरीपरी झाली. ३९
केव्हां कुरंगिणींच्या संगें एकाकिनी करीं खेळ,
मंजुल कोकिलकूजित अनुकरुनी दवडिला कधीं वेळ. ४०
केव्हां तरुण तरूंचे लावितसें मी विवाह लतिकांशीं,
केव्हां फिरें प्रभूच्या सांगातीं मी सरित्तटापाशीं. ४१

---

१ ही मयूरकवीची पंक्ति येथें कायम ठेविली आहे. २ दाट.

नाथासवें कधीं मी विहराया पर्वतावरी जाई,
प्रभुच्या वचनसुधेतें सेवुनि आनंद मानसीं होई. ४२
कैलासीं नित्य उमा परिसे त्र्यंबकमुखें कथा नाना,
तैशा मी ऐकतसें; आतांही भास होतसे कानां. ४३
हा! दैवा! फिरुनि न का कानीं पडणार ती मधुर वाणी?
आणी ऐसें वदुनी शोकाकुल लोचनां सती पाणी. ४४
परिसुनि तव रम्य कथा ये माझ्या जानकी! विचार मनीं,
सोडुनि राजविलासा वास करावा सदा सुखांत वनीं. ४५
फिरतां उज्ज्वल शशिकर कांतारीं तिमिर गे! लया जाय.
सीते! तव सान्निध्यें वनचर सुख पावले नवल काय? ४६
राघवदयिते! सीते! केलें तव दशमुखें कसें हरण?
सांग; मला सेवाया वचनामृत उत्क[1] जाहले कर्ण. ४७
" असतां अशा रितीनें पंचवटीकाननांत सुखमग्न--
येउनि शूर्पणखेनें, अमुच्या सौख्यांत आणिलें विघ्न. ४८
सरमे! मन्मन शरमे स्मरतां तत्कृत्य ती जळो नष्टा!
श्रीरामास वराया सजली स्त्रीकुलकलंकिनी दुष्टा!! ४९
घेउनि धनुष्य तीतें उठले दंडावयास भावोजी,
आले धावुनि राक्षस तों; तेथें प्रबल मातली आजि[2]. ५०
शिरलें उटजीं परिसुनि भयकारक मी धनुष्यटंकार,
पतिरक्षणार्थ केला नम्रपणें देवतां नमस्कार. ५१
इतुक्यांत एक दिसला कांचनमृग आश्रमापुढें मातें,
त्यातें आणुनि द्या हो; वदलें मी आग्रहेंच रामातें. ५२
मातें सांभाळाया ठेवुनि ते आश्रमांत अनुजाला,
गेले हरिणामागें; वायुगतीं आर्तनाद तों झाला. ५३

१ उत्सुक. २ युद्ध.

" असती संकटकालीं वद कोठें लक्ष्मणा ! सख्या ! बंधो !
मरतों येरे ! मजला ताराया धावुनी दयासिंधो ! " ५४
परिसून आर्त वाणी वदलें, " बसलांत भाउजी ! काय ?
जाहो जा शीघ्र तुह्मी; सांपडले संकटांत रघुराय ! " ५५
" आर्ये ! टाकुनि तुजला विपिनीं एकाकिनी कसें जावें ?
राक्षस तो, मृग नोहे, मातें विनवूं नको वृथा, पावें. " ५६
वदती हें लक्ष्मणजी तों फिरुनी नाद परिसिला कानीं,–
' हा सीते ! हा लक्ष्मण ! ' जाय दणाणून विपिन हाकांनीं. ५७
झालें अधीर हृदयीं ताडियलें त्यां[1] कठोर वचनांहीं;
" रे ! निर्दया ! कठोरा ! कैशी करुणा नये तुला कांहीं. ५८
होसी पुरुष कशाला वीरकुलाला कलंक लावाया ?
तुजहुनि बरवी वाटे स्त्री, धरिसी हें धनुष्य कां वाया ? ५९
पाहूनि एकली मज किंवा शिवलें तुझ्या मना पाप ?
ह्मणवूनि ताप देसी, तीव्र, मदांधा, पतिव्रताशाप ! " ६०
" शिवशिव ! या अशिव अशा वचनां माते ! वदूं नको पावें;
अपराधी बालक मी नसुनी त्वां व्यर्थ काय कोपावें ? ६१
जरि पापबुद्धि केव्हां क्षणही शिवली असेल हृदयास,
अंधत्व शीघ्र येवो किंवा जगदीश संहरो यास ! ६२
आज्ञा तव मान्य मला माते ! सौमित्रि बोलला रागें,
जातों शोधायातें श्रीरामा; आश्रमीं जपुनि वागें. " ६३
" बसल्यें सचिंत उटजीं वाट पतीची पहात एकांतीं.
तेजस्वी पुण्यात्मा तों नरवर देखिला बहिःप्रांतीं. ६४
हातीं दंड कमंडलु भस्म शरीरीं शिरीं जटाभार,
साष्टांगप्रणिपाता करुनी केला तदीय सत्कार. ६५

---

१ लक्ष्मणाला.

घालीं भिक्षा मजला रघुदयिते ! पावलों बहुत कष्ट,
आहें क्षुधार्त वदला ऐसें तो कपटनाटकी दुष्ट. ६६
योगी नच तो रावण कालफणी झांकिला फुलांखालीं,
कळतें मजला हरहर ! तर मी नमित्यें न त्या कदाकालीं. ६७
" ध्यावा विश्राम जरा बैसुनि या आसनीं महाभागें,
येतील राक्षसांतें जिंकुनि रघुवीर सत्वरी मागें. " ६८
' घालीं मजला भिक्षा सत्वर झालों क्षुधापिपासार्त,
अन्यस्थलास जातों नाहीं तर; ' बोलला मला धूर्त. ६९
' अतिथीपूजन हें व्रत रघुवंशाचें प्रसिद्ध या लोकीं,
विन्मुख जाऊं देसी मातें; देईन शाप अवलोकीं. " ७०
भयकातर मी झालें, भिक्षाद्रव्यास घेउनी आलें--
बाहेरी, तों मातें धरिलें त्यानें अहा ! कपटजालें. ७१
मजला धरी सखे ! तो सिंह जसा क्रूर धरितसे हरिणी,
रडलें मी ओरडलें परि न कुणी धांवला मदुद्धरणीं. ७२
गेल्या जटा शिरींच्या, हातींचा तो कमंडलू पडला,
सारथिच्या वेषानें उचलुनि मज तो रथावरी चढला. ७३
कालफणीच्या वदनीं भेकी[1] तैशी करीं तयाच्या मी;
गेलें बुडून शोकीं, आठवुनी मानसीं प्रिय स्वामी. ७४
रथ चालतां भरारा दिधलीं फेंकून भूषणें सकल,
ह्मणुनी वेष असा मम अन्यातें दोष लावणें विफल. ७५
" शद्बवहा[2] आकाशा ! माझी नाथास सांग तूं वार्ता;
पतिरायास निवेदीं पवना ! मी जाहलें किती आर्ता. ७६
मेघा ! शद्ब भयंकर करुनी नाथास हांक तूं घालीं;
गुंजारव कर कर्णीं भ्रमरा ! प्रभुच्या दुजा न मज वाली. ७७

१ बेडकी. २ शद्ब दूरवर नेणाऱ्या.

पाडावें अबल प्रजेस उघडें, तें राजवाडा उठे;
झाला एक धनी गिळून बसतो सर्वस्व कष्टार्जितें. २

साक्षी देव, न राज्यलोभ धरुनी मीं घोर केलीं रणें;
न व्यक्तीस्तव रक्तपात घडला, साऱ्या जनाकारणें;
मेले कोण ह्मणेल बंधु पडले देशार्थ जे संगरीं ?
त्यांची कीर्ति जगांत गाजत असे; सुस्थान त्यांना वरी. ३

स्वर्गीं सर्व जन स्वतंत्र; न कुठें कारागृहें, शृंखला;
स्वर्गीं थार न, बांधवा तुडविती सत्तामदें, त्या खलां;
स्वर्गद्वार खुलें न वैरकलहा; प्रेमैक सर्वांतरें;
स्वर्गीं देव पिता; अभेद भजती त्याचीं तया लेंकरें. ४

साहेना परबंधनांत पडली माझी महाराष्ट्रभू.
केला यत्न निमित्त केवळ तया मी; साह्य झाला प्रभू;
त्याचें कार्य तयें स्वयें घडविलें; स्वातंत्र्य पात्रां दिलें,
सोसाया परतंत्रता जगविलीं मागें तियेचीं मुलें. ५

स्वातंत्र्यास्तव कां उगाच करितां हा आरडा ओरडा ?
देशाचा अभिमान सर्व तुमचा मातें दिसे कोरडा.
स्वर्गीं लाजविले स्वपूर्वज तुह्मी; ते आंसवें ढाळिती;
कीं आले खर भारवाहक असे पोटीं मनुष्याकृती. ६

कोठें मालुसरे सहोदर, कुठें हे मावळे आजचे ?
बाजीब्राह्मणवंशजांस बघतां उत्साह सारा खचे.
वीरांनीं पहिल्या स्वभूजननिला जीवंत केलें खरें;
आतां प्रेत तिचें चिरीत बसलीं त्यांचीं मुलें लेंकरें ! ! ७

एकी जाय लया; परस्पर नसे विश्वास तो राहिला;
कोणाला न पुसे कुणी; निजहितीं जो तो दिसे गुंगला;

वाढे मत्सर; लोभदृष्टि अवघे; साहे परोत्कर्ष न;
झालें काय अशा गुणें स्वजनतास्वातंत्र्यसंपादन? ८

कष्टाचें फल वांछिलें न; नृपता मातें प्रभूनें दिली;
ती त्याची समजून, मीं निजशिरीं अत्यादरें वाहिली;
प्रेमें वागविली प्रजा; मजसवें तीही तशी वागली;
होती भूषण, तीच दूषण परी आतां दिसूं लागली! ९

मी माझी ह्मणवीतसें, बघवतें आतां न ती लोचनीं;
कां हाका मज मारिते, न कळतें, वर्षांत एका दिनीं;
माझी का प्रतिमा वृथा बसविते बाहेर सिंहासनीं?
देशप्रीति मनीं नसून, यश का येई अशा साधनीं? १०

मी केलें, करणार काय, अवघी सत्ता प्रभूच्या करीं;
त्याला आळविणें नको, वळखतो तो भक्ति खोटी खरी;
स्वातंत्र्यक्षम होय सर्व जनता जाणेल जेव्हां प्रभू,
तेव्हां वेळ नको स्वतंत्र, सुभगा व्हाया महाराष्ट्रभू. ११

विनायक.

---

## मनोवृत्ति.

पद.

टाकिली यानें सुंदर तंबोरी । तरी का मदन पळे दूरी!
सुरांची केली ज्यानें भंवेरी । जनांची काय तिथें थोरी?
कोपुनी त्याला मारी मदनारी । प्रकटे मनांमधीं स्वारी!
बिचारी जड ती! केवळ तंबोरी । प्रबळ हा दिसे फार वैरी! १
मनाच्या वृत्ती मन त्यांला मारी । तरी मरतात असुखकारी! ॥ धृ ॥
टाळही तैसा तालातें दावी । समता तयाप्रती ठावी;

मदनकृतलीला प्रभुलीला गावी । ताल तों सम दोन्ही भावीं.
तयाला कैसा दोष कोण लावी । संग बाधतो तया केंवी ?
आत्मभू किंवा मनसिज पदधारी । अनंगा अन्य कोण मारी ! ॥ म० ॥ २
तसा हा दंभ राहे नखऱ्यांत । नसे का साध्या वसण्यांत !
दिसे तो जैसा चाळाघोळांत । तसा तो दिसतो नेत्रांत;
राहतो प्रेमें जैसा माळेंत । तसा तो राहे हस्तांत;
नेसला साधें अथवा जरतारी । अशानें दंभ नव्हे दूरी ॥ म० ॥ ३
मदन जाळितसे नखरेबाजाला । जाळितो काय न इतराला ?
असे ही वृत्ती साऱ्या प्राण्यांला । सारखी पीडा सर्वांला;
असो तो साधा किंवा रंगेला । काम सोडिना मुळीं त्याला.
व्यापिलीं याणें जरि गात्रें सारीं । काय हीं साहिल्यें दुसरीं ॥ म० ॥ ४
सिंह रागानें बाणाला चावे । मारत्यावरी न तो धांवे;
साधनांलागीं कोपें ताडावें । आणि कर्त्याला विसरावें ?
अशानें कैसें इच्छित साधावें । वृथा कष्टांत गढुन जावें ?
हळू हळु यत्नें त्यांस दूर सारी । तरुनिया इतरांतें तारी ॥ म० ॥ ५

मोरो गणेश लोंढे.

## निद्रा*.

श्लोक.

जें मंदमंद विहरे कुळ[1] कोकरांचें,
कर्णां सुहर्षकर ते ध्वनि पावसांचे,
तें भृंग-गुंजन तसे सरिता-प्रपातें[2],
यांचें करी मधुरचिंतन मी मनांत ! १

* ही कविता वर्ड्स्वर्थ कवीच्या 'Sleep' या कवितेच्या आधारानें लिहिली आहे. १ कळप. २ धबधबा.

ती क्षेत्रपंक्ति; जलधी; मधुशद्ब वारें;
वर्फावली रुचिरवर्ण; असंख्य तारे;
चिंतीयले सकल मी मनिं सावकाश,
निद्रा नये मजपरी ! किति मी हताश ! २

आतां विभातिं झणिंया गृहवाटिकेंत--
गातील कोमल विहंगम गोड गीत !
ती कोकिला तशिच गाइल पंचमांत,
उद्विग्नता वरिल ऐकुनि यांस चित्त ! ३

मी कंठिल्या रजनि तीन तुझ्या शिवाय,
निद्रे ! मला सुचत नाहिं मुळीं उपाय;
युक्तिप्रयुक्ति करुनी जरि यत्न केले--
जिंकावया तुजसि ! निष्फल ते जहाले ! ४

यालागिं हे ! सकल—मानस—तापहंत्रि !
ये ! ये ! कृपाकरुनि ये ! तरि आज रात्रीं;
सौंदर्य सृष्टिंत विभातिं भरूनि जाई,
तें त्वद्विना कधिं मला कवणास मोही ? ५

निद्रे ! लया कठिनता दिनरात्र यांची--
नेतेस तूं, असुखता हरिं मानसाची;
तूं गे ! विचार—जननी असशी सुशांत;
ये ! ये ! अतां अझुनि पाहसि काय अंत ! ! ६

शंकर कृष्ण.

१ शेतांची रांग. २ घराजवळील फळबागेंत. हीं झोंप आणण्याची काल्पनीक साधनें आहेत.

## अन्योक्तिमाला.

### मयूर.

श्लोक.

तुझी वाणी नाहीं मधुर ह्मणुनी खिन्न न मनीं--
मयूरा त्वां व्हावें. बहुत तुजला मान सुजनीं.
प्रभा ज्याची रम्य: सुरधनुसही लज्जित करी,
पिसारा बा ! ऐसा रुचिर तव; आनंद वितरी. १

### गुलाबकलिका.

गे ! बाई दिससी गुलाबकलिके कां तूं अशी दुःखिता,
आहे गात्रलताचि कंटकयुता मानूं नको खिन्नता.
कामी दुष्ट जगीं अनेक टपले तारुण्य चाखावया,
ईशें कंटक हे ह्मणूनि दिधले त्यां योग्य शासावया. २

### जास्वंदी.

नाहीं अल्प फुलास वास तुझिया, हुंगी न त्यातें कुणी;
जास्वंदी ह्मणुनी तुला निशिदिनीं कां दुःख होई मनीं.
बाई ! पुष्प तुझें मनोहर, तुला ही देणगी उत्तमा;
रंगानें अपुल्या जगा शिकवितें सत्प्रीतिचा रक्तिमा. ३

### मूषक.

नाहीं आजवरी कुणी तुजकडे ढुंकूनही पाहिलें,
प्लेगें भाग्य परी तुझें उघडलें मातें गमे चांगलें.
भीती लोक तुझी मनांत धरिती बा मूषका संप्रति,
क्षुद्रांही अनुकूल काल असतां मोठे जगीं मानिती. ४

माधवानुज.

———————